# कुंतलपूरचे छोटे युवराज

लेखिका: सौ. गायत्री साळवणकर



a

# कुंतलपूरचे छोटे युवराज

## लेखिका- सौ.गायत्री साळवणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# कुंतलपूरचे छोटे युवराज


## सौ.गायत्री साळवणकर

172/ब, 'केदार,' जवाहरनगर,
कोल्हापूर, 416012,
महाराष्ट्र.
इमेल: gayatri.salvankar@gmail.com
मोबाईल क्रमांक: 8446800213



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १२ डिसेंबर २०२४

©esahity Pratishthan®2024

या पुस्तकाच्या छापिल प्रतींसाठी आपण **सौ.गायत्री साळवणकर यांच्याशी** 8446800213 या क्रमांकावर संपर्क करावा

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फाॅरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

a

# अनुवादिका परिचय



## सौ. गायत्री गिरीश साळवणकर

पुर्वाश्रमीची मी, उज्वला दिगंबर गुहागरकर,

जन्म: 16 जानेवारी 1963

शिक्षण: BCom.

पत्ता: 172/ब, 'केदार,' जवाहरनगर, कोल्हापूर, 416012, महाराष्ट्र.

हे माझे तिसरे पुस्तक. स्वतंत्र कादंबरी लेखनाचा हा पहिला प्रयत्न. काही बाल कविताही आहेत. दै. लोकसत्तामध्ये नियमितपणे 'लोक मानस' सदराखाली पत्रलेखन केले आहे. 6 में 2023च्या, लोकसत्ता चतुरंग पुरवणी मध्ये 'सोने चांदी आम्हा मृत्तिके समान' हा आपल्या शिक्षकांप्रती आदरभाव प्रगट करणारा लेख, तसेच 'दृष्टी आणि कोन''या सदराखाली लेख प्रसिद्ध. दिनांक 12 जून 2023 रोजी आकाशवाणी कोल्हापूर वर "माझे जीवन गाणे" या सदरात मुलाखत प्रक्षेपित

'स्वांत सुखाय' या ब्लॉगवर काही स्फुट लेखन प्रसिद्ध केले आहे. https://swantsukhay2245533.wordpress.com/

मला सकस, वैचारिक वाङ्मयाची विशेष आवड आहे.

कुंतलपूरचे छोटे युवराज ही कादंबरी, ही कादंबरी 'लिटल लॉर्ड ऑफ फॉटलेरॉय' या 1886 फ्रान्सिस हॉजसन बर्नेट या अमेरिकन लेखिकेच्या 1886 साली

a

लहान मुलांसाठी लिहिलेल्या जगप्रसिद्ध कादंबरीवर आधारित काल्पनिक कादंबरी आहे.

मुळ कादंबरी जागतिक पातळीवर 'बाल कादंबरी' या प्रकारात अव्वल स्थानी असून तिच्या आधारे कुंतलपूरचे छोटे युवराज ही स्वातंत्र्यपूर्व भारतातील एका काल्पनिक संस्थानाच्या पाश्र्वभूमीवर लिहिलेली स्वतंत्र मराठी कादंबरी आहे.

थोडक्यात वर्णन

आठ वर्षांचा सौमित्र सरदेशमुख हा मुलगा मुंबईतील फुलवाडी भागात आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर आईबरोबर सर्व साधारण परिस्थितीमध्ये राहात असतो. त्याचे आजोबा जे कुंतलपूर संस्थानाचे राजे असतात, त्यांनी सौमित्रच्या वडिलांना, त्यांच्या मर्जी विरूध्द सामान्य कुटुंबातून आलेल्या मुलीबरोबर लग्न केल्याने, राजघराण्यातून बेदखल केलेले असते. सौमित्रच्या दोन्ही काकांच्या मृत्यू नंतर तो एकटाच कुंतलपूर संस्थानाचा वारस उरतो. त्याचा शोध घेऊन राजेसाहेबांचे वकील त्यांच्या आई समोर राजेसाहेबांचा प्रस्ताव ठेवतात. सौमित्र कुंतलपूरचा युवराज म्हणून घोषित केला जाईल, त्यांची संपूर्ण जबाबदारी राजेसाहेब घेतील आणि त्याच्या आईला राहण्यासाठी स्वतंत्र घर आणि दरमहा खर्चासाठी रक्कम दिली जाईल. मुलाचा ताबा मात्र आजोबाकडे राहील. आपल्या दिवंगत पतीची इच्छा आणि मुलाच्या चांगल्या भवितव्यासाठी त्याची आई या गोष्टीला संमती देते मात्र स्वाभिमानाने राहत्या घरा शिवाय इतर काही स्विकारण्यास नकार देते. सौमित्रला या गोष्टीची माहिती दिलेली नसते. तो आपले आजोबा प्रेमळ, दयाळू, परोपकारी आहेत असे समजत असतो. प्रत्यक्षात मात्र परिस्थिती उलटी असते.

a

एका निरागस, निष्पाप बालकाचा भाबडा विश्वास, त्याच्या स्वार्थ परायण वृत्तीच्या, भावनाशून्य आजोबांना संपूर्णतः बदलायला कसा कारणीभूत होतो हे या कादंबरीत रंजकपणे मांडले आहे.

संपूर्णपणे बदलेल्या राजेसाहेबांपुढे एक नवीन पेचप्रसंग उभा राहतो. अचानकपणे एक स्त्री आपण त्यांच्या मृत झालेल्या मोठ्या मुलाची पत्नी असून त्यांचा मुलगा हा युवराजपदाचा हक्कदार असल्याचा दावा करते. सौमित्रचे मुंबईतील किराणामालचे वयोवृद्ध दुकानदार बापू शेठ, रस्त्यावर बुटपॉलीश करणारा हरहुन्नरी बबन हे दोन्ही मित्र एका नवोदित वकिलांच्या मदतीने, त्या स्त्रीचा डाव कसा उधळून लावतात हे जाणून घेणे मनोरंजन ठरणार आहे.


राजेसाहेबांनी आपल्या नातवाला उच्च कुलीन मूल्ये शिकवण्यासाठी योजना आखली होती. त्याऐवजी, सौमित्र आपल्या आजोबांना शिकवतो की उच्चपदस्थ खानदानी व्यक्तीने त्याच्यावर अवलंबून असलेल्यांबद्दल सहानुभूती बाळगली पाहिजे. सौमित्रने निष्पाप मनाने आपले आजोबा आजोबा प्रेमळ, दयाळू, परोपकारी आहेत असा विश्वास ठेवला होता, अखेर तो विश्वास राजेसाहेबांना प्रत्यक्षात तसे बनवायला कारण झाला.

या पुस्तकावरील आपल्या प्रतिक्रिया जाणून घ्यायला आवडेल. कृपया 8446800213 या क्रमांकावर त्या कळवाव्या. कोणाला याची छापिल प्रत विकत हवी असल्यास कळवावे.

गायत्री गिरीश साळवणकर

गायत्री गिरीश साळवणकर यांची यापूर्वीची दोन पुस्तके.

पुस्तकाच्या कव्हरवर क्लिक करताच ते उघडेल व वाचता येईल.






अर्पण पत्रिका

गेल्या वर्षी सहज सुचलेल्या अनुवाद करण्याच्या कल्पनेचे स्वागत
करून मला प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या तिन्ही कन्यका
राधिका, दिपिका, चैताली,

जिने इ- पुस्तके अत्यंत सुबकपणे अगदी कमी वेळात छापून
देण्यासाठी तत्परतेने सहाय्य केलेली,
माझी भाची सोनल (नक्षत्रा माणकीकर)
आणि
पुस्तक छपाईसाठी आर्थिक प्रोत्साहन निधी दिल्याबद्दल,
माझे पती श्री गिरीश साळवणकर,

सर्वांना प्रेमपूर्वक अर्पण करत आहे.

a

# मनोगत

पुन्हा एकदा आपल्या भेटीला एका विश्र्व विख्यात बाल कादंबरीचे कथाबीज आपल्या इथल्या मातीत रोवून, रुजवून, आपला भेटीला एक छोटा शूर, प्रेमळ, देखणा, कनवाळू युवराज बनवून आणला आहे.

आत्ताच्या भाषेत सांगायचे झाले तर माझी भाची म्हणाली तसे, "मामी तू हा◌ॅलीवूडचा सिनेमा बा◌ॅलीवूड मध्ये बनवत आहेस," जवळ जवळ तसेच.

मूळ कादंबरीत कथानक अमेरिका आणि इंग्लंड यांच्या पाश्र्वभूमीवर घडते. मला ते मुंबई, पुणे आणि आपल्या पश्र्चिम महाराष्ट्रातील एक काल्पनिक संस्थान या पार्श्वभूमीवर आणावे लागले. कादंबरी घडतानांचा काळ आहे, स्वातंत्र्य पूर्व साधारण 1920/1930 साल, ब्रिटिश इंडिया आणि देशी संस्थाने यांच्यामधील राजकीय संबंध, सामाजिक परिस्थिती, राजकीय चळवळ यांचा थोडाफार संबंध कथेच्या अनुषंगाने येणे क्रमप्राप्त होते. तो प्रयत्न किती सफल झाला आहे हे सूज्ञ वाचक नक्कीच ठरवतील. जिज्ञासू मूळ कादंबरी 'Little lord of Fauntleroy'

पब्लिक डोमेन मधील कादंबरी वाचून तुलना पण करू शकतात.

परकीय कथाबीज घेऊन त्यावर भारतीय संस्कार घडवावे अशी सूचना मला एक दोन सुहृदांनी केली. सूचना चांगली होती पण माझ्या दृष्टीने अत्यंत अवघड अशी होती. तसे प्रयोग आपल्याकडे अनेक वर्षांपासून सुरू आहेत. साने गुरुजींच्या अनेक कथा इतक्या अस्सल उतरल्या आहेत की मूळ कल्पना परकीय असावी याची पुसटशी शंका देखील मनात येत नाही. असो माझ्या दृष्टीने हा नवीन प्रयोग आहे.

आपल्याला कसा काय वाटला जरूर कळवा.

गायत्री साळवणकर

a

# प्रकरण 1

कुंतलपूर नावाचे एक आटपाट नगर हते. पंचगंगेच्या तीरावर वसलेले कुंतलपूर, खूप प्राचीन होते. जमीन सुपीक असल्याने लोक खाऊन पिऊन सुखी होते. मार्तंडदेव नावाचे एक संस्थानिक तिथे राज्य करत होते. त्यांच्या पत्नीचे नाव शांतलादेवी, नागपूरच्या राजघराण्यातून आल्या होता. त्यांना तीन मुलगे होते. थोरला रुद्रसेन, मधला विरेंद्र आणि धाकटा आशुतोष. राजेसाहेब महाप्रतापी होते तसेच महासंतापी पण होते. त्यांच्या पुढे राणीसाहेब किंवा राजपुत्रांचे काही चालत नसे. त्यातल्या त्यात धाकट्या आशुतोष थोडाफार त्यांच्या मर्जीतला होता. तो त्याच्या मा◌ॅ◌ंसाहेबांसारखा म्हणजे शांतलादेवी राणीसाहेबांसारखा ऋजु स्वभावाचा होता परंतु स्वतंत्र बुद्धीने वागणारा असल्याने, त्याचे वागणे सुध्दा राजेसाहेबांना अनेकदा पसंत पडत नसे. दुसरे दोन्ही राजपुत्र फारसे हुषार तर नव्हतेच पण त्यांना वाईट संगत लागली होती. फक्त चैनीत आयुष्य घालवणे एव्हढेच त्यांचे ध्येय होते. यामुळे राजेसाहेब जास्तच चिडखोर झाले होते. त्यांच्या मर्जीशिवाय कोणती गोष्ट घडणे अशक्य होते. मुलांनी तर त्यांच्यापासून दूरच राहायचे ठरवले होते. आशुतोष अभ्यासू आणि हुषार होता. त्याने शिक्षणावर लक्ष केंद्रित केले आणि मुंबईहून टेक्सटाइल इंजिनिअरींगची पदवी घेतली. त्याचे वडील बंधू मात्र आज मुंबई, उजेद्या पुणे असे गावोगाव चैनी करत पैसे उधळत होते.

या साऱ्या धक्क्याने कोमल मनाच्या शांतलादेवी मनाने खचल्या आणि मुलांचे सुखी संसार बघायची इच्छा अपूर्ण ठेवत त्यांनी जगाचा निरोप घेतला. आता मात्र संपूर्ण एकटे पडलेले राजेसाहेब जास्तीतजास्त दुराग्रही बनत चालले.

a

असो धाकटे आशुतोष मुंबई आले तेव्हा मुंबईचे नाव सगळीकडे गाजत होते. "मुंबई नगरी बडी बाका। जशी रावणाची लंका" अशी पट्ठे बापूरावांनी वर्णन केलेली तेव्हाची मुंबई, आता प्रमाणे श्रीमंतांपासून गरीबांना आपल्यात सामावून घेणारी होती. या मुंबईत गिरगावातील फुलवाडीमध्ये सात वर्षाचा एक मुलगा राहात होता. हा आपला चरित्र नायक सौमित्र. सौमित्र कुंतलपूरच्या धाकट्या राजपुत्राचा, आशुतोष सरदेशमुख यांचा मुलगा होता.

छोटा सौमित्र, फुलवाडीतील सर्वांच्या प्रेमाचा केंद्रबिंदू होता. गिरगावातील मुख्य वाड्यावस्त्यांपासून काहीशी दूरच ही फुलवाडी वसली होती. तसे कागदोपत्री वाडी त्या जागेचे मालक लोखंडवाला यांच्या नावाने ओळखली जात असली तरी तेथील बहुसंख्य कुटुंबे, ठाकुरद्वार येथे हार, तुरे, गजरे, व फुलांच्या व्यवसायात असल्याने, केळेवाडी, कांदेवाडी प्रमाणेच ती फुलवाडी म्हणून प्रसिद्ध होती.

तिथे एका छोट्याशा घरात सौमित्र आपल्या आईबरोबर रहात असे. सोबतीला राधाक्का, त्याच्या आईची दूरची आत्या पण त्यांच्याकडेच कायमची राहायला होती. राधाक्कांनी घरकामाची आणि सौमित्रची सारी जबाबदारी एका हाती उचलल्याने, त्याच्या आईला अर्थात अपर्णाताईंना घरचा आर्थिक भार उचलणे सोपे झाले होते. इन मिन अडीच माणसांचा संसार असला तरी अपर्णाताई संपूर्ण दिवस कामात गुंतून गेलेल्या असत. भल्या पहाटे लांब लांबच्या गावाहून फुलांची आवक मुंबईत होत असे. लगोलाग माल स्टेशनवरून फुलवाडीत दाखल होई. त्यातील लिलावातून योग्य बोली लावून चांगला ताजा माल उचलावा लागे, त्यांचे योग्य वर्गीकरण करून हार तुऱ्यांसाठी आणि गजऱ्यांसाठी वेगवेगळ्या प्रकारची फुले वेगळी करायला लागत. बरोबर सहाच्या दरम्यान अपर्णाताईंच्या मदतनीस मुली कामाला लागत आणि तासा दिड तासांत तयार माल नेण्यासाठी फुलवाल्यांच्या दुकानातून हातगाड्या येत असत. अपर्णाताईंच्या कलात्मक गजऱ्यांसाठी खास

मागणी असे. रोज एक हार ठाकुरद्वारच्या मंदीरात अर्पण केला जाई. त्यानंतर दहा वाजता आजुबाजुच्या लहान मुलांची बालवाडी पुढच्या सोप्यात भरत असे. एक दोन आठवी इयत्ता शिकलेल्या मुलींना हाताशी घेऊन 25/30 मुलांची बालवाडी साडे बारा पर्यंत चालत असे. त्यानंतर जेवणखाण आटोपून तीनच्या दरम्यान सात आठ महिला त्यांच्याकडे शिवणकाम शिकायला येत. त्यांना शिकवताना अपर्णाताई, शिवणकामाची गिऱ्हाईकांची घेतलेली कामे पूर्ण करत. सौमित्र जवळच्या सरकारी शाळेत दुसरी इयत्तेत शिकत होता. संध्याकाळी त्याचा गृहपाठ घेतांना पाच सहा मुलांची शिकवणीचे काम अपर्णाताई आनंदाने करत असत.

सौमित्रचे बाबा, आशुतोष मार्तंडदेव सरदेशमुख, या जगात नव्हते. सौमित्र पाच वर्षांचा होता तेव्हा त्याचे बाबा वारले होते. तेव्हा तो इतका लहान होता की त्याला त्यांच्याबद्दल फारसे काही आठवत नव्हते. त्याला बाबांची फक्त अंधुक अंधुक आठवण होती. ते खूप उंच आणि देखणे होते, पिंगट केसांचा नीटनेटका भांग पाडलेला असे, त्यांचे डोळे काळे होते आणि मोठ्या मिशा होत्या, त्याचा पापा घेतांना त्यांच्या मिशा त्याच्या गालाला टोचायच्या, मग तो रडत असे आणि बाबा गडगडाटी हसत असत. निळसर रंगाचा सूट घालून ते ऑफिसला निघाले की सिनेमातील हिरोप्रमाणे दिसत असे राधाक्कांच्या बोलण्यातून त्याला समजले होते. राधाक्का त्याच्या आईची, अपर्णाताईंची लांबची आत्या होती. सौमित्र जन्माला आल्यापासून राधाक्का त्यांच्याकडेच रहात होत्या. कधी कधी अपर्णाताई आणि राधाक्का बोलताना त्याने ऐकले होते: इंग्रज सरकारच्या जुलूमशाही विरोधात उसळलेल्या दंगलीत त्याच्या बाबांचा- आशुतोष यांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी संपूर्ण भारतभर इंग्रज सरकार विरोधी सविनय कायदेभंगाचे आंदोलन ऐन भरात होते. परदेशी मालावर बहिष्कार टाकण्यात येत होता. या आंदोलनाचा भाग म्हणून बाबू गेनू यांनी परदेशी कापडाने भरलेल्या मोटारीपुढे स्वतः झोकून दिले आणि मस्तवाल

a

इंग्रजी अधिकाऱ्यांनी बेदरकारपणे मोटार त्यांच्या अंगावरून चालवली. या घटनेमुळे लोकभावना प्रक्षुब्ध झाली आणि लोकांच्या झुंडीच्या झुंडी रस्त्यावर उतरल्या. जमावाला पांगवण्यासाठी, लाठीमार, अश्रुधूर, प्रसंगी बंदुकीच्या फैरी झाडल्या गेल्या आणि अशाच एका दंगलीच्या वेळी आशुतोष सरदेशमुख, आपल्या कामावर निघाले होते, आणि अचानक उसळलेली दंगल पांगवण्यासाठी, पोलीसांनी लाठीमार सुरू केला. असे दुर्दैवाने आशुतोष लाठीमारात जबर जखमी झाले. त्यांच्या मिल मधील सहकाऱ्यांनी त्यांना जवळच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले. प्राथमिक उपचार झाले पण डोक्यावर घाव वर्मी बसला होता, भरपूर उलट्या झाल्याने मेंदूला जबर धक्का बसला होता हे उघड होते. यापुढील उपचार उपलब्ध नसल्याने त्यांना घरी पाठवण्यात आले. छोट्या सौमित्रला त्याच्या वडिलांच्या सहकाऱ्याने आपल्या घरी नेले आणि जेव्हा तो परत आला तेव्हा सर्व काही संपले होते.

त्यानंतर त्याची आई पण खूप आजारी होती इतकी की ती त्याला ओळखू येईना. कपाळावर कुंकू नसल्याने कुणी अनोळखी बाई असावी अशी ती दिसत होती. हातात बांगड्या नव्हत्या की गळयातील मंगळसूत्र, तिचा चेहरा वेगळा वाटत होता. सौमित्र एकदम घाबरला आणि आपले बाबा कुठे आहेत, आई अशी का दिसते असे सारखे विचारायला लागला. अपर्णाताईंनी त्याला पोटाशी धरले आणि आपल्या दु:खाला वाट मोकळी करून दिली. चिमुकला सौमित्र त्याच्यापरीने आईचे सांत्वन करु पहात होता. शेजारच्या आयाबाया तिला सावरायला प्रयत्न करत होत्या. निर्धाराने तिचे बाबा हणमंतराव पुढे झाले आणि त्यांनी लेकीला सांगितले की यानंतर परत डोळयात पाणी काढू नकोस. आता तिलाच सौमित्रची आई आणि बाबा दोन्ही बनायला हवे. त्यांनी आपल्या जीवात जीव असेपर्यंत त्यांची काळजी घेण्याचे वचन दिले आणि निभावून नेले.

a

जावयाच्या अकाली मृत्यूनंतर हणमंतरावांनी खटपट करून विम्याची रक्कम मिळवून, मुलीच्या आणि नातवाच्या नांवे बॅंकेत सुरक्षित ठेवली आणि आशुतोषच्या नोकरीतील मिळालेल्या फंडाच्या रकमेतून गहाणखत करून घेतलेले घर खरेदीखत करून मुलीच्या नावाने खरेदी केले. पण वर्षभरात त्यांचे हे अवसान गळून गेले आणि आयुष्यात प्रथमच आजारी पडले. यावेळी त्यांनी मृत्यूपत्र करून अगोदरच सर्व सारवासारव केली होती. मनाने खचल्याने ते आजारातून उठले नाहीत आणि अपर्णाताईंना आणि छोट्या सौमित्रला परत एकदा दु:खाला सामोरे जावे लागले. यावेळी हणमंतरावांची दूरची बहिण राधाक्का मात्र अपर्णाताईंच्या मागे सावलीसारखी उभी राहिली आणि कायमच त्यांच्यासोबत राहण्याचे वचन तिने अगोदरच हणमंतरावांना दिले होते.

सौमित्रला आता समजले त्याचे आजोबा आणि लाडके बाबा आता परत येणार नाहीत. ते मरण पावले आहेत असे इतर लोकांनी म्हणताना त्याने ऐकले होते. एक गोष्ट त्याच्या ध्यानात आली होती ती म्हणजे जेव्हा जेव्हा तो आपल्या बाबांबद्दल बोलत असे तेव्हा तेव्हा आपली आई दु:खी होते, यामुळे त्याने गुपचूप मनाशी ठरवले की तिच्याशी बाबांविषयी वारंवार न बोलणेच चांगले आहे. परंतु तिला एकटीला  शांतपणे खिडकीतून बाहेर शून्यात बघायला देणे सुध्दा चांगले नाही म्हणून तो सतत तिच्या अवतीभवती वावरत असे आणि त्याच्या समजूतीप्रमाणे तिचे मन रमवण्याचा प्रयत्न करत असे.

अपर्णाताई मात्र आशुतोषना विसरू शकत नव्हत्या. त्यांच्या डोळयापुढे सतत त्यांचा औट घटकेचा सुखी संसार दिसत असे आणि आशुतोषनी सांगितलेल्या त्यांच्या लहानपणापासूनच्या आठवणी एखाद्या चित्रपटासारख्या डोळ्यासमोर दिसत असत: आशुतोष सरदेशमुखानी, मुंबईच्या 'व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट' मधून इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर 'इंडिया युनायटेड मिल'

मध्ये मोठ्या पगाराची आणि मानाची नोकरी मिळवली होती. हणमंतराव घाटगे त्यांच्या हाताखाली सुपरवाझर म्हणून काम करत. हणमंतराव कामगारवर्गात अतिशय लोकप्रिय होते. वारकरी माणूस, सतत सर्वांच्या मदतीला हजर असे. मिलची नोकरी सांभाळून ते विमा विक्रेता म्हणून पण काम करत असत. वडिलकीच्या नात्याने त्यांनी नवीन साहेबांना विम्याचा विषय समजावला आणि पहिला पगार झाल्यावर त्यांना पाच हजारांचा विमा उतरायला लावला. एव्हढ्या मोठ्या मुंबईत आशुतोष एकटा होता. इतके दिवस कॉलेजच्या हॉस्टेलवर राहण्या जेवण्याची सोय होती पण आता घरासाठी जागा बघण्याची गरज होती. हणमंतरावांनी ही जबाबदारी पण स्वतःवर घेतली आणि त्यांच्या वाडीतच एक घर गहाणखत करून सरदेशमुख साहेबांना मिळवून दिले.

हणमंतरावांना एकुलती एक मुलगी होती, ती म्हणजे अपर्णा. दहावी पर्यंत शिकलेली, दिसायला सुंदर, वागणे बोलणे आदबशीर. प्रथमदर्शनीच आशुतोष तिच्याकडे मनाने ओढला गेला आणि नंतर परिचयातून प्रीती फुलली. हणमंतरावांसारखा मुरब्बी माणसाने सर्व परिस्थिती योग्यप्रकारे हाताळली. प्रथम मुलीकडून सर्व गोष्टी विचारून घेतल्या आणि नंतर सरळ आशुतोषना स्पष्टपणे विचारले. त्यांच्या एकूण राहणीमानावरून ही असामी साधीसुधी नसणार असा त्यांचा अंदाज होता आणि तो खरा ठरला. आशुतोष सरदेशमुख, कुंतलपूर संस्थानाचे संस्थानिक, राजे मार्तंडदेव सरदेशमुख यांचे सर्वात धाकटे चिरंजीव होते. त्यांचे महाराजांबरोबर जास्त पटत नसे. त्यांचे वडिल बंधू रुद्रसेन हेच राज्याचे वारस होते. राजेसाहेबांच्या नंतर तेच गादीवर बसणार होते जर त्यांच्या बाबतीत काही अघटीत घडले तर मग दोन नंबरचे बंधू विरेंद्र हे गादीला वारस ठरले असते. एव्हढे मोठे राजघराणे असून कनिष्ठ पुत्राला तिथे काही उज्ज्वल भवितव्याची आशा नक्कीच नव्हती. पण निसर्गाचे दान जे धाकट्याच्या पदरी पडले होते ते इतर दोन

a

भावांच्या वाट्याला आले नव्हते. आशुतोष दिसायला मा◌ॅ◌ंसाहेबांसारखा देखणा अगदी मातृमुखी होता. उंचापुरा, उमदा, उत्तम शरिरसंपदा कमावलेला त्याचा बांधा होता. चेहऱ्यावर प्रसन्न हसू असे. मनात दुर्बलांविषयी कणव होती. आवाज मधूर होता, त्याचा लोक व्यवहार मैत्रीपूर्ण असे. तो शूर आणि उदार होता आणि सर्वात महत्वाचे म्हणजे दयाळू हृदयाचा होता. प्रत्येकजण त्याच्यावर प्रेम करत असे. त्याच्या मोठ्या भावांच्या बाबतीत तसे नव्हते; त्यांच्यापैकी कोणीही देखणा, दयाळू किंवा हुशार नव्हता. जेव्हा ते दोघे बडोद्याच्या राजपुत्रांच्या कॉलेजमध्ये शिकत होते, तेव्हा ते लोकप्रिय नव्हते; तेव्हा त्यांनी अभ्यासाची काळजी घेतली नाही आणि वेळ आणि पैसा दोन्ही वाया घालवले आणि काही वाईट मित्रांच्या संगतीत अधिक वाईट बनले. त्यांचे वडील राजे मार्तंडदेव, त्यांच्या बाबतीत सतत निराश आणि अपमानित झाले होते; त्यांच्या घराण्याचे वारस उदात्त आणि सन्माननीय नसल्याची त्यांना खंत वाटत असे आणि जो वारस म्हणून लायक होता, त्याला राजगादीचा वारसा कधीच मिळणार नव्हता यामुळेच कधी कधी राजेसाहेब त्याचा रागराग करत असत. खरे तर आशुतोषच राजसिंहासनावर बसणास लायक होता याची राजेसाहेबांना पूर्ण कल्पना होती पण ते राजघराण्यातील परंपरा आणि कायदे यांच्यापुढे असहाय्य होते आणि याच कारणामुळे त्याचे वडिल बंधू त्याचा द्वेष करत ही गोष्ट राजेसाहेबच्या नजरेतून सुटली नव्हती. परंतु काही वेळा राजेसाहेबांना आशुतोषचे वागणे पसंत नसे विशेषतः त्याचे सर्वसामान्य जनतेत मिळून मिसळून वागणे, राजेसाहेबांच्या रोषाचे कारण होते. आपल्या वडिल बंधुंप्रमाणे, त्याने खास बडोद्याच्या युवराजांसाठी असलेल्या संस्थेत शिक्षण घेण्याऐवजी मॉसाहेबांना सांगून मुंबईत उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेसाहेबांची परवानगी मिळवली होती. पण आशुतोष इंजिनिअरिंग कॉलेजच्या शेवटच्या वर्षी असताना मॉसाहेबांचे अकाली निधन झाले आणि आशुतोषचा कुंतलपूरचा शेवटचा पाश तुटला. अर्थात शिक्षण संपल्यावर तो कुंतलपूरला परत

a

येईल असा राजेसाहेबांचा कयास होता पण आशुतोषनी नोकरीचा मार्ग स्विकारल्यानंतर परतीचे दोर आपल्या हाताने कापल्यासारखे झाले होते. ही सर्व परिस्थिती आशुतोषनी हणमंतरावांच्या कानावर घातली. हणमंतरावांनी सर्व परिस्थिती जाणून घेतल्यानंतर रितीरिवाजाप्रमाणे या लग्नसंबंधाने राजेसाहेबांना अवगत करणे आवश्यक आहे असे समजून आपल्याकडून आणि आशुतोष कडून अशी दोन पत्रे कुंतलपूरला रवाना केली. जेव्हा राजेसाहेबांना ती पत्रे मिळाली तेव्हा ते प्रचंड संतापले. तास दोन तास आपल्या दालनात ते वाघासारखे गुरगुरत होते. त्यांचा संताप पाहून सेवकांना भीती वाटू लागली. मग राजेसाहेबांनी आपल्या मुलाला पत्र लिहिले आणि त्याला आज्ञा दिली की यापुढे त्याने कधीही कुंतलपूरच्या राजवाड्यात पाऊल सुध्दा ठेऊ नये, पुन्हा कधीही त्याच्या वडिलांशी किंवा भावांशी पत्राने देखील संपर्क साधू नये. शेवटी असे लिहले की तो त्याच्या इच्छेनुसार जगू शकतो आणि त्याला वाटेल तेथे मरू शकतो, त्याला त्याच्या कुटुंबातून कायमचे काढून टाकले आहे आणि तो जिवंत असेपर्यंत त्याला त्याच्या वडिलांकडून कोणत्याही प्रकारच्या मदतीची अपेक्षा करण्याची गरज नाही.

पत्र वाचून आशुतोषना खूप वाईट वाटले; त्यांना कुंतलपूर खरेच खूप आवडत असे आणि जिथे त्याचा जन्म झाला होता त्या सुंदर राजवाड्यावर त्याचे खूप प्रेम होते; त्याचे आपल्या वृद्ध पित्यावरही प्रेम होते आणि वडिल बंधूंच्या वर्तणुकीमुळे त्यांची निराशा झाली असल्याने आशुतोषना, त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटत होती; भविष्यात त्यांच्याकडून कसलीही अपेक्षा करू नये याबाबत त्यांच्या मनात कसलीही खंत नव्हती. पण त्यांना मॉसाहेब गेल्यानंतर परत एकदा पोरकेपणाची भावना त्यांचे अंत:करण कुडतडू लागली.

या लग्नसंबंधाला राजेसाहेबांची संमती असणार नाही ही गोष्ट स्पष्ट झाल्यावर हणमंतरावांनी आळंदीला वधुवरास नेऊन लग्न गांठ बांधवली. परत

आल्यावर फुलवाडीला आणि मिल मधील परिचितांना लग्नाचे जेवण घातले आणि स्वेच्छानिवृत्ती घेऊन संपूर्ण वेळ विम्याचे काम करू लागले. कदाचित जावई माणसाच्या हाताखाली काम करणे त्यांना अवघड वाटले असावे. पण पुढच्याच वर्षी ते अजून एका जबाबदारीत पूर्णपणे गुंतले, ती जबाबदारी म्हणजे सौमित्रचा जन्म. आईविना पोरक्या मुलीचे बाळंतपण राधाक्काच्या मदतीने बापाने रितीरिवाजाप्रमाणे पार पाडले. आता हणमंतराव बाळाच्या बाललीला पाहण्यात स्वर्गसुख अनुभवू लागले.

आशुतोष पण नवीन संसारात रमले होते. एव्हढ्या मोठ्या राजघराण्याचा वंशज त्या छोटेखानी घरात जन्माला आला. अतिशय आनंदात आणि मजेत आयुष्य चालले होते. अपर्णा सारख्या सामान्य घरातील मुलीशी लग्न केल्याचा त्यांना एक क्षणभरही कमीपणा अथवा वाईट वाटले नाही. ती खूपच गोड आणि प्रेमळ होती आणि त्यांच्यावर जीवापाड प्रेम करत होती. तो पण तिच्यावर आणि मुलावर तितकेच प्रेम करत होता. लहान मुलगा पण त्यांच्या आईवडिलांसारखा शांत आणि हसरा होता. कुणीही त्याच्या बाललीलांनी मोहून जाते असे. संपूर्ण फुलवाडीला बाळाने गोकुळातील कृष्णासारखे वेड लावले होते असे म्हटले तर चुकीचे ठरले नसते. मऊ, कुरळे पिंगट जावळ, गोरापान रंग, मोठे तपकिरी डोळे आणि लांबसडक पापण्या, अंगापेराने सुदृढ असे हे बालक साऱ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनले होते. सौमित्र नवव्या महिन्यात चालायला शिकला. राधाक्कांनी पाऊल उंडे करून फुलवाडीतील सर्व बाळगोपाळांना बोलावून खाऊ घातले आणि सर्वांचे औक्षण केले. प्रत्येकजण आपला मित्र आहे असे त्याला वाटू लागले होते. जाणारा येणारा अगदी अनोळखी माणूस सुध्दा त्याला बघून थबकत असे आणि बाळ सौमित्राच्या एक हास्याने कायमचा त्याचा चाहता बनत असे. फुलवाडीतील सर्वांना अगदी जवळच्या किराणा दुकानाच्या म्हाताऱ्या मालकाला सुध्दा त्याच्या बद्दल प्रेम आणि

a

फक्त प्रेमच वाटत असे. त्याला पाहण्यासाठी, त्याचे बोबडे बोल ऐकण्यासाठी सर्वजण आतूर असत. सौमित्र घरच्यांच्या वाट्याला फार कमी येत असे. फुलवाडीतील सामान्यांचे जीवन त्या लाघवी राजपुत्रामुळे समृद्ध झाले होते असे म्हणणे रास्त ठरले असते.

आता बाळ चालायला लागला, रस्त्यावरुन त्याला दुडूदुडू धावताना आडवताना राधाक्काना पूरेपरे होत असे. जो तो त्याला पाहून बाळकृष्णाची उपमा देत असे. आपल्यामुळे लोक आनंदी आहेत हे समजल्यावर तो अजून आनंदी होत असे. त्याचे आई वडिल त्याच्यावर खूप प्रेम करत असत, ते दोघेही प्रेमळ आणि विचारशील आणि कोमल आणि सुसंस्कृत होते. घरी त्याच्या कानावर कधी वावगा किंवा अभद्र शब्द पडला नव्हता; त्याला नेहमीच सर्वांनी प्रेम दिले गेले त्यामुळे तो सर्वांवर प्रेम करत असे. त्याचे मन दयाळू आणि निष्पाप उबदार भावनांनी परिपूर्ण होते. त्याने नेहमी त्याच्या बाबांनी त्याच्या आईला, प्रेमळपणे हाक मारताना ऐकले होते आणि म्हणून तो पण तिच्याशी तसाच प्रेमाने बोलत असे आणि आपल्या वडिलांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करत असे; त्याचे बाबा तिच्यावर लक्ष ठेवत आणि तिची खूप काळजी घेत हे त्याने नेहमी पाहिले होते म्हणून तो देखील तिची काळजी घ्यायला शिकला होता.

अचानकपणे बाबा गेल्यावर, लहानग्या सौमित्रला बदललेल्या परिस्थितीची जाण त्याच्या वयाच्या मानाने खूप लौकर आली. जेव्हा तो आपल्या आईबरोबर खेळत अथवा बोलत असे तेव्हा तिच्या डोळयातील दु:ख, थोड्या वेळासाठी का होईना नाहीसे होते हे त्याला जाणवत असे म्हणून तो मुद्दाम तिला बोलण्यात गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न करत असे. त्याचे अत्यंत जवळचे मित्र, किराणा दुकानाचे मालक बापू शेठ यांच्या बरोबरच्या संभाषणातील मोठमोठे विद्वत्ताप्रचुर शब्दप्रयोग ऐकल्यावर तिच्या डोळयातील दु:ख नाहीसे होऊन तिला छानसे हसताना पाहून,

a

सौमित्रला मुद्दाम असा शब्द प्रयोगात आणत असे. यामध्ये आईला हसण्यासारखे काय वाटते  हे त्याला समजत नसे कारण तो तर गंभीरपणे बोलत असे.

सौमित्राला त्याची आई किती दुःखी आहे हे जाणवत होते. तिला आनंद देण्यासाठी जे जे करणे शक्य आहे ते केले पाहिजे असे त्याला वाटत असे. त्याच्या बालबुध्दीनुसार तो तिच्या गुडघ्यावर चढत असे आणि तिचा पापा घेत असे. आपले कुरळे डोके तिच्या मानेवर ठेवून आपल्या समजूती प्रमाणे तिच्याशी बोलत असे. तिला त्याची खेळणी आणि चित्राची पुस्तके दाखवत असे. तिला बरे वाटावे एव्हढाच विचार सदैव त्याच्या मनात असायचा. ती सोफ्यावर झोपायची तेव्हा तो शांतपणे तिच्या बाजूला पडून राहत असे. याशिवाय अजून काय करावे आहे हे जाणून घेण्याइतके त्याचे वय नव्हते म्हणून त्याला जे शक्य होते ते करत असे. त्या दुःखी माऊलीला त्याची निष्पाप धडपड जाणवत असे आणि तिला अधिक दिलासा मिळत असे..

"अहो, राधाक्का!" अपर्णाताई एकदा राधाक्काना म्हणाल्या; "मला खात्री आहे की तो निरागसपणे मला मदत करण्याचा प्रयत्न करत आहे. तो माझ्याकडे कधीकधी प्रेमळ आणि आश्चर्यकारक नजरेने पाहतो, जणू काही त्याला माझ्याबद्दल खेद वाटतो हे स्पष्टपणे दिसते मग तो जवळ येऊन मला हर प्रकारे मला आनंद देण्याचा प्रयत्न करत असतो. वयाच्या मानाने त्याला परिस्थितीची चांगलीच जाण आहे आणि दुःखावर मात त्याचे करण्याचे प्रयत्न सुरू आहेत."

जसजसा तो मोठा होत गेला तसतसा वेगवेगळ्या प्रकारांनी तो लोकांचे मन रिझवून त्यांना  आनंद देऊ लागला. आईचा तो इतका चांगला सोबती होता की तिला इतर कोणाचीही गरज भासली नसती. ते दोघे एकत्र फिरायचे, खेळायचे, एकमेकांशी गप्पागोष्टी करायचे. तसा सौमित्र थोडासा लौकरच लिहायला वाचायला शिकला; आणि त्यानंतर तो संध्याकाळी सतरंजीवर झोपून आईला आणि

राधाक्काला लहान मुलांची पुस्तके वाचून दाखवत असे तर कधी वर्तमानपत्रही वाचून दाखवी; आणि बऱ्याचदा त्याचे वाचन सुरू असता राधाक्का आणि अपर्णाताईना हसू आवरत नसे तर कधी त्याचा अकाली समंजसपणा पाहून डोळ्याला पदर लावला जाई.

राधाक्काचे सौमित्रवर खूप प्रेम होते आणि त्याचा त्यांना अभिमान पण वाटत असे. तो जन्माला आल्यापासून त्या त्याच्या आईसोबत होत्या; आणि त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर, स्वयंपाकापासून सौमित्रला सांभाळण्यापर्यंत सर्व काही त्या निभावून नेत असत. सौमित्रच्या सुंदर दिसण्याचे, शिष्टाचारचे, मनमोकळ्या स्वभावाचे आणि सर्वांना आनंद देण्याच्या वृत्तीचे त्यांना कोण कौतुक. दर चार दोन दिवसांनी तिन्हीसांजेला दृष्ट काढतांना, अलाबला घेताना, आपली मेलीची नजर लागू नये म्हणून तिनतिनदा मीठ मोहऱ्या ओवाळून टाकत असत. कुरळ्या केसांमुळे तो श्रीकृष्णा सारखा दिसतो असेच साऱ्यांचे मत होते.

कोपऱ्यावरच्या किराणादुकानाचे मालक, बापू शेठ हे सौमित्रचे चांगले मित्र होते. एरव्ही  ते त्रासलेले दिसत पण सौमित्र बरोबर कसे काय कुणास ठाऊक तासनतास मजेत गप्पा मारताना दिसत असत. अगदी बरोबरीच्या नात्याने राजकारणावर त्यांच्या चर्चा चालत असत. सौमित्रला त्यांच्याबद्दल कमालीचा आदर वाटत असे.

तसे सौमित्रला दूधवाले मामा, बेकरीवाले काका आणि केळी विकणाऱ्या आजीबाई पण आवडत असत पण सर्वात जास्त बापू शेठ आवडते होते.

त्यांना तो खूप श्रीमंत आणि सामर्थ्यवान व्यक्ती समजत होता. त्यांच्या दुकानात पुष्कळ गोष्टी होत्या - पिस्ते,बदाम, मनुका, अंजीर असा सुका मेवा विक्रीसाठी असे. पेपरमिंटच्या गोळया, चाॅकलेट्स, बिस्किटे असा लहान मुलांचा आवडता खाऊ इतरांसाठी विक्रीला आणि त्याच्यासाठी बोलता बोलता मुठभर

a

तोंडांत टाकायला नेहमी ते देत असत. त्यांच्याकडे माल आणायला एक घोडागाडी होती. कधीकधी त्याला त्यामधून एखादी चक्कर मारायला बापू शेठ आनंदाने नेत असत. बराच वेळ ते दोघे वेगवेगळ्या विषयांवर तासनतास चर्चा करत. ते किती गोष्टींबद्दल बोलत याचे आश्चर्य वाटण्यासारखे होते- उदा इंग्रजी जुलमी सत्तेला या देशातील संस्थानिकांचा असलेला पाठिंबा बापू शेठ यांच्या मते, अक्षम्य अपराध होता. त्यांनी सौमित्रला अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्ययुद्ध, असहकार आंदोलन, सविनय भंगाची चळवळ, मीठाचा सत्याग्रह हा सगळा जिवंत इतिहास सांगितला होता. त्या दोघांचे बोलणे रंगात आले असताना जर दुकानात कोणी गिऱ्हाईके आली तर बापू शेठ त्यांच्याकडे लक्ष न देता, त्यांना खुशाल नोकरावर सोपवून ते सौमित्रशी चाललेल्या बोलण्यात खंड पडू देत नसत. स्वातंत्र्यवीरांची माहिती सांगताना त्यांचा उर अभिमानाने भरून येई. भगतसिंग, राजगुरू यांची गोष्ट सांगताना वक्ता आणि श्रोता दोघांचे डोळे पाझरत असत. घरी गेल्यावर रात्रीचे जेवण करतांना सौमित्र आईला, बापू शेठनी सांगितलेल्या गोष्टी भारावून जाऊन सांगत असे. बापू शेठनी त्याच्यामध्ये राजकारणात पहिली आवड निर्माण केली असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. यांना वर्तमानपत्रे वाचण्याची आवड होती. सौमित्र पण त्यांची राजकारणावरील मते मन लावून ऐकू लागला. त्याच्या मनाच्या हळव्या कोपऱ्यात त्याच्या बाबांचा मृत्यू, पोलीसांच्या लाठीमारामुळे झाल्याची आठवण अजून ठसठसत होती. एकदा बापू शेठ, त्याला आझाद मैदानावर एक मोठी सभा पाहण्यासाठी घेऊन गेले. मोठमोठ्या नेत्यांच्या दर्शनाने सौमित्र भारावून गेला होता.

यानंतर काही दिवस गेले. एक दिवस बापू शेठ जुलमी ब्रिटिश सरकार आणि त्यांचे लांगूलचालन करणारे राजे, महाराजे, लहानमोठे संस्थानिक, रावसाहेब, राव बहादुर यांच्या विरोधात फारच पोटतिडकीने बोलत होते. त्यांचा एकमेव वक्ता अर्थातच सौमित्र होता. बापू शेठ हातात केसरीची घडी धरून सौमित्रला म्हणाले,

a

"आता या लोकांची चलती चालली आहे. त्यांनी जनतेच्या विरोधात जाऊन परकियांशी केलेली हातमिळवणी पाहून, एक दिवस जनताच यांच्या विरोधात पेटून उठेल आणि होत्याचे नव्हते करून टाकेल."

सौमित्रने नेहमीप्रमाणे उंच स्टूलवर बसला होता. त्याने आपली टोपी मागे सरकवली आणि बापू शेठ यांच्याकडे कौतुकाने पाहत खिशात हात घालत म्हणाला, "बापू शेठ, तुम्हाला बरेच राजे, महाराजे, सरदार दरकदार, जहागीरदार माहिती असतील नाही?"

"नाही," बापू शेठनी रागाने उत्तर दिले; "मला त्यांच्यापैकी कोणी माहीत नाही. पण मला त्यांच्यापैकी एकाला तरी माझ्या माळ्यावर डांबून ठेवायला आवडेल; अशा जुलमी, देशद्रोही लोकांना माझे हे उंच स्टुल तर दूरच पण फटाक्याच्या पिंपावर सुध्दा बसायला देणार नाही! शिक्षा म्हणून चांगले उभे करून ठेवेन."

बापू शेठ, आपल्या या कल्पनेवर भलतेच खूश झाले. जणू काही एखादा संस्थानिक त्यांच्या समोर हात जोडून गयावया करत उभा आहे असे चित्र त्यांच्या डोळ्यासमोर आले असावे. त्यांची छाती देशाभिमानाने अगदी भरून आली होती.

पण छोट्या सौमित्रला, बापू शेठनी कल्पनेने पकडून शिक्षा म्हणून उभ्या करून ठेवलेल्या राजा किंवा सरदाराची थोडी दया वाटली आणि काहीतरी बोलायचे म्हणून म्हणाला, "पण कदाचित, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे राजे लोकांना इंग्रजांच्या दुष्कृत्यांची पूर्ण कल्पना नसेल."

"त्यांना कल्पना नसेल? अरे हेच लोक तर इंग्रजांची पाठराखण करतात, त्यांना त्यांच्या प्रजेची बिल्कुल काळजी नाही. उलट प्रजेवर अन्याय करून ते इंग्रज सरकारची मर्जी राखण्यासाठी सदैव झटत असतात." बापू शेठना सौमित्रने घेतलेली वेगळी भुमिका बहुतेक आवडली नसावी.

ते असे बोलत असतांना राधाक्का लगबगीने दुकानाकडे येताना त्यांना दिसल्या. घाईघाईने आल्यामुळे राधाक्कांना दम लागला होता. सौमित्रला वाटले की बहुदा साखर संपली असावी म्हणून नेण्यासाठी त्या आल्या असाव्यात. तोच राधाक्का त्याला म्हणाल्या, "लौकर घरी चल बाबा. तुला आईने ताबडतोब घरी घेऊन यायला सांगितले आहे."

सौमित्र उंच स्टुल वरून खाली घसरला आणि म्हणाला, "तिला, मला घेऊन कुठे बाहेर जायचे आहे काय? बापू शेठ मी निघतो उद्या भेटू." राधाक्का त्याच्याकडे एकटक पहात होत्या. त्यांच्या नजरेत काहीतरी वेगळे जाणवत होते पण त्या काही बोलल्या नाहीत. सौमित्र गोंधळून गेला. "राधाक्का नेमके काय झाले आहे?" त्यांने विचारले, "सर्व ठिक आहे ना?" "नाही," राधाक्का म्हणाल्या; "पण आपल्यासोबत काही विचित्र गोष्टी घडत आहेत." "उन्हामुळे आईची डोकेदुखी तर पुन्हा सुरू झाली नाही ना?" त्याने चौकशी केली.

पण तशी काही गोष्ट नव्हती. त्यांच्या दारात एक आलिशान बग्गी उभी होती. अपर्णाताई कुणाशी तरी बोलत होत्या. राधाक्का त्याला घाईघाईने माडीवर घेऊन गेल्या आणि त्याचे केस विंचरून ठेवणीतले कपडे घालायला मदत करु लागल्या, त्यांची अगदी धांदल उडून गेली होती.

"आपल्याकडे कोणी मोठे राजे आले आहेत काय? सौमित्रने प्रश्न केला. "छे! पण राजांकडून बोलावणे आले आहे. देवा! माझ्या लेकरांच्या पाठीशी रहा!" असे म्हणत त्यांनी त्याच्या तोंडावरून हात फिरवत बोटे आपल्या कानशीलामागे बोटे मोडली.

खरोखरच तो खूप गोंधळून गेला होता पण त्याला खात्री होती की त्याची आई कुठल्याही अडचणीतून मार्ग काढायला समर्थ आहे. रडवेल्या झालेल्या राधाक्कांना तिथे तसेच सोडून तो खाली बैठकीच्या खोलीत पळाला. धारदार

चेहऱ्याचे एक उंच, बारीक गृहस्थ खुर्चीत बसले होते. त्याची आई निस्तेज चेहऱ्याने शेजारी उभी होती आणि त्याने पाहिले की तिच्या डोळ्यात अश्रू आहेत.

"अजूनही सरंजामशाहीच सुरू आहे म्हणजे कुळांना, कसायला दिलेल्या जमिनींच्या मोबदल्यात  पोटापुरते अन्न मिळण्याची पंचाईत होत असणार," असे अपर्णाताई त्या अनोळखी गृहस्थाना म्हणत होत्या.

सौमित्रला पाहताच अपर्णाताई आपल्या छोट्या मुलाकडे धावल्या आणि सौमित्र, सौमित्र म्हणत त्याला आपल्या कुशीत घट्ट धरून त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले.

उंच म्हातारे गृहस्थ आपल्या खुर्चीवरून उठले आणि त्यांनी धारदार नजरेने सौमित्रकडे पाहिले. त्यांनी पालथ्या हातावर आपली हनुवटी घालली मात्र ते अजिबात नाराज झालेले दिसत नव्हते.

"आणि म्हणून," ते शेवटी हळू हळू म्हणाले, - "आणि म्हणून हा कुंतलपूरचा छोटा युवराज आहे."

# प्रकरण 2

पुढचा संपूर्ण आठवडा छोट्या सौमित्रला अनपेक्षित धक्के बसतच राहिले. त्याची सुरवात अपर्णाताईंनी- त्याच्या आईने त्यांच्याकडे आलिशान बग्गी मधून कोण आले होते याच्या माहिती करून दिल्याने झाली. त्याने अत्यंत उत्सुकतेने सर्व गोष्ट ऐकून घेतली आणि त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे प्रश्न विचारून सर्व गोष्टी जाणून घेतल्या. याबद्दल बापू शेठ यांचे काय मत असेल याची त्याला कल्पनादेखील करता आली नाही म्हणून त्याने तुर्तास तो विषय बाजूला ठेवून इतर गोष्टी समजून घेण्यावर भर दिला कारण राजे, महाराजे यांच्या विषयी बापू शेठ यांची मते तो जाणून होता आणि त्याचे आजोबा तर कुंतलपूर संस्थानाचे राजे होते, ज्यांना त्याने किंवा त्याच्या आईने कधीच पाहिले नव्हते. त्याचे मोठे काका युवराज रूद्रसेन, घोड्यावरून पडून निधन पावले नसते तर आजोबांच्या नंतर तेच कुंतलपूरचे राजे बनले असते. रुद्रसेनांचे निधन झाल्यानंतर त्याचे दुसरे काका विरेंद्र, हे गादीचे वारस बनले असते पण अचानक मुदतीच्या तापाचे निमित्त होऊन त्यांचा मृत्यू ओढवला. जर त्याचे बाबा जिवंत असते तर ते वारस म्हणून घोषित झाले असते पण दुर्दैवाने मोठ्या भावांच्या अगोदरच, एकुलता एक वारस- सौमित्र मागे सोडून ते हे जग सोडून गेले होते आणि आता फक्त सौमित्र राजघराण्याचा एकमेव वारस उरला होता. तो

त्याच्या आजोबांच्या मृत्यूनंतर राजा होणार होता - आणि सध्या कुंतलपूरचा युवराज बनणार होता.

जेव्हा सर्वात प्रथम त्याला ही गोष्ट समजली तेव्हा त्याचा चेहरा एकदम उतरला आणि तो त्याच्या आईला म्हणाला, "आई, मला नाही राजा बनायचे, इथला कोणीच मुलगा मोठेपणी राजा बनणार नाही मग मी पण त्यांच्यासारखा एक नाही काय?"

संध्याकाळी तेव्हा तो आईबरोबर खिडकीतून बाहेर समोरच्या कच्च्या रस्त्याकडे पहात बराच वेळ बोलत बसला होता तेव्हा त्याच्या ध्यानात आले की त्याला पुढे जाऊन कुंतलपूरचा राजा बनणे ही गोष्ट अटळ आहे. नेहमीप्रमाणे सौमित्र, छोट्या स्टुलावर बसला होता आणि दोन्ही हातानी गुडघ्याना कवटाळून पोटाशी धरून विचार करु लागला. त्याच्या आजोबांनी त्याला कुंतलपूरला बोलावले होते आणि त्याच्या आईने या गोष्टीसाठी संमती दिली होती.

खिडकीतून बाहेर पाहात, पाणावलेल्या डोळ्यांनी अपर्णाताई म्हणाल्या, "सौमित्र, मला माहित आहे की तुझ्या बाबांनी पण या गोष्टीसाठी संमती दिली असती. त्यांना त्यांचा राजवाडा खूपच आवडतं असे. तू अजून खूप लहान आहेस, तुला सगळ्या गोष्टी आता समजणे अवघड आहे, मी तुला तुझ्या आजोबांच्याकडे पाठवले नाही तर मी एक स्वार्थी आई ठरेन. तू जेव्हा मोठा होशील तेव्हा तुला याचा अर्थ समजेल."

सौमित्रने दु:खाने मान हलवली आणि म्हणाला, "मला बापू शेठना सोडून जाताना खूप वाईट वाटेल. मला भीती वाटते की त्यांना सुद्धा माझी खूप आठवण येईल आणि मला मला त्यांची आणि इथल्या प्रत्येकाची आठवण येईल."

शामराव देशपांडे, हे कुंतलपूरच्या राजघराण्याचे  वकील होते. मार्डंडदेव राजेसाहेबांनी त्यांच्यावर सौमित्रला कुंतलपूरला घेऊन येण्याची जबाबदारी सोपवली

होती. दुसरे दिवशी पुन्हा ते फुलवाडीतील त्यांच्या छोट्याशा घरी आले आणि त्यांनी सौमित्रला त्याच्या उज्वल वारश्याची आणि कुंतलपूरच्या संपन्नतेची ओझरती माहिती दिली. तो मोठा झाल्यावर बऱ्याच मोठ्या संपत्तीचा मालक बनणार होता, त्याच्या मालकीचे अनेक किल्ले, गढ्या, मोठमोठ्या बागांनी सुशोभित केलेले वाडे, शिवाय खनिजांच्या खाणी सुध्दा असणार होत्या. कुंतलपूरच्या राजाच्या मालकीच्या अनेक चाळी असून त्यामध्ये गरीब लोक भाडेकरू म्हणून रहात असत, हे सर्व वैभव ऐकून सुद्धा त्याच्या मनाची समजूत पटली नाही. सौमित्रला बापू शेठ यांच्याबद्दल खरोखरच खूप काळजी वाटत होती, न्याहारी झाल्यावर लगेच तो त्यांना भेटायला निघाला तेव्हा तो मनातून अस्वस्थ होता.

सौमित्र दुकानात गेला तेव्हा बापू शेठ पेपर वाचत होते. गेल्या एक दोन दिवसात सौमित्रच्या बाबतीत जे काही घडत होते ते ऐकून बापू शेठना जबरदस्त धक्का बसणार होता असे त्याला वाटत होते. ही बातमी त्यांना कशी सांगावी याची तो मनाशी जुळवाजुळव करत होता.

"हॅलो, गुड मॉर्निंग," बापू शेठ पेपर मधून लक्ष बाजूला करून त्याला म्हणाले.

"गुड मॉर्निंग,” असे हळू आवाजात म्हणत सौमित्र नेहमीप्रमाणे त्याच्या उंच स्टुलावर न बसता, शांतपणे फटाक्यांच्या पिंपावर जाऊन बसला आणि दोन्ही हातानी गुडघे पोटाशी घट्ट धरून ठेवले. तो इतका शांत बसला होता की बापू शेठनी वर्तमानपत्रातून डोके वर काढून त्याच्या कडे प्रश्नार्थक नजर टाकली.

"काय रे! काय झाले? असा एकदम गप्प गप्प का बसलास?" बापूशेठनी विचारले. "बापू शेठ, आपण काल सकाळी काय बोलत होतो ते तुम्हाला आठवत आहे काय?" सौमित्रने मन अगदी घट्ट करत विचारले. "हो, आपण इंग्रज सरकारच्या जुलूमशाही विषयी बोलत होतो," त्याच्या प्रश्नाने बापू शेठ थोडे बुचकळयात पडले

a

होते. "बरोबर, पण मला राधाक्का बोलवायला आल्या तेव्हा नेमके काय बोलत होतो, या बद्दल मी विचारत आहे." बापू शेठनी आपले डोके खाजवले आणि म्हणाले, "इंग्रज सरकार आणि भारतातील उच्चभ्रू समाज हा विषय होता."

"बरोबर," काहीसा कचरत सौमित्र म्हणाला, "इथले राजे, महाराजे हा विषय होता तुम्हाला आठवते आहे काय?"

"हो, आपण त्याबद्दल थोडे बोललो होतो, पण ते तू आता का बरे विचारत आहेस?" बापू शेठनी प्रश्न केला.

सौमित्र एकदम गोरामोरा झाला आणि त्याने कपाळावरचे केस मागे केले. उभ्या आयुष्यात आजच्या इतकी लाजिरवाणी परिस्थिती त्याने अनुभवली नव्हती. बापू शेठना सुद्धा थोडे अवघडल्यासारखे वाटेल या विचाराने त्या थोडी भीती वाटत होती.

"तुम्ही म्हणालात की तुम्ही त्यांना पकडले तर तुमच्या फटाक्यांच्या पिंपावर पण बसायला देणार नाही."

"अगदी बरोबर," बापू शेठ जोराने म्हणाले,

"मी असेच म्हणालो होतो, त्यांनी तसा प्रयत्न तर करून पहावा म्हणजे बघ मी काय करतो ते."

"बापू शेठ, तर मग त्यांच्यापैकी एक तुमच्या फटाक्याच्या पिंपावर आता बसला आहे," शेवटी एकदाचा सौमित्र बोलून गेला.

बापू शेठ एका झटक्यात त्यांच्या खुर्चीवरून उठून उभे राहिले आणि आश्चर्यचकीत होऊन, "क् काऽऽय?" असे मोठ्याने ओरडले.

"होय", सौमित्रने शालीनतेने मान्यता दिली, "मी तुम्हाला फसवणार नाही -- मी त्यांच्यापैकी एक आहे कींवा मी त्यांच्यापैकी एक बनणार आहे." हे ऐकून बापू शेठ काळजीत पडले आणि थर्मामीटर शोधू लागले.

a

त्याच्याकडे पहात बाप शेठनी चौकशी सुरू केली, "बहुतेक तुझ्या डोक्यात ताप चढला असेल. आज बरेच गरम होत आहे, तुला कुठे दुखत आहे काय? कधी पासून तुला असा त्रास होत आहे?"

"बापू शेठ," सौमित्र म्हणाला, "आता या पिंपावर एक भावी राजा बसला आहे!" बापू शेठनी न रहावून त्याच्या डोक्यावर हात ठेवला. सौमित्र, कधी नव्हे इतका जास्त अवघडून गेला.

"धन्यवाद," सौमित्र म्हणाला; "मी ठीक आहे. माझ्या डोक्यात काही ताप वगैरे चढलेला नाही. बापू शेठ मला सांगायला खेद वाटतो पण यासाठीच राधाक्का मला घरी न्यायला आल्या होत्या. शामराव देशपांडे नावाचे वकील आले होते आणि त्यांनी हे सर्व आईला सांगितले."

बापू शेठ त्यांच्या खुर्चीत जाऊन बसले आणि कपाळावर आलेला घाम टिपत म्हणाले, "आपल्या दोघांपैकी एकाला सनस्ट्रोक झाला असावा."

"नाही असे काहीही झालेले नाही ही चांगली गोष्ट आहे. वकील शामराव देशपांडे, आम्हाला याबद्दल सांगण्यासाठी कुंतलपूर वरून आले आहेत. माझ्या आजोबांनी त्यांना पाठवले आहे," सौमित्र म्हणाला.

बापू शेठ त्यांच्या समोरच्या निरागस पण गंभीर चेहऱ्याकडे टक लावून पाहत होते. "तुझे आजोबा कोण आहेत?" त्यांनी विचारले.

सौमित्रने खिशात हात घातला आणि स्वतःच्या गिचमिड्या अक्षरात लिहिलेली चिठ्ठी हळू आवाजात वाचू लागला, 'हिज हायनेस, मार्तंडदेव राजे ऑफ कुंतलपूर. ते कुंतलपूरच्या राजवाड्यात राहतात. कुंतलपूर मध्ये त्यांचे तीन राजवाडे आहेत. माझे बाबा त्यांचा सर्वात लहान पुत्र होता, ते जर आज जिवंत असते तर ते आजोबांच्या नंतर राजा झाले असते कारण त्यांचे दोन वडिल बंधू नुकतेच निवर्तले आहेत. आता माझ्याशिवाय कोणीही राजगादीला वारस उरला नाही आणि म्हणून

मला युवराज घोषित करण्यासाठी माझ्या आजोबांनी मला कुंतलपूर घेऊन येण्यासाठी वकीलांना पाठवले आहे."

हे सर्व ऐकून बापू शेठना घाम फुटला. परत परत ते कपाळावरचा घाम पुसू लागले. त्यांचा श्वासोच्छवास जोरजोरात सुरू झाला. विश्र्वास बसणार नाही अशी गोष्ट घडत आहे याची त्यांना जाणीव झाली. जेव्हा त्यांचे लक्ष त्या फटाक्यांच्या पिंपावर बसलेल्या लहानग्या सौमित्रकडे गेले तेव्हा त्याच्या बालीश निष्पाप डोळ्यात पडलेले चिंतेचे सावट स्पष्ट दिसून येत होते. बापू शेठनी त्याला पुन्हा एकदा निरखून पाहिले, तो अजिबात बदलला नव्हता, आदल्या दिवशी जसा होता तसाच आता सुद्धा दिसत होता फक्त एक देखणा, आनंदी, धाडसी लहान मुलगा. निळ्या रंगाचा सूट घातलेला, गळ्यात लाल रंगाचा बो बांधलेला, राजघराण्याच्या नवीन माहितीमुळे कावराबावरा झाला होता, हे पाहून बापू शेठ देखील गोंधळून गेले. सौमित्रने प्रांजळपणे सर्व माहिती, त्यांना सांगितली होती, त्यामध्ये त्याचा प्रामाणिकपणा आणि सचोटी दिसून येत होती मात्र त्याला स्वतःला ती गोष्ट किती महत्त्वाची आहे हे समजलेले दिसत नव्हते.

"त्यांनी तुझी काय म्हणून ओळख सांगितली," बापू शेठनी विचारले. "सौमित्र सरदेशमुख, कुंतलपूरचे छोटे युवराज मला वकील साहेबांनी अशीच हाक मारली," सौमित्र निरागसपणे म्हणाला.

" ' कुंतलपूरचे छोटे युवराज' हे ऐकून मी अगदी थक्क झालो," बापू शेठ भारावून म्हणाले.

जेव्हा ते एखाद्या गोष्टीने चकीत होत तेव्हा
'मी थक्क झालो' असे म्हणत आणि ही वेळ नेमकी तशीच होती. त्यामुळे सौमित्रला त्यांची प्रतिक्रिया ओळखीची वाटली. सौमित्रच्या मनात, बापू शेठ यांच्याबद्दल इतका आदर आणि स्नेह होता की तो त्यांच्या मतांचा नेहमीच आदर करत असे

आणि त्यांना सर्वज्ञ मानत असे. काही वेळा त्यांची मते चाकोरीबद्ध, रुढिप्रिय असत पण सौमित्र अजून लहान असल्याने आणि त्याला जगाचा अनुभव शून्य असल्याने, या गोष्टींची जाणीव त्याला असणे शक्य नव्हते. मात्र एक गोष्ट तो जाणून होता, ती म्हणजे त्यांचे विचार त्याच्या आईपेक्षा वेगळे होते तशीच त्यांची मते पण तिच्यापेक्षा वेगळी होती. त्याची आई एक आदर्श महिला आहे असा त्याचा विश्वास होता. पण त्याला वाटे बापू शेठ एक सद्गृहस्थ आहेत आणि त्यांचे विचार, आईपेक्षा वेगळे असणे शक्य होते म्हणून त्यांना तो वडीलधाऱ्या व्यक्तीचा मान देत असे.

त्यांच्याकडे पाहात सौमित्रने काहीशा खंतावलेल्या स्वरात विचारले, "मुंबईहून कुंतलपूर किती लांब आहे?"

"मुंबईहून कुंतलपूर जवळ जवळ चारशे मैल इतके दूर आहे." बापू शेठ म्हणाले. "बापू शेठ, ही तर खूप वाईट गोष्ट आहे," सौमित्र म्हणाला.

"कदाचित मी तुम्हाला पुन्हा लौकर भेटणार नाही आणि मला तसा विचार देखील करायला आवडत नाही."

"आता आपल्याला एकमेकांपासून दूर होणे भाग आहे," बापू शेठ यांचा आवाज भरून आला होता. "खरंच, आपण खूप जूने मित्र आहोत ना?" सौमित्रने विचारले. "हो तर, अगदी तुझ्या जन्मापासून, तू तीन महिन्याचा होतास, तेव्हा मी तुला प्रथम पाहिले होते."

"हं!" सौमित्र एक उसासा टाकत म्हणाला, "मी एक युवराज होईन असे मला कधी स्वप्नातही देखील वाटले नव्हते."

"आता असा विचार करून काहीच उपयोग नाही. तुझी यातून सुटका नाही हे नक्की."

"छे! छे! मी काही घाबरेलो नाही," सौमित्रने उत्तर दिले. "आई म्हणते तुझ्या बाबांना तू युवराज झालेले आवडले असते, पण जर मला राजा व्हायचे असेल तर

a

मी एक गोष्ट करू शकतो: मी एक चांगला राजा बनण्याचा प्रयत्न करू शकतो. मी जुलमी राजा होणार नाही.मी माझ्या प्रजेला सुखी ठेवण्यासाठी प्रयत्न करेन. मी तुम्हाला वचन देतो की काहीही झाले तरी मी इंग्रजांची पाठराखण करणारे नाही."

सौमित्रचे बापू शेठ बरोबरचे संभाषण बराच वेळ गंभीरपणे चालले होते. सुरवातीच्या धक्क्यातून बाहेर पडल्यावर बापू शेठ बरेच सावरले आणि त्यांनी परिस्थितीशी जुळवून घेण्याची तयारी केली. त्यांनी सौमित्रला बरेच प्रश्न विचारले आणि त्याने जेव्हढी उत्तरे त्याला देणे शक्य होते तेव्हढी उत्तरे दिली. त्याला न आलेली उत्तरे, बापू शेठनी त्याला समजावून सांगितली. संस्थानिक कसे त्या त्या राज्याचे राज्यकर्ते असतात, त्यांच्या हाताखालील सरदार, दरकदार यांच्या सहाय्याने कसा राज्यकारभार चालतो, राजाची कर्तव्ये कोणती, उत्तम राजकारभार म्हणजे काय? या सर्व गोष्टींचा त्यांनी खुलासा केला. हे संभाषण, जर शामराव देशपांडे वकीलांनी ऐकले असते तर ते देखील आश्चर्यचकित झाले असते.

नंतर अशा काही घटना घडल्या की शामराव देशपांडे वकील खरोखरच आश्र्चर्यचकीत झाले. त्यांनी आपले सारे आयुष्य कुंतलपूरच्या महाराजांच्या सेवेमध्ये घालविले होते. त्यांना मुंबईच्या शहरी जीवनाची आणि शहरी लोकांची अजिबात आवड नव्हती. ते जवळजवळ चाळीस वर्षांपासून मार्तंडदेव राजांच्या कुटुंबाशी व्यावसायिकरित्या जोडले गेले होते आणि त्यांना राजेसाहेबांच्या सर्व स्थावर, जंगम मालमत्तेची आणि सर्व महत्त्वाच्या दरबारी गोष्टींची इत्यंभूत माहिती होती; थंड डोक्याने काम करणारे ते मुरब्बी वकील होते आणि राजेसाहेबांनी सोपवलेली जबाबदारी पार पाडताना त्यांना या छोट्या मुलांमध्ये स्वारस्य वाटले, जो भविष्यात, सर्वांचा मालक होणार होता - कुंतलपूरचा भावी राजा.

मोठ्या दोन्ही मुलांच्या बाबतीत मार्तंडदेव राजांची निराशा झाली होती आणि धाकट्याने त्यांच्या इच्छेविरुद्ध केलेल्या लग्नामुळे त्यांना झालेला, तीव्र

संताप मुलाच्या मृत्यूनंतरही अजून धगधगत होता याची शामराव देशपांडेंना पूर्ण कल्पना होती. अजूनही त्या दुर्दैवी सूनबाई बद्दल राजेसाहेबांच्या मनात तिरस्कार होता, तिच्याविषयी त्यांचे बोलणे कडवट आणि क्रूर होते, त्यांचा असा पक्का समज होता की ती अतिसामान्य कुटुंबातील असून तिने फक्त आशुतोष राज घराण्यातील आहे म्हणून फसवणूक करून त्याच्याशी लग्न केले होते आणि या गोष्टींवर, त्या जुन्या वकिलांचा पण विश्वास बसला होता. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक स्वार्थी लोक पाहिले होते आणि त्यांचा शहरातील माणसांवर तर अजिबात विश्वास नव्हता. पण जेव्हा त्यांची बग्गी, त्या गरीब वस्तीतील रस्त्यावरून चालू लागली आणि एका सर्वसाधारण लहान घरासमोर थांबली, तेव्हा त्यांना खरोखर धक्का बसला. कुंतलपूरच्या राजघराण्याचा वारस, अशा गरीब वस्तीत, जन्माला आला आणि तिथेच वाढत आहे ही कल्पनाच भयंकर होती. तो मुलगा आणि त्याची आई कशी असेल असा त्यांना प्रश्न पडला. त्यांची भेट घेण्याची कल्पना सुध्दा त्यांना कशीतरीच वाटली. त्यांना स्वतःला राजघराण्याच्या सर्व व्यवहाराच्या कायदेशीर बाजू ते पाहत असल्याने त्यांना त्या राजघराण्याचा एकप्रकारचा अभिमान वाटत असे. एका असभ्य, पैशाच्या लोभाने लग्न केलेल्या, स्त्री बरोबर वाटाघाटी करण्यासाठी ते बांधील असल्याचा त्यांना खूप त्रास वाटत होता. तिला तिच्या मृत पतीच्या कुटुंबाबद्दल आणि कुटुंबाच्या प्रतिष्ठेबद्दल आदर नसेल अशी त्यांची समजूत होती. कुंतलपूरच्या सरदेशमुख राजघराण्याचे नाव खूप जुने आणि अतिशय वैभवशाली होते. जरी शामराव देशपांडे, व्यवसायाने राजघराण्याचे जूने जाणते वकील होते, तरी त्यांना राजघराण्याविषयी खूप आदर होता.

जेव्हा राधाक्का, शामराव देशपांडे वकीलांना बैठकीच्या खोलीत घेऊन गेल्या, तेव्हा त्यांनी गंभीरपणे आजुबाजुला पाहिले. अगदी साधेपणाने नीटनेटकी खोली ठेवली होती. त्यांच्या कल्पनेप्रमाणे तिथे उथळपणा किंवा हीन अभिरुची

a

अजिबात दिसत नव्हती, उलट गृहस्वामिनीचा कलात्मक हात तिथे फिरत असल्याचे जाणवत होते. तिने बनवलेल्या सुंदर सुंदर सजावटीचे नमुने भिंतीवर शोभून दिसत होते. त्यांना त्यामध्ये काही खोट काढण्यासारखे आढळून आले नाही. कदाचित आशुतोषराजांची उच्च अभिरुची यासाठी कारणीभूत असावी, असा त्यांचा समज झाला. पण जेव्हा अपर्णाताईंनी खोलीत प्रवेश केला तेव्हा मात्र ही सर्व कलात्मकता त्यांचीच असली पाहिजे असे वकीलसाहेबांना वाटून गेले. ते स्वतः राजदरबारचे कर्तव्यकठोर वृध्द वकील होते. अपर्णाताईंना पाहताक्षणीच त्या सुसंस्कृत आणि सुसंस्कारित असल्याची, त्यांची पक्की खात्री झाली.

विधवेच्या पोशाखातील अपर्णाताई, आठ वर्षांच्या मुलाची आई वाटण्यापेक्षा एक सडपातळ तरूण स्त्री वाटत होत्या- एक सुंदर, दुःखी, तरुण स्त्री, तिच्या मोठ्या तपकिरी डोळयांमध्ये एक अतिशय कोमल, निष्पाप भावना स्पष्टपणे दिसत होती. नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्या चेहऱ्यावर फक्त दुःख आणि दु:ख उरले होते.

इतकी वर्षे वकीलीच्या व्यवसायात घालवल्यावर शामराव माणसांची पारख अचूक करत. सौमित्रच्या आईला पाहताच त्यांना समजले की मार्तंडदेव राजेसाहेबांनी तिला एक असभ्य, पोटार्थी स्त्री समजण्यात मोठी चूक केली आहे. वकील देशपांडे अविवाहित होते आणि त्यांनी कधी कुणा स्त्रीवर प्रेम वगैरे केले नव्हते, पण सुंदर, गोड आवाजाच्या, उदास डोळयांच्या, दु:खी तरूण मुलीने, आशुतोष सरदेशमुखांशी लग्न केले ते फक्त तिचे त्यांच्यावर मनापासून प्रेम होते म्हणून, आशुतोष राजघराण्यातील असल्याचा फायदा करून घ्यावा अशी कदापिही इच्छा नव्हती, याची त्यांना खात्री पटली. त्यामुळे त्यांना तिच्याविषयी काही शंका उरली नाही आणि छोट्या युवराजांबाबत राजघराण्याला काही अडचण निर्माण होणार नाही असा त्यांचा समज झाला. मुळात आशुतोष एक देखणा, सच्छील तरुण होता त्याची पत्नी सुंदर आणि सभ्य स्त्री आहे त्यामुळे छोटे युवराज, आईबापाच्या

वळणावर गेले असण्याची शक्यता दाट होती या विचाराने त्यांच्या मनावरचे ओझे थोडे हलके झाले.

जेव्हा देशपांडे वकीलांनी आपल्या तिथे येण्याचे कारण तिला सांगितले तेव्हा ती एकदम तिचा चेहरा निस्तेज झाला कशीतरी सावरत ती त्यांना म्हणाली,

"त्याला माझ्यापासून दूर केले जाईल काय? आमचा एकमेकांवर खूप जीव आहे. माझ्यासाठी तो आनंदाचा ठेवा आहे, तोच माझे सर्वस्व आहे. त्यांची आई म्हणून त्याच्या भल्यासाठी जे काय म्हणून चांगले करणे शक्य आहे ते मी करत आहे," तिचा गोड आवाज थरथरू लागला, डोळे पाण्याने भरले, "तो माझ्यासाठी काय आहे, याची तुम्हाला कल्पना पण येणार नाही."

देशपांडे वकीलांनी उगीचच घसा खाकरला आणि म्हणाले, "मला हे तुम्हाला सांगावे लागेल की राजे मार्तंडदेव तुमच्या बाबतीत फारसा चांगला विचार करणारे नाहीत. त्यांचे विचार पूर्वग्रहदूषित आहेत आणि म्हातारपणी ते अधिकच पक्के झाले आहेत. त्यांच्या मनात नेहमीच मुंबई सारख्या शहरातील माणसांविषयी विशेष अढी आहे. त्यांच्या धाकट्या मुलाच्या लग्नामुळे ते प्रचंड दुखावले गेले आहेत. मला तुम्हाला सांगताना खेद होतो आहे पण त्यांना आपल्याशी भेटण्याची देखील इच्छा नाही आणि ते आपल्या निश्चयावर ठाम आहेत. कुंतलपूरच्या युवराजांना त्यांच्या स्वतःच्या देखरेखीखाली शिक्षण दिले जाईल; राजेसाहेब बऱ्याच वेळी कुंतलपूरच्या राजवाड्यात असतात, संधीवाताच्या जूने दुखण्याने ते आजारी असून जवळजवळ जागेला खिळून राहिले आहेत त्यामुळे विशेष बाहेर पडत नाहीत. तुमच्या राहण्यासाठी राजवाड्याच्या बाहेर एक वाडा दिली जाईल मात्र आपल्याला राजवाड्यात किंवा राजवाड्याच्या प्रांगणात प्रवेश करण्यास मनाई असेल. पण तुम्ही खरोखरच तुमच्या मुलापासून वेगळे होणार नाही, याची मी तुम्हाला खात्री देतो. बाईसाहेब, या अटी इतक्या कठोर नाहीत, छोट्या युवराजांच्या

a

उज्ज्वल भवितव्यासाठी या सर्व सुखसुविधांचा आणि मुख्य म्हणजे उत्तम शिक्षणाचा फायदा होईल याचा आपण नक्कीच विचार कराल, असे मला वाटते."

एव्हढे बोलून ते अपर्णाताईंच्या उत्तराची वाट पाहत अस्वस्थपणे उभे राहिले. अशा प्रसंगी एखादी स्त्री नक्कीच रडायला लागेल असा त्यांचा अनुभव होता आणि तसे झाले असते तर त्यांना अधिक अवघडल्यासारखे झाले असते.

पण अपर्णाताईंनी तसे केले नाही. त्या खिडकीजवळ गेल्या आणि काही क्षण तोंड खिडकीकडे वळवून उभ्या राहिल्या: स्वतःला सावरण्याचा त्यांचा तो प्रयत्न होता.

"आशुतोषना कुंतलपूरचा राजवाडा फार आवडत असे. कुंतलपूरवर त्यांचे खूप प्रेम होते. त्यांना, त्याच्या घरापासून वेगळे झाल्याचे दु:ख नेहमीच वाटत होते. त्यांना विशेषतः कुंतलपूरच्या राजवाडाचा आणि सरदेशमुख, राजघराण्याचा अभिमान होता. मला माहित आहे आशुतोषना, 'सौमित्रने आपला समृद्ध वारसा पहावा, अनुभवावा आणि त्याचे भवितव्य उत्तम घडावे म्हणून आवश्यक असे योग्य शिक्षण त्याला मिळावे' असेच वाटले असते." असे म्हणून अपर्णाताई परत टेबलाजवळ आल्या आणि शांतपणे देशपांडे वकीलांकडे पाहू लागल्या.

"माझ्या पतीला पण असेच वाटले असते," अपर्णाताई परत एकदा पुनरुच्चार केला, "मला माहित आहे की माझ्या मुलांसाठी ही सर्वोत्कृष्ट संधी असेल. माझी माहिती आहे - मला खात्री आहे की राजेसाहेब इतके निर्दयी नसतील की त्यांच्याकडून सौमित्रने माझ्यावर प्रेम करू नये असे शिकवण्याचा प्रयत्न केला जाईल; आणि मला माहित आहे - जरी त्यांनी तसा प्रयत्न केला तरी - माझा लहान मुलाचा स्वभाव, त्याच्या वडिलांप्रमाणेच प्रेमळ, विश्वासू आहे आणि मी त्याच्या नजरेपासून जरी दूर असले तरीही तो माझ्यावर प्रेम करेल."

a

अपर्णाताईंनी स्वतःबद्दल फारच कमी विचार केला आहे शिवाय त्यांनी स्वतःकडून कोणत्याही अटी घातल्या नाहीत ही गोष्ट त्या चाणाक्ष वकीलांच्या नजरेतून सुटली नाही.

"बाईसाहेब," ते मोठ्याने म्हणाले, "मला तुमच्या मुलाबद्दलच्या तुमच्या विचारांचा आदर आहे. मी तुम्हाला शब्द देतो की युवराजांची सर्वोतोपरी जाईल, आणि त्यांना आनंदात ठेवण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील. स्वतः राजेसाहेब तुमच्या एव्हढेच त्यांच्या संगोपनाच्या बाबतीत दक्ष आहेत आणि स्वतः जातीने लक्ष घालण्यास उत्सुक आहेत."

"मला आशा आहे," अपर्णाताई थोड्या रडवेल्या आवाजात म्हणाल्या, "त्याचे आजोबा त्याच्यावर प्रेम करतील. त्याचा स्वभाव खूप प्रेमळ आहे. त्याच्यावर नेहमीच सर्वांनी प्रेम केले  आहे."

देशपांडे वकीलांनी पुन्हा एकदा घसा साफ केला. संधीवाताने खिळलेले, प्रचंड संतापी, राजे मार्तंडदेव, कोणावर तरी खूप प्रेम करत आहेत याची कल्पना सुद्धा ते करू शकत नव्हते. पण त्यांना या गोष्टीची कल्पना होती की त्याच्या एकुलत्या एक वारस असणाऱ्या लहानग्या सौमित्र बरोबर प्रेमाने वागणे हे त्यांच्याच हिताचे असणार आहे. त्यांना माहित होते जर सौमित्रकडे भावी युवराज बनण्याच्या दृष्टीने चांगले गुण असतील तर त्याचा, त्याच्या आजोबांना नक्कीच अभिमान वाटेल.

"युवराज सौमित्र आजोबांच्या जवळ अगदी आरामात असतील, याबद्दल मला खात्री आहे," देशपांडे वकील म्हणाले. "युवराजांच्या आनंदासाठी, आपल्याला वारंवार भेट घेता यावी म्हणून आपण त्यांच्या जवळ असावे, अशी राजेसाहेबांची इच्छा आहे."

a

राजेसाहेबांनी वापरलेल्या नेमक्या शब्दांचा पुनरुच्चार करणे करणे शहाणपणाचे ठरेल असे त्यांना वाटले नाही, राजेसाहेबांचे बोलणे सौजन्यशील तर नव्हतेच पण साध्या माणुसकीला सुध्दा धरून नव्हते. त्यामुळेच देशपांडे वकीलांनी त्यांच्या शाही पक्षकारांनी बाजू शक्य तितक्या चांगल्या शब्दात अदबीने मांडली.

अपर्णाताईंनी राधाक्काला सौमित्रला घरी बोलावून आणायला सांगितले. तो नेमका कुठे असेल हे राधाक्का अपर्णाताईंना सांगताना, देशपांडे वकिलांनी ऐकले आणि त्यांना थोडा धक्का बसला. "अग तो बापू शेठ यांच्या किराणा मालाच्या दुकानातील उंच स्टुलावर बसून राजकारणावर गप्पा मारत बसला असेल किंवा साबण, मेणबत्त्या आणि किराणा सामानाच्या जागेवर लावायला बापू शेठना मदत करत असेल. मी आता जाऊन त्याला घेऊन येते."

राधाक्का सौमित्र बोलवायला गेल्यावर अपर्णाताई देशपांडे वकीलांना म्हणाल्या, "आमच्या सौमित्रची आणि इथले किराणा दुकानाचे मालक, बापू शेठ यांची खूप चांगली मैत्री आहे, सौमित्रच्या जन्मापासून ते त्याला ओळखतात.”

देशपांडे वकीलांना एकदम ठसका लागला. तिथे येताना त्यांनी किराणा मालाचे दुकान पाहिले होते. ती खूणच त्यांना अपर्णाताईंचे घर शोधायला उपयोगी पडली होती. दुकानाच्या दर्शनी भागात कांदे बटाट्याची पोती मांडलेली होती, बहुतेक सर्वच गरजेच्या वस्तू तिथे विकायला ठेवलेल्या असाव्यात. देशपांडे वडीलांच्या मनात शंका आली, "थोरामोठ्यांच्या मुलाची मैत्री आणि ती एका किराणा दुकानदाराशी?” त्यांना एकदम धक्काच बसला.

“या लहान मुलावर जर योग्य संस्कार झाले नसतील आणि हलक्या लोकांची संगत लागली असेल तर परिस्थिती अवघड आहे. राजेसाहेबांसाठी याहून अधिक नामुष्कीची गोष्ट असणार नाही, अगोदरच त्यांच्या दोन्ही मुलांचा

कुसंगतीनेच घात केला होता. आता नातवाने त्याच्या वडिलांच्या चांगल्या गुणांऐवजी, मोठ्या काकांचे वाईट गुण घेतले असतील तर काय?"

सौमित्र खोलीमध्ये येईपर्यंत, अपर्णाताई बरोबर बोलताना, देशपांडे वकील या गोष्टीचा अस्वस्थपणे विचार करत होते. जेव्हा दार उघडल्यावर सौमित्र आता आला तरी त्याच्याकडे पाहताना देशपांडे वकील थोडे मनातून धास्तावले होते. आपल्या आईच्या मिठीत धावत आलेल्या मुलाकडे पाहताना, देशपांडे वकीलांच्या मनात, उलट सुलट विचारांचा हलकल्लोळ उडाला आणि क्षणार्धात त्यांची खात्री पटली आजवर त्यांनी पाहिलेल्या छोट्या मुलांपैकी एक अत्युत्कृष्ट आणि अतिशय सुंदर असा हा मुलगा आहे. त्याचा बांधा सुदृढ होता, सुंदर चेहऱ्यावर कोमल बालीश भाव होते, एखाद्या शूरवीराप्रमाणे त्याची मान ताठ होती. आश्र्चयाची बाब म्हणजे तो अगदी त्याच्या वडिलांसारखा दिसत होता. देशपांडे वकीलांच्या नजरेपुढे लहानपणीच्या आशुतोष आला, फक्त तपकिरी डोळे आईकडून घेतलेले दिसत होते पण केस मात्र वडिलांसारखे पिंगट होते. डोळ्यात भीती किंवा दु:खाचा लवलेशही दिसत नव्हता. ते निष्पाप आणि निर्भय होते. त्याच्या चेहऱ्यावर धैर्य आणि आत्मविश्वास स्पष्टपणे दिसत होता.

"हा मुलगा, मी आतापर्यंत पाहिलेल्या मुलांपैकी अत्यंत देखणा आणि सुसंस्कारी मुलगा आहे," देशपांडे वकीलांच्या मनात हा विचार आला, मात्र उघडपणे पालथ्या हातावर आपली हनुवटी घासत म्हणाले, "आणि म्हणून हा कुंतलपूरचा छोटा युवराज आहे."

यानंतर देशपांडे वकील छोट्या युवराजांशी जितका जास्त परिचय होत गेला तेव्हढे जास्त ते चकीत होत गेले. मुळात देशपांडे वकीलांला लहान मुलांची जास्त सवय नव्हती. त्यांनी पाहिलेल्या मोठ्या घराण्यातील लहान मुलामुलींना त्यासाठी मुद्दाम घरी शिक्षणासाठी शिक्षक नेमून, शिष्टाचार शिकवण्यासाठी गव्हर्नेस

a

नेमून त्यांची काटेकोरपणे काळजी घेतली जात असे पण तरीही त्यापैकी काही उद्दाम असत तर काही लाजाळू त्यामुळे म्हाताऱ्या देशपांडे वकीलांना लहान मुलांमध्ये विशेष स्वारस्य नव्हते. कदाचित छोट्या युवराजांच्या नशीबाशी, त्यांना वैयक्तिक स्वारस्य असल्याने सहाजिकच ते सौमित्रकडे जास्त लक्ष देऊन त्याचे निरीक्षण करत होते. सौमित्रला मात्र याची कल्पना नसल्याने तो आपला स्वाभाविकपणे वागत होता. जेव्हा त्यांची ओळख झाली तेव्हा सौमित्रने मित्रत्वाने हस्तांदोलन केले आणि जसा तो बापू शेठ यांच्या प्रश्नाना उत्तर देत असे त्याच पद्धतीने त्याने देशपांडे वकीलांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. तसा तो लाजाळू नव्हता पण आगावू पण नव्हता. त्याच्या आईशी, देशपांडे वकील बोलत असताना त्यांच्या लक्षात आले की तो एखाद्या प्रौढ माणसासारखे लक्ष देऊन त्यांचे संभाषण ऐकत आहे. ते पाहून देशपांडे वकील त्याच्या आईला म्हणाले, "वयाने लहान असून समज मात्र मोठ्या माणसांप्रमाणे आहे असे दिसते."

“होय, काही काही गोष्टींमध्ये त्याची समज मोठ्या माणसांप्रमाणे आहे," अपर्णाताई म्हणाल्या, "तो नेहमीच नव्या गोष्टी समजून घ्यायला आणि शिकायला उत्सुक असतो. सतत मोठ्या माणसांच्या सहवासात रहात असल्याने त्यांच्याकडून ऐकलेले आणि पुस्तकातून वाचलेले मोठे अवघड शब्द त्याला वापरतांना मजा येते. लहान मुलांचे खेळ त्याला फार आवडतात. तसा तो हुषार आहे आणि अगदी छोट्या मुलासारखा निरागस आहे."

पुढच्या वेळी जेव्हा देशपांडे वकील पुन्हा भेटले तेव्हा अपर्णाताईंनी शेवटी म्हटलेले, 'अगदी छोट्या मुलासारखा निरागस आहे' हे खरे असल्याचे त्यांना पटले. त्यावेळी जशी त्यांची बग्गी कोपऱ्यावर वळली तसा एक लहान मुलांचा घोळका त्यांच्यासमोर आला त्यांच्यामध्ये बरीच आरडाओरड सुरू होती, दोन मुलांची पळण्याची शर्यत लागणार होती त्यापैकी एक त्यांचे भावी छोटे युवराज होते

a

बाकीच्या मुलासारखा त्याचा पण दंगा, आरडाओरड स्पष्टपणे ऐकू येत होता. त्याने लाल रंगाची गुडघ्यापर्यंत पोचणारी तोकडी विजार घातली होती आणि दुसऱ्या मुलाची विजार तपकिरी रंगाची होती.

आता शर्यतीला सुरवात होणार होती.

एक, दोन, साडे माडे तीन --, देशपांडे वकील, उत्सुकतेने बग्गीतून बाहेर पाहू लागले. रेस सुरू झाली आणि युवराजांची स्वारी, तुफान मेल सारखी सुसाट धावत सुटली. यापूर्वी असे काही पाहिल्याचे देशपांडे वकीलांना खरोखरच आठवत नव्हते.

"हुर्रे, सौमित्र!" मुले, नाचत उत्साहाने ओरडत होती. "हुर्रे, विजय! पळ जोरात पळ!" दुसऱ्या खेळाडूचे पाठीराखे पण पाठींबा द्यायला सज्ज झाले होते.

ज्या पद्धतीने सौमित्र पळत होता, ते पाहून तो नक्की शर्यत जिंकणार याची देशपांडे वकीलांना खात्री वाटत होती. विजय राणे, दुसरा खेळाडू पण तयारीचा होता. सौमित्रची बरोबरी साधून पुढे जाण्याचे त्यांचे शर्थीचे प्रयत्न चालू होते. "आता सौमित्रच जिंकावा अशी इच्छा करण्याव्यतिरिक्त मी काहीच करू शकत नाही," या विचाराने देशपांडे वकीलांना खेद वाटला आणि खोकल्याची उबळ आली. त्या क्षणी, प्रोत्साहन देणाऱ्या मुलांच्या आरोळया ऐकू आल्या. शेवटची एकच आवेशपूर्ण झेप घेऊन सौमित्रने विजय राणेच्या फक्त दोन सेकंद अगोदर विजेच्या खांबाला हात लावून शर्यत जिंकली होती.

सर्वजण सौमित्रचा जयजयकार करत होते. देशपांडे वकीलांनी डोके आता वळवले, त्यांच्या चेहऱ्यावर हसू होते. "भले! शाब्बास! युवराज," असे स्वतःशी पुटपुटत बग्गी पुढे नेण्यासाठी फर्मावले. बग्गी अपर्णाताईंच्या घरापर्यंत येईपर्यंत सर्व मुले, विजेता आणि पराभूत दोघांसह तिकडेच येत होती. सौमित्र, विजयकडे गेला आणि त्याच्या बरोबर बोलू लागला.

a

त्याचा चेहरा आनंदाने फुलला होता, त्याचे कुरळे केस घामेजलेल्या कपाळाला चिकटले होते, त्याने हात खिशात घातले होते. हरलेल्या मुलांचे अवघडलेपण दूर करण्याच्या हेतूने सौमित्र, विजयला म्हणाला, "अरे माझे पाय तुझ्या पायापेक्षा लांब आहेत, म्हणून मी तुझ्या अगोदर खांबाला हात लावला, त्यात फार काही विशेष नाही. शिवाय मी तुझ्यापेक्षा तीन दिवसांनी मोठा आहे त्याचा हा फायदा आहे. त्याच्या या बोलण्याने विजय राणे इतका खूश झाला आणि आनंदाने हसत ऐटीत चालू लागला जणू काही तोच शर्यत जिंकला असावा. सौमित्रकडे लोकांना दिलासा देण्याचे कौशल्य होते. शर्यत जिंकल्याचा आनंदात त्याच्या लक्षात आले की हरलेल्या मुलाला दु:ख झाले असणार म्हणून जर थोडी वेगळी परिस्थिती असती तर तोही जिंकू शकला असता असे त्याला वाटू शकले असते, म्हणून सौमित्रने स्वतः पुढाकार घेतला आणि त्याची समजूत पटवली.

त्या दिवशी सकाळी, बापू शेठ आणि सौमित्रच्या यांच्या जशा मैत्रीपूर्ण गप्पा होत, त्याप्रमाणे देशपांडे वकील आणि सौमित्र यांच्यामध्ये खूप गप्पा झाल्या, त्यावेळी देशपांडे वकीलांना बऱ्याच वेळा अवघडल्यासारखे सारखे झाले, कसेबसे हसून त्यांनी वेळ निभावून नेली. देशपांडे वकील, अपर्णाताईं बरोबर बैठकीच्या खोलीत चर्चा करत होते छोटा सौमित्र तिथेच बसून त्यांचे बोलणे ऐकत होते. काही कामानिमित्त अपर्णाताई आतल्या खोलीत गेल्या आणि बैठकीच्या खोलीत देशपांडे वकील आणि सौमित्र दोघेच राहिले, सौमित्र बरोबर नेमके काय बोलावे याचा देशपांडे वकीलांना प्रश्न पडला. खरे पाहिले तर,सौमित्र त्याच्या आजोबांना भेटण्यापुर्वी त्याला बदलणाऱ्या परीस्थितीची आणि कुंतलपूरच्या राजवाड्याची माहिती देणे गरजेचे होते. त्याची आई त्याच्यासोबत एकाच घरात राहणार नाही हे त्याला अजून माहीत नव्हते आणि त्याची त्याबद्दल नेमकी काय प्रतिक्रिया येईल

a

याची खात्री नव्हती, म्हणून ती गोष्ट त्याचा थोडा अंदाज घेऊन सांगावी लागणार होती.

देशपांडे वकील, एका मोठ्या खिडकीच्या बाजूला एका खुर्चीत बसले होते. त्यांच्या समोरच्या मोठ्या खुर्चीवर बसून सौमित्र त्यांच्याकडे पाहात होता. त्यांने मान पाठीमागे उशीवर टेकवली होती, पण तो छोटा असल्याने त्याचे पाय जमिनीला टेकलेले नव्हते. तसेच अधांतरी लटकत होते. त्याने पायावर पाय ठेवत आपले हात खिशात खुपसले होते, बापू शेठ यांच्या समोर तो जसा बसायचा तसाच अगदी तो आरामात बसून, त्यांच्याकडे आदरयुक्त नजरेने पाहत होता. अपर्णाताई खोलीतून घरात गेल्यावर खोलीत थोडी शांतता पसरली. दोघेही एकमेकांचा अंदाज घेत असावेत. गुडघ्यापर्यंत विजार आणि लाल रंगाचे मोजे घातलेल्या त्या छोट्या मुलाबरोबर काय बोलावे याचा देशपांडे वकील विचार करत होते.

अचानक सौमित्रने स्वतः संभाषण सुरू केले आणि वकील साहेबांना हायसे वाटले. "मला फक्त गोष्टीं मधला राजा माहीत आहे, पण खऱ्याखुऱ्या राजांबद्दल काही माहिती नाही. तुम्ही मला जर मोठेपणी राजा बनायचे असेल तर मला त्याविषयी सर्व जाणून घ्यायला आवडेल. तुम्ही मला त्यांच्याविषयी काही माहिती सांगता काय?" सौमित्रने म्हणाला. "हो नक्कीच."

"मग मला सांगा, राजाची निवड कशी केली जाते?" सौमित्रने विचारले.

"सर्वात प्रथम स्थानावर एखाद्या मोठ्या साम्राज्याचे मुख्य, महाराज किंवा महाराणी असतात. आपले मराठा साम्राज्य, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केले ही गोष्ट तर तुला माहित असणार. त्यांनी लहान, मोठी संस्थाने एकत्र करून मराठी साम्राज्याची स्थापना केली. या छोट्या, मोठ्या संस्थानांच्या प्रमुखांना राजा हा किताब आहे. मराठा साम्राज्याच्या स्थापनेच्या अगोदर पासून काही संस्थाने, जहागिरी अस्तित्वात होत्या. तर काही जणांना, स्वराज्यासाठी काही विशेष

कामगिरी केल्याबद्दल महाराजांनी जहागिरी बहाल केली होती. कुंतलपूर संस्थान, सुरवातीपासून शिवाजी महाराजांच्या सोबत असल्याने, सरदेशमुखीचा अधिकार आणि संस्थान कायम आपल्या घराण्याकडे राहिले.

"इथे मुंबईत ब्रिटीशांचे राज्य असताना असताना, कुंतलपूर मध्ये राजा स्वतंत्रपणे राज्यकारभार करतो?" सौमित्रच्या प्रश्नावर देशपांडे वकील एकदम चमकले.

नेमके काय उत्तर द्यावे याचा त्यांना पेच पडला, "होय, कुंतलपूरचे संस्थानाचा कारभार स्वतंत्र आहे, तसा संस्थानाशी ब्रिटिश राजसत्तेशी तहनामा झाला आहे. कुंतलपूर संस्थान आणि ब्रिटिश यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत." शक्य तितक्या सोप्या पध्दतीने देशपांडे वकीलांनी समजावून सांगितले.

"मी कधी राजा बनण्याचा विचार केला नव्हता. मला तर इंग्रजांना या देशातून हाकलून द्यायला आवडेल, बापू शेठना पण मी राजा झालेले फारसे आवडणार नाही. ते म्हणतात की हे राजे, महाराजे, सरदार, दरकदार इंग्रज सरकारचे पाठीराखे आहेत म्हणून आपण पारतंत्र्यात आहोत. संपूर्ण देशात इंग्रजांच्या विरोधात जी चळवळ उभी आहे त्यातील प्रमुख नेत्यांची सभा आझाद मैदानावर होती, बापू शेठ मला तिकडे घेऊन गेले होते. सभेला खूपच गर्दी होती."

आता मात्र हा मामला गंभीर होत चालला आहे याची देशपांडे वकीलांना जाणीव झाली. ते नीट सावरून बसले. दोन्ही तळवे एकमेकांना जोडून त्यावर हनुवटी टेकवली डोळे मिटून विचारांची जुळवाजुळव केली आणि म्हणाले, "कुंतलपूर संस्थानाचे धोरण संस्थान इंग्रज सरकारच्या विरोधात जाणार नाही याची दक्षता घेतली जाते मात्र इंग्रज सरकार संस्थानाच्या राज्य कारभारात दखल देत नसल्याने कुंतलपूर मध्ये संपूर्ण स्वायत्तता आहे."

छोट्या सौमित्रला स्वतंत्रता आणि स्वायत्तता यातील फरक समजला नाही. पण बापू शेठ म्हणतात त्यापेक्षा कुंतलपूरचे राजे काही वेगळे असावेत असे वाटून असा समज झाला आणि तो तसाच असावा असा देशपांडे वकीलांचा प्रयत्न होता.

"आपला राजवंश खूप प्राचीन आहे." देशपांडे वकीलांनी विषय बदलण्याचा प्रयत्न केला. "म्हणजे काय?" सौमित्रने विचारले. "म्हणजे खूप जूना आहे अनेक वर्षांपासूनचा आहे."

"अहो!" सौमित्र अजून खोलवर खिशात हात घालत म्हणाला. "मला वाटते बागेजवळ केळी विकणाऱ्या आजीबाई पण अशाच वयाने खूप वर्षांच्या आहेत. मला तर वाटते बहुतेक शंभर वर्षांच्या तरी नक्कीच असतील. एव्हढ्या वर्षांच्या असून त्या कशा काय अजून केळी विकायला बसतात यांचे सर्वांना आश्चर्य वाटते. पण जेव्हा पाऊस पडतो तेव्हा मला त्यांची खूप दया येते. गेल्या पावसाळ्यात माझ्या मित्राकडे विजय राणे कडे दोन रुपये होते मी त्याला रोज आजीकडून रोज दहा पैशाची दोन केळी घ्यायला सांगितले असे सलग वीस दिवस रोज केळी खाऊन तो कंटाळला. मी आईने मला खाऊ साठी दिलेल्या पैशातून आजीबाईकंडून नेहमी केळी घेतो. मला त्या गरीब म्हाताऱ्या आजीबाईबंद्दल खूप वाईट वाटते. ती म्हणते की पावसाळ्यात गारठा तिला सोसवत नाही. अगदी हाडापर्यंत थंडी वाजत असते."

हे ऐकून देशपांडे वकील गोंधळून गेले त्यांना पुढे काय बोलावे ते समजेना. त्याच्या निरागस, गंभीर चेहऱ्याकडे पाहून ते म्हणाले, "मी काय म्हणालो ते तुला समजले नाही, तुझा काहीतरी गैरसमज झाला आहे. प्राचीन वंश म्हणजे आपल्या घराण्याचे नाव शेकडो वर्षे जूने आहे. आपल्या घराण्याचा मूळ पुरूष चारशे वर्षांपूर्वी जन्माला होता."

a

"असे काय? मग खूपच जूनी गोष्ट आहे. आपण माझ्या आईला हे सांगितले आहे काय? तिला अशा इतिहासातील गोष्टी खूप आवडतात. बरे, एकदा राजा झाल्यावर, राजे आणखी करावे लागते?"

‘‘पुर्वीच्या काळी आपल्या पुर्वजांनी छत्रपती शिवाजी महाराजांना राज्य स्थापन करण्यासाठी मदत केली आहे. जून्या काळात मोठ मोठ्या लढाया जिंकल्या आहेत, राजे शूर असतात."

"मला स्वतःला शूरवीर व्हायला आवडेल. माझे बाबा पण शूर होते. इंग्रजांच्या लाठीहल्ल्यात ते बळी पडले नसते तर तेच राजा झाले असते. शूर आणि धाडसी असणे ही चांगली गोष्ट आहे. तुम्हाला माहित आहे काय पूर्वी मी अंधाराला घाबरत असे. मग मी बाल शिवाजीची आणि त्यांच्या मावळयांची गोष्ट ऐकली आणि मग मी अंधाराला घाबरण्याचे सोडून दिले."

"राजा असण्याचा आणखी एक फायदा आहे," देशपांडे वकील हळूच म्हणाले आणि आपली चाणाक्ष नजर त्याच्या चेहऱ्याकडे वळवली. "काही राजांकडे खूप पैसा असतो." त्या छोट्या मुलाला पैशाची ताकद काय असते हे माहित आहे काय, हे जाणून घेण्यासाठी ते उत्सुक होते. "खूप पैसा असणे ही एक चांगली गोष्ट आहे. माझ्याकडे पण खूप पैसा असावा, अशी माझी इच्छा आहे," सौमित्र निरागसपणे म्हणाला. "तुला खूप पैसा कशासाठी हवा आहे? तू खूप पैसे मिळाले तर काय करशील? देशपांडे वकीलांनी विचारले. "असे पहा, पैसा असला की खूप गोष्टी करता येतात. आता त्या केळी विकणाऱ्या आजीबाईचे परिस्थिती पहा, मी जर खूप श्रीमंत असतो तर तिला मी लहानसा तंबू तरी दिला असता म्हणजे तिला पावसात भिजायला लागणार नाही. उबेसाठी एक कोळशाची शेगडी पण द्यायला हवी. जर खूप पाऊस पडत असेल तेव्हा तर मी तिला एक रुपया देईन म्हणजे तिला घरी राहणे शक्य होईल शिवाय मी तिला एक शाल देईन कारण तिला खूप

a

थंडी वाजते. तिची हाडे आपल्या सारखी नाहीत. तिला हालचाल करताना खूप वेदना होतात. जर माझ्याकडे पैसे असतील तर मी तिच्या थोड्या वेदना कमी करू शकेन आणि तिला थोडा आराम मिळेल." देशपांडे वकीलांनी घसा थोडा खाकरला आणि विचारले, "तू श्रीमंत असशील तर आणखी दुसरं काय करशील?"

"मला अजून बरेच काही करायचे आहे. मी माझ्या आईसाठी खूप खूप सुंदर वस्तू खरेदी करेन. शिवणकामाला लागणाऱ्या सर्व वस्तूंची एक लहान पेटीच आणेन. पुस्तके, पंखा आणि लहानशी घोडा गाडी, तिचा कामासाठी जाताना चालण्याचा त्रास कमी होईल. तिला रेशमी साड्या आवडत असत. बाबा असतांना ती तशा साड्या नेसत असे. मी तिला सुंदर सुंदर रंगाच्या रेशमी साड्या आणेन. पण ती साध्या सुती साड्या नेसत असते. तिला दुकानात नेऊन तिला ज्या हव्यात त्या साड्या, तिला मी निवडायला सांगेन. आणि मग बबनला--"

"हा बबन कोण आहे?" देशपांडे वकीलांनी विचारले. "बबन बूट पॉलिश करणारा मुलगा आहे, " छोट्या युवराजांनी सांगितले, त्याचा मदतीसाठीची योजना तयार होती आणि देशपांडे वकीलांनी त्यात विशेष लक्ष घातल्याने तो एकदम उत्साहीत झाला होता.

"तो एक सर्वात चांगले बूट पॉलीश करणारा चांगला मुलगा आहे. गावात एका रस्त्याच्या कोपऱ्यावर उभा राहून तो काम करत असतो. मी लहान असल्यापासून त्याला ओळखतो. मी खूप लहान असताना, एकदा आई बरोबर त्या रस्त्याने जात होतो. तिने मला एक सुंदर चेंडू विकत घेऊन दिला होता. तो माझ्या हातातून निसटून रस्त्याच्या मधोमध जाऊन पडला. रस्त्यावर गर्दी होती आणि रस्त्यावर घोडागाड्या, सायकली आणि ट्राम धावत होती. चेंडू गेला म्हणून मी रडू लागलो. बबन बूट पॉलिश करत होता त्याने चेंडू रस्त्याच्या मधोमध पडलेला पाहिला आणि तशा गर्दीमध्ये धावत जाऊन माझा चेंडू आपल्या शर्टाने पुसून मला

आणून दिला. आईला त्याचे खूप कौतुक वाटले. तेव्हा पासून आम्ही गावात गेलो की त्याच्याबरोबर खुशालीच्या गप्पा मारत असतो. अलीकडेच तो खूप नाराज होता. त्याचा धंदा नीट चालत नाही असे सांगत होता."

"तुला त्याच्यासाठी काय करायला आवडेल?" देशपांडे वकीलांच्या चेहऱ्यावर एक विचित्र स्मितहास्य होते. "मी सर्वात प्रथम त्याला जगनच्या, कर्जातून मुक्त करेन," सौमित्र आता बुट पॉलीशच्या धंद्यातील अडचणींचा विचार करायला लागला होता. "हा जगन कोण आहे?" देशपांडे वकीलांनी विचारले. "तो बबनचा भागिदार आहे. पण खूप वाईट आहे. बबन खूप काम करतो पण त्याला भांडवलासाठी जगनकडून पैसे कर्जाऊ घ्यावे लागतात. जगन त्याची खूप फसवणूक करतो आणि त्याची कष्टाची कमाई व्याजापोटी लुबाडतो. स्वतः काही काम करत नाही. दिवसभर बबन काम करतो आणि संध्याकाळी हा पैसे वसूल करून निघून जातो. गिऱ्हाईकांना जगन अजिबात आवडत नाही. तो तिथे असेल तर लोक बबन कडे पण बूट पॉलिशसाठी येत नाहीत. म्हणून मी सर्वात अगोदर बबनने घेतलेले कर्ज फेडायला लावेन आणि बबनला स्वतंत्रपणे काम करायला सांगेन. त्याला नवीन कपडे आणि नवीन ब्रशेस आणि इतर साहित्य आणून देईन आणि त्याच्या धंद्याची सुरुवात चांगली होईल."

सौमित्र, विश्वासाने आणि प्रामाणिकपणे, त्याच्या मित्रांची गोष्ट सांगत होता, त्याचा असा समज झाला होता त्या वयोवृद्ध वकील महाशयांना त्यांच्या सारखेच त्या सर्वांमध्ये स्वारस्य असेल आणि आश्चयाची गोष्ट म्हणजे देशपांडे वकीलांना त्यामध्ये स्वारस्य निर्माण झाले अर्थात केळेवाल्या आजीबाई किंवा बबन- जगनच्या भागिदारीच्या भांडणात नाही तर ज्याप्रकारे कुरळ्या केसांचा गोड लहानगा आपल्या मित्रांच्या मदतीसाठी नाविन्यपूर्ण योजना बनवण्यात स्वतःला

a

विसरून गेला होता ते पाहून कोणीही सहृदय व्यक्ती त्यांच्यावर मोहित झाल्याशिवाय राहिली नसती.

"या शिवाय आणखी काही---," देशपांडे वकीलांनी विचारले. "तू खूप श्रीमंत झालास तर तुझ्या स्वतःसाठी काय करशील?"

"खूप काही गोष्टी मला करायला आवडतील. सर्वात अगोदर मी राधाक्कांकडे त्यांच्या बहिणीला- बिंबाक्कांना मदत करण्यासाठी पैसे देईन. बिंबाक्कांचे पती सुतारकाम करतात. त्यांना आठ मुले आहेत. त्यांना नेहमीच पैशाची चणचण भासत असते. त्या आमच्या कडे येतात आणि सारख्या रडत असतात, आई त्यांना पिशवीतून धान्य वगैरे देत असते मग परत रडायला लागतात आणि, 'देव तुमचे भले करो' म्हणून आशीर्वाद देतात. शिवाय मला एक सोन्याचे साखळी असलेले घड्याळ बापू शेठना भेट म्हणून द्यायला आवडेल शिवाय त्यांना तंबाखू ओढायचा पाईप पण द्यायचा आहे. मला लहान मुलांची एक तुकडी बनवून देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या लोकांना मदत करायची आहे. आम्ही असे एकत्र आलो की मग आम्हाला कवायत करता येईल, प्रभातफेऱ्या काढता येतील.”

तेव्हढ्यात आत अपर्णाताई आल्या आणि देशपांडे वकीलांना म्हणाल्या, "मला परत यायला खूप वेळ झाला, क्षमा असावी. आमच्याकडे एक संकटात सापडलेली स्त्री मदत मागायला आली आहे."

"आताच आपला छोटा मुलगा त्याच्या मित्रांची माहिती सांगत होता आणि तो श्रीमंत झाला तर त्याच्या मित्रासाठी काय काय करणार याच्या योजना पण सांगत होता."

"होय, बिंबाक्का त्याच्या मित्रपरिवारापैकी एक आहेत. आता मी त्यांच्या बरोबर स्वयंपाकघरात बोलत होते. त्यांच्या पतीला संधीवाताचा त्रास आहे त्यामुळे ते काम करू शकत नाहीत. म्हणून त्या मोठ्या पैशांच्या अडचणीत आल्या आहेत.”

a

सौमित्र त्याच्या खुर्चीतून खाली सरकला आणि म्हणाला, "मी त्यांना जाऊन भेटून येतो. महादेव काका स्वभावाने खूप चांगले आहेत. त्यांनी मला एकदा लाकडाची तलवार बनवून दिली होती. पण एकदा का संधीवाताने डोके वर काढले की त्यांच्या नाईलाज होतो. आणि कामच करता येत नाही, एरव्ही सुतारकामात ते एकदम तरबेज आहेत."

तो धावतच खोलीतून बाहेर पडला आणि देशपांडे वकील त्यांच्या खुर्चीवरून उठले. त्यांच्या मनात काहीतरी बोलायचे होते, ते थोडे संकोचाने अपर्णाताईंना म्हणाले, "कुंतलपूर सोडून इकडे येण्यापूर्वी मी मार्तंडदेव राजेसाहेबांची भेट घेतली होती. तेव्हा त्यांनी मला काही महत्वाच्या सूचना दिल्या. त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली की त्यांच्या नातवाचे यापुढचे, कुंतलपूर मधील भावी आयुष्य आनंदाचे असावे तसे त्याचे इथले मित्र, परिचित पण आनंदात असावेत. त्यांनी मला छोट्या युवराजांना या गोष्टीची कल्पना देण्यासाठी सांगितले आहे की हा बदल त्यांना भरपूर संपत्ती आणि लहान मुलांना हवे असणारी करमणूक, खेळ, खेळणी, मनोरंजन देऊ शकणार आहे. जर छोट्या युवराजांच्या काही इच्छा, अपेक्षा असतील तर त्या राजेसाहेबांनी मला पूर्ण करण्यासाठी आणि त्यांचे आजोबा त्यांना जे हवे ते देत आहेत या गोष्टीची कल्पना त्यांना द्यायला सांगितले आहे. अर्थात, मला माहित आहे की राजेसाहेबानी अशी काही अपेक्षा केली नव्हती; पण जर एखाद्या गरजू स्त्रीला मदत केल्याने युवराजांना आनंद होणार असेल आणि जर तो त्यांना मिळाला नाही तर मात्र राजेसाहेब नाराज होतील."

यावेळी दुसऱ्यांदा, राजेसाहेब खरोखरच या संबंधात काय बोलले होते हे देशपांडे वकीलांनी सांगितले नाही.

राजेसाहेब म्हणाले होते, "त्या मुलाला समजू द्या की मी त्याला जे काही हवे ते देऊ शकतो. कुंतलपूरच्या राजेसाहेबांचा नातू म्हणजे काय काय आहे हे त्याला

समजू देत. त्याला जे काही हवे आहे ते त्याला विकत घेऊन द्या; त्याच्या खिशात पैसे असू द्या आणि त्याला सांगा त्यांच्या आजोबांनी ते दिले आहेत."

त्यांचे हेतू चांगले नव्हते. छोट्या युवराजांचा प्रेमळ आणि दयाळू स्वभाव न समजून घेता, आपल्या संपत्तीचे आणि अधिकाराचे महत्व ठसविण्याचे राजेसाहेबांचे असंवेदनशील प्रयत्न, प्रत्यक्षात हानीकारक ठरले असते म्हणूनच देशपांडे वकीलांना सर्व सांभाळून घ्यावे लागत होते. सौमित्रची आई अतिशय संवेदनशील स्त्री होती, तिच्या नजरेतून अशी असंवेदनशीलता नक्कीच सुटली नसती. देशपांडे वकीलांच्या बोलण्यावरून तिचा असा समज झाला की राजेसाहेब एकाकी, दुःखी वृद्ध माणूस असून त्यांनी आपली तिन्ही मुले गमावली आहेत, त्यांना तिच्या लहान मुलाबरोबर सहृदयपणाने वागून त्याचे प्रेम आणि विश्वास जिंकण्याची इच्छा आहे. सौमित्र बिंबाक्काना मदत करू शकतो या विचाराने तिला आनंद झाला. त्याही पेक्षा तिला या गोष्टीचा आनंद झाला की तिच्या लहान मुलाच्या नशीबात अकल्पितपणे युवराज बनण्याच्या योग आल्याने, तो अनेक गरजू, उपेक्षितांच्या मदतीला उपयोगी पडू शकतो, या विचाराने तिच्या चेहऱ्यावर आनंदाची चमक आली.

"ओहो! हा तर राजेसाहेबांच्या मनाचा मोठेपणा आहे. सौमित्रला खूप आनंद होईल. त्याचे, बिंबाक्कांवर आणि महादेवरावांवर प्रेम आहे आणि ते पण त्याच्यावर माया करतात. त्यांना मदतीची गरज आहे, मला त्यांना जास्त मदत करायला आवडले असते पण माझ्या पण काही मर्यादा आहेत. महादेव काका कष्टाळू आहेत, जेव्हा बरे असतात तेव्हा खूप कष्ट करतात पण संधीवाताने आजारी पडल्यावर त्यांचा नाईलाज होतो. त्यांना घ्यावी लागणारी औषधे महाग आहेत शिवाय उबदार कपडे, पौष्टिक अन्नाची त्यांना गरज आहे, त्यांना मदत केली तर वाया जाणार नाही."

a

देशपांडे वकीलांनी खिशातून छोटी वही काढली आणि काही आकडेमोड केली. कुंतलपूरच्या युवराजांची पहिली इच्छा पूर्ण होणार होती. नेमकी काय होती हे समजल्यावर त्या तिरसट, व्यवहारी वृत्तीच्या, स्वार्थी वृध्द राजेसाहेबांची नेमकी काय प्रतिक्रिया असेल असा विचार देशपांडे वडीलांच्या मनात आला. "कदाचित आपल्याला माहित असेल की कुंतलपूरचे राजेसाहेब एक अतिशय श्रीमंत संस्थानिक आहेत. अक्षरशः साक्षात लक्ष्मी तिथे पाणी भरते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. माझ्यामते युवराजांची कोणतीही इच्छा पूर्ण करण्यात त्यांना आनंद वाटेल. आपण जर त्यांना बोलावून घेतले तर मी या व्यक्तींसाठी पाचशे रुपये देऊ शकतो."

"पाचशे रुपये!" अपर्णाताई उद्गारल्या. "हे त्यांच्यासाठी अपेक्षेपेक्षा खूपच जास्त आहेत. खरोखरच माझा सुध्दा यावर विश्र्वास बसत नाही."

"हे अगदी खरं आहे," देशपांडे वकील कोरडे हसत म्हणाले. "तुमच्या मुलाच्या आयुष्यात आता खूप मोठा बदल झाला आहे, त्याच्या हातात खूप मोठी सत्ता येणार आहे."

"अहो! पण तो वयाने अजून लहान आहे--अतिशय लहान मुलगा. या सर्व ऐश्वर्याचा उपभोग आणि विनियोग कसा करावा हे त्याला कसे शिकवावे असा मला प्रश्न पडला आहे आणि त्याची भीती वाटत आहे. माझा छोटा सौमित्र खूप प्रेमळ, साधा सरळमार्गी लहान बालक आहे."

देशपांडे वकीलांनी परत एकदा घसा खाकरला. अपर्णाताईंच्या सुंदर तपकिरी डोळ्यात दिसणारी भीती आणि त्यांना त्यांच्या छोट्या मुलाविषयी वाटणारी काळजी पाहून, त्यांचे व्यवहारी हृदय एकदम हेलावून गेले. त्यांना त्या एकाकी मायलेकांबद्दल ममत्व जाणवले. ते अपर्णाताईंना म्हणाले, "बाईसाहेब, मी सकाळी युवराजांच्या बरोबर बराच वेळ चर्चा केली आणि त्यांची पारख पण केली.

a

कुंतलपूरचे भावी राजे, इतरांचा विचार करणारे आहेत तसाच स्वतःच्या राजघराण्याचा मान सन्मान जपणारे आहेत. अजून ते लहान आहेत, पण मला वाटते की त्यांच्यावर विश्वास ठेवला जाऊ शकतो."

मग अपर्णाताई आत गेल्या आणि सौमित्रला घेऊन बैठकीच्या खोलीत आल्या. त्या मायलेकाचे बोलणे देशपांडे वकीलांच्या कानावर पडले.

"महादेव काकांचा संधीवात बळावला आहे. सर्व सांधे सुजलेले आहेत . बिंबाक्का म्हणतात तरी थकलेल्या घरभाड्याचा विचार करत राहतात त्यामुळे आणखी जास्त त्रास होतो. त्यांना निदान बऱ्यापैकी कपडे मिळाले तर एखाद्या दुकानात नोकरी बघता येईल कारण अशा परिस्थितीत ते सुतार काम करू शकत नाहीत."

जेव्हा सौमित्र बैठकीच्या खोलीत आला तेव्हा त्याचा चेहरा चिंताग्रस्त झाला होता. त्याला बिंबाक्कांबद्दल खूप वाईट वाटत होते.

"आईने, तुम्ही मला बोलवले आहे असे सांगितले. मी बिंबाक्कांबरोबर बोलत होतो."

देशपांडे वकीलांनी खाली वाकून त्याच्याकडे पाहिले. त्यांना थोडे अवघडल्यासारखे झाले आणि ते थोडे गोंधळून गेले. सौमित्रची आई म्हणाली ते बरोबर होते, तो खूपच लहान मुलगा होता. खूप लहान.

"कुंतलपूरच्या राजेसाहेबांनी--" त्यांनी बोलायला सुरुवात केली आणि नकळतपणे अपर्णाताईंकडे पाहिले.

अपर्णाताई चटकन पुढे आल्या आणि सौमित्र समोर गुडघे दुमडून बसल्या आणि सौमित्रला दोन्ही हातांनी कवटाळून धरले आणि म्हणाल्या, "बाळ सौमित्र, राजेसाहेब तुझे आजोबा आहेत, ते खूप दयाळू आहेत. त्यांचे तुझ्यावर खूप प्रेम आहे आणि तू पण त्यांच्यावर प्रेम करावे अशी त्यांची खूप इच्छा आहे. त्यांची तिन्ही मुले

देवाघरी गेली आहेत. तू स्वतः आनंदात असावे आणि दुसऱ्यांना सुध्दा तू आनंदी करावे अशी त्यांची इच्छा आहे. त्यांच्याकडे खूप संपत्ती आहे आणि तुला जे हवे ते तुला मिळावे असे त्यांना वाटते. तसे त्यांनी वकील साहेबांना खूप सारे पैसे देण्यासाठी सांगून ठेवले आहे. त्यातील काही पैसे तू बिंबाक्कांना घरभाडे देण्यासाठी आणि महादेव काकांना औषधे आणि इतर खर्चासाठी देऊ शकतोस. खरच तुझे आजोबा खूप चांगले आहेत," असे म्हणत तिने त्याचा पापा घेतला. क्षणार्धात त्याचा चेहरा आनंदाने उजळून निघाला.

त्याने पटकन देशपांडे वडीलांकडे पाहिले आणि गडबडीने विचारले, "मला लगेच पैसे देता येतील काय? बिंबाक्का आता त्यांच्या घराकडे निघाल्या आहेत." देशपांडे वकीलांनी त्याला नव्या कोऱ्या शंभर रूपयांच्या पाच नोटा दिल्या. ते घेऊन सौमित्र पळत स्वयंपाकघरात गेला. "बिंबाक्का!" असे जोरात ओरडला. "बिंबाक्का, एक मिनिट थांबा! हे काही पैसे आहेत. ते तुमच्यासाठी आहेत, आता तुम्ही घरभाडे देऊ शकता. माझ्या आजोबांनी ते तुम्हाला आणि महादेव काकांना देण्यासाठी मला दिले आहेत."

"अरे, अरे सौमित्र!" बिंबाक्का घाबरलेल्या आवाजात ओरडल्या. "हे तर पाचशे रुपये आहेत. तुझी आई कुठे आहे?"

"मला वाटते की मला जाऊन त्यांना सर्व समजावून सांगावे लागेल," अपर्णाताई म्हणाल्या आणि त्या आत गेल्या. देशपांडे वकील एकटेच खिडकीतून बाहेर पहात होते. कुंतलपूरच्या राजेसाहेबांचा विचार त्यांच्या मनात घोळत होता. राजवाड्याच्या भल्या मोठ्या विलासी दालनात, संधिवाताने ग्रस्त झालेले राजेसाहेब, एकटेच बसलेले असणार. त्यांची प्रेमाने विचारपूस करावी असे कोणीही त्यांच्याबरोबर तिथे असणार नव्हते कारण आजवर राजेसाहेबांनी स्वतः व्यतिरिक्त इतर कुणावरही कधी प्रेम केले नव्हते. ते अत्यंत स्वार्थी, आपमतलबी, गर्विष्ठ आणि

संतापी होते. त्यांनी आजवर फक्त कुंतलपूरच्या राजसिंहासनाची आणि स्वतःच्या सुखाची काळजी घेतली होती त्यापलीकडे इतरांचा साधा विचार देखील त्यांच्या मनामध्ये येत नसे. सर्व सत्ता, सामर्थ्य, राजवैभव, मान सन्मान यांचा ते एकटेच उपभोग घेत. परंतु आता ते वृद्ध झाले होते; आतापर्यंतचे त्यांचे उत्साहाने आणि आनंदाने भरलेले स्वकेंद्रित आयुष्य त्यांना आता निष्क्रिय आणि निरस वाटू लागले. त्यामुळे त्यांची अस्वस्थता आणि चिडचिड कमालीची वाढली तशात त्यांची तब्बेत देखील पूर्वी सारखी साथ देत नव्हती त्यामुळे त्यांच्या काहीच पसंतीस येत नसे. तसेच त्यांच्या अशा वागण्यामुळे तेही कुणाला आवडत नसत. कुंतलपूर सारख्या संपन्न संस्थानाचे संस्थानिक असूनही मार्तंडदेव राजेसाहेब जनतेमध्ये कमालीचे अप्रिय होते. त्यांनी ठरवले असते तर राजवाडा पै पाहुण्यांनी गजबजून गेला असता, शाही पाहुणचाराने आमंत्रित खुश झाले असते. परंतु राजेसाहेबांना कल्पना होती की त्यांचे आमंत्रण स्विकारणारी मंडळी चिडखोर वृध्द यजमानाला आणि त्यांच्या तिखट जीभेला घाबरून असायची. त्यांचे बोलणे तिखट होते तसेच स्वभावात खवटचपणा आणि कडवटपणा भरलेला होता. जेव्हा त्यांच्या अंगात जोम होता तेव्हा ते इतरांना तुच्छतेने वागवत असत, त्यांना लोकांशी निर्दयीपणे वागण्यात एकप्रकारचा आसुरी आनंद मिळत असावा, त्यामुळेच समंजस, स्वाभिमानी लोक त्यांचा पाहुणचार टाळत आणि नेभळट लोक त्यांना घाबरून दूर रहात.

देशपांडे वकीलांना मार्तंडदेव राजेसाहेबांच्या कठोर आणि आक्रमक पद्धतीने वागण्याची खडानखडा माहिती होती. खिडकीतून बाहेर पहात असताना त्यांच्या मनात तेच विचार होते. अचानक त्यांच्या मनात छोट्या सौमित्र बद्दल विचार आला. मार्तंडदेव राजेसाहेबांच्या बरोबर उलट त्याचे व्यक्तिमत्त्व होते. आनंदी, दयाळू, उत्साही असा सुंदर, देखणा, निष्पाप बालक, त्यांच्या समोरच्या भल्या मोठ्या खुर्चीत बसून, अत्यंत विचारपूर्वक आणि प्रामाणिकपणे, आपल्या मित्रांची-

a

केळी विकणाऱ्या आजीबाईंची, बुटपॉलीश करणाऱ्या बबनची, अडचणीत सापडलेल्या बिंबाक्का आणि महादेव काकांची हलाखीची परिस्थिती विशद करणारा आणि त्यावर मात करण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधणारा सौमित्र, त्यांना एक विश्र्वासू छोटा मित्रच वाटला. देशपांडे वकीलांना वाटले, कुंतलपूर संस्थानाच्या प्रचंड उत्पन्नाचा, अफाट संपत्तीचा, भव्य मालमत्ता आणि सत्ता सामर्थ्याचा उपयोग तेथील जनतेच्या भल्यासाठी केला जाईल अथवा वाईटासाठी, हे काळच ठरवेल मात्र ती जबाबदारी आता सौमित्रच्या छोट्या खांद्यावर नियतीने टाकली आहे असे त्यांना वाटले. ते स्वतःशी पुटपुटले, "खरच नक्कीच खूप फरक पडेल." तेव्हढ्यात सौमित्र आणि अपर्णाताई तिथे आल्या. सौमित्र खूप उत्साही आणि आनंदी दिसत होता. देशपांडे वकील आणि अपर्णाताई खुर्चीत बसून बोलू लागले. मधल्या खुर्चीवर सौमित्र बसून गुडघ्यावर हात ठेवून त्यांचे बोलणे ऐकत होता. अत्यंत कठीण परिस्थितीतून सुटका झाल्याने, बिंबाक्कांना अत्यानंद झाला होता, याचे सौमित्रला खूपच समाधान वाटत होते त्याचा चेहरा आनंदाने फुलून आला होता तो देशपांडे वडीलांना म्हणाला, "बिंबाक्का रडायला लागल्या, त्या म्हणाल्या हे आनंदाश्रू आहेत. खरोखरच मी, याआधी कोणालाही आनंदामुळे रडताना पाहिले नाही. माझे आजोबा खूप चांगले आहेत असे मला वाटत होते पण ते इतके चांगले असतील याची मला कल्पना नव्हती. मला जे वाटत होते त्यापेक्षा राजा बनणे ही फार मोठी आणि महत्त्वाची गोष्ट आहे. मला खूप आनंद झाला आहे - मी राजा बनणार याचा मला खूप आनंद झाला आहे."

a

# प्रकरण 3

पुढच्या आठवड्यात सौमित्रचे मत, राजा बनण्यासाठी अधिकाधिक अनुकूल बनत चालले. खरोखरच अशी कोणतीही गोष्ट नव्हती की त्याला करावीशी वाटेल आणि ती करणे अशक्य असेल. त्याला देशपांडे वकीलांच्या बोलण्यातून एव्हढे समजले होते की त्याची कोणतीही इच्छा पूर्ण केली जाईल मग तो अगदी आनंदाने इच्छापूर्ती करून घेण्याच्या मागे लागला. मित्रपरिवाराच्या भल्यासाठी त्याचे प्रामाणिक प्रयत्न पाहून देशपांडे वकील पण अचंबित झाले. कुंतलपूरला प्रस्थान करण्यापूर्वी साधारण एक आठवडा अगोदर त्याने अनेक आगळयावेगळया गोष्टी केल्या. एका सकाळी सौमित्र आणि देशपांडे वकील केळेवाल्या आजीबाईंना जाऊन भेटले आणि पावसापासून संरक्षण मिळावे म्हणून एक तंबू, गारठ्यासाठी उपयोग व्हावा म्हणून एक शेगडी, थंडीसाठी उबदार अशी शाल आणि अडीअडचणीला उपयोगी पडावेत म्हणून काही पैसे देऊन आले. या मदतीने आजीबाईंना खूप आनंद झाला. सौमित्रने गोड आवाजात सांगितले की, "मी आता कुंतलपूर संस्थानाचा युवराज बनण्यासाठी जाणार आहे. तुम्हाला पावसाचा त्रास होतो, तुमची हाडे दुखतात हे पाहून मला फार वाईट वाटते. माझी कधी हाडे दुखत नाहीत म्हणून मला तुम्हाला किती त्रास होतो याची कल्पना नाही पण मला तुमची खूप काळजी वाटते. मला वाटते आता तुमचा त्रास थोडा कमी होईल."

a

"केळेवाल्या आजीबाई खूप चांगल्या आहेत," असे तिथून निघून जाताना सौमित्र, देशपांडे वकीलांना सांगत होता. "एकदा मी रस्त्यात पडलो, माझ्या गुडघ्याला खरचटले होते, तेव्हा मला जवळ बोलावून आजीबाईंनी एक केळे दिले, मला त्या गोष्टीची कायम आठवण आहे. तुम्हाला माहिती असेल, जे आपल्याशी प्रेमळपणे आणि दयाळूपणे वागतात, त्यांची आठवण मी विसरू शकत नाही." त्याच्या निरागस मनाला दयाळूपणा विसरणारे लोक असतात, ही कल्पना कधीच शिवली नव्हती.

देशपांडे वकील आणि सौमित्र, जेव्हा बबनला भेटायला गेले, तेव्हा बबन खूप अस्वस्थ होता. नुकताच जगन त्याला मारहाण करून पैसे घेऊन पळून गेला होता. सौमित्रने त्याला शांतपणे सांगितले की ते त्याला मदत करण्यासाठीच आले आहेत. ज्या प्रांजळपणे सौमित्रने आपल्या येण्यामागचा हेतू आणि त्याच्या बदलेल्या नशीबाची माहिती बबनला सांगितली ती ऐकून देशपांडे वकील प्रभावित झाले. कुंतलपूरच्या राजेसाहेबांच्या नंतर सौमित्र राजा बनणार हे ऐकून बबनने आश्र्चर्याने 'आ' वासून त्याच्या तोंडाकडे पाहत राहिला आणि त्याची टोपी खाली पडली. बबन सौमित्रला एकेरी संबोधन करत होता ते ऐकून देशपांडे वकील अचंबित झाले पण सौमित्रला त्याची सवय होती. बबनने स्पष्टपणे सौमित्रला विचारले की तो जे सांगत आहे, ते नक्की खरे आहे की त्याचा काही गैरसमज झाला आहे.

सौमित्रने सांगितले, "त्याचा स्वतःचा पण या गोष्टीवर सुरवातीला विश्र्वास बसला नव्हता. बापू शेठना तर मला सनस्ट्रोक झाला की काय असे वाटले. मला सुद्धा युवराज होणे आवडेल असे वाटले नव्हते पण आता मला सवयीने आवडायला लागले आहे. कुंतलपूरचे सध्याचे राजेसाहेब माझे आजोबा आहेत. त्यांना मला युवराज बनवायचे आहे. देशपांडे वकीलांबरोबर त्यांनी माझ्यासाठी खूप पैसे पाठवले

a

आहेत. तुला जगनचे कर्ज फेडून स्वतंत्रपणे व्यवसाय करता यावा म्हणून त्यापैकी काही रक्कम मी तुझे कर्ज फेडायला आणले आहेत.”

बबनने खरोखरच सौमित्रने दिलेल्या पैशातून जगनचे कर्ज फेडले आणि स्वतःचा बूटपॉलीशचा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्यासाठी नवीन सामानाची खरेदी केली त्यासाठी आवश्यक तो परवाना आणि गणवेश पण खरेदी केला. त्याला आपल्या नशीबावर विश्र्वासच बसत नव्हता. जे काही घडत आहे ते स्वप्न आहे की सत्य हेच त्याला कळत नव्हते. कोणत्याही क्षणी जाग येईल आणि स्वप्न संपून जाईल अशी त्याला भीती वाटत होती. तेथून निघताना सौमित्रने त्याच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढे करेपर्यंत त्याला काहीच कळत नव्हते.

बबनचा निरोप घेताना सौमित्रचा आवाज थोडा थरथरत होता. डोळयांची अर्धवट उघडमीट करत सौमित्र बबनला म्हणला, "मला आशा वाटते की यापुढे तुझे बस्तान व्यवस्थितपणे बसेल. मला तुला सोडून जाताना खूप वाईट वाटत आहे, मला माफ कर. कदाचित मी नंतर कधीतरी इकडे येऊन जाईन पण तो पर्यंत तू मला इथली हालहवाल कळवत जा, तुला मी माझा तिकडचा पत्ता देतो, आता मी फक्त सौमित्र सरदेशमुख नसून, कुंतलपूरचा युवराज आहे. पुन्हा भेटू."

बबनचे डोळे आनंदाने लकाकत होते, थोडे अधिक निरखून पाहिल्यास डोळे पाणावलेले दिसत होते. तो फारसा शिकलेला नव्हता, त्याला आपल्या भावना कशा प्रकारे व्यक्त कराव्यात हे समजत नव्हते. त्याचा गळा दाटून आला होता. आवंढा गिळत घोगऱ्या आवाजात तो म्हणाला, "तू मुंबई सोडून जाऊ नये असे मला वाटते." मग त्याने देशपांडे वकीलांकडे पाहिले आणि नम्रपणे खाली वाकून त्यांना नमस्कार केला. "धन्यवाद, साहेब, तुम्ही दिलेल्या मदतीसाठी मी आपला आभारी आहे. तो माझा खूप चांगला छोटा मित्र आहे. तो मला सोडून जात आहे याचे मला

a

दुःख होत आहे. मला त्याची खूप आठवण येइल. तो एक विलक्षण प्रेमळ आणि दयाळू लहान मुलगा आहे," बबन डोळे पुसत म्हणाला.

देशपांडे वकील आणि सौमित्र परत निघाले. बबन पाणावलेल्या डोळयांनी त्यांना जाताना पहात स्तब्ध उभा होता. देशपांडे वकीलांसारख्या कठोर उंच वृध्दाबरोबर छोटा सौमित्र अगदी आनंदाने निघाला होता. कुंतलपूरला निघण्याचा दिवस येईपर्यंत, सौमित्रने शक्य तेव्हढा वेळ बापू शेठ यांच्या बरोबर, त्यांच्या दुकानात घालवला. बापू शेठ खिन्न होते आणि सौमित्र पण उदास होता. जेव्हा सौमित्रने आठवण म्हणून सोन्याचे घड्याळ आणि साखळी त्यांना भेट म्हणून दिली, तेव्हा सुरुवातीला ते स्विकारण्यास तयार झाले नाहीत. त्यांना काय बोलावे हे सुचेनासे झाले. घड्याळाच्या पेटीतून, घड्याळ बाहेर काढून ते निरखून पहात होते, तेव्हा सौमित्र त्यांना म्हणाला, "त्या पेटीच्या आतल्या बाजूला मजकूर लिहिला आहे. मी त्या दुकानदाराला काय लिहायचे ते सांगितले, 'श्री. बापू शेठ यांना,
त्यांच्या अत्यंत जवळच्या मित्राकडून- युवराज सौमित्र यास कडून सप्रेम भेट,' आपणाला रोज घड्याळ पाहिल्यावर माझी आठवण येईल. तुम्ही मला कधीही विसरु नये असे मला वाटते."

बापू शेठनी घसा खाकरला आणि म्हणाले, " मी तुला कधीच विसरणार नाही तू मात्र कुंतलपूरच्या राजवाड्यात रमल्यानंतर मला विसरु नकोस," त्या पुढे त्यांना बोलवेना, त्यांचा कंठ दाटून आला होता. "मी कुठेही असलो तरी तुम्हाला कधीच विसरणार नाही. तुमच्या सानिध्यात मी प्रत्येक क्षण आनंदात घालवला आहे. मी माझ्या आजोबांना तुमची माहिती सांगेन, त्यांनी तुम्हाला तिकडे बोलावले तर तुम्ही एकदा कुंतलपूरला नक्की या, मला खूप आनंद होईल. राजेशाही विषयी तुमचा राग आहे म्हणून तुम्ही राजाचा पाहुणचार नाकारणार तर नाही ना?"

"मी तुला भेटायला येईन," बापू शेठ आस्थावाइकपणे म्हणाले. त्यामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली की कुंतलपूर राजवाड्याचे आमंत्रण मिळाले तर बापू शेठ, राजे मंडळींविषयीचे आपले पूर्वग्रह बाजूला ठेवून नक्कीच कुंतलपूरच्या राजवाड्यात सौमित्रला भेटायला येतील.

अखेर कुंतलपूरला निघण्याची सर्व तयारी झाली. सर्व सामान रेल्वे स्टेशनवर अगोदरच पोहोचले होते. सौमित्र आणि अपर्णाताईंना नेण्यासाठी बग्गी दारात आली. त्यांच्या सोबतीला राधाक्का पण कुंतलपूरला जाणार होत्या. घर सोडून जाणे अपर्णाताईंच्या जीवावर आले होते. त्यांचा संसार त्याच घरात सुरू झाला होता. प्रेमळ पतीच्या अनेक आठवणी तिथल्या कणाकणात भरून राहिल्या होत्या. सौमित्रच्या जन्माने सुखाची परमावधी लाभली होती आणि त्याच घरात आपल्या प्रिय पतीच्या आणि पित्याच्या मृत्यूचे दु:ख त्यांनी झेलले होते. त्यांचा तेथून पाय निघत नव्हता. बराच वेळ त्या आपल्या खोलीतून बाहेर पडल्या नाहीत. बाहेर सौमित्रला एकटेपणा जाणवू लागला. खूप वेळाने अपर्णाताई बाहेर आल्या. त्यांचा चेहरा उतरलेला होता, डोळे पाणावलेले होते, ओठ थरथरत होते. सौमित्र त्यांच्याकडे गेला, त्या खाली वाकल्या तसे सौमित्रने आपले हात आईच्या गळयात घातले, त्याच्या आईने त्याचा पापा घेतला आणि त्याला उराशी कवटाळून धरले. सौमित्रला जाणवले की ते दोघेही दु:खी आहेत पण ते नेमके काय दु:ख आहे हे त्याच्या बाल बुध्दीला समजले नाही पण एक कोमल हळुवार भावना त्याच्या अंत:करणाला जाणवली. तो आपल्या आईला म्हणाला, "आई हे आपले आवडते छोटेसे घर, आपल्याला कायम आवडते असेल नाही का?"

"हो माझ्या राजा! अगदी कायमचे आवडते राहिल," अत्यंत मृदू आवाजात अपर्णाताई म्हणाल्या आणि मग ते बग्गीमध्ये शिरले. सौमित्र आईच्या अगदी जवळ

a

बसला होता. अपर्णाताई, जेव्हा खिडकीतून मागे वळून घराकडे पहात होत्या तेव्हा सौमित्रने त्यांच्याकडे पाहिले आणि त्यांचा हात गच्च पकडून ठेवला.

मग बग्गी रेल्वे स्टेशनच्या दिशेने निघाली. रेल्वे स्टेशनवर खूप गडबड गोंधळ सुरू होता. फलाटावर उतारु प्रवाशांची आणि प्रवासाला निघालेल्या लोकांची धक्का बुक्की चालली होती. देशपांडे वकीलांनी सौमित्रची आणि अपर्णाताईंची प्रतीक्षालयात बसण्याची व्यवस्था केली. राधाक्का पण आपले सामान घेऊन थेट बिंबाक्काच्या घराकडून आल्या होत्या. सौमित्र दिलेल्या मदतीमुळे महादेव काकांचे औषधोपचार सुरू होते आणि हळूहळू त्यांना बरे वाटत होते, त्यामुळे बिंबाक्कांची काळजी मिटली होती आणि राधाक्कांना पण दिलासा मिळाला होता. सौमित्र आजुबाजुचा गोंधळ मजेत पाहत होता. फलाटावर एकदम गोंधळ उडाला. कुंतलपूरला जाणारी रेल्वे धडधडत स्टेशनमध्ये शिरत होती. देशपांडे वकिलांनी कुलींकडून सर्वांचे सामान फर्स्ट क्लासच्या डब्यात ठेवण्याची व्यवस्था केली होती. सर्वजण डब्यात चढत होते, तेव्हढ्यात सौमित्रला आपल्याला कोणी तरी हाका मारत असल्याचे जाणवले. त्यांने त्या दिशेने पाहिले तर धापा टाकत पळत पळत बबन त्याच्याच दिशेने येत होता. त्याच्या हातात लाल रंगाचे काहीतरी दिसत होते.

बबन जवळ आला आणि सौमित्रला म्हणाला, “तुला भेटायला मी धावत धावत आलो. माझा धंदा चांगला चालला आहे. कालच्या कमाईतून मी तुझ्यासाठी ही भेट आणली आहे," असे म्हणून त्यांने आणलेला लाल रुमाल सौमित्रकडे सोपवला. "तुला जेव्हा आमची आठवण येऊन वाईट वाटेल तेव्हा हा रुमाल वापर. आमची आठवण जपून ठेव. गडबडीत माझे प्लॅटफॉर्मचे तिकीट हरवले, मला आत येऊ देत नव्हते. कसातरी तिकीट तपासनीसची नजर चुकवून पळत आलो," घाईघाईने त्याने आपले बोलणे पूर्ण केले, तोवर गाडीची शिट्टी वाजली. "गुडबाय!"

a

म्हणत त्याने दीर्घ श्वास घेतला. "आठवणीने रुमाल वापर" असे सांगून तो निघून गेला.

आगगाडी सुटायची वेळ होत आली. प्रवासाला निघालेल्या लोकांना निरोप देण्यासाठी बाहेर खिडकीजवळ नातेवाईक, मित्रमंडळींची एकच गर्दी झाली होती आणि आतून खिडकीतून प्रवासी हात हालवून निरोप घेत होते, कुणी डोळ्यांना रुमाल लावत होते तर कुणी सुखरूप पोहोचल्याचे कळवण्यासाठी बजावत होते. सौमित्र, खिडकीतून बबन दिसतो का पहात होता, त्याला एका उंचवट्यावर उभा असलेला बबन, आगगाडीकडे एकटक पाहत उभा असलेला दिसला. सौमित्रने त्यादिशेने लाल रुमाल हालवला आणि "गुडबाय बबन, गुडबाय," असे मोठ्याने ओरडला.

आगगाडी हळुहळू निघाली. अपर्णाताईंनी डोळे पुसले. खिडकीतून बाहेर बघत असणाऱ्या सौमित्रचा तेजस्वी, बालिश चेहरा आणि सूर्यप्रकाशात वाऱ्यावर उडणारे त्यांचे पिंगट सोनेरी केस केस, हळुहळू बबनच्या नजरेसमोरून दिसेनासे झाले. "गुड बाय माझ्या मित्रा! गुड बाय सौमित्र! गुड बाय छोटे युवराज!" असे स्वतःशीच पुटपुटत त्यांने शर्टच्या बाहीने डोळे पुसले आणि गाडी स्टेशनच्या बाहेर पडली.

a

# प्रकरण 4

.

आगगाडीतील प्रवासादरम्यान अपर्णाताईंनी सौमित्रला, आपण त्याच्या सोबत राजवाड्यात राहणार नसून जवळच दुसऱ्या एका वाड्यात राहणार आहेत या गोष्टीची कल्पना दिली. हे ऐकून सौमित्र खूपच दु:खी झाला आणि त्याने देशपांडे वकीलांना याबाबत प्रश्न विचारले अर्थात त्याच्या प्रश्नांचे त्याला पटेल असे उत्तर ते देऊ शकले नाहीत. अपर्णाताईंच्या राहण्याची सोय राजवाड्याजवळच करण्याला राजेसाहेबांनी मान्यता दिली हे खूप चांगले झाले असे वकील साहेबांना वाटत होते कारण त्यामुळे अपर्णाताई सौमित्रच्या जवळपास राहू शकल्या असत्या. एक गोष्ट स्पष्ट होती की सौमित्र आईशिवाय एकटा राहू शकला नसता, आईचा वियोग सहन करणे त्या निरागस स्वच्छंदी लहान मुलाला अशक्य झाले असते. त्याच्या आईने प्रेमाने आणि गोडीगुलाबीने, आपण त्याच्यापासून दूर जाणार नाही याबाबत त्याची समजूत पटवली. त्यामुळे त्याची भीती बऱ्यापैकी कमी झाली. "अरे सौमित्र मी राजवाड्याजवळच्या एका वाड्यात राहणार आहे," ही गोष्ट पुन्हापुन्हा त्या सौमित्रला सांगत राहिल्या. "राजवाडा माझ्या घरापासून खूप जवळ आहे आणि तू तर रोज अगदी धावत येऊन मला भेटू शकशील आणि राजवाड्यातील गमतीजमती मला सांगू शकशील. आपण दोघे थोडे लांब रहात असलो तरी आपल्याला दिवसातील बराच वेळ आनंदाने एकत्र घालवता येईल."

a

"तरी सुध्दा तू राजवाड्यात असली असतीस तर मला ते जास्त आवडले असते," छोट्या युवराजांनी मोठा उसासा टाकला. त्याची प्रिय आई एका वाड्यात राहणार असून तो मात्र राजवाड्यात राहणार, अशी राहण्याची विचित्र व्यवस्था का केली गेली असावी हा त्याचा मूळ प्रश्न अनुत्तरित राहिला. अर्थात त्यासंबंधी मौन राखणे उत्तम असा अपर्णाताईंनी विचार केला. "या अशा वेगवेगळया राहण्याच्या व्यवस्थेमागचे खरे कारण त्याला सांगू नये असे मी ठरवले आहे," अपर्णाताईंनी देशपांडे वकीलांना सांगितले. "ते कारण समजण्याइतका तो मोठा नाही; त्याला फक्त धक्का बसेल आणि तो दुखावला जाईल; राजेसाहेबांच्या मनामध्ये, माझ्याबद्दल कडवटपणा भरला आहे आणि ते मला नापसंत करतात, ही गोष्ट त्याला समजली तर तो त्यांच्याबरोबर स्वाभाविक सहजप्रवृत्तीने आणि प्रेमळपणे वागू शकणार नाही. त्याने आजपर्यंत कधीही द्वेष अथवा निष्ठूरपणा पाहिला अथवा अनुभवलेला नाही. कोणीही माझा तिरस्कार करू शकतो हे कळल्यावर त्याला मोठा धक्का बसेल. तो स्वतः खूप प्रेमळ आहे आणि मी त्याला खूप प्रिय आहे त्यामुळे सौमित्र ही गोष्ट समजण्याइतका मोठा होईपर्यंत त्याला हे न सांगणे, त्याच्यासाठी आणि त्याच्या आजोबांसाठीही चांगले आहे. नाहीतर सौमित्र आणि त्याच्या आजोबांच्या संबंधांमध्ये अडथळा येऊ शकतो." देशपांडे वकीलांना ही गोष्ट पूर्णपणे पटली.

त्यामुळे सौमित्रला फक्त एव्हढेच समजले की राहण्याची अशी व्यवस्था करण्यामागे काही तरी अस्पष्ट असे कारण आहे आणि आता तो ते समजण्याइतका मोठा नाही. मोठा झाल्यावर त्याला ते स्पष्ट केले जाईल. सुरवातीला तो थोडा गोंधळून गेला पण नंतर त्याने त्याबद्दल काळजी करण्याचे सोडून दिले; विशेषतः अपर्णाताईंनी त्याच्याबरोबर संवाद साधून त्याची समजूत घातली आणि या गोष्टींची चांगली बाजू त्याच्यासमोर कल्पकतेने मांडली; त्यामुळे त्याचा गोंधळ थोडा कमी

a

झाला. मात्र त्यानंतरही देशपांडे वकीलांनी सौमित्रला खिडकीतून गंभीरपणे बाहेर बघत असताना निराशेने सुस्कारा सोडताना पाहिले.

सौमित्र अत्यंत आदराने देशपांडे वकीलांना म्हणाला, "माझी आई म्हणते की मी आजोबांच्या बरोबर एकट्याने आनंदात रहावे पण मला खरंच एकट्याने राहायला आवडणार नाही. खरंच आवडणार नाही. या जगात अशी संकटे वेळोवेळी येतातच आणि त्यांना आपण खंबीरपणे सामोरे जायला हवे अशी राधाक्कांनी माझी समजूत काढण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट खरी आहे की माझे आजोबा एकटे आहेत, त्यांची तिन्ही मुले मरण पावली आहेत. ते खूप दु:खी असणे स्वाभाविक आहे म्हणून मला आई म्हणते त्याप्रमाणे त्यांच्या जवळ राहून त्यांना आनंद द्यायला हवा."

सौमित्र लोकांबरोबर बोलताना, अगदी पोक्तपणाने बोलत असे. त्याच्या देखण्या निरागस चेहऱ्यावरचे गंभीर भाव मोठे मजेशीर वाटत. आपल्या कामाचा एक भाग म्हणून सौमित्र बरोबर संवाद साधणारे देशपांडे वकील हळुहळू त्याच्याकडे आकर्षित झाले आणि त्यांच्या एकाकी आयुष्यात लहानगा सौमित्र एक महत्त्वाचा भाग बनला. राजेसाहेबांनी त्यांच्यावर सोपवलेल्या व्यवसायिक कामगिरी बरोबरच सौमित्र आणि अपर्णाताईंच्या हितरक्षणाची जबाबदारी त्यांनी नकळतपणे स्वतःकडे घेतली.

"आणि म्हणून आपण राजेसाहेबांजवळ राहून त्यांना आनंद देण्याचा संकल्प केला असावा," देशपांडे वकील सौमित्रच्या बोलण्यावर मान डोलावत म्हणाले. "हो," छोट्या युवराजांनी उत्तर दिले, "मी तर त्यांचा नातू आहे, त्यांना आनंद देणे आणि म्हातारपणी त्यांना आधार देणे हे माझे कर्तव्यच आहे शिवाय ते माझ्याबरोबर खूप सहृदयतेने आणि दयाळूपणे वागत आहेत. एखादी परकी व्यक्ती आपल्याबरोबर दयाळूपणे वागत असेल, आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी धडपडत

a

असेल, तर आपण अशा परक्या व्यक्तीवर सुध्दा प्रेम करतो, राजेसाहेब तर माझे सख्खे आजोबा आहेत."

"तुम्हाला वाटते का," देशपांडे वकीलांनी विचारले, "राजेसाहेब आपल्यावर प्रेम करतील?"

"का नाही? मी तर त्यांचा एकुलता एक नातू आहे, नक्कीच ते माझ्यावर प्रेम करत असणार त्याशिवाय का त्यांनी तुम्हाला कुंतलपूरहून मला घेऊन येण्यासाठी पाठवून दिले आणि माझ्या सर्व इच्छा पूर्ण करण्यासाठी तुम्हाला सूचना केली?"

"अरे हो! बहुधा असेच असेल, राजेसाहेब झाले तरी ते शेवटी आजोबा आहेत, त्यांचे आपल्या नातवावर प्रेम असेलच," देशपांडे वकील म्हणाले.

एव्हाना त्या फर्स्ट क्लासच्या डब्यात युवराज सौमित्रची गोष्ट सर्वांनाच माहित झाली. प्रत्येकाच्या कौतुकभरल्या नजरा परत परत सौमित्रकडे वळत होत्या. दिड दिवसाच्या प्रवासात, सौमित्रची रेल्वेच्या डब्यातल्या बाल गोपाळांची ओळख झाली. वडीलधाऱ्या मंडळींनी त्याला मनापासून त्याला आशीर्वाद दिले. कुंतलपूर स्टेशन आल्यावर सौमित्रने सर्वांशी प्रेमाने बोलून निरोप घेतला. कुंतलपूर स्टेशनवर युवराजांना नेण्यासाठी दरबारची खास घोडागाडी आली होती. घोडागाडी एका मोठ्या चौसोपी वाड्याच्या दिंडी दरवाजासमोर उभी राहिली तशी सौमित्र उडी मारून खाली उतरला. देवडीवर दोन शिपाई उभे होते. त्यांनी युवराजांना आणि अपर्णाताईंना वाकून मुजरा केला. एका वयस्कर स्त्रीने त्यांच्या पायावर उन पाणी घालले आणि युवराजांच्या वरून भाकर तुकडा ओवाळून टाकला. नंतर पाच सुवासिनींनी औक्षण करून त्याला आत घेतले. वाड्यातील इतर नोकर मंडळी, त्यांच्याकडे कुतुहलाने पाहत होती. त्यांच्या कानावर बऱ्याच गोष्टी आल्या होत्या, त्यासंबंधी त्यांची आपापसात कुजबुज सुरु होती. राजेसाहेब आपल्या धाकट्या

a

सूनबाईंवर नाराज असल्याचे आणि त्यामुळेच त्यांची स्वतंत्रपणे राहण्याची सोय त्या वाड्यात केली गेली आहे ही बातमी, आता वाड्यात पसरली होती. छोट्या युवराजांना त्यांच्या उग्र संतापी, आजोबांच्या सोबत राहणे भाग होते. वारसाहक्काने मिळणारे राज्यपद, नक्कीच भाग्याचे होते पण आईच्या मायेला पारखे होऊन संधीवाताला कंटाळून साऱ्या जगावर आग पाडणाऱ्या एकाकी स्वार्थी आजोबांच्या सोबत राहणे ही गोष्ट त्या लहान मुलाच्या दृष्टीने खूपच अवघड आहे, अशीच काहीशी चर्चा नोकर मंडळीत सुरू होती. त्यांना अजून छोटे युवराज नक्की कसे आहेत आणि भविष्यात राजेसाहेब म्हणून ते कसे असतील याची कल्पना नव्हती.

सौमित्र दिवाणखान्यातील सजावट बघून अचंबित झाला, छताला हंड्या झुंबरे लटकत होती. त्या भल्यामोठ्या दिवाणखान्यात प्रवेश केल्यावर समोरच्या भिंतीवर शिकार केलेल्या जनावरांची शिंगे टांगलेली होती तर दुसऱ्या भिंतीवर प्रसिद्ध चित्रकारांनी सुंदर चित्राकृती चितारलेल्या होता. एका ओट्यावर शिकार केलेली काही जनावरे पेंढा भरून जतन केलेली होती. त्यांच्याकडे पाहिल्यावर सौमित्र एकदम दचकला. दिवाणखान्याच्या समोरील चौकात, एक भला मोठा गवा रेडा पेंढा भरून उभा केलेला होता. त्याच्याकडे पाहिल्यावर तो जिवंत असल्याचा भास होत होता.

हे सर्व पाहून सौमित्र आपल्या आईला म्हणाला,

"हा खूप सुंदर आणि मोठा वाडा आहे. तू या ठिकाणी राहणार हे समजल्यावर मला खूप आनंद वाटला." मुंबईतील लहानशा वस्तीतील त्यांचे घर या वाड्याच्या तुलनेत अगदीच लहान आणि सामान्य होते. राधाक्कांच्या बरोबर सौमित्र माडीवरच्या शयनगृहात गेला. तिथे गालीच्यावर एक भली मोठी पांढरीशुभ्र पर्शियन मांजरी आरामात लोळत पडली होती.

a

राधाक्का अपर्णाताईंना म्हणाल्या, "ही मांजरी, राजवाड्यातील सर्वात जून्या दासी, कृष्णाबाईंनी मुद्दाम सौमित्र साठी पाठवली आहे. त्यानी सांगितले ही मांजरी म्हणजे सौमित्रच्या बाबांच्या लाडक्या मांजरीचे पिल्लू होते, जे आता मोठे झाले होते. तिच्याबरोबर सौमित्र खेळेल म्हणून मुद्दाम त्यांनी तिला या वाड्यात तिला पाठवून दिले आहे. या कृष्णाबाईनी आशुतोष यांची लहानपणी देखभाल केली होती. त्यांचा स्वभाव खूप लाघवी होता असे कृष्णाबाईंनी सांगत होत्या. त्या मुद्दाम सौमित्रला पहाण्यासाठी थांबणार होत्या पण राजवाड्यातून तातडीने बोलावणे आले म्हणून माझ्याकडे निरोप देऊन आताच त्या गडबडीने तिकडे गेल्या. तुम्ही दोघांनी स्नान वगैरे आवरून घ्यावे असा तुम्हाला निरोप द्यायला सांगितले आहे."

अपर्णाताई आणि सौमित्र यांचे स्नान वगैरे आवरून झाल्यावर ते जिन्यावरून खाली निघाले तशी त्यांच्याबरोबर झोपेतून उठलेली मनी माऊ पण खाली निघाली. सौमित्र आणि मनी माऊची गट्टी जमली होती. सौमित्र तिच्या मागून पळत होता आणि ती पण त्याच्या बरोबर खेळत होती. आता दिवाणखान्यात शेजारच्या दुसऱ्या बैठकीच्या खोलीत मंडळी गेली, तिथे एका खुर्चीत देशपांडे वकील बसलेले होते. ती खोली पण प्रशस्त होती. एका मंचावर वाघाचे कमावलेले कातडे अंथरलेली बैठक होती. मनी माऊ आता दमली होती, ती जाऊन एका भल्या मोठ्या खुर्चीत विसावली, सौमित्र पण तिथे बसला आणि हलकेच तिला थोपटू लागला. देशपांडे वकील आणि अपर्णाताईंचे काही बोलणे चालले आहे. तिकडे सौमित्रचे अजिबात लक्ष नव्हते.

देशपांडे वकीलांशी बोलतांना अपर्णाताईंचा आवाज कधी नव्हे तो थोडा चढलेला वाटला, त्या म्हणाल्या, "मला नाही वाटत की सौमित्रने अगदी आजच राजवाड्यात राहायला जावे. अगोदरच तो प्रवासाने दमलेला आहे त्यामुळे मला त्याच्यावर आणखी मानसिक दडपण आणायचे नाही. त्याच्या वडिलांच्या माघारी

a

आम्ही दोघेच एकमेकांचा आधार बनलो. एक नाजूक रोपटे इथून उपटून तिकडे नेऊन लावायचे म्हणजे त्याच्या मुळांना एकदम धक्का लागणार नाही याची काळजी घेतली पाहिजे."

देशपांडे वकील थोडे नरमाईने बोलले, "ठिक आहे बाईसाहेब, आपला विचार अगदी योग्य आहे. संध्याकाळी मी राजेसाहेबांची भेट घेतो आणि आपण आल्याचे निवेदन करतो. आपल्या इच्छेप्रमाणे छोटे युवराज उद्यापासून राजवाड्यात राहायला जातील."

अपर्णाताईंनी सौमित्रकडे पाहिले, तो प्रेमाने मनी माऊच्या अंगावरून हात फिरवत होता. मनी माऊला त्याचा स्पर्श आवडल्याचे दिसत होते. ती शांतपणे झोपी गेली होती. हे पाहून अपर्णाताई मंद हसल्या आणि म्हणाल्या, "राजेसाहेब माझ्याकडून काय हिरावून घेत आहेत याची त्यांना जाणीव नाही. त्यांना सांगा त्यांनी मला देऊ केलेले पैसे मला नको आहेत," त्यांच्या आवाजात थोडा कंप होता आणि चेहऱ्यावर उदासी होती.

देशपांडे वकीलांनी चमकून त्यांच्याकडे पाहिले. ते म्हणाले, "म्हणजे त्यांनी तुमच्यापुढे ठराविक रक्कम देण्याचा ठेवलेला प्रस्ताव तुम्हाला मान्य नाही?"

"हो," अपर्णाताईंनी अगदी सहज उत्तर दिले; "ते पैसे स्विकारावे असे मला वाटत नाही. माझ्याकडे माझे स्वतःचे थोडे पैसे आहेत. राजेसाहेबांनी इथे राहण्यासाठी घर दिलेले घर ते स्वीकारण्यास मी बांधील आहे, आणि त्यासाठी मी त्यांची आभारी आहे. माझ्या मुलाजवळ राहणे शक्य होईल म्हणून मी हे घर स्विकारण्यास तयार झाले, त्याव्यतिरिक्त इतर काही स्विकारले तर मी माझा मुलगा पैश्यासाठी विकला असे होईल. माझे त्याच्यावर स्वतःच्या प्राणांपेक्षा जास्त प्रेम आहे. त्याच्या भल्यासाठी आणि त्याच्या बाबांची इच्छा प्रमाण मानून मी मनावर दगड ठेवून त्याला माझ्यापासून दूर करत आहे."

a

"आपण पैसे स्विकारले नाहीत तर राजेसाहेबांना आवडणार नाही. त्यामागची आपली भुमिका जरी योग्य असली तरी ती त्यांना समजणे अशक्य आहे. उगाच त्यांच्या रागाला खतपाणी घातल्यासारखे होईल," देशपांडे वकीलांनी आपल्या अशीलांची बाजू मांडली.

"मला वाटते की त्यांनी यावर नीट विचार केल्यास त्यांना खरे कारण समजेल," अपर्णाताईंनी उत्तर दिले. "मला खरंच त्यांच्या पैशाची गरज नाही शिवाय ते माझा इतका तिरस्कार करतात की ते माझ्या मुलाला माझ्याकडून-त्यांच्या लहान मुलाच्या विधवेकडून हिरावून घेत आहेत अशा सासऱ्यांकडून मी पैसे कसे स्विकारू?" देशपांडे वकील विचारात पडले, नंतर म्हणाले, "मी तसा निरोप राजेसाहेबांना देतो."

अपर्णाताई आणि सौमित्रने रात्रीचे जेवण एकत्र केले, सोबत मनी माऊ सौमित्रच्या अगदी जवळ बसली होती आणि आपले लाड करून घेत होती. देशपांडे वकील राजेसाहेबांना छोटे युवराज आल्याची वर्दी देण्यासाठी राजवाड्यावर गेले, लगेच त्यांना राजेसाहेबांनी त्यांच्या दालनात पाठवून देण्यास सांगितले. देशपांडे वकील आत गेले तेव्हा राजेसाहेब एका आलिशान आरामखुर्चीत बसलेले होते; संधीवाताने सुजलेले पाऊल त्यांनी एका छोट्या स्टुलावर ठेवले होते. देशपांडे वकील आत आल्यावर राजेसाहेबांनी काही न बोलता तीक्ष्ण नजरेने त्यांना न्याहाळले. राजेसाहेब जरी वरवर शांत असल्याचे आव आणत असले तरी मनातून सर्व खबरबात जाणून घेण्यासाठी अस्वस्थ आहेत याची देशपांडे वकीलांना चांगलीच कल्पना होती म्हणून ते मुद्दाम थोडे शांत उभे राहिले. शेवटी राजेसाहेबांनी त्यांना बसण्यास सांगितले आणि काय बातमी आहे याची विचारणा केली.

a

"छोटे युवराज आणि त्यांच्या आई, जून्या वाड्यात उतरले आहेत. एकंदरीत प्रवास चांगला झाला पण थोडा शीण आला आहे." देशपांडे वकीलांनी मोजके उत्तर दिले.

"हे ऐकून आनंद झाला, आणखी काय विशेष?" राजेसाहेब तुटकपणे म्हणाले. "आज रात्री छोटे युवराज त्यांच्या आईबरोबर राहणार आहेत. उद्या मी त्यांना राजवाड्यात घेऊन येईन."

"पुढे बोला, मी तुमच्यावर मुंबईची संपूर्ण जबाबदारी सोपवली होती, मला त्याबाबत पत्राने काही कळवायची गरज नाही, तुम्हाला योग्य वाटेल ते करा असा मी आदेश दिला होता म्हणून मला आता त्या मुलाबद्दल जाणून घ्यायचे आहे. मला त्याच्या आई विषयी जाणून घेण्याची काहीच गरज नाही फक्त तो मुलगा कोणत्या प्रकारचा मुलगा आहे ते मला सांगा."

देशपांडे वकील मुद्दाम थोडे शांत बसले आणि सावधपणाने म्हणाले, "आठ वर्षांच्या मुलाच्या चारित्र्याची अचूक पारख करणे अवघड गोष्ट आहे." राजेसाहेबांचे मन त्यांच्या विधवा सूनेविषयी आणि बापाविना पोरक्या नातवाविषयी पूर्वग्रहदूषित होते. त्यांनी पटकन देशपांडे वकीलांकडे पाहिले आणि थोड्या रागातच प्रश्न केला, "तरी पण तो नेमका कसा आहे? वेडा गबाळा आहे की मुंबईचा आगावू शहरी मुलगा आहे?" एरव्ही देशपांडे वकील नेहमी मुद्देसूद आणि गंभीरपणे बोलत असत पण यावेळी मात्र त्यांनी आपला नेहमीचा पवित्रा बदलला आणि आपले खरेखुरे मत देण्याऐवजी राजेसाहेबांनी सौमित्रला प्रत्यक्ष भेटून स्वतःचे मत बनवणे योग्य होईल असा त्यांनी विचार केला म्हणून त्यांनी स्वतः माहिती देण्याचे चतुराईने टाळले. "प्रकृती कशी आहे? व्यवस्थित वाढ झालेली आहे काय?" त्यांनी वकीलांना विचारले. "वरवर पाहता तरी निरोगी दिसतो, व्यवस्थित वाढ झालेली आहे," वकिलांने उत्तर दिले. "हात पाय धडधाकट आहेत ना? आणि दिसायला

सर्वसाधारण तरी बरा आहे काय?" हा प्रश्न ऐकून देशपांडे वकीलांच्या डोळयासमोर, वाड्यात वाघाच्या कातडीवर बेफिकीरपणे आरामात पडलेल्या सौमित्रचे देखणे रूप आले: विस्कटलेले पिंगट सोनसळी केस, हसरा चेहरा, गुलाबी रंग, तपकिरी डोळे म्हणूनच तर ते छोटे युवराज होते. "सरकार, माझ्या मते तो सर्वसाधारण नसून एक देखणा मुलगा आहे. पण मला खात्रीपूर्वक तुम्हाला सांगावे लागेल की तो इथल्या इतर खानदानी घराण्यातील लहान मुलांपेक्षा निश्चितच वेगळा मुलगा आहे."

"मला त्यात काही शंका वाटत नाही," राजेसाहेब चरफडत म्हणाले बहुतेक त्यांना संधीवातामुळे दुखऱ्या पावलांतून एक तीव्र वेदना जाणवली असावी.

"शहरातील अशा बऱ्याच आगावू, लाचार, लालची, उद्धट मुलांविषयी मी अनेकदा ऐकले आहे," त्यांनी मनात खदखदणारी शंका बोलून दाखवली. "छे! छे! त्याला उद्धटपणा म्हणता येणार नाही, पण नेमके वर्णन करणे मला अवघड आहे. हां! आपण असे म्हणू शकतो, तो त्याच्या वयाच्या मुलांपेक्षा मोठ्या लोकांसोबत जास्त राहतो त्यामुळे त्याच्यामध्ये प्रगल्भता आणि बालिशपणाचे मिश्रण आहे असे दिसते."

"हा एक शहरातल्या सुधारकांचा मूर्खपणा!" राजेसाहेबांनी निषेध व्यक्त केला. "मी याबद्दल आधी ऐकले आहे. सुधारक, याला अलौकीक बुध्दी आणि व्यक्ती स्वातंत्र्य समजतात. मला तो असभ्य आणि अशिष्टपणा वाटतो." देशपांडे वकील, राजेसाहेबांच्या मतांच्या विरोधात क्वचितच बोलत असत आणि जर राजेसाहेबांचा संधीवात बळावलेला असेल तर ते त्यांना एकट्याला सोडून तेथून जाणे पसंत करत, पण यावेळी त्यांनी हा परिपाठ मोडला आणि थोडावेळ शांत बसून राजेसाहेबांना म्हणाले, "माझ्याकडे सौमित्रच्या आईंनी आपल्यासाठी एक निरोप दिला आहे."

a

"मला तिचा कोणताही निरोप ऐकायचा नाही. तिच्या बरोबर जेव्हढा कमी संबंध येईल तेव्हढे चांगले."

"परंतु ही एक महत्त्वाची बाब आहे," वकीलांनी स्पष्ट केले. "आपण त्यांना तडजोड म्हणून देऊ केलेली रक्कम स्विकारण्यास त्यांनी नकार दिला आहे." राजेसाहेब एकदम चिडल्यासारखे झाले आणि आवाज चढवून म्हणाले, "याचा अर्थ काय?" देशपांडे वकीलांनी अपर्णाताईंनी दिलेला निरोप सांगितला, "त्या म्हणाल्या की 'या पैशांची त्यांना आवश्यकता नाही, आणि तसेही आपल्या बरोबरचे नातेसंबंध सौहार्दपूर्ण नाहीत' ----- "

"सौहार्दपूर्ण नाही!" राजेसाहेब एकदम भडकून म्हणाले, "मी तर म्हणेन की ते कधीच नव्हते आणि कधीही होणार नाहीत. मला तिचा विचार देखील नको आहे. पैशाच्या लालसेने माझ्या मुलाला भुलवणाऱ्या शहरातील त्या छचोर स्त्रीला मला भेटण्याची इच्छा नाही."

"आपल्याला त्यांना पैशांची लालसा आहे असे कदापिही म्हणता येणार नाही. त्यांनी आपल्याकडून काहीही अपेक्षा केली नाही उलट त्यांनी स्वाभिमानाने आपण दिलेला पैसा नाकारला आहे."

"हाच तर तिचा डाव आहे. तिला मला आपला मोठेपणा दाखवून द्यायचा आहे. मी तिचा  निस्पृहपणा पाहून भारावून जाईन असे तिला वाटत असेल. पण मला त्याचे काडीमात्र कौतुक नाही. मी तिला माझ्या जून्या वाड्यात भिकाऱ्यासारखे जगू देणार नाही. ती माझ्या नातवाची आई आहे म्हणून तिला स्वतःचा सामाजिक दर्जा टिकवून ठेवायलाच हवा. तिची इच्छा असो वा नसो तिला मी दिलेले पैसे स्विकारावे लागतीलच."

"तसे झाले तरी ते पैसे त्या खर्च करणार नाहीत हे नक्की आहे."

"ती खर्च करते की नाही याची मला पर्वा नाही!" राजेसाहेब एकदम भडकून मोठ्याने ओरडले. तिला इथल्या लोकांच्या कडून सहानुभूती मिळवायची असणार. मी तिला गरीबीचे जिणे जगण्यास भाग पाडले असे दाखवून तिच्या मुलाच्या मनात माझ्या बद्दल कटूता निर्माण करायचा प्रयत्न सुरू असणार. नव्हे मला वाटते तिने ते काम अगोदरच फत्ते केले असावे, त्याचे मन आधीच माझ्याविरुद्ध कलुषित केले असेल!"

"नाही," देशपांडे वकील म्हणाले. "माझ्याकडे आणखी एक निरोप दिला आहे, जो हे सिद्ध करेल की त्यांनी असे काही केले नाही."

"मला काही एक ऐकायचे नाही!" राजेसाहेब आता भलतेच संतापले होते. त्यातच भर म्हणून की काय आज त्यांचा संधीवात चांगलाच बळावला होता, त्यामुळे त्यांना या नकोशा विषयावर कोणतीही चर्चा नको होती. तरीही देशपांडे वकीलांनी अपर्णाताईंचा निरोप त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी व्यवस्थितपणे पार पडली. "त्यांची अशी अपेक्षा आहे की छोट्या युवराजांच्या कानावर अशी कोणतीही गोष्ट पडता कामा नये की ज्यामुळे युवराजांना समजेल की त्यांच्या आईपासून त्यांची ताटातूट होण्यास, आपले पुर्वग्रह कारणीभूत आहेत. युवराजांचे त्यांच्या आईवर खूप प्रेम आहे, जर ही गोष्ट युवराजांना समजली तर तुमच्या आणि त्याच्या मध्ये दुरावा निर्माण होईल असे त्यांना खात्रीपूर्वक वाटते. त्या म्हणाल्या की युवराजाना या सर्व गोष्टींचे नीट आकलन आता होणार नाही त्यामुळे त्याला आपली भीती वाटू शकते किंवा त्याला आपल्या विषयी ममत्व वाटणार नाही. या सर्व गोष्टी त्याला समजण्यासाठी त्याचे वय अजून लहान आहे, तो मोठा झाला की त्याला सांगता येईल. त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली की तुमच्या आणि त्याच्या पहिल्या भेटीवर या गोष्टीचे सावट पडता कामा नये." राजेसाहेब परत त्यांच्या खुर्चीत बसले. त्यांच्या रागीट जाड भुवयांच्या खाली म्हातारपणाने खोल

a

गेलेले डोळे एकदम चमकून उठले. "आता मला नीट सांगा! काय म्हणालात?" धापा टाकत राजेसाहेब म्हणाले. “त्याच्या आईने त्याला काहीच सांगितले नाही असे तुम्हाला म्हणायचे आहे काय?"

"होय सरकार, मी बोललो त्यातील एकही शब्द खोटा नाही," देशपांडे वकिलांनी थंडपणे उत्तर दिले. "मी तुम्हाला खात्रीने सांगू शकतो. त्या लहान मुलाची त्याच्या आईने अशी खात्री पटवून दिली आहे की तुम्ही सर्वात सुस्वभावी, दयाळू व्यक्ती आहात आणि तुमचे त्याच्यावर अतिशय प्रेम आहे. तुमच्या विषयी त्याच्या मनात शंका उत्पन्न होईल अशी एकही गोष्ट त्याच्या कानावर पडलेली नाही. मुंबईमध्ये असताना तो तुमच्या उदारतेने भारावून गेला होता."

"हे खरे आहे?"

"मी तुम्हाला माझा शब्द देतो,” देशपांडे वकील म्हणाले, "छोट्या युवराजांच्या मनावर तुमची छाप यापुढे पूर्णपणे तुमच्यावर अवलंबून असेल. मी तुम्हाला एक सूचना करण्याचे धाडस करणार आहे, त्याबद्दल मी अगोदरच आपली माफी मागत आहे: ती सूचना अशी आहे की जर आपण त्याच्या आईबद्दल किंचितही वेडेवाकडे न बोलण्याची खबरदारी घेतली तर छोट्या युवराजांचे मन आपल्या बाजूने वळवण्यात आपण खात्रीने यशस्वी व्हाल."

"छट्! तो तर सात वर्षाचा लहान बच्चा आहे," राजेसाहेब हेटाळणीच्या स्वरात म्हणाले. "ही गोष्ट खरी आहे पण त्याने ती सात वर्षे आईच्या प्रेमळ सान्निध्यात घालवलेली आहेत आणि तिचे त्याच्यावर जीवापाड प्रेम आहे," देशपांडे वकील शांतपणे म्हणाले.

# प्रकरण 5

दुसऱ्या दुपारी उशीरा राजवाड्याची खास घोडागाडी छोट्या युवराजांना राजवाड्यात घेऊन जाण्यासाठी आली. देशपांडे वकील स्वतः त्याला राजेसाहेबांच्या भेटीला घेऊन जाणार होते. रात्रीच्या जेवणासाठी युवराजांना आमंत्रण होते, युवराजांना एकट्यालाच त्यांना भेटायला पाठवून देण्याचा त्यांचा आदेश होता. घोडागाडीतील आलीशान गाद्या गिरद्यावर सौमित्र आरामात रेलून बसला होता. घोडागाडीच्या आतील आणि बाहेरील प्रत्येक गोष्ट त्याला पाहायची होती, जाणून घ्यायची होती. घोडागाडीला अस्सल अरबी घोडे जुंपलेले होते. घोड्यांचा पितळी सरंजाम चमकत होता. सौमित्रचे लक्ष, शाही गणवेशातील गाडीवान आणि लालभडक रंगाचा गणवेशातील उंच सेवकाकडे लागले होते. त्यांच्या पोशाखावर सोनेरी नक्षी होती. त्यावरील सन्मानचिन्हाविषयी माहिती मिळवण्यासाठी सौमित्र त्या दोघांशी बोलत होता.

घोडागाडी एका भल्यामोठ्या उद्यानाच्या प्रवेशद्वारापाशी थांबली. दार उघडण्यासाठी जवळच्या छोट्या घरातून एक स्त्री लगबगीने पुढे आली. तिच्याबरोबर तिची दोन लहान मुले घरातून धावत बाहेर आली. तिची मुले

a

तिच्यासारखी सुंदर आणि हसरी होती. तिने छोट्या युवराजांकडे पाहून मान लववली त्याबरोबर तिची छोटी मुलांनी पण हसत हसत सौमित्रला अभिवादन केले. "बहुतेक ती मला ओळखत असावी," असे म्हणत सौमित्रने आपली काळी टोपी काढली आणि हसत तिला तुम्ही कसे आहात असा प्रश्न केला.

त्याच्या त्या सौजन्यशील कृती मुळे ती स्त्री खूश झाल्याचे दिसत होते. तिच्या सुंदर चेहऱ्यावर हसू पसरले होते आणि डोळ्यात माया दिसत होती, आपल्या मुलांच्या वयाच्या युवराजांचे तिने स्वागत केले आणि त्याचे अभिष्टचिंतन केले. युवराजांनी आपली टोपी काढून हालवली आणि गाडी पुढे निघाली. "मला त्या बाई खूप आवडल्या आणि त्यांची मुले पण चांगली आहेत. मला इथे येऊन त्यांच्या बरोबर खेळायला आवडेल. इथे आजुबाजुला लहान मुलांच्या कवायती साठी एक तुकडी तयार होऊ शकेल एवढी लहान मुले असतील काय?" त्याने देशपांडे वकीलांना विचारले. परंतु देशपांडे वकीलांनी प्रवेश द्वारावर तैनात असलेल्या नोकर मंडळींशी, युवराजांना खेळायला मिळणे शक्य होणार नाही ही गोष्ट उघड केली नाही. वेळ आली की पाहू असा त्यांनी पवित्रा घेतला होता.

घोडागाडी उद्यानातील प्रशस्त मार्गावरून निघाली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठमोठे जूने वृक्ष ओळीने उभे होते. त्यांची सावली उन्हापासून रक्षण करत होती, थंडगार वारा शरीराला आणि मनाला सुखावून जात होता. सौमित्रने अशी मोठी झाडे यापूर्वी कधीच पाहिली नव्हती. झाडांच्या पानांमधून सूर्यप्रकाश हळूहळू पाझरत रस्त्यावर नक्षीदार चमकणाऱ्या रांगोळ्या घातल्या असल्याचा भास होत होता. सौमित्रला कुंतलपूरचा राजवाडा आणि उद्यानाचा परिसर, एका परिपूर्ण वास्तू सौंदर्याची नमुना म्हणून ओळखला जातो याची कल्पना नव्हती. विशेषतः ब्रिटिश अधिकारी कुंतलपूरच्या राजेसाहेबांचे आदरातिथ्य स्विकारण्यास येत, तेव्हा त्यांना या वैभवाची असूया वाटते असे. अनेकदा जवळच्या कुंतलपूर संस्थानाच्या राखीव

जंगलात शिकार करण्यासाठी ब्रिटिश अधिकाऱ्यांसोबत इतर राजे मंडळी पण हजेरी लावत असत. राजवाड्याचे उद्यान अगदी आखीवरेखीव होते. काही दुर्मिळ वृक्ष एक एकटे उभे होते तर काही ठिकाणी एकाच प्रकारच्या झाडांची बने बनली होती. गवताची कुरणे लांबवर पसरलेली होती. तेव्हढ्यात एक मोठा ससा उडी मारून पुढे आला आणि दचकून धूम पळाला. ते पाहून सौमित्रने टाळ्या पिटल्या, त्या आवाजाने झाडावरचा तितरांचा थवा भुर्रकन उडून गेला.

"हे एक सुंदर उद्यान आहे, नाही का?" सौमित्र देशपांडे वकीलांना म्हणाला. "आमच्या राणीच्या बागेपेक्षाही हे उद्यान सुंदर आहे. प्रवेशद्वारा पासून राजवाडा किती दूर आहे?"

"जवळपास चार एक मैल असेल," देशपांडे वकील म्हणाले. "एखाद्या व्यक्तीसाठी एव्हढे अंतर बरेच लांब आहे," सौमित्रने आपले मत दिले.

तेव्हढ्यात त्यांचे लक्ष आणखी एका आश्र्चर्याने वेधून घेतले. जवळच्या उंचवट्यावर एक हरणांचा कळप निवांतपणे उभा असलेला दिसला. कळपाचा प्रमुख, घोडागाडीच्या आवाजाने सावध होऊन त्यादिशेने पाहू लागला. त्याच्या भारदस्त डौलदार शिंगांची हालचाल खूप मनमोहक भासत होती. त्याच्या मोठ्या डोळयात सावधपणा होता. क्षणार्धात त्याने काही इशारा दिला असावा की सारा कळप, विरूद्ध दिशेला उधळला. छोट्या शावकांना पुढे घालून पळताना त्यांच्या आयांची थोडी धांदल उडाली. पाच एक मिनिटात हरणांचा कळप दिसेनासा झाला. "इथे प्राणी संग्रहालय आहे काय? की हे त्यांच्या राहण्याचे कायमचे ठिकाण आहे?" सौमित्रने प्रश्न केला. "हे सर्व इथेच राहतात, ते राजेसाहेबांच्या-आपल्या आजोबांच्या मालकीचे आहेत," देशपांडे वकीलांनी उत्तर दिले.

अजूनही राजवाडा दिसत नव्हता. त्यानंतर एक मोठे तळे दिसले त्याच्या एका बाजूला कठड्याचे दगडी बांधकाम होते, उद्यानातील प्राण्यांना पाणी

a

पिण्यासाठी दुसरी बाजू मोकळी होती. घोडागाडी पुढे निघाली आणि राजवाड्याचा दर्शनी भाग दिसू लागला.

राजवाड्याच्या दोन्ही बाजूला फुलझाडांची बाग होती. त्यात देशी विदेशी फुलांचे ताटवे योजनापूर्वक बनवले होते. बागेत एक तलाव होता, त्यामध्ये वेगवेगळया रंगांची कमळे फुलली होती, तळयात बदके पोहत होती. रंगीबेरंगी शोभिवंत मासे तळयात सोडले होते. तळयाच्या मधोमध रंगीत कारंजा होता. त्यातून अंगावर तुषार उडत होते. बागेमध्ये बसण्यासाठी चबुतरे बनवले होते, त्यावर लतामंडपांचे आच्छादन केले होते. वातावरणात फुलांचा सुगंध दरवळत होता.

राजवाड्याच्या प्रवेशद्वाराशी दोन मोठ्या तोफा होत्या. संस्थानाच्या लष्करी सामर्थ्याचे जणू त्या प्रतिक म्हणून शोभत होत्या. प्रसिद्ध युरोपियन वास्तुशास्त्रज्ञाने इमारतीचे आरेखन केले होते. भारतीय आणि युरोपियन शैलीतील ही इमारत वास्तू कलेचा एक अजोड नमुना होती. देशपांडे वकील सौमित्रच्या ज्ञानात सतत नवनवीन माहितीची भर घालत होते.

राजवाड्याचे दगडी बांधकाम होते. ती एक अष्टकोनी इमारत होती. समोरच्या बाजूला उंच मनोऱ्यावर एक मोठे घड्याळ बसवले होते. इमारतीच्या आठ कोनावर आठ लहान घुमट असून मध्यभागी मोठा घुमट होता. त्यावर भगवा जरीपटका डौलाने वाऱ्यावर फडकत होता.  "मी पाहिलेले हे सर्वात सुंदर ठिकाण आहे!" सौमित्र म्हणाला, त्याचा गोल चेहरा आनंदाने फुलला होता. "हा एखाद्या परिकथेतील राजवाड्यासारखा राजवाडा आहे. मी एका चित्रांच्या पुस्तकात असा राजवाडा पाहिला होता."

राजवाड्याच्या प्रवेश दारात राजवाड्यातील दास, दासी, सेवक, सेविकांची रांग सौमित्रच्या स्वागतासाठी उभी होती. एक दिवशी तो साऱ्या ऐश्वर्याचा आणि त्या सर्वांचा मालक असणार होता म्हणून ते सर्वजण त्याचा सन्मान करण्यासाठी

जमले होते पण या गोष्टीची सौमित्रला कल्पना नव्हती. तो त्याच्या जून्या जगातून बाहेर पडून त्याला जेमतेम एक आठवडा पण झाला नव्हता.

पाच सुवासिनींनी त्याच्या पायावर पाणी घातले. त्याच्यावरून भाकर तुकडा ओवाळून टाकला आणि औक्षण केले. त्याचे पाय पुसण्यासाठी एक सेवक पुढे आला. सौमित्र थोडा बावरला, त्याच्या आईने त्याला स्वावलंबनाचे धडे लहानपणापासून दिलेले होते.

देशपांडे वकील सौमित्रचा हात धरून त्याला एका वयोवृद्ध स्त्री जवळ घेऊन गेले. सौमित्रला पाहिल्यावर त्यांचा चेहरा आनंदाने फुलून गेला. "कृष्णा बाई, हे छोटे युवराज-सौमित्र," आणि सौमित्रला म्हणाले, "युवराज, या कृष्णाबाई- या अंत:पुराच्या प्रमुख आहेत, इथली सर्व व्यवस्था त्याच सांभाळतात. आपले वडील आशुतोष यांना लहानपणी यांनीच सांभाळले होते."

सौमित्रने आपला हात त्यांच्या हातात दिला, त्याचे डोळे उजळले होते, तो त्यांना म्हणाला, "वाड्यामध्ये माझ्यासाठी मांजरी आपणच पाठवली होती ना? त्यासाठी मी आपला आभारी आहे." कृष्णाबाईंचा चेहरा उद्यानाचे फाटक उघडणाऱ्या बाईसारख्या प्रसन्न होता.

"मी युवराजांना कुठेही ओळखले असते, त्यांना पाहून अगदी त्यांच्या वडिलांची आठवण झाली. वागणे, बोलणे अगदी त्यांच्या सारखेच आहे. आजचा दिवस अगदी भाग्याचा आहे." सौमित्रला त्या 'भाग्याचा दिवस' असे का म्हणाल्या त्याचा बोध झाला नाही. त्याने कुतुहलाने कृष्णाबाईंकडे पाहिले, त्याचे डोळे त्याला पाणावल्या सारखे वाटले पण तरीही त्या दु:खी नव्हत्या हे स्पष्ट होते. त्या त्याच्याकडे पाहून हसल्या आणि आनंदी चेहऱ्याने त्याला म्हणाल्या, "त्या मांजरीची दोन पिले इथे आहेत. त्यांना तुमच्या खेळण्याच्या खोलीत पाठवण्याची व्यवस्था केली आहे."

a

देशपांडे वकील हळू आवाजात त्यांच्या बरोबर काहीतरी बोलले. "त्यांच्या दालनात त्याला एकट्याला पाठवून देण्याचा आदेश दिला आहे." थोड्या वेळात गणवेशातील एक उंच सेवक सौमित्रला राजेसाहेबांच्या दालनाकडे घेऊन गेला, त्याने दार उघडले आणि मोठ्याने घोषणा केली, "सरकार, कुंतलपूरचे युवराज सौमित्र आले आहेत." कुंतलपूरचा भावी राजा प्रथमच त्याच्या स्वतःच्या वास्तूमध्ये प्रवेश करत होता. आज त्याची प्रथम भेट विद्यमान राजेसाहेबांशी होत होती, अशा ऐतिहासिक भेटीचा साक्षीदार बनण्याचे भाग्य आपल्या वाट्याला आल्याबद्दल तो राजसेवक खूपच खुश होता.

उंबरठा ओलांडून सौमित्रने राजेसाहेबांच्या दालनात प्रवेश केला. ते खूप भव्य दालन होते, पुस्तकांची उंच उंच कपाटे होती. त्यामध्ये मोठमोठे ग्रंथ व्यवस्थितपणे मांडून ठेवलेले होते. कुंतलपूरच्या राजघराण्याची ती ग्रंथसंपदा होती. बसण्यासाठी शिसवी लाकडाचे सोफे होते. त्यावर बारीक कोरीव काम केलेले होते. टेबल, खुर्च्यांना चकचकीत पॉलिश केलेले होते. त्यावर गाद्या, गिरद्या ठेवलेल्या होत्या. खिडक्यांना मोठे पडदे लावलेले होते. भिंतीवर सोनेरी फ्रेममध्ये बसवलेले बिलोरी आरसे टांगलेले होते. दालनात उंची गालिचा अंतरला होता. छताला सुंदर झुंबर टांगलेले होते. राजेसाहेबांच्या दालनात अगदी शांतता होती. सौमित्रला वाटले की दालनात कोणी उपस्थित नसावे परंतु दाराकडे पाठ करून ठेवलेल्या खुर्चीत कोणीतरी बसलेले आहे असे त्याला वाटले. शेवटी तो कुणाचे तरी लक्ष वेधून घेण्यात यशस्वी झाला. खुर्चीच्या जवळ गालिच्यावर एक भला मोठा कुत्रा बसला होता. तो हळूहळू जागचा उठला आणि सौमित्रच्या दिशेने चालू लागला. तेव्हा खुर्चीत बसलेली व्यक्ती म्हणाली, "शेरू! शेरू मागे फिर."

सौमित्रच्या मनात भीती नव्हती. त्याच्या अंत:करतात दया बुध्दी वास करत होती, त्याने अतिशय सहजपणे शेरूच्या पट्ट्यावर हात ठेवला आणि दोघे एकत्रपणे

पुढे आले. शेरू सौमित्रच्या अंगाचा वास हुंगत होता. राजेसाहेबांनी सौमित्र आणि शेरूच्या जोडीकडे आश्चर्याने पाहिले, त्याच वेळी सौमित्रची नजर राजेसाहेबांकडे गेली. त्याने पाहिले: एका भल्यामोठ्या आरामखुर्चीत बसलेले एक धिप्पाड वृध्द गृहस्थ त्याच्याकडे रोखून बघत होते. डोक्यावर पांढरे केस, उग्रपणा जाणवून देणाऱ्या जाड भुवया, वयोमानाप्रमाणे खोल गेलेले असले तरी रागीट डोळे, गरुडाच्या चोचीसारखे नाक, एकंदरीत त्यांना पाहताच जरब बसेल, भीती वाटेल असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

राजेसाहेबांनी पाहिले: त्यांच्या समोर काळया वेल्वेटच्या सूटमध्ये आठ एक वर्षांचा एक देखणा मुलगा उभा होता, शर्टच्या कॉलरला सुंदर लेस लावलेली होती. कपाळावर कुरळया केसांच्या बटा रूळत होत्या. त्याचे निष्पाप डोळे पाहाणाऱ्याकडे मित्रत्वाच्या नात्याने पहात होते. कुंतलपूरचा राजवाडा जर परीकथेतील राजवाडा म्हणायचे झाले तर सौमित्र स्वतः त्या परीकथेतील छोटा राजपुत्र म्हणून शोभून दिसला असता परंतु या वस्तुस्थितीची त्याला जाणीव नव्हती. त्याचे ते मोहक, देखणे रूप पाहून राजेसाहेबांचे मन आनंदाने उचंबळून आले. अगदी सहजपणे तो शेरूच्या मानेवर हात ठेवून उभा होता, हे पाहून त्यांना आपल्या नातवाचा अभिमान वाटला. राजेसाहेबांची आणि त्याची ही प्रथम भेट होती तरी सुद्धा सौमित्र अजिबात गोंधळून अथवा घाबरून गेला नव्हता, याचा राजेसाहेबांना आनंद वाटत होता.

"मी सौमित्र, आपण माझे आजोबा आहात ना? देशपांडे वकील आपल्याला भेटवण्यासाठी, मला मुंबईहून कुंतलपूरला घेऊन आले आहेत, आपण कसे आहात? आपल्याला भेटून मला खूप आनंद झाला," सौमित्रने स्वतःची ओळख करून देत आपल्या येण्यामागचे कारण सांगितले आणि हस्तोंदलनासाठी हात पुढे केला. राजेसाहेबांनी त्याचा चिमुकला हात आपल्या हातात घेतला, त्यांचे

डोळे कौतुकाने चमकत होते, ते इतके चकीत झाले होते की त्यांना काय बोलावे हेच सुचत नव्हते. त्यांनी एकदा आपल्या राजबिंड्या नातवाला डोक्यापासून पायापर्यंत न्याहाळले आणि त्याला प्रश्न विचारला, "मला पाहून तुला आनंद झाला?"

"हो, मला खूप आनंद झाला," असे म्हणून तो जवळच्या खुर्चीवर बसला. त्याच्या उंचीच्या मानाने खुर्ची बरीच मोठी होती. त्याचे पाय जमिनीवर न टेकता, अधांतरी लटकत होते. तो सहजपणे बसला होता, समोरच्या वडीलधाऱ्या व्यक्तीकडे त्याचे आस्थेने लक्ष होते. "आपण कसे दिसत असाल याचा मी विचार करत होतो, आपण माझ्या बाबांसारखे दिसत असाल असे मला वाटले," सौमित्र अदबीने म्हणाला. "मग मी तसा दिसतो काय?" राजेसाहेबांनी सौमित्रला विचारले. "त्याचे काय आहे, माझे बाबा गेले तेव्हा मी खूप लहान होतो, मला ते नीटसे आठवत नाहीत पण आपण त्यांच्यासारखे दिसत असाल, असे मला वाटत नाही.”

"म्हणून तुझी निराशा झाली काय?" राजेसाहेबांनी विचारले. "असे काही नाही," सौमित्र नम्रपणे म्हणाला. "आपल्या वडिलांसारखे कोणी दिसत असेल तर त्यात आनंद वाटणे सहाजिकच आहे पण आपले आजोबा आपल्या वडिलांसारखे दिसत नसले तरी ते आवडणार नाहीत असे काही नाही. तुमचे तुमच्या कुटुंबियांवर किती प्रेम आहे हे मला माहीत आहे." राजेसाहेब खुर्चीत मागे झुकले आणि त्याच्याकडे बघतच राहिले. त्यांना त्यांच्या कुटुंबीयांचे कितपत अगत्य होते हे ते सांगू शकले नसते कारण आजतागायत त्यांनी आपला रिकामा वेळ आपल्या मुलांबरोबर भांडण्यात, त्यांना नांवे ठेवून त्यांची निंदानालस्ती करण्यात घालवला होता. त्याची परिणीती म्हणजे त्यांची सर्व मुले त्यांच्यापासून मनाने दुरावली आणि नंतर त्यांनीच एकेकाला घराबाहेर काढले. त्यामुळे सर्वजण त्याचा मनापासून तिरस्कार करत असत.

a

"कोणताही मुलगा त्याच्या आजोबांवर प्रेम करेल," सौमित्र पुढे म्हणाला, "विशेषत: तुमच्यासारख्या दयाळू आजोबांवर नक्कीच जास्त प्रेम करेल." राजेसाहेब एकदम चमकले आणि म्हणाले, "मी तुझ्याबरोबर दयाळूपणे वागलो, असे तुला म्हणायचे आहे?"

"होय तर, आपण बिंबाक्का, केळेवाल्या आजीबाई आणि बबनसाठी जे काही केले आहे त्यासाठी मी आपला ऋणी आहे."

"बिंबाक्का! केळेवाल्या आजीबाई! बबन!" राजेसाहेब उद्गारले. "होय, त्यांच्या करिता मी आपण दिलेले पैसे खर्च केले. मला पैसे हवे असतील तर देण्यासाठी तुम्हीच देशपांडे वकीलांना पैसे देऊन ठेवले होते असे देशपांडे वकीलांनी मला सांगितले."

"हां! ते होय? ते मी तुला लागतील तर खर्च करायला दिले होते. बरं मग मला सांग तू काय विकत घेतलेस? मला त्याविषयी ऐकायला आवडेल." राजेसाहेबांना आता उत्सुकता वाटू लागली होती. "तुम्हाला बिंबाक्का, केळेवाल्या आजीबाई आणि बबनबद्दल काहीच माहिती नाही, हे मी विसरलो होतो. हे सर्व माझे खास मित्र होते. त्याचे काय झाले महादेव काका आजारी होते." सौमित्रने सांगायला सुरुवात केलीच  "महादेव काका कोण आहेत?" राजेसाहेबांनी विचारले.

"ते बिंबाक्कांचे पती आहेत. ते खूपच आजारी होते, त्यांना आठ मुले आहेत आणि ते घरात एकटेच कमावणारे आहेत. तेच आजारी पडल्यावर पैशाची खूप चणचण भासू लागली, अगदी जेवणखाण्याची पंचाईत झाली. बिचाऱ्या बिंबाक्का आमच्याकडे येऊन रडत बसल्या होत्या. एरव्ही कधी अडचण आली तर आई किंवा राधाक्का- बिंबाक्कांची बहिण त्यांना मदत करत. नेमके त्यावेळी देशपांडे वकील तिथे उपस्थित होते. त्यांनी मला बोलावून घेतले आणि सांगितले की आपण मला देण्यासाठी त्यांच्या जवळ अगोदरच पैसे देऊन ठेवले आहेत. त्यांनी

a

दिलेले पैसे मी बिंबाक्कांना दिले, बिंबाक्काना त्यांच्या स्वतःच्या डोळयांवर विश्वास बसेनासा झाला. त्यांना खूप आनंद झाला. म्हणून मला आपल्याशी कृतज्ञ आहे." राजेसाहेब गंभीर आवाजात म्हणाले, "तू स्वतःसाठी दुसरी कोणती गोष्ट केलीस?"

आता त्यांचे संभाषण ऐकण्यात शेरू स्वारस्य असल्यासारखा सौमित्रकडे वळून पाहू लागला. शेरु एक शिकारी कुत्रा होता सहसा कुणाच्या जवळ जात नसे किंवा कुणाला आपल्या जवळही येऊ देत नसे हे राजेसाहेब जाणून होते. त्याने सौमित्रला आपल्याजवळ कसे येऊ दिले याचे राजेसाहेबांना आश्चर्य वाटत होते. एव्हढा क्रूर कुत्रा असून तो सौमित्रच्या सान्निध्यात शांतपणे बसला होता. त्याने आणखी एक अचंबित करणारी कृती केली: शेरूने आपले भले मोठे डोके, सौमित्रच्या गुडघ्यावर ठेवले, सौमित्र त्याच्या डोक्यावर हलके हलके थोपटत म्हणाला, "तुम्हाला माझ्या दुसऱ्या मित्राची- बबनची कहाणी ऐकायला आवडेल. तो अगदी प्रामाणिक आणि कष्टाळू मुलगा आहे. कुणाची कधी फसवणूक करत नाही किंवा कुणाशी भांडण तंटा करायच्या भानगडीत पडत नाही."

"तुझा मित्र काय करतो?" राजेसाहेबांनी विचारले. "तो बूटपॉलिश करून स्वतःचा उदरनिर्वाह करतो, मुंबईमध्ये तो एकटा राहतो. आपले काम तो खूप मन लावून करत असतो," सौमित्रने माहिती दिली. "तुझी आणि त्याची ओळख कशी झाली?"

"तो माझा खूप जूना मित्र आहे, पण अगदी बापू शेठ यांच्या इतका जूना नाही. मी अगदी लहान असताना माझा चेंडू गर्दीच्या रस्त्यावर हरवला होता, त्याने हातातले काम सोडून वाहनांच्या गर्दीतून माझा चेंडू शोधून आणला, तेव्हापासून तो माझा मित्र झाला." सौमित्रने खिशात हात घातला आणि खिशातून एक लाल रंगाचा रुमाल काढून मोठ्या अभिमानाने राजेसाहेबांना दाखवत म्हणाला, "हा रुमाल त्याने

स्वतंत्रपणे केलेल्या पहिल्या कमाईतून मला भेट म्हणून दिला आहे. बबनने एका मुलाकडून धंद्यासाठी भांडवल व परवाना उधार घेतला होता. त्या मुलाचे नाव जगन असे होते. तो बबनला खूप त्रास देत असे. त्याची सर्व कमाई तो वसुली म्हणून काढून घेत असे. बिचाऱ्या बबनला जीवापाड मेहनत करूनही कायम कफल्लक अवस्थेत रहावे लागे. त्याची जगनकडून घेतलेली उधारी फेडायला आणि त्याला धंद्यासाठी नवीन साहित्य व स्वतंत्र परवाना मिळवण्यासाठी मी तुम्ही दिलेल्या पैशातून त्याला मदत केली. त्याने मला त्याची आठवण म्हणून हा रुमाल दिला आहे. मी देखील बापू शेठना एक सोन्याचे घड्याळ आणि चेन आठवण म्हणून दिली तेव्हा ते म्हणाले जेव्हा मी या घड्याळात वेळ बघेन, तेव्हा मला तुझी आठवण येईल. तसे मला देखील हा रुमाल पाहिल्यावर बबनची आठवण येईल."

सौमित्रचे बोलणं ऐकून राजेसाहेब अंतर्बाह्य थरारून गेले. तसे राजेसाहेब सहजासहजी एखाद्या गोष्टीने भारावून जाणारी व्यक्ती नव्हते, त्यांना जगाचा चांगलाच अनुभव होता. आज त्यांच्या मनात एक विलक्षण भावना जागृत झाली होती आणि त्या जाणीवेने त्यांना गुदमरून गेल्यासारखे झाले होते. राजेसाहेब आजवर फक्त आणि फक्त स्वतःच्या सुखामध्ये गुंतलेले होते, त्यांना इतरांची काळजी करायला कधीच वेळ मिळाला नव्हता- अगदी स्वत:च्या मुलांसाठी सुध्दा वेळ मिळाला नव्हता. त्यांची मुले लहान असताना सुद्धा त्यांनी कधी मुलांचे कोडकौतुक केले नव्हते की कधी त्यांचे लाड पुरवले नव्हते. आजवर ते स्वकेंद्रित आयुष्य जगले होते. मुळात ते इतके स्वार्थी बनले होते की दुसऱ्या कुणा मधील निस्वार्थ समजून घेण्याची क्षमताच त्यांनी गमावली होती. तसे त्यांना फार पुर्वी धाकट्या मुलांविषयी - आशुतोष विषयी थोडेफार ममत्व वाटत होते पण त्याने मुंबईतील अगदीच सर्वसामान्य कुटुंबातील मुलीशी विवाह करण्याचे ठरवल्यावर त्यांच्या मनातील उरलीसुरली ममता नष्ट झाली होती. तेव्हापासून स्वार्थ परायण भावनाशून्य निष्ठूर

a

स्वभाव हाच त्यांचा स्थायीभाव बनला. लहान मूल किती प्रेमळ, विश्र्वासू आणि कोमल असू शकते याची त्यांना कल्पना नव्हती. लहान मूल अजाणतेपणी किती सहजतेने एखाद्याचे मन मोहून घेऊ शकते याचा त्यांना अनुभव नव्हता. बहुतेक लहान मूले अप्पलपोटी, हावरट आणि मस्तीखोर असतात आणि त्यांना शक्य तितक्या कडक शिस्तीत ठेवले नाही तर ती उद्दाम बनतात असा त्यांचा समज होता. त्यांची दोन्ही मोठी मुले त्यांच्या शिक्षकांना त्रास देत असल्याने, त्यांच्या विषयी राजेसाहेबांना सतत तक्रारी ऐकून घ्याव्या लागत असत. धाकट्या मुलाच्या बाबतीत विशेष तक्रारी आल्या नाहीत पण त्यांना त्याचे फारसे महत्त्व वाटले नव्हते. आशुतोषचा मुलगा - आपला नातू त्यांना फारसा आवडेल अशी त्यांची अपेक्षा नव्हती. त्यांनी नातवाला मुद्दाम बोलावून घेतले याला कारण त्याच्याविषयी प्रेम नसून त्यांचा स्वतःचा अहंकार होता. पुढेमागे त्यांच्यानंतर तोच राजा बनणार होता, तो जर अगदीच मूर्ख निघाला असता तर त्यांच्या घराण्याचे नाव बदनाम झाले असते. तो जर मुंबईसारख्या शहरात, हलक्या माणसांच्या संगतीत वाढला असता, तर त्यांच्या मते तो अगदीच वाया गेला असता आणि म्हणूनच त्यांनी त्याला कुंतलपूरला बोलावून घेतले होते. त्यांना त्याच्याबाबतीत फार काही चांगले निष्पन्न होईल अशी अपेक्षाही नव्हती. त्यांची फक्त एकच आशा होती की तो निदान शरीराने धडधाकट आणि अक्कल हुषारीने वागणारा असला तरी पूरे होते. आशुतोषच्या लग्नामुळे ते इतके चिडले होते, की त्यातून चांगले असे काही घडेल असे त्यांना कधीच वाटले नव्हते. जेव्हा राजसेवकाने युवराज आल्याची वर्दी दिली तेव्हा त्यांना ज्या गोष्टींची भीती वाटत होती ती सत्यात उतरली असेल या कल्पनेने ते मनातून हादरून गेले होते. अशा मानहानीकारक प्रसंगाला कोणी साक्षीदार असू नये म्हणून त्यांनी सौमित्रला एकट्याला भेटायला बोलावले होते. निराशच व्हायचे असेल तर त्यांची निराशा इतरांनी पाहावी हे त्यांच्या अभिमानी मनाला सहन झाले नसते. जेव्हा

a

शेरूसारख्या शिकारी कुत्र्याच्या पट्ट्यावर हात ठेवून, अगदी सहजपणे सौमित्र पुढे आला तेव्हा त्यांचे हट्टी, गर्विष्ठ मन एकदम उचंबळून वर आले. ज्या गोष्टीची त्यांनी कल्पनाही केली नव्हती, असा देखणा, राजबिंडा बालक- त्यांचा नातू त्यांच्या समोर उभा होता.

त्यांना न आवडलेल्या स्त्रीचा, सुंदर, धाडसी, तेजस्वी बालक डौलदारपणे सामोरा आलेला पाहून, राजेसाहेब विस्मित झाले. राजेसाहेबांनी सौमित्र बरोबर बोलायला सुरुवात केली. सौमित्र इतक्या सहजतेने त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत होता, हे पाहून राजेसाहेब अजून गोंधळून गेले. त्यांच्यासमोर बोलायला लोक धजावत नसत, आपला नातू सुध्दा इतर लोकांसारखा त्यांना पाहून घाबरून जाईल असे त्यांना वाटले होते. सौमित्र जसा शेरूला घाबरला नाही तशीच त्याला राजेसाहेबांची पण भीती वाटली नाही. त्याने धाडसाचा अथवा धिटाईचा उपयोग करून घेण्याऐवजी मित्रत्वाच्या नात्याने त्यांना आपलेसे करून घेतले होते. किंबहुना राजेसाहेबांना घाबरून राहण्यासारखे काही कारण असू शकेल असा विचारही त्याच्या निरागस मनाला शिवला नाही. राजेसाहेबांच्या समोर मोठ्या खुर्चीवर बसून तो आत्मियतेने बोलत होता. समोर बसलेले रागीट चेहऱ्याचे वृध्द गृहस्थ त्याच्या दृष्टीने त्याचे दयाळू मनाचे प्रेमळ आजोबा होते, जे त्याच्या तिथे येण्याने आनंदीत झालेले होते. आपल्या आजोबांना खुश करणे ही आपली जबाबदारी आहे असे त्याला वाटत होते आणि त्याचे तसे प्रयत्न चालू होते. तिरकस स्वभावाचे कठोर राजेसाहेब नेहमीच स्वतः पलीकडे कुणाचा विचार करत नसत पण आज त्यांना आनंद देण्यासाठी त्यांच्या नातवाचे चाललेले प्रयत्न त्यांच्या लक्षात आले होते. सौमित्रचा त्यांच्या बद्दलचा विश्र्वास त्याच्या देहबोलीतून जाणवत होता. आज प्रथमच या अनुभवाला सामोरे जातांना त्यांना मनातल्या मनात खुश झाले होते. त्यांच्यावर अविश्वास न दाखवणारा, त्यांना न घाबरता मोकळ्या मनाने त्यांच्याशी संवाद साधणारा आणि सर्वात

a

महत्वाचे म्हणजे त्यांच्या खडूस, स्वार्थी स्वभावाला दयाळू आणि मायाळू समजणारा फक्त सौमित्र होता: विश्र्वासाने त्यांच्याकडे स्वच्छ नजरेने पाहणारा त्यांचा नातू.

राजेसाहेब त्यांच्या आरामखुर्चीत आरामात रेलून सौमित्र बरोबर गप्पा मारत बसले होते. बोलण्याचे काम सौमित्र करत होता, राजेसाहेबांनी त्याला प्रश्न विचारून बोलते करत होते आणि तो पण आनंदाने सर्व प्रश्नांची उत्तरे देत होता. बोलण्याच्या ओघात त्यांने केळेवाल्या आजीबाई आणि बापू शेठ यांची माहिती सांगितली. बापू शेठ यांच्या बरोबर पाहिलेल्या, आझाद मैदानावरील मोठ्या सभेचा विषय पण निघाला पण सौमित्रने तो पटकन आवरता घेतला. राजेसाहेबांच्या ते लक्षात आले म्हणून त्यांनी सौमित्रला त्याबाबत जास्त प्रश्न विचारले. सौमित्रची मात्र पंचाईत झाली कारण बापू शेठ यांची राजकीय मते ब्रिटिश सरकार आणि देशी संस्थानिक यांच्या विरोधात होती. राजेसाहेबांच्या प्रश्नांच्या उत्तरादाखल त्यांने शक्य तितक्या सफाईने सर्व खुलासा केला आणि शेवटी म्हणाला, "त्या सभेहून आल्यावर माझे आणि बापू शेठ यांचे बोलणे झाले. बापू शेठ यांचे मत भारतीय संस्थानिक ब्रिटिश सरकारची मर्जी राखण्यासाठी आपापल्या संस्थानातील स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चळवळ दडपण्याचा प्रयास करत आहेत. पुढेमागे आपल्याला संस्थानिकांचा विरोध पत्करून स्वातंत्र्याचा लढा लढावा लागणार." सौमित्रचे बोलणे ऐकून राजेसाहेब एकदम चमकले. पण स्वतःला सावरुन घेत म्हणाले, " पण तुला ब्रिटिशांच्या विरोधात उभे राहण्याची गरज नाही. तू स्वतंत्र अशा कुंतलपूरचा राजा होणार आहेस."

"मला असा विचार करून चालणार नाही. मी भारतमातेचा पुत्र आहे आणि परकियांच्या गुलामगिरीतून तिची मुक्तता करणे हे माझे कर्तव्य आहे, असे मी समजतो," सौमित्रने आपली बाजू मांडली. राजेसाहेब निरूत्तर झाले. त्यांनी मनाशी

a

विचार केला, "भारतमातेचा पुत्र म्हणून सौमित्र तिचे रक्षण करण्यासाठी प्रतिबद्ध आहे हे एका दृष्टीने चांगली गोष्ट आहे. कुंतलपूरचा राजकारभार करण्यास आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांना दोन हात दूर ठेवण्यास तो नक्कीच यशस्वी होईल यात शंका नाही." तेव्हढ्यात जेवण तयार असल्याची वर्दी आली आणि संभाषणात खंड पडला. सौमित्र आपल्या खुर्चीवरून उठला आणि राजेसाहेबांच्या जवळ गेला. त्यांने राजेसाहेबांचे संधिवाताने सुजलेले दुखरे पाय पाहिले आणि आपुलकीने त्यांना विचारले, "मी आपल्याला उठण्यासाठी मदत करु काय? तुम्ही माझ्या खांद्याचा आधार घेऊ शकता. एकदा बापू शेठ यांचा पाय दुखावला होता, ते माझ्या खांद्यावर हात ठेवून चालत असत." हे ऐकून राजसेवकाने महत्प्रयासाने आपले हसू दाबून धरले. त्याच्या पिढ्यान् पिढ्या राजघराण्याच्या सेवेत होत्या. यापुर्वी तो कधीही हसला नव्हता. सेवकाच्या चेहऱ्यावर सदैव गंभीर भाव असणे आवश्यक होते. राजेसाहेबांनी सौमित्रला पायापासून डोक्यापर्यंत पाहिले आणि तुटकपणे सौमित्रला विचारले, "तू हे करू शकशील असे तुला वाटते काय?"

"हो नक्कीच, मी शक्तीवान मुलगा आहे. तुम्ही एका हातात काठी धरून दुसरा हात माझ्या खांद्यावर ठेवावा, बबन म्हणत होता की मी लहान असलो तरी माझ्या दंडातील बेटकुळी चांगलीच उड्या मारते," असे म्हणून त्याने हाताची मूठ बंद केली आणि हात कोपरात दुमडून खांद्याकडे वर नेला, राजेसाहेबांना दंड दिसावा म्हणून त्यांचा प्रयत्न होता. त्याचा गंभीर आणि निश्र्चयी चेहरा इतका गोड दिसत होता की राजसेवकाला परत परत त्याच्याकडे पाहावेसे वाटत होते. "ठीक आहे," राजेसाहेब म्हणाले, "तू प्रयत्न करू शकतोस." सौमित्रने लगबगीने राजेसाहेबांच्या हातात काठी आणून दिली आणि त्यांना उठायला मदत करू लागला. नेहमी राजसेवक त्यांना उठवत असे तेव्हा राजेसाहेबांच्या पायात जोराची कळ येई आणि

a

ते शिव्या देऊन सेवकाचा उद्धार करत. राजेसाहेब भयंकर तापट स्वभावाचे होते, अनेकदा त्यांचा ताडमाड उंचीचा, धट्टाकट्टा सेवक भीतीने चळाचळा कापत असे.

आज नेहमीप्रमाणे राजेसाहेबांच्या दे पायातून असह्य कळा आल्या तरी सुध्दा त्यांनी त्या निमुटपणे सहन करायच्या ठरवले आणि स्वतः हिंमत करून हळूहळू ते उठले. आपणहून मदतीला आलेल्या छोट्या स्वयंसेवकाच्या- सौमित्रच्या खांद्यावर हात ठेवला. त्यांच्या दुखऱ्या पायाकडे पाहत सौमित्रने सावधपणे पुढे पाऊल टाकले आणि तो उत्साहाने म्हणाला "फक्त माझ्यावर झुका, मी खूप हळू चालेन.” नेहमीप्रमाणे जर राजेसाहेबांनी सेवकाच्या हातांचा आधार घेतला असता तर त्यांनी हातातील काठीवर कमी पण सेवकाच्या हातावर जास्तीत जास्त आपला भार टाकला असता. आज त्यांना नातवाच्या खांद्यावर आपला संपूर्ण भार टाकायचा नव्हता पण त्याला आपले वजन अगदीच हलके आहे असेही वाटू द्यायचे नव्हते. त्यामुळे त्यांनी तसा प्रयोग करण्याचे ठरवले. तसे राजेसाहेब वृध्द असले तरी धिप्पाड शरीरयष्टीचे गृहस्थ होते. त्यांना आधार देताना लहानगा सौमित्र घामाघूम झाला, त्याची छाती धडधडायला लागली. स्वत:च्या शक्तीवरचा त्याचा विश्र्वास आणि बबनने त्याच्या शक्तीची केलेली प्रशंसा आठवून तो आपल्या निश्र्चयावर ठाम राहिला. "माझ्यावर झुकायला घाबरू नका," तो धडपडत म्हणाला. "मी ठीक आहे - जर - जर अंतर फार लांब नसेल तर." खरोखरच जेवणाची खोली फार दूर नव्हती परंतु जेवणाच्या टेबलापर्यंत जाईपर्यंत सौमित्रला ते अंतर खूपच जास्त वाटले. त्याला खांद्यावरचा भार प्रत्येक पावलागणिक जास्त वाटत होता, त्याचा चेहरा लालबुंद झाला होता, श्वास फुलला होता आणि गरम वाटायला लागले होते, तरीपण त्याने हार मानली नाही. सर्व शक्ती एकवटून ताठ मानेने चालताना तो राजेसाहेबांना दिलासा देत होता, "तुम्ही काळजी करू नका मी हळू चालेन. तुम्हाला उभे राहताना जास्त त्रास होतो काय? तुम्ही गरम पाण्याचा शेक घेता काय? मोहरीच्या तेलाने

मालिश केल्याने पण आराम पडतो असे बापू शेठ म्हणतात. 'अर्निका' हे औषध पण चांगले आहे असे मी त्यांच्याकडून ऐकले आहे."

त्या दोघांच्या मागून शेरू हळुहळू चालला होता. त्याच्या सोबत राजेसाहेबांचा सेवक होता, त्याचे सारे लक्ष सौमित्रकडे होते. राजेसाहेबांचे वजन पेलवणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. राजेसाहेबांचे लक्ष पण सौमित्रच्या चेहऱ्याकडे होते. त्याचा लालबुंद चेहरा पाहून राजेसाहेबांची मनस्थिती विचित्र झाली. जेव्हा त्यांनी जेवणाच्या दालनात प्रवेश केला तेव्हा सौमित्रला एक खूप मोठे आकर्षक जेवणाचे टेबल दिसले, टेबलाच्या मुख्य खुर्चीच्या मागे उभा असलेला एक सेवक त्यांच्याकडे आश्र्चर्याने पहात होता. शेवटी ते खुर्चीपर्यंत पोहोचले. राजेसाहेबांनी त्याच्या खांद्यावरून हात काढला आणि ते त्यांच्या खुर्चीत बसले.

सौमित्रने खिशातून बबनने दिलेला रुमाल काढला आणि कपाळावरचा घाम पुसला. "आज थोडे गरम होत आहे नाही काय?" आपल्या कृती मागचे कारण सांगण्याचा त्याचा उद्देश, राजेसाहेबांना त्याला फारसा त्रास झाला नाही, असे वाटावे हा होता. "तुला श्रम झाल्यामुळे जास्त गरम होत असेल," राजेसाहेबांचे म्हणणे रास्त होते. "छे! छे! असे काही नाही, मला काही विशेष त्रास झाला नाही. उन्हाळयामुळे मला थोडे उकडत आहे," सौमित्र पटकन म्हणाला.

सौमित्रने आपले घामेजलेले कुरळे केस बबनने दिलेल्या रुमालाने खसाखसा पुसले आणि राजेसाहेबांच्या समोरच्या मोठ्या खुर्चीत जाऊन विसावला. खरे पाहिले तर ती खुर्ची त्यांच्यासारख्या लहान मुलासाठी नव्हती पण सौमित्र आता सर्व भव्यदिव्य गोष्टींना थोडा सरावला होता. मोठे उद्यान, मोठा राजवाडा, त्यातील मोठ्या दालनांचे उंच छत, मोठ्या आरामखुर्चीत बसणारे धिप्पाड शरीरयष्टीचे राजेसाहेब, त्यांचा भला मोठा कुत्रा-शेरू, त्यांचा ताडमाड उंचीचा धट्टाकट्टा सेवक या सर्वांच्या तुलनेत छोट्या सौमित्रचे स्थान कुठेही नव्हते, पण त्याने याबाबत फारशी

a

खंत केली नव्हती. त्याने स्वतःला कधी महत्त्वाचे मानले नव्हते, आहे त्या परिस्थितीचा स्वीकार त्याने सहजपणे केला होता.

जेवणाच्या दालनात दिव्यांच्या झगमगाट होता. चकचकीत चांदीच्या ताटात पंचपक्वानांचे जेवण वाढले जात होते. राजेसाहेब पट्टीचे खवय्ये होते. जेवणाच्या चवीबाबत, पदार्थ वाढतांना जरा देखील इकडेतिकडे झालेले त्यांना खपत नसे. त्यांचे भोजन आटोपेपर्यंत स्वयंपाकी, वाढपी, सेवक, दास दासी सर्वजण धास्तावलेले असत. जर राजेसाहेब जेवणाबद्दल समाधानी नसतील किंवा त्यांना भूक लागली नसेल तर ती एक गंभीर गोष्ट मानली जात असे. आज राजेसाहेबांची भूक थोडी बरी होती. कधी नव्हे तो आज त्यांच्या डोक्यात पदार्थांच्या चवी व्यतिरिक्त दुसरा विषय होता. त्यांच्या नातवाने त्यांच्या विचारांना नवीन खाद्य पुरवले होते. ते त्याच्याकडेच बघत होते. त्यांनी त्याला बोलते केले होते आणि त्याच्या सान्निध्याने, त्याच्या दिसण्याने सुखावले होते. त्याच्या बालसुलभ बोलण्याने आपले मनोरंजन होईल अशी कल्पनाही त्यांनी कधी केली नव्हती पण सौमित्रच्या वागण्याने ते आश्र्चर्यचकीत झाले. त्याच्या धाडसी पण प्रेमळ स्वभावाचे त्यांना मनापासून कौतुक वाटत होते. विशेषतः त्यांना उठवून चालायला मदत करतांना तो दमला, थकला पण तसे न दाखवता हातात घेतलेले काम त्याने अर्धवट सोडून दिले नव्हते. "तुम्ही तुमचा राजमुकुट नेहमी घालत नाही काय?" सौमित्रने आदरपूर्वक विचारले. "नाही," राजेसाहेबांनी गंभीरपणे उत्तर दिले; "हल्ली माझ्याकडून फारसा घातला जात नाही. विशेष दरबाराच्या वेळीच राजमुकुट घातला जातो."

"बापू शेठ म्हणत होते की राजमुकुट नेहमी परिधान केला जातो, परंतु नंतर ते विचार करून म्हणाले की कधी टोपी घालायची असेल तर मग राजमुकुट घातला जात नसेल." सौमित्र म्हणाला. "हो, म्हणून मी अधूनमधून घालत असतो,"

राजेसाहेबांनी उत्तर दिले. त्यांच्या सेवकाला या उत्तराचे नवल वाटले आणि त्याला ठसका लागला.

सौमित्रचे जेवण लौकर संपले. तो आजुबाजुला न्याहाळू लागला आणि म्हणाला, "तुम्हाला तुमच्या राजवाड्याच्या अभिमान वाटत असेल नाही काय? किती सुंदर राजवाडा आहे. मी कधीच इतके सुंदर घर पाहिले नव्हते."

"तुला असे वाटते की मला राजवाड्याचा अभिमान वाटायला हवा?" राजेसाहेबांनी विचारले. "होय, जर हे माझे घर असते तर मला नक्कीच अभिमान वाटला असता. इथले सर्व काही सुंदर आहे: उद्यान,मोठं मोठे वृक्ष, पशुपक्षी, फुलबाग, तलाव, कारंजे, राजवाड्याची भव्य इमारत, कलात्मक रितीने सजवलेली आतील दालने, सर्वच खूप सुंदर आहे," सौमित्र क्षणभर बोलायचा थांबला आणि राजेसाहेबांच्या चेहऱ्याकडे उत्सुकतेने पाहत म्हणाला, "फक्त दोन लोकांना राहण्यासाठी एव्हढे मोठे घर खूपच मोठे आहे नाही काय?"

"दोघांना राहण्यासाठी पुरेसे आहे. तुला फार मोठे आहे असे वाटत आहे काय? राजेसाहेबांच्या प्रतिप्रश्नावर सौमित्र दचकला आणि म्हणाला, "मी आपला सहज विचार करत होतो. जर त्यात दोनच लोक रहात असतील आणि त्यांचे एकमेकांशी फारसे सख्य नसेल तर त्यांना कधी कधी एकटे वाटू शकते."

"मी तुझ्यापेक्षा वयाने खूप मोठा आहे, आपल्या दोघांची चांगली मैत्री होईल असे तुला वाटते काय?" राजेसाहेबांनी विचारले. "हो, मी आणि बापू शेठ चांगले मित्र होतो. ते सुद्धा वयाने खूप मोठे आहेत. माझ्या परमप्रिय आई व्यतिरिक्त फक्त बापू शेठ, माझे चांगले मित्र होते."

एव्हाना सौमित्र खूप दमला होता शिवाय त्याच्या झोपेची पण वेळ झाली असावी. प्रथमच तो आईपासून दुरावला होता. आज तो आपल्या प्रेमळ आईच्या जवळ झोपणार नव्हता. तो अबोलपणे तिचाच विचार करत होता. राजेसाहेबांचे

जेवण झाले, त्यांना सौमित्रचा चेहरा थोडा रडवेला झाल्यासारखा वाटला. सौमित्रने स्वतःला सावरले आणि परत तो राजेसाहेबांच्या बरोबर त्यांच्या दालनाकडे निघाला. यावेळी राजेसाहेबांनी परत एकदा सौमित्रच्या खांद्याचा आधार घेतला होता पण यावेळी त्यांनी स्वतःचा भार जास्तीत जास्त काठीवर टाकला होता. सेवक नुसताच बरोबर चालला होता. सर्वजण राजेसाहेबांच्या दालनात गेल्यावर सेवक माघारी परतला. राजेसाहेब आरामखुर्चीत बसून विश्रांती घेऊ लागले आणि सौमित्र गालिचावर बसून शेरुच्या डोक्यावरून हात फिरवू लागला. राजेसाहेबांनी त्याच्याकडे पाहिले: त्याचे डोळे दु:खी वाटत होते, चेहरा उदास होता, तो काहीतरी विचारात गुंतलेला होता. नकळत त्याने एक खोल उसासा टाकला आणि ते राजेसाहेबांच्या लक्षात आले. त्यांनी सौमित्रला विचारले, "तू कसला विचार करत आहेस?" सौमित्रचा चेहरा उजळला, हसतमुखाने त्यांने राजेसाहेबांकडे पाहिले आणि म्हणाला, "मी माझ्या आईचा विचार करत होतो. मला वाटते आता मला झोपण्याच्या खोलीत जायला हवे," असे म्हणत तो शेरू जवळून उठला आणि खिशात हात घालून फेऱ्या मारू लागला. त्याचे डोळे तेजस्वी दिसत होते. ओठ दाताखाली दाबून धरले होते, मान ताठ होती. तेव्हढ्यात शेरू पण जागचा उठला आणि त्याच्या मागेमागे जाऊ लागला. सौमित्रने मायेने त्याच्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हणाला, "शेरू खूप छान कुत्रा आहे, तो तर माझा मित्रच झाला आहे. मला काय वाटते ते त्याला माहित आहे."

"तुला काय वाटत आहे?" राजेसाहेबांनी विचारले.

सौमित्र गोरामोरा झाला, त्याला घराची ओढ लागली होती, आईची आठवण येत होती. त्याला नवख्या ठिकाणी परकेपणा आणि पोरकेपणा जाणवत होता. तरीसुद्धा तो या साऱ्या परिस्थितीला धैर्याने सामोरे जाण्याचा प्रयत्न करत होता. त्याच्या धाडसाचे राजेसाहेबांना मनापासून कौतुक वाटले आणि त्यांनी त्याला आपल्या

a

जवळ बोलावले. तो त्यांच्या जवळ गेला, त्याच्या डोळ्यात बेचैनी दिसत होती. सौमित्र राजेसाहेबांना म्हणाला, "यापूर्वी मी कधीच घरापासून दूर राहिलो नाही. जर एखाद्या व्यक्तीला स्वतःच्या घराऐवजी दुसऱ्याच्या वाड्यात रात्रभर मुक्काम करावा लागतो तेव्हा त्याला नेमके कसे वाटेल ते मला आता समजले. मला खूप विचित्र वाटत आहे. तशी माझी आई माझ्यापासून फार दूर नाही. शिवाय मी अगदी लहान नाही, हे तिने मला लक्षात ठेवायला सांगितले आहे. तिने आपला फोटो माझ्याकडे दिला आहे. मला तिची आठवण आली की मी तिचा फोटो पाहून शकतो." त्याने खिशात हात घातला, आणि एक छोटी मखमली डबी बाहेर काढली. तो म्हणाला. "आपण सुध्दा पाहू शकता, हा खटका दाबा म्हणजे झाकण उघडेल, आत तिचा फोटो आहे!" असे म्हणत तो राजेसाहेबांच्या खुर्चीजवळ आला आणि विश्र्वासाने डबी उघडून त्यातील फोटो दाखवण्यासाठी त्यांच्या समोर धरला. राजेसाहेबांना आपल्या सूनबाईंचा फोटो सुध्दा पाहण्याची इच्छा नव्हती. पण त्यांचा नाईलाज झाला. त्यांच्या भुवया आक्रसल्या, सौमित्रचे मन राखण्यासाठी त्यांनी फोटोकडे नजर टाकली. एका हसऱ्या चेहऱ्याच्या अतिशय सुंदर, शालीन तरूण स्त्रीचा तो फोटो होता. फोटो पाहून राजेसाहेब विस्मित झाले. सौमित्र मातृमुखी होता याचा स्पष्ट पुरावा म्हणजे तो फोटो होता. काही तरी बोलायला हवे म्हणून राजेसाहेब म्हणाले, "मला वाटतं की तू तिच्यावर खूप प्रेम करतोस."

"होय, माझी आई माझे सर्वस्व आहे. जरी बापू शेठ, बिंबाक्का, राधाक्का महादेव काका, बबन हे माझे जवळचे मित्र असले तरी माझ्या आईची आणि माझी जीवाभावाची मैत्री आहे. तिचे माझ्यावर स्वतःच्या प्राणापलीकडे प्रेम आहे. आम्ही एकमेकांना सर्व गोष्टी सांगत असतो. माझे बाबा माझ्यावर तिची जबाबदारी टाकून गेले आहेत. मी मोठा झाल्यावर स्वतः काम करून आमच्यासाठी पैसे मिळवणार आहे.”

a

"तुला काय काम करावे असे वाटते?" आजोबांनी चौकशी केली. छोटे युवराज हातात आईचा फोटो घेऊन खाली बसले गंभीरपणे विचार करू लागले. "मला वाटले की कदाचित मी बापू शेठ यांच्या सोबत व्यवसाय करू शकतो, पण मला भारतमातेला पारतंत्र्यातून सोडवायचे आहे."

"त्याऐवजी आम्ही तुझा कुंतलपूरचे राजकुमार म्हणून यौराज्याभिषेक करू," त्याचे आजोबा म्हणाले. "ठीक आहे," असे म्हणत सौमित्र एकदम गप्प झाला. कदाचित मनात विचार करत असावा. राजेसाहेब पण आपल्या आरामखुर्चीत मंदपणे डुलत विचारमग्न झाले.

शेरूने अंग ताणले आणि आपल्या पंजावर आपले भले थोरले डोके ठेवून झोपी गेला. दालनात सर्वत्र शांतता पसरली. अर्ध्या तासानंतर देशपांडे वकील आत आले. सगळीकडे शांतता होती. राजेसाहेब देशपांडे वकीलांना पाहून किंचित पुढे झुकले आणि त्यांनी आवाज करू नये असा हाताने इशारा केला. देशपांडे वकीलांची नजर गालिच्यावर झोपलेल्या शेरूकडे गेली, शेरू अजूनही झोपलेला होता आणि त्याच्या शेजारी आपल्या हातावर डोके ठेऊन कुरळया केसांचे कुंतलपूरचे युवराज झोपी गेले होते.

# प्रकरण 6

गाढ झोपेतून सौमित्र सकाळी उठला तेव्हा आपण नेमके कुठे आहोत याचा त्याला संभ्रम पडला. आदल्या रात्री शेरु बरोबर त्याचा पण डोळा लागला होता. राजेसाहेबांनी सौमित्रला अलगद उचलून त्याच्या खोलीत नेऊन निजवायला त्यांच्या सेवकाला सांगितले होते त्यामुळे त्याला तेव्हा अजिबात जाग आली नव्हती. दोन स्त्रिया काही तरी आपापसात बोलत असल्याचे त्याला जाणवले. "द्वारकामाई, त्याच्याबरोबर बोलतांना तुम्हाला जास्त काळजी घ्यायला हवी. जोपर्यंत तो कळत्या वयाचा होत नाही, तोपर्यंत त्याला तिच्यापासून वेगळे होण्यामागचे कारण त्याच्या कानावर पडता कामा नये."

"तशीच आज्ञा असेल तर पाळली जाईल यात शंका नाही," दुसरी स्त्री बोलली. "पण तुमच्या माझ्यातील गोष्ट म्हणून बोलते, राजवाड्यातील नोकर मंडळी तर सोडाच पण इतर लोक पण म्हणायला लागले आहेत की हा दुष्टपणा आहे: त्या गरीब, तरूण विधवेची पोटच्या पोरापासून ताटातूट करणे पाप आहे. बिचारी किती सोज्वळ आहे, मुलगा पण आईच्या वळणावर गेला आहे अगदी तसेच देखणे रूप घेऊन आला आहे. श्रीपती आणि जयराम सांगत होते की त्यांच्या उभ्या आयुष्यात त्यांनी असे दृष्य कधी पाहिले नव्हते: अतिशय निरागसपणे तो बरोबरीच्या मित्रांशी बोलावे असे बोलत होता. एखादा प्रेमळ देवदूतच असावा असा भास होत होता.

नक्कीच त्याच्या आईने चांगले संस्कार केले असणार. नंतर मला आणि जयरामला त्याला उचलून आणण्यासाठी आत बोलावले. बसल्या जागी त्याला झोप लागली होती. जयरामने झोपमोड होऊ नये म्हणून अलगद उचलून घेतले, त्याला अजिबात जाग आली नाही. गोरे गुलाबी गाल, निरागस चेहरा, कपाळावर आलेले कुरळे केस पाहताना नजर हटत नव्हती. सरकार पण पहात होते, त्यांनी जयरामला बजावले, ‘सावकाश! हळू! उगाच झोपमोड व्हायला नको!’ त्यांच्या या सूचनेचे मला आश्चर्य वाटले, कधीतरी त्यांनी स्वतः पलीकडे विचार केला असावा.” सौमित्रने डोळे उघडले आणि डोक्याखालची उशी बाजूला केली.

खोलीत सूर्यप्रकाश आला होता. खोली उत्तमप्रकारे सजवलेली होती. फिक्कट पिवळसर रंगाचे पडदे होते त्यावर पाना फुलांचे सुंदर नक्षीकाम केलेले होते. वातावरण अगदी प्रसन्न होते. सौमित्र उठलेला पाहून, त्या दोघी जणी चटकन पुढे आल्या. त्यापैकी एक पोक्त स्त्री म्हणजे कृष्णाबाई-तिथल्या मुख्य व्यवस्थापिका होत्या आणि दुसऱ्या द्वारकामाई होत्या, त्यांची सौमित्रच्या देखभालीसाठी नुकतीच नेमणूक झाली होती. "सुप्रभात, छोटे युवराज, झोप नीट लागली की नाही?" कृष्णाबाईंनी विचारले. सौमित्र डोळे चोळत हसला आणि म्हणाला, "मी या खोलीत कसा काय आलो? "रात्री तुम्हाला झोप लागली होती, म्हणून तसेच उचलून माडीवरच्या या खोलीत आणले. हे तुमचे शयनगृह आहे आणि या द्वारकामाई-आपल्या देखभालीसाठी त्यांची नेमणूक झाली आहे.” सौमित्र उठून बसला आणि त्याने हस्तोंदलनासाठी हात पुढे केला. "मावशी, तुम्ही कशा आहात?" सौमित्रने विचारले. "माझी काळजी घेण्यासाठी आल्याबद्दल मी तुमचा खूप आभारी आहे."

मी खूप वर्षांपासून स्वतःच्या स्वतः अंघोळ करून कपडे घालायला शिकलो आहे. माझ्या आईने मला स्वावलंबी होण्यासाठी सर्व लहान मोठी कामे करायला शिकवली आहेत. आमच्याकडे राधाक्का, आईला कामात मदत करतात

त्यांच्यावर कामाचा जास्त भार पडू नये म्हणून आई स्वतः पण काम करते आणि मी त्यांना मदत करतो.” कृष्णाबाईंनी द्वारकामाईंकडे पाहिले आणि म्हणाल्या, "काही हरकत नाही. गरज लागली तर द्वारकामाई मदत करतील." ही गोष्ट द्वारकामाईंना पसंत पडली आणि त्यांनी सौमित्रला लागेल तेव्हा मदत करण्याचे कबूल केले. सौमित्रचा कधी कधी कपड्यांची बटणे लावताना गोंधळ उडत असे, तेव्हा त्याने द्वारकामाईंची मदत घेण्याचे ठरवले.

सौमित्रला द्वारकामाई अत्यंत दयाळू स्त्री वाटल्या. खूप लौकर त्या दोघांची मैत्री झाली. सौमित्रने द्वारकामाई बद्दल बरीच माहिती मिळवली. त्यांचे पती सैनिक होते आणि ते लढाईमध्ये धारातीर्थी पडले होते. त्यांचा मुलगा जहाजावर खलाशी होता, त्यांने दूर दूरचे देश पाहिले होते. त्यांच्या मुलाने प्रवासात मिळवलेल्या खूप काही विचित्र, चमत्कारिक गोष्टी आपल्या आईकडे दिल्या होत्या. त्यांनी त्या त्यांच्या पेटीमध्ये जपून ठेवल्या होत्या. द्वारकामाई सौमित्रला कधीही दाखवायला तयार होत्या. लहान मुलांची देखभाल करण्यासाठी द्वारकामाई अनेक मोठ्या श्रीमंत कुटुंबात राहिल्या होत्या. त्या दुसऱ्या एका संस्थानिकांच्या मुलीच्या देखभालीचे काम करत होत्या तेव्हा कुंतलपूर संस्थानाकडून सौमित्रच्या देखभालीसाठी त्यांना बोलावून घेतले होते. ती मुलगी सुध्दा सौमित्रच्या दूरच्या नात्यातली होती.

सौमित्र नाष्टा करण्यासाठी जवळच्या एका खोलीत गेला. खोली खूपच मोठी होती. खोलीला लागूनच असलेली आणखी एक खोली पण सौमित्र साठी होती असे द्वारकामाईंनी सौमित्रला सांगितले. या साऱ्या भव्यतेपुढे आपण खूपच लहान आहोत अशी भावना सौमित्रच्या मनात दाटून आली आणि तसे त्याने द्वारकामाईंना बोलूनही दाखवले. द्वारकामाई सौमित्रला म्हणाल्या, "सुरवातीला तुम्हाला थोडे जड जाईल पण हळुहळू सवय झाल्यावर तसे वाटणार नाही. हा राजवाडा खूप सुंदर आहे. तुम्हाला नक्की आवडेल."

"राजवाडा सुंदर आहे यात काही शंका नाही. मला माझ्या आईची आठवण येते. मुंबईत आम्ही रोज सकाळी एकत्र चहा घेत असू. मला आवडते म्हणून आई माझ्या चहात साय घालत असे, आम्ही दोघे चहासोबत टोस्ट खात असू असा आमचा रोजचा चहाचा कार्यक्रम असे," सौमित्र दु:खी स्वरात म्हणाला. द्वारकामाई त्याची समजूत घालण्यासाठी म्हणाल्या, "एव्हढे वाईट वाटून घेण्याचे काही कारण नाही. आपण आपल्या आईंना रोज भेटू शकता. रोज तुम्हाला इथल्या खूप गंमती जमती आईला सांगता येतील. पण त्यापुर्वी इथली सर्व माहिती करून घ्यावी. इथली घोड्यांची पागा पाहण्यासारखी आहे. राजेसाहेबांच्या संग्रही खूप जातीवंत तगडे घोडे आहेत."

"मला घोडे फार आवडतात. बापू शेठ यांच्याकडे एक घोडागाडी होती. तिचा घोडा कधी कधी अडेलतट्टूपणा करत असे."

"घोड्यांच्या पागे शिवाय अजून एक गंमत आहे," द्वारकामाई खेळकरपणे म्हणाल्या, "काय गंमत आहे?" सौमित्रची उत्सुकता ताणली गेली. "नाष्टा झाल्यावर दिसेल," द्वारकामाई म्हणाल्या. सौमित्रने लौकर नाष्टा आटोपला आणि द्वारकामाईंकडे गंमत दाखवण्यासाठी घाई करू लागला. द्वारकामाईंनी पलीकडच्या खोलीचा दरवाजा उघडला आणि सौमित्र आश्र्चर्याने पहातच राहिला. कुठल्याही मुलाने आश्र्चर्यचकीत व्हावे अशीच ती खोली होती. बाकीच्या खोल्यांसारखी मोठी होती पण सौमित्रला बाकीच्यांपेक्षा अधिक सुंदर वाटली. खोलीतील फर्निचर नवीन पध्दतीचे होते. भिंतींचे रंग उजळ होते. त्यावर लहान मुलांना आवडतील अशी चित्रे काढलेली होती. एका भिंतीवर संपूर्ण जंगल आणि त्यातील प्राणी चितारलेले होते. पुस्तकाचे एक कपाट लहान मुलांच्या पुस्तकांनी भरलेले होते. दोन मोठ्या कपाटात खेळणी मांडून ठेवलेली होती. एका टेबलावर बैठ्या खेळांचे संच ठेवले होते. मुंबईतील खेळण्याच्या दुकानाच्या शोकेसमध्ये त्यांने असे दृश्य पाहिले होते. "ही

a

एखाद्या लहान मुलाची खोली दिसते. ही सर्व कोणाची खेळणी आहेत? सौमित्रने विचारले."

"ही खोली आणि खेळणी आपलीच आहेत. आपण आत जाऊन पहावे," द्वारकामाई म्हणाल्या. "काय? ही सर्व माझी खेळणी आहेत? मला कोणी दिली?" एक क्षणभर सौमित्र थांबला, त्यांचे डोळे लकाकले आणि आनंदाने हरखून मोठ्याने म्हणाला, "माझ्या आजोबांनी दिली आहेत. मला माहित आहे, मी बरोब्बर ओळखलं!"

"होय, राजेसाहेबांनी आपल्यासाठी मागवली आहेत. आपल्याला हवा तो खेळ आपण खेळू शकता. आपण दिवसभर आनंदात रहावे अशी राजेसाहेबांची इच्छा आहे. आपण जे काही मागाल ते सर्व आपल्याला मिळेल." सौमित्रची अगदी धांदल उडून गेली. त्याला प्रत्येक गोष्ट तपासून पाहायची होती पण प्रत्येक गोष्ट इतकी नाविन्यपूर्ण होती की त्याला काय करावे हे सुचत नव्हते. तो मुंबईहून कुंतलपूरला येण्यापुर्वी मुंबईच्या प्रसिद्ध दुकानातील माणसे मुलांना आवडतील अशी खेळणी, पुस्तके स्वतः कुंतलपूरला घेऊन आली होती आणि आकर्षक रितीने मांडणी करून गेली होती. "तुमच्या माहितीमध्ये असा कोणी मुलगा आहे काय, ज्याला माझ्या आजोबांसारखे दयाळू आजोबा आहेत?"

द्वारकामाईंच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव उमटले. राजेसाहेबांच्या स्वभावाबद्दल त्यांचे फारसे चांगले मत नव्हते. त्यांच्या कानावर राजवाड्यातील नोकर मंडळींच्या तोंडून राजेसाहेबांच्या स्वभावाच्या संदर्भात बऱ्याच गोष्टी आल्या होत्या: राजेसाहेबांच्या मनात कुणाबद्दल जराही दया माया नव्हती. स्वतःच्या स्वार्थापलीकडे त्यांचे दुसरे जग नव्हते. त्यांना स्वतःच्या मुलांविषयी देखील प्रेम वाटत नव्हते मग परक्या व्यक्तीची गोष्ट तर दूरच राहिली. अधिकाराचा गर्व होता. दुसऱ्याच्या उपयोगी पडावे अशी भावना सुध्दा त्यांच्या मनाला शिवली नव्हती.

a

त्यांच्या श्रीपती नावाच्या सेवकाने राजेसाहेब देशपांडे वकीलांशी बोलतांना ऐकले होते, "त्याला स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागू द्या. त्याच्या खोल्या खेळण्यांनी भरून टाका. त्याला जे हवे ते द्या म्हणजे तो त्याच्या आईला लौकर विसरेल. त्याचे मन करमणूकीमध्ये आणि नवनवीन गोष्टींमध्ये सारखे गुंतून जाऊ देत म्हणजे आपल्याला काळजी करण्याचे कारण उरणार नाही. असाच मुलांचा स्वभाव असतो."

सौमित्रचा गोड प्रेमळ स्वभाव पाहिल्यावर राजेसाहेबांना आपला मुलांच्या स्वभावाविषयी त्यांनी व्यक्त केलेला अंदाज चुकल्याची जाणीव झाली. रात्री संधिवात बळावला म्हणून सकाळी ते बराच वेळ आपल्या खोलीत एकटेच बसले होते. शेवटी दुपारी त्यांनी सौमित्रला बोलावणे पाठवले. सौमित्र लगेच धावत धावत आला. त्याचा चेहरा आनंदाने फुलला होता, डोळे चमकत होते. अतिशय नम्रपणे तो म्हणाला, "मी तुमचा निरोप येण्याची वाट बघत कधीचा तयार होऊन बसलो होतो. तुम्ही माझ्यावर पुस्तके आणि खेळण्यांची लयलूट केली आहे, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. सकाळपासून मी त्यांच्या बरोबर खेळण्यात दंग झालो आहे."

"खेळणी खरोखरच आवडली? राजेसाहेबांनी विचारले. "हो खूप," आनंदी स्वरात सौमित्र म्हणाला. "मी एकटाच खेळत होतो. मला दुसरा भिडू हवा म्हणून मी द्वारकामाईंना विचारले पण त्यांना खेळता येत नाही. आपण सापशिडीचा खेळ खेळूया काय?" सौमित्रने उत्साहाने विचारले.  "तुम्ही हा खेळ खेळला असणार," सौमित्र म्हणाला.

राजेसाहेब भूतकाळात डोकावले, त्यांची मुले लहान असताना कधी त्यांच्याबरोबर खेळण्याचा प्रसंग आला नव्हता, कदाचित ते सौमित्र एव्हढे असताना खेळले असावेत. त्यांनी परत एकदा छोट्या साथीदाराबरोबर सापशिडीचा खेळ खेळण्याचे ठरवले. खेळ मांडण्यासाठी छोटे टेबल लागणार होते. राजेसाहेबांनी

a

सौमित्रला सेवकाला हाक मारायला सांगितले. सौमित्र म्हणाला, "हे छोटे टेबल फारसे जड नाही. मी एकटा हलवू शकतो," असे म्हणून त्याने राजेसाहेबांसमोर टेबल ढकलून आणले आणि आपली खुर्ची पुढे घेऊन डाव मांडू लागला.  "काल रात्री तुम्हाला जास्त त्रास झाला काय?" सौमित्रने काळजीच्या स्वरात विचारले.

सापशिडीचा खेळ सुरू झाला. शिडीच्या सहाय्याने वर चढण्याचा आणि सापाच्या मुखातून घसरत खाली येण्याचा थरार छोटे युवराज आणि त्याचे आजोबा दोघेही आनंदाने अनुभवत होते. खेळ अगदी रंगात आला होता.

कुंतलपूरचे राजेसाहेब त्यांचे जूने पुराणे संधिवाताचे दुखणे आणि स्वतःचा चिडखोर स्वभाव विसरून एका छोट्या मुलाबरोबर सापशिडीचा खेळ खेळत बसलेले होते. तेव्हढ्यात बाहेर भेटण्यासाठी कोणी आले आहे याची वर्दी देण्यासाठी राजसेवक आत आला आणि आतील दृश्य पाहून आपण कशासाठी आत आलो हेच विसरून गेला. राजेसाहेबांनी त्याला आत येण्याचे कारण विचारले तेव्हा त्याला आठवले की मारूतीच्या मंदीराचे पुजारी आणि देवळात भरणाऱ्या शाळेचे शिक्षक अशा दोन दोन जबाबदाऱ्या निभावून देणारे गुरव मास्तर राजेसाहेबांची भेट घेण्यासाठी आले होते. सेवकाने तसा निरोप राजेसाहेबांना सांगितला.

कुंतलपूरच्या पंचक्रोशीबाहेर माळावर मारुतीचे मंदिर होते. त्याच्या सभोवार कुंतलपूरच्या राजघराण्याची खाजगीतील शेतजमीन होती जी अनेक कुळांना खंडावर कसायला दिली होती. सध्याच्या राजेसाहेबांच्या आजोबांनी कुळांना राहण्यासाठी माळावर एक घरकुलांची वसाहत उभी केली होती, त्याचे घरभाडे दरमहा शेतकऱ्यांकडून राजेसाहेबांचे खाजगी कारभारी, नरसिंहराव कुलकर्णी यांचा मुनिम वसूल करून राजेसाहेबांच्या खाजगीकडे जमा करत असे. पन्नास वर्षापुर्वी बांधलेली घरकुले आता मोडकळीस आली होती, त्यांची डागडुजी करणे कुळांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट होती आणि नरसिंहराव कुलकर्णी

a

जाणूनबुजून तिकडे दुर्लक्ष करत असत. प्राथमिक सोईसुविधांच्या अभावी एकेकाळी टुमदार घरकुलांच्या वसाहतीला आता झोपडपट्टीचे स्वरूप आले होते. माळावरच्या मारूतीचे पुजारी, गुरव मास्तर, देवळाच्या प्रांगणात एका मोठ्या वटवृक्षाखाली, वस्तीवरील मुलांना शिकवत असत. अडीअडचणीला गुरव मास्तर शेतकऱ्यांच्या मदतीला धावून जात. गुरव मास्तरांना सहसा राजवाड्यात राजेसाहेबांना भेटून कुळांच्या तक्रारींचा पाढा वाचायला आवडत नसे कारण राजेसाहेब त्याकडे फारसे लक्ष देत नसत. अशा भेटीच्या वेळी जर राजेसाहेबांचा संधिवात बळावला असेल तर ते खुशाल त्यांच्या तोंडावर सांगून टाकत की मला लोकांच्या अडचणी ऐकण्यासाठी काडीमात्र रस नाही. त्यांची तब्येत थोडी ठिक असेल तरच राजेसाहेब थोडीफार माणुसकी दाखवत असत. मात्र राजेसाहेबांचे बोलणे इतके अवमानकारक आणि लाघट असे की गुरव मास्तरांसारख्या सरळमार्गी व्यक्तीला देखील ते सहन करणे अवघड होत असे. स्वतःच्या खिशाला जरा देखील तोशीस पडलेली राजेसाहेबांना अजिबात आवडत नसे. देवा धर्मासाठी, गोरगरिबांच्या मदतीसाठी पैसा खर्च करणे राजेसाहेबांना नामंजूर होते.

आज गुरव मास्तर, राजेसाहेबांशी एका महत्त्वाच्या गोष्टी संदर्भात बोलण्यासाठी आले होते. परंतु त्यांची बोलणी कितपत यशस्वी होतील याविषयी ते साशंक होते. त्याची दोन कारणे होती, एक म्हणजे गेले काही दिवस राजेसाहेबांचा संधिवात बळावला गेला असल्याची बातमी सगळीकडे पसरली होती. राजवाड्यातील एका सेविकेची- जनाबाईची बहिण माळावरच्या वस्तीमध्ये किराणा मालाचे दुकान चालवत असे. जनाबाई कडून राजवाड्यातील बातम्या तिच्या बहिणीकडे-दौपदीकडे जात आणि मग तिथून साऱ्या वस्तीला समजत असत. राजेसाहेबांचा खास सेवक श्रीपती आणि जनाबाईची चांगली मैत्री होती. तिला श्रीपती कडून राजेसाहेबांच्या तब्बेतीची माहिती मिळत असे. दोनच दिवसांपूर्वी

रागाच्या भरात राजेसाहेबांनी जेवणाचे ताट भिरकावून दिले होते ही बातमी तासाभरात वस्तीतील सर्वांना समजली होती. जनाबाईच्या बहिणीच्या दुकानात खरेदी करता करता वस्तीतील बायकांच्या बोलण्यात नेहमी राजवाडा हा एकच विषय चघळला जात असे, यावरून राजवाड्यातील वातावरण तापलेले असावे असा गुरव मास्तरांना अंदाज होता.

दुसरा महत्त्वाचा सर्वांच्या चर्चेचा विषय म्हणजे नुकतेच झालेले छोट्या युवराजांचे आगमन हा होता. सर्वांना आशुतोष यांच्या लग्नामुळे संतापलेल्या राजेसाहेबांचा रुद्रावतार माहीत होता. सर्वांशी आपुलकीने वागणारा आशुतोष हा कुंतलपूरच्या राजघराण्यातील एकमेव व्यक्ती होता. बिचारा परक्या ठिकाणी मृत्यू पावल्यानंतर सुध्दा, राजघराण्याने त्याला क्षमा केली नव्हती की त्याच्या तरुण विधवा पत्नी आणि निष्पाप पोरक्या पोराला सांत्वनाचा एखादा शब्द सुद्धा दिला नव्हता उलट राजघराण्याचा तीव्र तिरस्कार त्यांच्या वाट्याला आला होता. ते दोघे राजेसाहेबांना डोळ्यासमोर देखील नको होते. जेव्हा त्यांची दोन्ही मुले मागे वारस न ठेवता मरण पावली तेव्हा कुठे राजेसाहेबांना त्यांच्या धाकट्या मुलाच्या मुलाची आठवण आली. आता सुध्दा ते प्रेमाने अथवा आपुलकीने त्याची वाट पाहत नव्हते तर एक असभ्य, उनाड असा मुलगा आपल्या राजघराण्याचे नाव बदनाम करेल या भितीने धास्तावले होते.

राजेसाहेबांच्या खास सेवकाने त्यांच्या अस्वस्थ चेहऱ्यावरून त्यांना वाटणारी भीती ओळखली होती आणि त्याची चर्चा पण नोकर मंडळींमध्ये झाल्याने ही बातमी वस्तीतील लोकांपर्यंत पोहोचली होती. गुरव मास्तरांना भीती वाटत होती की कालच संध्याकाळी छोटे युवराज राजवाड्यात राजेसाहेबांना भेटले होते. राजेसाहेबांना वाटत असणारी भीती खरी ठरली असेल, तर राजेसाहेबांना सर्वप्रथम

a

भेटायला जाणाऱ्या व्यक्तीला त्यांच्या संतापाला सामोरे जायला लागणार होते आणि नेमके ते स्वतः ती व्यक्ती होते.

श्रीपतीने दार उघडले आणि गुरव मास्तरांच्या कानावर लहान मुलाच्या आनंदाने हसण्याचा आवाज आला आणि ते आश्र्चर्यचकीत झाले. "आजोबा, तुम्ही सापाच्या तोंडातून खाली सरळ सात आकड्यावर आला आहात," टाळ्या वाजवत एक छोटा मुलगा मोठ्याने म्हणाला. आरामखुर्चीत बसलेल्या राजेसाहेबांनी संधिवाताने सुजलेले पाय एका लहान स्टुलावर ठेवले होते. समोर एका छोट्या टेबलावर सापशिडीचा डाव मांडला होता आणि सात आठ वर्षांचा एक सुंदर गोड मुलगा समोरच्या खुर्चीत बसला होता. "अरेरे! आजोबा पुढच्या वेळी तुम्ही शिडीवरून चढून माझ्या पुढे जाल," त्यांना दिलासा देण्यासाठी तो मुलगा म्हणाला. खोलीमध्ये कोणीतरी आले आहे याची त्या दोघांना जाणीव झाली आणि त्यांनी दाराकडे पाहीले. नेहमीप्रमाणे राजेसाहेबांच्या भुवया उंचावल्या होत्या पण गुरव मास्तरांना त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीचा अहंमन्यपणा दिसला नाही, उलट राजेसाहेब आपले तुसडेपणाने दुसऱ्याला जाणीवपूर्वक अपमानित करण्याचे धोरण विसरून गेल्यासारखे वाटले.

"कोण गुरव मास्तर काय? अरे व्वा! या या, मला एक नवीन मित्र मिळाला आहे. त्याच्या बरोबर खेळायला कोणी बरोबरीचे नाही म्हणून मलाच त्याचा भिडू बनायला लागत आहे. हे सौमित्र-आपल्या कुंतलपूरचे छोटे युवराज, आणि युवराज, हे गुरव मास्तर, माळावरच्या मारुतीचे पुजारी आणि तिथल्या शाळेचे मास्तर," राजेसाहेब त्याच्या छोट्या खांद्यावर हात ठेवत प्रसन्नपणे म्हणाले. आपला वारस म्हणून ओळख करून देताना त्यांच्या अंतःकरणात तृप्त अभिमानाची भावना निर्माण झाली होती. युवराजांनी त्या साध्या कपड्यातील मास्तरांकडे पाहिले आणि पुढे आपला हात पुढे करत मंजुळ आवाजात म्हणाला, "मला आपली ओळख करून

घेताना खूप आनंद होतो आहे," बापू शेठ नवीन लोकांशी असेच ओळख करून घेत असत. वडिलधाऱ्या लोकांशी विनयशील असले पाहिजे अशी त्याला त्याच्या आईची शिकवण होती.

गुरव मास्तरांनी त्याच्या प्रफुल्ल चेहऱ्याकडे पाहिले आणि हसत हसत खाली वाकून त्याचा चिमुकला हात आपल्या हातात धरला, त्याक्षणी त्यांना तो छोटा मुलगा मनापासून आवडला, तशी त्यांना माणसांची आवड होती. सौमित्रच्या सौम्य बोलण्यातील खरेपणा, त्याच्या राजबिंड्या रूपापेक्षा गुरव मास्तरांना जास्त मोहवून गेला. सौमित्रला पाहिल्यावर गुरव मास्तर राजेसाहेबांचा विचार करायचे जणू विसरून गेले. एका दयाळू मनाच्या निष्पाप मुलांमुळे त्या खोलीतील खिन्न, गंभीर वातावरण पार बदलून आनंदी आणि उत्साही बनले होते.

"छोटे युवराज, आपल्याला भेटून मला खूप आनंद झाला. आपल्याला प्रवासात काही त्रास तर झाला नाही ना?" मास्तरांनी आपुलकीने विचारले. "छे! अजिबात नाही. प्रवास मोठा होता पण प्रथमच आगगाडीतून आईबरोबर प्रवास करताना गंमत वाटली," सौमित्र म्हणाला. "गुरव मास्तर आपण बसून घ्यावे," महाराजांनी फर्मावले. मास्तर समोरच्या खुर्चीत बसले आणि राजेसाहेबांकडे पाहू लागले. "महाराज छोट्या युवराजांच्या आगमनाप्रित्यर्थ आपले मनापासून अभिनंदन," मास्तर राजेसाहेबांना म्हणाले. परंतु राजेसाहेबांनी काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. "तो आपल्या वडिलांच्या वळणावर गेला आहे," राजेसाहेब कोरडेपणाने म्हणाले. "त्याच्या कडून तरी काही प्रशंसनीय कामगिरी घडेल अशी आशा करू. मास्तर आज सकाळीच काय काम काढलेत? कोण संकटात आहे?" राजसाहेबांनी विचारले.

मास्तरांच्या अपेक्षेपेक्षा सुरवात तर चांगली झाली होती पण ते थोडे थांबले आणि म्हणाले, "आपले कुळ, हरबा पवार अडचणीत आला आहे. त्याची मुले

a

एकापाठोपाठ एक थंडी तापाने आजारी पडली आहेत. त्यातच त्याच्या बैलगाडीचे बैल उधळले आणि धावत्या गाडीतून खाली पडून त्याला बराच मार लागला. आता महिनाभर जागेवर पडून होता आता जरा कुठे त्याने परत शेतावर काम करायला सुरुवात केली आहे. तसे त्याचे एरव्ही काम अगदी चोख असते असे मी म्हणत नाही पण यावेळी दुर्दैव हात धुवून त्याच्या पाठीशी लागले आहेत. सध्या त्याला घरभाड्याची आणि खंडाची जुळणी करणे अवघड झाले आहे. थकलेले भाडे भरले नाही तर घर खाली करण्याचे कालच मुनीमजी सांगून गेले आहेत. त्याला घर सोडायला लागले तर लहान मुलांसोबत सर्व कुटुंबाला रस्त्यावर यावे लागेल म्हणून मी त्याच्या वतीने आपल्याला विनंती करत आहे की त्याला थोडी मुदत वाढवून मिळावी. आपले पैसे तो चुकवणार नाही असा मी शब्द देतो."

"भाडे थकल्यावर सगळेच तसेच सांगत असतात," राजेसाहेबांचा स्वर आणि संताप वाढत चालला होता. नेमका यावेळी सौमित्र पुढे झाला. आतापर्यंत तो दोघांचे बोलणे लक्ष देऊन ऐकत होता. त्याच्या मनात हरबा पवार आणि त्याच्या कुटुंबाबद्दल अनुकंपा दाटून आली. त्यांची नेमकी किती मुले थंडी तापाने आजारी पडली असतील याची त्याला काळजी वाटत होती. "हरबा पवार दिलेल्या शब्दाचा पक्का आहे," मास्तरांनी त्याची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. "भाडेकरू म्हणून तो वाईट आहे, खंड पण वेळेवर भरत नाही, दुसरे चांगले कुळ बघायला हवे" राजेसाहेब म्हणाले. "कारभारी नरसिंह कुलकर्णी सांगत होते, नेहमीच तो उशिरा भाडे आणि खंड देत असतो."

"पण सध्या तो मोठ्या संकटात आहे," गुरव मास्तर म्हणाले. "बिचारा कुटुंबवत्सल माणूस आहे. कसायला दिलेले शेत काढून घेतले तर त्याच्या बायका मुलांचे उपाशीपोटी हाल होतील. अगोदरच साथीच्या तापाने त्याची दोन लहान मुले खूप अशक्त झाली आहेत, त्यांना शक्ती वर्धके आणि पौष्टिक अन्न मिळण्याची

आवश्यकता आहे." सौमित्र हे ऐकून म्हणाला, "मुंबईला महादेव काकांची पण अशीच परिस्थिती झाली होती."

राजेसाहेबांना सौमित्रच्या बोलण्याचे कुतुहल वाटू लागले, ते गमतीने म्हणाले, "अरेच्चा! इथे एक परोपकारी व्यक्ती आहे हे मी विसरून गेलो. हे महादेव काका कोण आहेत?"

"ते बिंब्बाकांचे पती आहेत. संधिवाताच्या दुखण्याने ते कामावर जाऊ शकत नव्हते. घरभाडे थकल्याने घर खाली करण्याची वेळ आली आणि औषधोपचार तर दूरच पण मुलाबाळांच्या खाण्या पिण्याचे वांधे झाले. त्यांच्या मदतीला तुम्हीच तर मला पैसे दिलेत," सौमित्रने आठवण करून दिली. राजेसाहेबांच्या भुवया आकुंचन पावल्या आणि गुरव मास्तरांकडे पहात काळजीच्या स्वरात म्हणाले, "कोण जाणे, युवराज पुढे जाऊन कशा प्रकारे जमीनदारी सांभाळणार आहेत. मी देशपांडे वकीलांना सांगितले होते की मुलाला जे काही हवे ते सर्व त्याला द्यावे. त्याला तर भिकाऱ्यांना देण्यासाठी पैसे हवे होते."

"पण आजोबा, ते लोक भिकारी नव्हते, ते कष्टकरी लोक होते. महादेव काका उत्तम गवंडी काम करत आणि सुतारकाम देखील. माझ्यासाठी त्यांनी लाकडाची तलवार बनवून दिली होती." सौमित्र कळकळीने म्हणाला. "ते भिकारी नव्हते तर गवंडीकाम करणारे, बुटपॉलीश करणारे आणि केळी विकणारे लोक होते." क्षणभर सौमित्रकडे पहात राजेसाहेब स्वतःशी म्हणाले. त्यांच्या मनात एक विलक्षण विचार आला. भले तो उदात्त भावनेने प्रेरित नसला तरी विचार वाईट नव्हता. "इकडे ये," त्यांनी सौमित्रला जवळ बोलावले. सौमित्र त्यांच्या दुखऱ्या पायाला धक्का लागणार नाही याची काळजी घेत जवळ उभा राहिला. "या प्रकरणात तू काय करशील?" राजेसाहेबांनी विचारले. राजेसाहेबांचे बोलणे ऐकल्यावर गुरव मास्तरांच्या मनात एकच खळबळ उडाली.

a

गुरव मास्तर एक विचारी सद्गृहस्थ होते. बरीच वर्षे त्यांचे कुंतलपूर मध्ये वास्तव्य असल्याने त्यांना तेथील लोकांची पारख होती आणि राजेसाहेबांच्या स्वभावाबद्दल बराच अनुभव त्यांच्या गाठीला होता. कुंतलपूरच्या चांगल्या वाईट भविष्याची जबाबदारी, आपले तपकिरी डोळे उघडे ठेवून खिशात हात घालून उभ्या असलेल्या छोट्या युवराजांच्या हाती सोपवली जात आहे त्याची त्यांना निश्चितपणे जाणीव झाली. कदाचित स्वार्थ परायण राजेसाहेबांकडून स्वतःच्या लहरी नुसार त्या लहान मुलाकडे मोठा अधिकार सोपवला जाण्याची शक्यता होती. तो मुलगा जर साधा सरळ आणि उदार अंतःकरणाचा नसेल तर ती गोष्ट केवळ कुंतलपूरच्या प्रजेसाठीच नव्हे तर त्या मुलासाठी सुध्दा हानीकारक ठरली असती. "आणि अशा वेळी तू काय करशील?" राजेसाहेबांनी परत एकदा विचारणा केली. सौमित्र अजून थोडा पुढे आला आणि मित्रत्वाने त्याने आपला हात राजेसाहेबांच्या गुडघ्यावर ठेवत म्हणाला, "मी जर खूप श्रीमंत माणूस असतो तर मी त्यांना कुळ आणि भाडेकरू म्हणून राहू दिले असते शिवाय त्यांच्या मुलांसाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या त्यांना देण्याची व्यवस्था केली असती. पण मी तर अजून लहान मुलगा आहे," असे म्हणून तो क्षणभर थांबला. त्याच्या मनामध्ये एक विचार आला. त्याचा चेहरा उजळला होता, मोठ्या विश्र्वासाने म्हणाला, "आजोबा, पण तुम्ही ही गोष्ट करू शकता, तुम्हाला काहीच अशक्य नाही."

"हं!" त्याच्याकडे बघत राजेसाहेब म्हणाले. "हे तुझे मत आहे ना?" पण ते नाराज नव्हते. "म्हणजे तुम्ही कोणालाही काहीही देऊ शकता," सौमित्र म्हणाला. "पण मी कुळांच्या आणि भाडेकरूंच्या बाबतीत फारशी दखल देत नाही," राजेसाहेब म्हणाले. "हे नरसिंह कुलकर्णी कोण आहेत," सौमित्रने विचारले. "ते खाजगीचे कारभारी आहेत, तेच सर्व व्यवहार पाहतात, त्यांना वेळेवर ठरलेला शेतजमिनीचा खंड आणि राहत्या घराचे भाडे न भरणारे भाडेकरू आणि कुळे अजिबात आवडत

a

नाहीत." राजेसाहेब म्हणाले. "तुम्ही त्यांना पत्र लिहून कळवता काय? मी कागद आणि लेखणी घेऊन येतो आणि या टेबलावरचा खेळ उचलून ठेवतो," सौमित्र म्हणाला. क्षणभर राजेसाहेबांच्या लक्षात आले नाही की खाजगीच्या कारभाऱ्यांना त्यांचे नुकसान करणारे आज्ञापत्र लिहायचे होते. राजेसाहेब सौमित्रकडे बघत म्हणाले, "तुला लिहिता येईल का?"

"होय," त्याने उत्तर दिले, "पण फार चांगले नाही."

"हे टेबल रिकामी करून माझ्या कपाटातून कागद, लेखणी आणि दौत घेऊन ये," राजेसाहेब म्हणाले. गुरव मास्तरांची उत्कंठा शिगेला पोहोचली. सौमित्रने लगबगीने लेखनाची सर्व व्यवस्था केली आणि राजेसाहेबांना आनंदाने म्हणाला, "आता आपण पत्र लिहू शकता."

"पत्र तुला लिहायचे आहे," राजेसाहेब उत्तरले. "मला? मी लिहलेले चालेल? माझ्या शुद्ध लेखनाच्या चुका होतात," सौमित्र चांगलाच गडबडला होता. "चुकले तरी चालेल," राजेसाहेबांनी उत्तर दिले. "हरबा काही शुद्ध लेखनाच्या चुका शोधणार नाही. मी काही परोपकारी नाही; तुला परोपकार करायचा आहे. तुझी लेखणी शाईत बुडव आणि लिहायला सुरुवात कर." सौमित्र खुर्चीत बसला, त्याने पत्र लिहण्यासाठी लेखणी शाईत बुडविली आणि राजेसाहेबांना विचारले, "नेमके काय लिहू?"

"सध्या हरबा पवार यांना थकबाकीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे लिहून खाली

कुंतलपूरचे युवराज -सौमित्र अशी सही कर.

सौमित्रने अतिशय गंभीरपणे लिहायला सुरुवात केली. थोड्या वेळाने पत्र पूर्ण झाले, आणि त्याने ते आजोबांच्या हातात दिले. राजेसाहेबांनी पत्र पाहिले त्यांच्या चेहऱ्यावर थोडी नाराजी दिसून आली. सौमित्रने लिहिताना खाडाखोड केली

होती आणि एक दोन शुद्ध लेखनाच्या चूका पण झाल्या होता. सहीच्या ठिकाणी शाईचा मोठा डाग पडला होता. त्यांनी पुन्हा एकदा पत्र व्यवस्थित लिहण्याची सूचना केली. सौमित्रने नव्याने राजेसाहेबांच्या सांगण्यानुसार पत्र लिहिले. राजेसाहेबांनी वाचून झाल्यावर गुरव मास्तरांकडे दिले. त्यादिवशी गुरव मास्तर राजवाड्यातून परत जाताना सोबत फक्त पत्रच घेऊन गेले नाहीत तर एक आनंददायी भावना आणि त्याहून अधिक आशादायक भविष्य सोबत घेऊन गेले जे यापूर्वी त्यांनी कधीच कुंतलपूरच्या राजवाड्यातून जाताना घेऊन गेले नव्हते.

गुरव मास्तर गेल्यावर सौमित्र पुन्हा राजेसाहेबांकडे गेला आणि त्याने आपल्या आईला भेटायला जाण्याची परवानगी विचारली. राजेसाहेब काही बोलले नाहीत पण एक गंमत पाहण्यासाठी त्यांनी घोड्यांच्या तबेल्यात जाण्याचे सुचवले. सौमित्रने त्यांना त्याची आई वाट पहात असेल तेव्हा उद्या मी गंमत बघितली तर चालेल काय असे विचारले. तेव्हा राजेसाहेब तुटकपणे म्हणाले, "ठिक आहे तर मग मी तुला जून्या वाड्यात जाण्यासाठी घोडागाडी बोलावून घेतो. तबेल्यात तुझ्यासाठी एक लहान तट्टू बांधले आहे ते उद्या बघ."

"काय? माझ्यासाठी?" सौमित्र आश्र्चर्यचकीत झाला होता. "म्हणजे माझ्या खोलीतल्या खेळण्याप्रमाणे आपण माझ्यासाठी लहान घोडा पण आणला?"

"होय," राजेसाहेब म्हणाले, "तुला आता बघायला आवडेल का? मी तशी व्यवस्था करायला सांगू का?" सौमित्र त्यांच्या या औदार्याने भारावून गेला होता, "माझ्याकडे घोडा असेल अशी मी कधीच अपेक्षाही केली नव्हती. आईला पण खूपच आनंद होईल, तुम्ही मला आवडणारी प्रत्येक गोष्ट देत आहात."

"तुला तुझ्यासाठी आणलेला घोडा तू आता पाहणार आहेस का?" राजेसाहेबांनी परत एकदा विचारणा केली. "मला पहायचा आहे, खरंच मला पहायचा आहे पण आता पहायला वेळ नाही, "सौमित्र म्हणाला. "आताच तुला

a

आईला भेटायला जायला हवे आहे काय? तू उद्यावर ढकलू शकत नाहीस काय?" राजेसाहेबांनी शेवटचा प्रयत्न करून पाहिला. "का बरे? सकाळपासून ती माझाच विचार करत बसली असणार, मी देखील तिचाच विचार करत आहे," सौमित्र म्हणाला. "असे आहे तर मग बेल वाजव, घोडागाडी मागवून घेऊ," राजेसाहेबांनी तट्टू पाहण्याचा विषय संपवला.

सौमित्र आणि राजेसाहेब घोडागाडीतून जून्या वाड्याकडे निघाले. उंच उंच झाडांच्या कमानी खालून घोडागाडी चालली होती. राजेसाहेब फारसे बोलत नव्हते. सौमित्रची बडबड सुरु होती. सतत तो त्याच्यासाठी आणलेल्या लहान तट्टू विषयी प्रश्न विचारत होता. कोणत्या रंगाचा आहे? किती मोठा आहे? त्याचे नाव काय ? त्याला काय खायला आवडते? किती वर्षांचा आहे? सकाळी त्याला किती वाजता बघता येईल? अशी सारखी प्रश्नांची सरबत्ती सुरू होती. "माझ्या आईला खूप आनंद होईल. तुम्ही माझ्याशी मायेने वागत आहात याबद्दल तिला आपल्याबद्दल कृतज्ञता वाटत असणार. मला लहान तट्टू किती आवडते हे तिला माहित आहे. पण आमच्याकडे एखादे लहान तट्टू असेल असे कधी वाटले नव्हते. आमच्या जवळच्या भागात एका लहान मुलाचा घोडा होता. त्याला बघण्यासाठी आम्ही बऱ्याचदा त्याच्या घराभोवती चकरा मारत असू."

सौमित्र मागे उशीवर टेकला आणि राजेसाहेबांकडे पाहत म्हणाला, "मला वाटते की तुम्ही जगातील सर्वोत्तम व्यक्ती आहात. तुम्ही नेहमीच चांगले काम करता, इतरांचा विचार करता, माझी आई म्हणते 'जो निस्वार्थपणे दुसऱ्याचा विचार करतो तोच खरा माणूस' आणि तुम्ही तसेच आहात, नाही काय?" सौमित्रने आपल्याला इतके आदरणीय स्थान दिलेले पाहून राजेसाहेबांना काय बोलावे हेच सुचेनासे झाले. सौमित्र, भाबडेपणाने त्यांच्या प्रत्येक अप्रिय, स्वार्थी हेतूला, त्यांचे औदार्य आणि चांगुलपणा समजत होता. सौमित्रचा त्यांच्याबद्दलचा विश्वास त्यांना एक विलक्षण

अनुभूती देऊन गेला. सौमित्रच्या निष्पाप डोळयात त्यांच्या विषयी कौतुक आणि अभिमान स्पष्टपणे दिसत होता.

सौमित्र म्हणाला, "तुम्ही खूप लोकांना आनंदीत केले आहे. फक्त माझ्या माहितीतील माणसे आणि त्यांचे कुटुंबीय मी मोजले तर ती संख्या पंचवीस पेक्षा जास्त झाली. तुमच्या दयाळूपणामुळे त्यांच्या आयुष्यात त्यांनी अपेक्षाही केली नसेल इतका आनंद मिळाला आहे. आणि एक गंमत मी तुम्हाला सांगतो ती म्हणजे ही सर्व मंडळी आपला हा आदर्श पुढे ठेवत त्यांच्या माहितीतील इतर गरजू लोकांना दयाळूपणा दाखवतील. दिवाळीत कसे आपण एका पेटलेल्या पणतीने दुसरी पणती पेटवतो अगदी तसेच. त्यामुळे बापू शेठ यांच्यासारखा विचार करणाऱ्या लोकांचा राजे लोकांबद्दलचा गैरसमज दूर होईल."

"बापू शेठ यांचे राजे लोकांबद्दल काय मत आहे?" राजेसाहेबांनी न रहावून विचारले.

"ते म्हणतात राजे मंडळी सदा सर्वदा स्वतःच्या सुखासीन आयुष्यात गुरफटून गेलेली असतात. त्यांना प्रजेच्या सुखदुःखाची अजिबात काळजी असत नाही. सध्या जनतेला ब्रिटिश सरकार आणि संस्थानिक असा दोघांचा जुलूम सहन करावा लागत आहे," सौमित्र म्हणाला. राजेसाहेबांना बापू शेठ यांचे परखड विचार स्वतःला आरसा दाखवत आहेत असे वाटले. सौमित्रला बापू शेठना त्याचे प्रत्यक्ष अनुभव सांगायचे होते. बापू शेठ यांचे पुस्तकी ज्ञान आणि सांगोवांगीच्या गोष्टी कुंतलपूरच्या राजेसाहेबांच्या बाबतीत तरी लागू पडत नाही, हे लौकरात लौकर बापू शेठना पत्राने कळवण्याचा त्याचा विचार, त्याने राजेसाहेबांना बोलून दाखवला.

राजेसाहेबांनी सौमित्रला विचारले, "तू बापू शेठना नेमके काय सांगणार आहेस?"

a

"माझे आजोबा सर्वात दयाळू व्यक्ती आहेत. ते नेहमी इतर लोकांचा विचार करतात, त्यांना आनंद देतात आणि - आणि मला आशा आहे की मी मोठा झाल्यावर, मला त्यांच्यासारखे व्हायला आवडेल." सौमित्र उत्साहाने म्हणाला."माझ्यासारखे!" असे म्हणत राजेसाहेबांनी सौमित्रच्या आनंदी चेहऱ्याकडे नजर टाकली. घोडागाडीच्या खिडकीतून सूर्य प्रकाशाचा एक कवडसा सौमित्रच्या चेहऱ्यावर पडला होता त्यामुळे त्याचा चेहरा उजळून निघाला होताना "होय, तुमच्यासारखे मला व्हायचे आहे. कदाचित मी तुमच्या एव्हढा चांगला बनू शकणार नाही पण माझा प्रयत्न तर तसाच असेल," सौमित्र मनापासून म्हणाला.

घोडागाडी आता राजवाड्याच्या प्रांगणातून उद्यानाच्या वाटेला लागली होती. सौमित्रला उंच वाढलेल्या गवतात उभा असलेला हरणांचा कळप घोडागाडीकडे आश्चर्यचकित नजरेने पहाताना दिसला. तपकिरी सशांची जोडी पळताना दिसली. तितरांचा थवा भुर्रकन उडून गेला. पक्ष्यांची गोड किलबिल ऐकू येत होती. दोन खारुताई पाठशिवणीचा खेळ खेळताना क्षणार्धात नजरेआड झाल्या. चोहोबाजूंनी दिसणाऱ्या सौंदर्याने सौमित्रचे सर्व हृदय आनंदाने व आनंदाने भरले होते. राजेसाहेब सुध्दा घोडागाडीतून पहात होते पण त्यांच्या डोळयासमोर त्यांचा भूतकाळ साकारला होता, कानावर वेगळेच शब्द ऐकू येत होते. उभ्या आयुष्यात त्यांनी कधी कुणाला उदार हस्ते मदत केली नव्हती किंवा कुणाचा दयाळूपणे वागवले नव्हते. तरूणपणी संपत्ती, शक्ती आणि सत्तेच्या उपयोग फक्त स्वतःच्या सुखासाठी केला होता. आता वेळ निघून गेली होती, म्हातारपण समोर ठाकले होते हा विचारसुद्धा फारसा आनंददायी नव्हता. एव्हढ्या ऐश्वर्याचे मालक असून ते एकाकी होते, ना कोणी जवळचे नातेवाईक होते, ना कुणी जीवाभावाचे मित्र. तोंडावर खोटी स्तुती आणि माघारी निंदा करणारी माणसेच त्यांच्या आजूबाजूला वावरत असत. निरपेक्षपणे त्यांच्यावर प्रेम करेल अशी कुणी व्यक्ती नव्हती, त्यांच्या जगण्याची

a

अथवा मरण्याची कुणाला फिकीर नव्हती. त्यांनी सुध्दा आज पर्यंत जग काय म्हणेल याची पर्वा कधी केली नव्हती. लोक त्यांना पसंत करत नव्हते, सर्व त्यांना घाबरून असत. घोडागाडीच्या खिडकीतून बाहेर पसरलेल्या त्यांच्या मालकीच्या शेकडो एकर जमिनीकडे त्यांचें लक्ष गेले. समोर दिसणाऱ्या जमिनी व्यतिरिक्त अजून किती जमीन आहे, त्यावर किती लोक राहतात, त्याची किती किंमत आहे, याची त्यांना पूर्ण कल्पना होती पण छोट्या युवराजांच्या त्याची जरा सुद्धा माहिती नव्हती. त्यांच्या भल्यामोठ्या इस्टेटीवर उभ्या असलेल्या अनेक गरीब अथवा श्रीमंत घरांमधील एकही व्यक्ती अशी नव्हती की जिला या अफाट संपत्तीची, सत्तेची हाव आणि राजघराण्याच्या प्रतिष्ठेचा हेवा वाटल्याशिवाय राहिला नसेल. पण त्यांच्यापैकी कुणीही एका क्षणासाठी का होईना राजेसाहेबांना "चांगले" म्हणाला नसेल किंवा साध्या सरळ मनाच्या सौमित्रप्रमाणे, त्याच्यासारखे व्हावे अशी इच्छा पण केली नसेल. सौमित्रच्या त्यांच्यावरचा विश्र्वास, त्यांना विचार करण्यास भाग पाडत होता की खरोखरच ते सौमित्रसाठी आदर्श व्यक्ती म्हणून योग्य आहेत काय? आणि याचे त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यांच्या आक्रसल्या भुवया आणि गंभीर चेहरा पाहून सौमित्रला वाटले की त्यांचा पाय दुखत असावा म्हणून त्यांने राजेसाहेबांना जास्त त्रास होऊ नये या विचाराने निमुटपणे बाहेरची शोभा पाहणे पसंत केले. शेवटी उद्यानाचे फाटक ओलांडून घोडागाडी जून्या वाड्यासमोर थांबली. सेवकाने येऊन दार उघडण्यापूर्वी सौमित्र स्वतः दार उघडून उडी मारून खाली उतरला होता. राजेसाहेब आपल्या विचारांच्या तंद्रीतून जागे झाले आणि उद्गारले, "काय? आपण इकडे पोहोचलो की काय?"

"हो," सौमित्र म्हणाला. "मी तुम्हाला तुमची काठी देतो. तुम्ही बाहेर पडल्यावर माझ्या खांद्याचा आधार घ्यावा."

"मी बाहेर पडणार नाही," राजेसाहेब कठोरपणे म्हणाले. "नाही — माझ्या आईला भेटणार नाही?" सौमित्र चकित होऊन म्हणाला. "ती मला माफ करेल," राजेसाहेब कोरडेपणाने म्हणाले. "तिच्याकडे गेल्यावर तिला सांग की एक नवीन घोडा देखील तुला इकडे येण्यापासून रोखून ठेवू शकला नाही."

"ती निराश होईल," सौमित्र म्हणाला. "तिला तुम्हाला भेटण्याची खूप इच्छा असेल."

"मला तसे काही वाटत नाही," राजेसाहेबांनी उत्तर दिले, "आम्ही परत येऊ तेव्हा तुला बोलावले जाईल श्रीपती, जनार्दनला गाडी पुढे न्यायला सांग." श्रीपतीने दरवाजा बंद केला. सौमित्र गोंधळून गेला होता. क्षणभर तो घुटमळला आणि नंतर वाड्याच्या दिशेने धूम पळाला. देशपांडे वकीलांनी सौमित्रला मुलांच्या बरोबर शर्यतीत पळताना पाहिले होते तशी संधी राजेसाहेबांना पण मिळाली. आश्र्चर्यकारक वेगाने सौमित्र पळत होता, त्याला आईची भेट घेण्यासाठी जरा देखील वेळ गमवायचा नव्हता.

गाडी हळू हळू पुढे सरकली, पण राजेसाहेब लगेच मागे झुकले नाहीत; ते अजूनही बाहेर पाहात होते. झाडांच्या मधून घराचा उघडा दरवाजा दिसत होता; छोटा सौमित्र पायऱ्यांवर पोहोचला. एक लहानसर बांध्याची सडपातळ तरूण स्त्री त्याला भेटायला पुढे धावत आली. सौमित्रने आईच्या दिशेने झेपावत आपले हात तिच्या गळयात घातले. खाली वाकून तिने सौमित्रला पोटाशी धरले आणि त्याचा पापा घेत त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले.

# प्रकरण 7

हनुमान जयंतीचा उत्सव जवळ आला होता. त्या अगोदर संपूर्ण आठवडाभर भजन किर्तनाचे कार्यक्रमांचे आयोजन केले होते. कुंतलपूरच्या मारुती मंदिरात उभ्या महाराष्ट्रातून ख्यातनाम किर्तनकार हजेरी लावत असत. मार्तंडदेव राजेसाहेबांच्या आजोबांच्यापासून हनुमान जयंतीचा सोहळा थाटात साजरा होत असे. संपूर्ण सप्ताहाचा खर्च राजेसाहेबांच्या खाजगी उत्पन्नातून होत असे. राजेसाहेबांच्या आजोबांनी माळावरच्या मारुती मंदिराचा जीर्णोद्धार केला होता तेव्हा पासून ही प्रथा सुरू होती. कुंतलपूरचे सर्व नागरिक या समारंभात भाग घेत.

यावर्षी हनुमान जयंतीच्या सोहळ्यात राजेसाहेब छोट्या युवराजांसमवेत उपस्थित राहणार आहेत याची खबर सगळीकडे पसरली होती. अलीकडे त्यांनी अशा सार्वजनिक समारंभात येणे जाणे बंद केले होते. तसा त्यांचा देव धर्माकडे ओढा पहिल्या पासून कमीच होता आणि आता तर वाढते वय आणि शारीरिक तक्रारी ही कारणे होती. या वर्षी कुंतलपूर संस्थानाचे छोटे युवराज आल्याने लोकांमध्ये उत्साह होता आणि त्यांना पाहण्याची उत्सुकता होती. मंदिर समितीचे लोक सालाबादप्रमाणे राजेसाहेबांना आमंत्रण देऊन गेले होते मात्र युवराजांना सोबत घेऊन यावे अशी वेगळी विनंती सर्वांनी केली होती. जरी वर वर राजेसाहेब दाखवत नसले तरी आपल्या वारसदाराला प्रजेस भेटवण्यासाठी उत्सुक होते.

a

पहाटे हनुमान जन्माचा सोहळा झाला. अभिषेक, पूजा विधी यथासांग पार पडल्यानंतर संध्याकाळी समारोपाचा भजन किर्तनाचा कार्यक्रम आणि नंतर महाप्रसाद होणार होता. या कार्यक्रमाला राजेसाहेब युवराजांच्या समवेत येणार असल्याची खबर होती त्यामुळे जवळ जवळ सर्वच कुंतलपूर माळावरच्या मारूतीच्या दर्शनाला लोटले होते. पण सौमित्रला पाहण्याची सर्वात जास्त उत्सुकता राजेसाहेबांची शेती कसणाऱ्या कुळांना लागून राहिली होती. तशी त्यांना राजवाड्यातील बित्तंबातमी द्रौपदीबाईंच्या दुकानात मिळत असे. विशेषतः सौमित्र आल्यापासून द्रौपदीबाईंना खरेदीसाठी येणाऱ्या बायकांशी राजवाडा, राजेसाहेब, सौमित्र, त्याचा थाटमाट याशिवाय बोलायला दुसरा कोणताही विषय नव्हता. अधूनमधून सौमित्रच्या आईचा अपर्णाताईंचा विषय निघत असे, पण कोणाला खात्रीने काही माहिती नव्हती. सगळयाजणी आपल्या मनाप्रमाणे अंदाज लावत असत. पण सगळया स्त्री वर्गाची सहानुभूती अपर्णाताईंच्या बाजूला होती, भले त्यांना कोणीही पाहिले नव्हते.

द्रौपदी बाईंच्या छोट्या दुकानात महिला ग्राहकांची आणि लहान मुलांची संख्या जास्त असे. रोजच्या गरजेच्या वस्तू काड्या पेटीपासून मुलांच्या आवडीच्या लिमलेटच्या गोळया, शेंगदाण्याची चिक्की, श्रीखंडाच्या गोळया सर्व वस्तू दुकानात विक्रीसाठी ठेवलेल्या होत्या. छोट्या युवराजांसाठी दोन मोठी दालने कशी सुसज्ज केली आहे, यात खेळणी आणि पुस्तकांचा कसा खजिना भरला आहे याची एक सुरस कथा द्रौपदीबाई सर्वांना ऐकवत असत. नुकतेच युवराजांसाठी आणलेले तपकिरी रंगाचे तट्टू, त्याचा शाही सरंजाम, त्याच्या देखभालीसाठी मोतद्दार नेमला असल्याची बातमी द्रौपदी बाईंना अगदी तोंडपाठ झाली होती. सौमित्र आणि राजेसाहेबांच्या पहिल्या भेटीचे वर्णन तर उत्कंठावर्धक होते. त्याला एकट्याला राजेसाहेबांच्या दालनात शिरताना राजवाड्यातील तमाम स्त्रीवर्गाला, सिंहाच्या गुहेत

a

शिरणाऱ्या कोकराची आठवण झाली, पण नंतर श्रीपतीकडून त्यांना समजले की तो अजिबात घाबरला नव्हता उलट पहिल्या क्षणापासून तो मित्रत्वाच्या नात्याने गप्पा मारत होता आणि त्या ऐकणे हे एकमेव काम राजेसाहेबांकडे उरले होते. ते कितीही रागीट, चिडखोर असले तरी त्यांना सौमित्रला पाहिल्यावर, त्याचे बोलणे ऐकल्यावर त्याचा अभिमान वाटला होता, मग भले त्यांनी तो उघड केला नसेल आणि अर्थातच त्यांचा तसा स्वभावही नव्हता. ते मनातून आनंदले होते हे श्रीपतीला जाणवले म्हणूनच तो आपल्या सहकाऱ्यांना म्हणत होता की राजेसाहेबांचा मूळ स्वभाव परत उसळून वर येऊ नये म्हणजे मिळवली. द्रौपदीबाईंच्या दुकानातील गप्पा घरी गेल्यावर पुरुष मंडळींना पण तिखटमीठ लावून सांगण्यात आल्या आणि राजवाड्यातील घडामोडी घराघरात पोहोचल्या.

त्यानंतर लगेच हरबा पवारांच्या बाबतीत सौमित्रच्या सांगण्यावरून राजेसाहेबांनी थकबाकीचा तगादा बंद करून मुदतवाढ करून दिल्याची घटना घडली. गुरव मास्तरांनी सांगताना नोकर मंडळींच्या कानावर पडली आणि मग त्यांच्याकरवी घराघरात जाऊन पोहोचली.

आठवडी बाजाराच्या दिवशी जो तो हरबाला याविषयी विचारत होता शेवटी त्याने गुरव मास्तरांकरवी मिळालेले छोट्या युवराजांच्या हस्ताक्षरातील पत्र दाखवले. नरसिंह कुलकर्णींना पण एक दोन सद्गृहस्थांनी याविषयी माहिती विचारली होती, कारभारी थोडे नाराज असल्याचे दिसून आले. यापुर्वी अशी कधी गोष्ट घडली नव्हती यापुढे मात्र घडेल याची दाट शक्यता दिसत होती त्यामुळे त्यांना सावधगिरी बाळगणे आवश्यक असल्याचे जाणवले होते.

हनुमान जयंतीच्या दिवशी माळावरच्या मारुतीच्या दर्शनासाठी जमलेले कुंतलपूरचे नागरिक राजेसाहेब नक्की येतील की नाही या बद्दल साशंक होते. सर्वांना छोट्या युवराजांना पाहण्याची उत्कंठा लागली होती. अचानक मंदिराच्या दिशेने दोन

a

अनोळखी स्त्रिया पूजेचे साहित्य हातात घेऊन येताना दिसल्या. साध्या वेशातील एक लहानसर बांध्याची सडपातळ तरूण स्त्री आणि तिच्या बरोबर एक पोक्त बाई होती. त्या तरूण स्त्रीने गळयात एक जोंधळी पोताच्या सर घातला होता, कानात मोत्याच्या कुड्या होत्या, कपाळ मात्र पांढरे होते. चेहऱ्यावर खानदानी तेज लपत नव्हते. तिला पाहून एक स्त्री म्हणाली, "बहुधा ती युवराजांची आई असावी," साऱ्याजणी तिकडे पाहू लागल्या. जून्या वाड्यात रोज दुधाचा रतीब घालणाऱ्या हौसाबाईनी त्याच वहिनीसाहेब आहेत असे सांगितले आणि क्षणार्धात बायकांच्या घोळक्यात गडबड उडाली. प्रत्येकीला त्यांना नीट पाहायचे होते. अपर्णाताई मात्र आपल्याच विचारात होत्या. त्यांच्या डोळयासमोर त्यांचा लाडका सौमित्र दिसत होता. आजोबांनी आपल्यासाठी घोडा आणला म्हणून हरखून गेलेला, आपल्या आई पासून दूर रहावे लागते म्हणून मनातून हिरमुसलेला असला तरी तसे न दाखवता इतरांना आनंद देण्यासाठी धडपडणारा सौमित्र. आज राजेसाहेब सौमित्रला घेऊन मंदिरात येणार असल्याची बातमी जून्या वाड्यापर्यंत पोहोचली होती. एरव्ही अपर्णाताई कुंतलपूरला आल्यापासून कुठेही बाहेर गेल्या नव्हत्या. राधाक्का मुद्दाम त्यांना मारुतीच्या दर्शनासाठी घेऊन आल्या होत्या. देव दर्शना बरोबर दोघींच्या मनात एकच विचार होता की त्या निमित्ताने दूरून का होईना सौमित्रची भेट घडेल. दोघीजणी आता मंदीराजवळ आल्या. दर्शनासाठी गर्दी झाली होती. एक वृध्द स्त्री पुढे आली आली अपर्णाताईंच्या डोक्यावर हात ठेवून म्हणाली, "पोरी देव तुझे कल्याण करो! तुझ्या लेकाला- युवराजांना उदंड आयुष्य लाभो!"

अपर्णाताई एकदम गडबडल्या. त्यांनी वडीलधाऱ्या स्त्रीचे आभार मानले. तोपर्यंत दर्शनासाठीच्या रांगेतल्या सर्व स्त्री पुरुषांना वहिनीसाहेब आल्याची बातमी समजली. सर्वजण अदबीने बाजूला होत मान लववून अभिवादन करू लागले. क्षणभर अपर्णाताईंना समजले नाही आणि मग त्यांच्या लक्षात की त्या छोट्या

युवराजांच्या मातोश्री असल्याने लोक आदर दाखवत आहेत. किंचित हसत त्यांनी अभिवादन स्वीकारले आणि हळू आवाजात 'धन्यवाद' व्यक्त केले. मुंबई सारख्या मोठ्या शहरात राहिल्याने त्यांना हे वातावरण, या चालीरीती नव्या होत्या. परंतु त्यातून पोहोचणारी मैत्रीची आणि सन्मानाची भावना अपर्णाताईंना हृद्य वाटली. अपर्णाताई आणि राधाक्का मारुतीचे दर्शन घेण्यासाठी आत गेल्या. तात्या भटजींनी त्यांना तीर्थ प्रसाद देऊन आशीर्वाद दिला. दोघीजणी बाहेर आल्या आणि समारोपाच्या किर्तन ऐकण्यासाठी मंडपात बसण्यासाठी निघाल्या. त्या मंडपात पोहचल्यावर कार्यकर्त्यांनी त्यांना ओळखले आणि स्त्रियांच्या बसण्याची सोय केलेल्या भागात निमंत्रितांच्या खास रांगेत त्यांची बसण्याची व्यवस्था केली.

त्याचवेळी मंदिराच्या आवारात राजेसाहेबांची घोडागाडी आत येत होती. राजेसाहेब आणि युवराज येत असल्याचे समजल्यावर लोकांच्या नजरा त्या दिशेने वळल्या. राजेसाहेबांची नोकर मंडळी गर्दीला एका बाजूला करण्याचा प्रयत्न करत होती. जो तो माना उंचावून छोट्या युवराजांना पाहायला धडपडत होता. घोडागाडी मंदिराच्या प्रवेशद्वारापाशी आल आणि श्रीपतीने खाली उतरून दार उघडले, नक्षीदार किनखापी अंगरखा आणि तंग सुरवार घातलेला, एक लहान मुलगा उडी मारून बाहेर आला. त्याचे चमकदार केस वाऱ्यावर उडवत होते.

प्रत्येकजण त्याच्याकडे कुतूहलाने पाहत होता. अनेकांना त्याला पाहताच त्याच्या वडिलांची- आशुतोष यांची आठवण झाली. श्रीपती राजेसाहेबांना घोडागाडीतून उतरण्यासाठी मदत करू लागला. सौमित्र काळजीने त्यांच्याकडे पाहात उभा होता. त्यांना मदतीची गरज आहे असे लक्षात आल्यावर झटकन सौमित्रने आपला हात मदतीसाठी पुढे केला आणि मोठा माणूस असल्यासारखे खुशाल आपल्या खांद्याचा आधार घ्यावा असे सुचवले. अशावेळी राजेसाहेब इतर

a

मंडळींवर जशी छातीत धडकी भरवण्यासारखी आगपाखड करत तसे काही आपल्या नातवाच्या बाबत करण्याचे टाळले असल्याचे लोकांच्या ध्यानात आले.

"फक्त माझ्यावर झुका," सौमित्र राजेसाहेबांना म्हणाला, "लोक तुमचा चांगुलपणा जाणतात म्हणूनच तुम्हाला पाहण्यासाठी लोक किती आतूर झाले आहेत," सौमित्र म्हणाला. "ते तुझ्या स्वागतासाठी जमले आहेत, तुझा जयजयकार करत आहेत. तू सर्वांना हात जोडून नमस्कार कर." राजेसाहेब म्हणाले. "काय? माझ्या स्वागतासाठी इतके लोक?" सौमित्र आश्चर्यचकीत झाला होता. त्याने आपला तेजस्वी चेहरा जमलेल्या गर्दीकडे वळवला. एकाच वेळी प्रत्येकाला नमस्कार करण्याचा त्याचा प्रयत्न चालला होता. राज सेवकांनी गर्दी हाटवली तसे राजेसाहेब एका हातात काठी पकडून दुसरा हात छोट्या युवराजांच्या खांद्यावर ठेवून मंदिराकडे निघाले. गर्दीतील एक वृध्द स्त्री-जिने सर्वप्रथम अपर्णाताईंना आशीर्वाद दिला होता, ती सौमित्रकडे पाहात म्हणाली,

"आयुष्यमान हो बाळा! देव तुझे कल्याण करो!" तेव्हढ्या गर्दी देखील सौमित्रने त्या आजीबाईंना वाकून नमस्कार केला. आजीबाईंनी कानशीलावर बोटे मोडत अलाबला घेतली. सौमित्रला एकदम राधाक्कांची आठवण आली आणि त्याने नकळतपणे आवंढा गिळला.

मंदिराच्या गाभाऱ्यात जावून राजेसाहेब आणि सौमित्रने दर्शन घेतले. तीर्थ प्रसाद देऊन सौमित्रच्या कपाळी भटजींनी अंगारा लावला. नंतर सरकारांची स्वारी सौमित्र सह मंडपात दाखल झाली.

व्यासपीठावर मान्यवरांच्या बैठकीची व्यवस्था केली होती. समोरच्या स्त्रियांच्या रांगेत सौमित्रला अपर्णाताई आणि राधाक्का दिसल्या. त्याचा चेहरा आनंदाने फुलून आला. शेजारी बसलेल्या राजेसाहेबांच्या अनुभवी नजरेला

a

क्षणार्धात त्याचे कारण लक्षात आले. समोरच्या रांगेतील अपर्णाताईंना पाहून त्यांच्या ओठांचा कोपरा दुमडला होता. कपाळावर आठी उमटली होती.

सप्ताह भर भजन, किर्तन, गायन, वादन सादर केलेल्या कलाकारांना राजेसाहेबांच्या हातून बिदागी देण्याचा कार्यक्रम होता. तो पर्यंत व्यासपीठावर गुरव मास्तरांच्या शाळेतील लहान मुले श्लोक, अभंग, भजन, स्तोत्र असे कार्यक्रम सादर करत होते. मानाने, जबाबदारीने मोठा असला तरी सौमित्र वयाने लहान पोर होता. मास्तरांनी सुचवल्यावर त्याने आपल्या गोड आवाजात 'भीमरुपी महारुद्रा' हे स्तोत्र म्हणून दाखवले. मंडपात टाळ्यांच्या कडकडाट झाला. राजेसाहेब सुखावले होते. अपर्णाताईंच्या मनात संमिश्र भावना होत्या. राज वैभवाच्या त्या कधीच भुकेल्या नव्हत्या, आपल्या निरागस, निष्पाप मुलाचा निर्मळ आनंद असाच टिकून राहो आणि दैववशात जे विचित्र भाग्य, राजवैभव त्याला लाभले आहे त्यामुळे त्याच्यासोबत कोणतीही चूक किंवा वाईट घडू नये अशी प्रार्थना त्या परमेश्वराकडे करत होत्या.

आदल्या दिवशीच संध्याकाळी सौमित्रला निरोप देताना त्या काय म्हणाल्या होत्या ते त्यांना आठवत
होते, "बाळा मी तुला खूप अक्कल हुषारीच्या शहाणपणाच्या गोष्टी सांगू शकते, पण या जगात सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे चांगला हो, निर्भय हो, नेहमी सर्वांशी दयाळूपणाने वागत जा आणि कधी सत्याची कास सोडू नकोस, कधी कुणाला दुखवू नकोस. जीवात जीव असेपर्यंत तू दुसऱ्याला मदत करू शकतोस, माझ्या छोट्या सौमित्र मुळे या जगाचे कल्याण व्हावे असे मला वाटते. बाळा, एक व्यक्ती जगात थोडासा जरी चांगला बदल घडून शकली तर त्यापेक्षा महत्त्वाचे दुसरे काही नाही मग तो बदल कितीही लहान का असेना पण तो ज्यांच्या बाबतीत घडत असतो त्यांच्या साठी तो खूप मोठा असतो."

a

राजेसाहेबांना सौमित्रने त्याच्या आईचे बोलणे सांगितले आणि म्हणाला, की आई जेव्हा हे सांगत होती तेव्हा माझ्या मनात फक्त तुमचाच विचार आला. मी तिला सांगितले की तुम्ही तंतोतंत असेच वागत असता आणि म्हणूनच मी तुमच्यासारखा बनण्याचा प्रयत्न करत आहे. यावर तुझी आई काय म्हणाली? असे राजेसाहेबनी विचारल्यावर सौमित्रने सांगितले की ती म्हणाली हे बरोबर आहे, आणि आपण नेहमी लोकांमध्ये चांगले शोधले पाहिजे आणि तसे बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

हे आठवल्यावर राजेसाहेबांचे लक्ष प्रेक्षकात समोरच्या रांगेत राधाक्का समवेत बसलेल्या आपल्या सूनबाईंकडे गेले. त्यांना आपल्या मुलाची आठवण आली. त्याच्या मृत्यू नंतरही त्याला आणि त्याच्या प्रिय पत्नीला राज परिवाराने क्षमा केलेली नव्हती. थोड्या वेळापूर्वी टाळयांच्या कडकडाटात ज्याचे कौतुक केले गेले त्या युवराजांचे डोळे थेट त्याच्या आईसारखे दिसतात ही गोष्ट त्यांना स्पष्टपणे जाणवली पण त्यांच्या मनात रेंगाळणारे विचार कठोर आणि कडवट होते की मृदू आणि आनंददायी होते हे समजणे अवघड होते.

समारंभ संपला, राजेसाहेब आणि सौमित्र बाहेर आले. त्यांना पाहण्यासाठी बाहेर लोक वाट पहात उभे होते. गर्दी पांगवण्याचे काम राजेसाहेबांचे अंगरक्षक करत होते. घोडागाडी जवळ एक मध्यम वयाचा शेतकरी घुटमळत होता. त्यांच्या चेहऱ्यावर काळजी, संकोच आणि कृतज्ञता दिसत होती. त्याच्या हातात ताज्या गुलाबाच्या फुलांचा गुच्छ दिसत होता. राजेसाहेबांचे लक्ष त्याच्याकडे गेले. तो हरबा पवार होता. "हरबा आता तब्बेत बरी आहे ना?" राजेसाहेबांनी विचारले. सौमित्र त्याला पाहण्यासाठी पटकन वळला आणि त्याने राजेसाहेबांना विचारले, "ते हरबा पवार आहेत काय?"

"होय," राजेसाहेब कोरड्या स्वरात म्हणाले, "तो आपल्या नवीन मालकाला भेटायला आला आहे."

"होय सरकार," त्यांच्या चेहऱ्यावर दीनवाणे भाव होते, "मला कारभाऱ्यांनी सांगितले की छोट्या युवराजांच्या शिष्टाईमुळे मला मुदतवाढ मिळाली आहे, मला परवानगी मिळाली तर मला त्यांना धन्यवाद द्यायचे आहेत." हरबाला सौमित्रला पाहिल्यावर वाटले की या लहान मुलाच्या शिष्टाईने त्याच्यावर आणि त्याच्या कुटुंबावर आलेले किती मोठे संकट पांगले होते याची त्या उपकारकर्त्याला जरा देखील कल्पना नव्हती आणि त्याच बरोबर त्याला स्वतःच्या स्थानाचे महत्त्व पण माहिती नव्हते. "छोटे सरकार, आपले खूप उपकार झाले, मी आपले आभार मानतो," असे म्हणत हरबाने गुलाबाचा गुच्छ त्या हातात दिला आणि हात जोडले. "छे! मी काहीच केले नाही. मी फक्त आजोबांच्या सांगण्यावरून पत्र लिहिले. तुम्हाला मुदतवाढ तर आजोबांनी दिली आहे. आपल्याला माहितच आहे की ते नेहमीच सर्वांशी सहृदयतेने आणि कनवाळूपणे वागतात. आपल्या पत्नीची प्रकृती आता कशी आहे?" गुलाबाच्या फुलांचा वास घेत सौमित्रने विचारले.

हरबा पवार परत दीनवाणे दिसू लागले, सौमित्रच्या तोंडून, राजेसाहेबांचे वर्णन 'अत्यंत परोपकारी आणि सर्वगुणसंपन्न व्यक्ती' असे ऐकल्यावर हरबा पवार थक्क झाले होते. अडखळत अडखळत ते म्हणाले, "ती होय, ती आता ठिक आहे. तिच्या जीवाला लागलेली काळजी आता मिटली आहे त्यामुळे आता तब्बेतीची गाडी रुळावर येत आहे."

“हे ऐकून मला आनंद झाला. तुमची मुले थंडी तापाने आजारी होती हे समजल्यावर मला आणि माझ्या आजोबांना वाईट वाटले. मुले आजारी असली की आईवडीलांना किती वाईट वाटते याची आजोबांना कल्पना आहे. तुम्हाला माहिती असेल मी त्यांच्या मुलाचा मुलगा आहे,” सौमित्र आपुलकीने बोलत होता. हरबा

पवार आता मात्र पार घाबरून गेले, इतके की त्यांनी राजेसाहेबांकडे न पाहता तिथून सही सलामत बाहेर पडण्याचा विचार केला. संपूर्ण कुंतलपूर जाणत होते की राजेसाहेब वर्षातून दोन वेळाच फक्त आपल्या मुलांच्या समवेत रहात असत: ते म्हणजे गणेशोत्सव आणि दिवाळीच्या वेळी. मुले अगदी लहान असतांना त्यांच्या आजारपणाच्या वेळी देखील ते कुंतलपूर मध्ये उपस्थित नसत, हमखास दौऱ्यावर अथवा शिकारीसाठी बाहेर पडत. त्यांना मुलांचे डॉक्टर, परिचारिका यांच्याशी फारसा संबंध येणे आवडत नसे. हरबाने राजेसाहेबांच्या चेहऱ्याकडे हळूच चोरून पाहिले, त्यांचे डोळे आग ओकत होते.

कडवटपणे हसत राजेसाहेब हरबाला म्हणाले, "त्याचे असे आहे की तुम्हा लोकांचा माझ्या संदर्भात चुकीचा समज झाला आहे. फक्त युवराजच आम्हाला बरोबर समजून घेऊ शकतात. जेव्हा तुम्हाला माझ्या बद्दल खात्रीलायक माहिती हवी असेल तेव्हा युवराजांशी संपर्क साधा. युवराज गाडीमध्ये चढावे." युवराजांनी पटकन उडी मारून गाडीत चढले. घोडागाडी पुढे निघाली, पुढच्या वळणावर गाडी वेळेपर्यंत राजेसाहेब आमच्या चेहऱ्यावर अजून तसेच कडवट हास्य रेंगाळत होते.

# प्रकरण 8

सरत्या दिवसागणिक अनेकवेळा राजेसाहेबांच्या चेहऱ्यावर कडवट हास्य दिसत असे. दरम्यान त्यांच्या नातवाशी त्यांची घसट जसजशी वाढत चालली तसतशी त्या कडवट हास्याची जागा कौतुकभरल्या हास्याने कधी घेतली हे राजेसाहेबांना देखील उमगले नाही. छोट्या सौमित्रचे राजवाड्यात आगमन होण्यापूर्वी, सत्तर वर्षांचे वयोवृद्ध राजेसाहेब एकाकीपणाला आणि संधीवाताच्या जूनाट आजारामुळे खूप कंटाळला होते यात शंकाच नव्हती. पूर्वायुष्यात त्यांनी खूप मौजमजा केली होती, दूरवरचे प्रवास केले, शिकारीसाठी वेगवेगळ्या ठिकाणच्या जंगलात त्यांचा बऱ्याचदा मुक्काम केला पण आता ते सर्व भूतकाळात जमा झाले होते. त्यांच्या भव्य दालनात दुखरे पाय स्टुलावर ठेवून, रागाच्या भरात अगोदरच घाबरून गेलेल्या सेवकांच्या अंगावर खेकसण्याशिवाय दुसरा उद्योग उरला नव्हता. त्यांच्या अशा वागण्यामुळे ते सेवक मंडळींमध्ये अप्रिय बनले होते ही गोष्ट राजेसाहेब ओळखून होते पण उघडपणे ते तसे दाखवून देत नसत. कधी कधी पाहुणे मंडळी काही कामानिमित्त भेटायला येत, त्यांच्याबरोबर उपरोधिक आणि टोचून बोलण्यात राजेसाहेबांना आनंद मिळत असे. जो पर्यंत त्यांची तब्बेत ठणठणीत होते तो पर्यंत ते कुंतलपूर सोडून राज्यात इतर ठिकाणी सतत जात येत असत. दौऱ्यावर जायला

त्यांना फार आवडत असे. जेव्हा तब्बेत बिघडू लागली तेव्हा कुंतलपूर सोडून बाहेर जाणे जमेनासे झाले. वर्तमानपत्रे, पुस्तके, शेरू यांच्या सोबत त्यांनी स्वतःला कोंडून घेतले. पण दिवसरात्र काही ते वाचन करू शकत नव्हते. मग त्यांचा कंटाळा वाढायला लागला. रात्रीची झोप उडाली, दिवस संपता संपेना आणि मग ते जास्त निष्ठूर आणि निर्दयी बनले, त्यांचा चिडखोरपणा वाढत चालला. नेमके याच वेळी सौमित्रचे आगमन राजवाड्यात झाले. सुदैवाने त्याला पाहताच राजेसाहेबांचे मन मोहून गेले. सौमित्रला पाहता क्षणीच त्यांना आपल्या राजघराण्याचा सुप्त अभिमान उफाळून वर आला आणि ते संतुष्ट झाले. सौमित्र दिसायला थोडा जरी कमी देखणा असता, तर राजेसाहेबांनी त्याला पसंत केले नसते, तसे झाले असते तर राजेसाहेबाना आपल्या नातवाच्या अंगचे चांगले गुण समजले नसते. सौमित्रचा देखणेपणा आणि निर्भय वृत्ती त्यांच्या अंगात खेळत असणाऱ्या कुंतलपूरच्या राजघराण्याची देणगी आहे अशी त्यांची धारणा होती. जेव्हा त्यांनी त्यांचे वागणे बोलणे पाहिले आणि ऐकले तेव्हा त्याच्या घरंदाजपणाबद्दल राजेसाहेबांची खात्री पटली. सौमित्रला युवराजपदाच्या लाभांची कल्पना नव्हती आणि तरीही तो राजेसाहेबांना आवडला, त्याच्या सहवासाने ते सुखावले. त्यांनी मुद्दाम हरबा पवारला सौमित्रच्या हस्ते मदत करायला लावली. त्यांना हरबा पवारच्या अडचणींबाबत अनुकंपा नव्हती तर त्यामुळे आपल्या नातवाबद्दल प्रजेमध्ये चांगली प्रतिमा निर्माण होईल या विचाराने त्यांनी तसे मुद्दाम केले होते.

हनुमान जयंतीच्या उत्सवाला लोकांनी सौमित्रची वाहवा केली याचा त्यांना आनंद वाटला आणि अभिमानाने त्यांचा उर भरून आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सौमित्रच्या घोडेस्वारी शिकण्याचा श्रीगणेशा झाला. राजेसाहेब इतके उत्साही आणि आनंदी दिसत होते की ते त्यांचे संधिवाताचे दुखणे पार विसरून गेले. मोतद्दार तपकिरी रंगाचे, सडपातळ असे तट्टू घेऊन बाहेर

आला. लहान डोके, लहान कान, तेजस्वी डोळे, आखूड मान, ठेंगणे पण मजबूत पाय, लांब डौलदार शेपटी अगदी जातीवंत जनावर होते. घोड्याचे नाव धीरज असे होते. उत्तम खरारा केल्याने त्याचे अंग सुर्यप्रकाशात अजून चमकत होते. राजेसाहेब त्यांच्या दालनातील खिडकीतून पाहात होते. सौमित्रला घोडेस्वारी शिकवण्यासाठी करीम यांची नेमणूक केली होती. मध्यमवयीन करीम चाचा राजघराण्यातील, सरदार घराण्यातील मुलांना घोडेस्वारी शिकवत. सौमित्रची शिकवणी सुरु झाली. अजिबात न घाबरता तो करीम चाचा सांगतील तसे करण्याचा प्रयत्न करत होता, हे पाहून राजेसाहेबांना आनंद वाटला. अनेक लहान मुले सुरवातीला घाबरून जातात हे त्यांना माहीत होते, आपला नातू घाबरून गेला नाही याचे त्यांना समाधान झाले.

घोड्यावर चढल्यावर सौमित्रला अतिशय आनंद झाला. यापूर्वी तो कधीही घोड्यावर बसला नव्हता त्यामुळे तो खूप उत्साहात होता. करीम चाचांनी त्याच्या घोड्यांचा लगाम धरून खिडकीसमोरच्या मैदानावर फेऱ्या मारायला सुरुवात केली.

नंतर तबेल्यात घोडा बांधायला गेल्यावर करीम चाचा इतर नोकर मंडळींना कौतुकाने हसत सांगत होते, "युवराज तसे बरेच तयारीचे आहेत. त्यांना घोड्यावर चढायला काहीच अवघड गेले नाही. पण घोड्यावर ताठ बसण्याची अजून सवय व्हायला हवी. मला युवराजांनी विचारले, 'करीम चाचा मी सर्कशीत बसतात तसा ताठ बसलो आहे ना? बसलो नसेल तर मला सांगा,' मी म्हणालो आपण अगदी ताठ बसला आहात."

खरे पाहायला गेले तर ताठ बसून घोडा चालवणे सौमित्रला अजून जमायचे होते. खिडकीजवळ गेल्यावर त्याने राजेसाहेबांना विचारले, "मी घोडा दुडक्या चालीने चालवू शकतो काय? माझ्या माहितीतील एक मुलगा घोडा पळवत असे."

"तसे करायला तुला जमेल असे वाटते काय?" राजेसाहेबांनी विचारले. "मला प्रयत्न करायला आवडेल," सौमित्रने उत्तर दिले. राजेसाहेबांनी करीमचाचांना

खूण करून त्यांना घोडा घेऊन येण्यासाठी सांगितले. करीम चाचा स्वतः दुसऱ्या घोड्यावर बसले आणि सौमित्रच्या घोड्यांच्या शेजारी आपला घोडा घेऊन गेले. त्याच्या घोड्यांचा लगाम आपल्या हातात धरला, त्यांना दोन्ही घोड्यांवर नियंत्रण ठेवायला लागणार होते. "आता," राजेसाहेब म्हणाले, "त्याला त्याच्या इच्छेनुसार फिरू दे."

काही मिनिटांतच छोट्या घोडेस्वाराला कल्पना आली की दुडक्या चालीने घोडा पळवणे ही इतकी सोपी गोष्ट नाही. घोडा चालवताना सौमित्रला बरेच धक्के जाणवत होते. त्याने करीम चाचांना विचारले, "मला खूप धक्के बसत आहेत, तुम्हाला पण जाणवतात काय?"

"नाही छोटे सरकार, तुम्हाला पण थोडा सराव झाला की धक्के बसणार नाहीत. रिकिबीवर पाय रोवून किंचित वर उठायला हवे," करीम चाचा म्हणाले. "अं ! मी दरवेळी उठत आहे," सौमित्र म्हणाला.

खरोखरच तो दर वेळी उठत होता आणि खाली आदळत होता, हादरत होता, वर उसळून आपटत होता. सौमित्रचा श्वास फुलला होता, चेहरा लालबुंद झाला होता, तरी सर्व शक्ती पणाला लावून शक्य तेव्हढे ताठ बसण्याची त्याची पराकाष्ठा चालली होती. हे सर्व राजेसाहेब खिडकीतून पाहात होते. काही वेळ झाडांमुळे ते दोघे राजेसाहेबांच्या नजरेआड झाले. थोड्या वेळात ते दोघे परत आले, सौमित्रच्या डोक्यावर टोपी नव्हती, त्याचा चेहरा टोमॅटो सारखा लालबुंद झाला होता, ओठ घट्ट आवळून धरले होते, तरीही तो शूरपणे घोड्याला दौडवत होता. "एक मिनिट थांबा!" त्याचे आजोबा म्हणाले. "तुझी टोपी कुठे आहे?"

"सरकार वाटेत पडली. मला उचलण्यासाठी थांबायला पण दिले नाही," करीम चाचा म्हणाले. "युवराज घाबरले तर नाहीत ना?" राजेसाहेबांनी चौकशी

केली. "छे! अजिबात नाही, मी कितीतरी लहान मुलांना घोडेस्वारी शिकवली आहे. पण युवराजांच्या सारखा जिद्दी मुलगा या अगोदर कुठे पाहिला नाही."

"थकलास का? खाली उतरणार?" राजेसाहेबांनी सौमित्रला विचारले.

"मला वाटले त्यापेक्षा जास्त धक्के बसत होते," सौमित्रने प्रांजळपणे कबुली दिली. "थोडे थकायला झाले पण मी इतक्यात खाली उतरणार नाही. मला अजून एकदा रपेट मारायची आहे. थोडे थांबून टोपी आणायला परत जाईन," युवराज धापा टाकत म्हणाले. राजेसाहेबांना संतुष्ट करण्यासाठी नेमके काय करावे लागेल हे कोणी सौमित्रला शिकवू शकले नसते. सौमित्रच्या अंगभूत गुणांमुळे ते काम सहज झाले होते. सौमित्र, करीम चाचा बरोबर परत टोपी आणण्यासाठी निघाला आणि राजेसाहेबांच्या चेहऱ्यावर समाधानाचे मंद हासू दिसू लागले. राजेसाहेब त्यांच्या परत येण्याची वाट पाहात बसून राहिले. यावेळी ते लौकर परत आले. सौमित्रची टोपी करीम चाचानी पकडली होती. सौमित्रचे गाल पूर्वीपेक्षा लाल झाले होते, आणि केस वाऱ्यावर उडत होते, त्याच्या आनंदी चेहऱ्यावरून नजर हटवणे राजेसाहेबांना अवघड वाटत होते.

धापा टाकत सौमित्र म्हणाला, "मी पण जोरात घोडा पळवला, अगदी मुंबईतल्या मुलगा पळवत असे तेव्हढा चांगला नाही, पण मी घोड्यावरून दौड केली आणि मगच थांबलो." औत्या दिवसापासून सौमित्र, करीम चाचा आणि त्याचा घोडा धीरज यांची घट्ट मैत्री झाली. त्यांनी घोडेस्वारी केली नाही असा नाही असा एकही दिवस गेला नाही.

मोठ्या रस्त्यावर, गावाबाहेरच्या माळरानावर, गावातील लहान मोठ्या गल्ल्यामधून ते दोघे नेहमीच घोडेस्वारी करताना दिसत असत. घोड्यांच्या टापांचा आवाज दूरून ऐकल्यावर, रुबाबदार तपकिरी घोड्यावर ताठ बसून घोडेस्वारी करणाऱ्या सौमित्रला पाहण्यासाठी कुंतलपूर मधील लहान मुले दाराबाहेर धावत येत.

सौमित्र हसून हात हलवत त्यांना प्रतिसाद देई, तर कधी थांबून चौकशी करत असे. एकदा करीम चाचा घोडेस्वारी करून परत आल्यावर राजवाड्यातील नोकर मंडळींना सांगत होते की कुंतलपूर जवळच्या खेड्यातील शाळेजवळ युवराजांनी एका अपंग मुलासाठी घोडा थांबवला, आणि त्याला आपल्या लहान घोड्यावरून घरी पोहोचवण्याचा आग्रह धरला.

"त्यांची माणुसकी पाहून मी धन्य झालो," करीम चाचा सांगत होते, "त्यांनी मला खाली उतरायलाच दिले नाही. माझ्या मोठ्या घोड्यावर त्या मुलाला चढायला जमले नसते. युवराज म्हणाले की 'तो मुलगा लंगडत आहे, मी नाही. मला त्याच्याशी बोलायचे आहे.' त्या मुलाला घोड्यावर चढायला मदत करून, स्वतः युवराज खिशात हात घालून, त्या मुलाबरोबर गप्पा मारत घोडा बरोबर सावकाश चालत राहिले. जेव्हा आम्ही त्या मुलाच्या झोपडी जवळ आलो तेव्हा त्याची आई बाहेर आली. युवराजांनी डोक्यावरची टोपी हातात घेतली आणि मान लववली, 'मावशी, मी तुमच्या मुलाला घरी घेवून आलो. त्याला चालतांना त्रास होतो फक्त काठी पुरेशी नाही मी माझ्या आजोबांना सांगून त्याच्यासाठी दोन कुबड्या देण्याची व्यवस्था करेन.' त्या मुलाच्या आईला एकदम गहिवरून आले. माझ्या पण डोळयात पाणी आले."

जेव्हा राजेसाहेबांनी ही गोष्ट ऐकली तेव्हा ते रागावतील असे करीम चाचांना वाटत होते पण तसे काही घडले नाही उलट राजेसाहेब हसले. त्यांनी सौमित्रला जवळ बोलावून पुन्हा त्याच्याकडून एकदा सर्व गोष्ट ऐकली. त्यानंतर काही दिवसानंतर त्या अपंग मुलाच्या झोपडीसमोर राजेशाही घोडागाडी थांबले आणि त्यामधून सौमित्र उडी मारून बाहेर आला. त्याच्या हातामध्ये वजनाने हलकी पण मजबूत असा नवीन कोऱ्या कुबडीचा जोड होता. तो जोड घेऊन सौमित्र दारापाशी गेला आणि 'मावशी' म्हणून हाक मारली. त्या मुलाची आई बाहेर आली. सौमित्र

तिच्या हातात कुबडीचा जोड देत म्हणाला, "आपल्या मुलासाठी माझ्या आजोबांनी दिले आहे. त्याला लौकर बरे वाटेल अशी आशा आहे." ती स्त्री एकदम भारावून गेली, तिला काय प्रथम बोलावे हेच सुचेना, "देव तुझे कल्याण करो!" असे म्हणत तिने त्याच्या डोक्यावरुन हात फिरवला.

परत आल्यावर सौमित्रने घडलेली गोष्ट राजेसाहेबांना सांगितली आणि म्हणाला, "तुम्ही मला तसे सांगितले नव्हते पण मला वाटले तुम्ही मला सांगायला विसरून गेला असाल, खरे आहे ना?" सौमित्रने विचारले. राजेसाहेब नुसतेच हसले पण सौमित्रचा समज खोटा आहे असे काही बोलले नाही. दिवसागणिक त्या दोघांमधील संबंध जास्तीत जास्त घनिष्ठ होत गेले आणि सौमित्रचा राजेसाहेबांच्या दयाळूपणावर व सदाचारी वृत्तीवरचा विश्र्वास पक्का होत गेला. त्याच्यासाठी त्याचे आजोबा प्रेमळ आणि उदार होते याबद्दल काहीच शंका नव्हती. त्याच्या तोंडातून शब्द फुटायचा अवकाश त्याची इच्छा पूर्ण होत होती. तरतऱ्हेच्या भेटवस्तू आणि सुखसुविधा पाहून आपल्या संपन्नतेने तो चक्रावून जात होता. त्याला हवे ते मिळत होते, हवे तिथे तो जाऊ शकत होता, एखादा लहान मुलगा इतक्या लाडाने पार बिघडून गेला असता पण सौमित्र त्याच्या आईच्या सहवासात जून्या वाड्यात बराच वेळ रहात असे. मायलेक खूप वेळ गप्पा मारत. त्याची आई त्याला प्रेमाने जवळ घेई, साध्या सरळ शब्दात त्याच्या शंका दूर करत असे. त्यामुळे राजवाड्यात परत आल्यावर सुध्दा त्याच्या मनात आईने सांगितलेले शुद्ध, निर्मळ विचार कायम स्मरणात रहात असत.

एक गोष्ट मात्र त्याला नेहमी गोंधळात टाकत होती, त्या गोष्टीवर त्याने खूप विचार पण केला होता. सौमित्र असा काही विचार करत असेल हे त्याच्या आईच्या अथवा राजेसाहेबांच्या पण लक्षात आले नव्हते. ती गोष्ट अशी होती की आजपर्यंत राजेसाहेब आणि त्याच्या आईची समोरासमोर कधीच भेट घडली नव्हती, या मागे

काय कारण असावे, या प्रश्नांचे उत्तर त्याला खूप विचार करूनही मिळाले नव्हते. जून्या वाड्यात सौमित्रला घोडागाडीतून सोडतांना राजेसाहेब कधीच खाली उतरले नव्हते. एक दोन प्रसंगी राजेसाहेब आणि सौमित्र मारुती मंदिरात गेले असता, अपर्णाताईं तिथे भेटल्या होत्या, त्यावेळी राजेसाहेबांनी सौमित्रला एकट्याला त्याच्या आईशी भेटायला दिले होते. तरी पण राजवाड्यातून दररोज, फळे, फुले, मेवा मिठाई जून्या वाड्यात पाठवली जात असे हे सौमित्रने पाहिले होते. मात्र राजेसाहेबांच्या एक कृतीने सौमित्रचे मन जिंकून घेतले. मंदिरातून परत जाताना सौमित्र राजेसाहेबांच्या बरोबर घोडागाडीतून राजवाड्यात गेला. अपर्णाताईं एकट्याच चालत जून्या वाड्याकडे गेल्याचे राजेसाहेबांच्या लक्षात आले. त्यानंतरच्या आठवड्यात सौमित्र आईला भेटायला जाण्यासाठी तयार होऊन राजवाड्याच्या प्रवेश दारापाशी आला तेव्हा तिथे नेहमीची घोडागाडी नव्हती, त्याऐवजी एक टुमदार बग्गी वाट पहात उभी होती. समोरच्या बाजूला एक करड्या रंगाचा घोडा जुंपला होता आणि गाडीवान पण नवीन दिसत होता. सौमित्र औत्सुक्याने बग्गी पाहात होता तेव्हा अचानक राजेसाहेब पुढे येऊन म्हणाले, "ही तुझ्या आईसाठी तुझ्याकडून भेट आहे. तिला गावात चालत जाण्याची गरज नाही. बग्गी चालवणारा माणूस कायम जून्या वाड्यावर तैनात करण्यात आला आहे, तो सर्व काळजी घेईल. ही तुमच्याकडून भेट आहे." सौमित्र आनंदला पण त्याने आपला आनंद बग्गीतून जून्या वाड्याकडे पोहोचेपर्यंत स्वतःपाशी ठेवला होता. अपर्णाताईं बागेत गुलाबाची फुले तोडत होत्या. बग्गी वाड्यापाशी थांबली. सौमित्रने खाली उडी मारली आणि तो सुसाट अपर्णाताईंकडे पळाला.  "आई!" तो ओरडला, "हे पाहिलेस काय? ही बग्गी तुझ्यासाठी आहे. तुझा विश्वास बसतोय काय? आजोबा म्हणाले की ही माझ्याकडून तुला भेट आहे. आता तुला बाहेर जाताना ही तुझी गाडी वापरता येईल."

a

तो इतका खूश होता की अपर्णाताईंना काय बोलावे तेच कळेना. ती भेटवस्तू त्यांना शत्रू मानणाऱ्या व्यक्तीने पाठवली असली तरी ती स्वीकारण्यास नकार देऊन सौमित्रच्या आनंदावर त्या विरजण घालून शकत नव्हत्या. राजवाड्यातून नेहमी येणाऱ्या भेटवस्तूंप्रमाणे त्यांनी ही भेटवस्तू स्वीकारली आणि त्या सौमित्र बरोबर बग्गीमधून बाहेर फिरायला जायला लागल्या. वाटेत सौमित्र आपल्या आजोबांच्या प्रेमळपणाच्या आणि चांगुलपणाच्या गोष्टी सांगत असे. काही वेळा त्या गोष्टी ऐकताना सौमित्रचा भाबडेपणा पाहून अपर्णाताईंना हसू येई मग त्या सौमित्रला जवळ घेऊन त्याचा पापा घेत, त्यांच्या एकाकी वृध्द सासरेबुवांमध्ये सौमित्रला फक्त चांगलेपणा दिसत आहे याचा त्यांना आनंद वाटे.

त्यानंतर दुसऱ्याच दिवशी, सौमित्रने बापू शेठ यांना एक लांबलचक पत्र लिहिले आणि त्याने ते आजोबांकडे तपासणीसाठी आणले. सौमित्र आजोबांना म्हणाला, "माझ्या शुद्ध लेखनाच्या चूका झाल्या असतील, तुम्ही तपासून द्याल काय?" सौमित्रने लिहिले होते,

प्रिय बापू शेठ यांना सप्रेम नमस्कार,

तुम्ही कसे आहात? आम्ही सगळे इकडे खुशाल आहोत. तुम्ही म्हणत होतात की राजे मंडळी प्रजेवर अन्याय आणि अत्याचार करतात पण माझे आजोबा तसे अजिबात नाहीत उलट ते अगदी दयाळू आणि परोपकारी वृत्तीचे राजे आहेत. प्रजेच्या अडचणी जाणून घेऊन ते मदत करण्यासाठी नेहमी तयार असतात. त्यांना संधिवाताचा त्रास आहे. त्याचा पाय फार दुखतो तरी पण ते धैर्याने सहन करतात. माझे त्यांच्यावर खूप प्रेम आहे, अशा दयाळू व्यक्तीवर कोणीही प्रेम करेल. तुमची आणि राजेसाहेबांची ओळख व्हायला हवी असे मला वाटते. त्यांनी खूप मोठी मोठी पुस्तके वाचली आहेत. त्यांना जगातील सर्व काही माहित आहे आपण त्यांना कोणताही प्रश्न विचारू शकता. त्यांनी मला घोडेस्वारी शिकण्यासाठी लहान घोडा

a

दिला आहे शिवाय बाहेर जाण्यासाठी घोडागाडी पण आहे. आईसाठी एक सुंदर बग्गी दिली आहे. माझ्यासाठी तीन मोठ्या खोल्या आहेत, त्यात सर्व प्रकारची खेळणी, पुस्तके आहेत. कुंतलपूरचा राजवाडा खूप मोठा आहे. नवख्या माणसाला तिथे हरवायला होते. इथे खूप मोठे उद्यान आहे. त्यात मध्ये हरणे, मोर बागडताना दिसतात. एक मोठे तळे आहे. दोन लहान तलाव आहेत त्यात कारंज्यातून पाणी उडत असते. करीम चाचा मला घोडेस्वारी शिकवतात, मी आता चांगली घोडेस्वारी करतो. करीम चाचा सांगत होते की राजवाड्याच्या तळ मजल्यावर अंधार कोठडी आहे. पुर्वी तिथे गुन्हेगारांना शिक्षा म्हणून कैद करून ठेवले जात असे. माझे आजोबा खूप श्रीमंत आहेत परंतु ते गर्विष्ठ किंवा दुष्ट नाहीत. मला नेहमीच त्याच्याबरोबर राहायला आवडते. त्यांची प्रजा त्यांना नेहमी दुवा देते. त्यांनी त्यांच्या एका कुळाला पैशाची अडचण होती तरी त्याला शेतावर आणि घरात राहायला दिले शिवाय त्याच्या आजारी मुलांना औषधपाणी आणि इतर खर्चासाठी पैसे पण दिले. माझी आई, उद्यानाच्या बाहेरच्या जून्या वाड्यात रहाते. माझी आई राजवाड्यात राहायला आली असती तर मला फार आनंद झाला असता, तरी मी तिला नेहमी भेटायला जातो त्यामुळे ती नेहमी माझ्या सोबत असल्यासारखे वाटते. माझे आजोबांवर खूप प्रेम आहे.

मला तुम्हाला भेटायला आवडेल. माझे पत्र मिळाल्यावर उत्तर पाठवा, वाट पाहत आहे,

आपला जूना मित्र,
सौमित्र सरदेशमुख

a

ता.क. कुंतलपूरचे राजे-माझे आजोबा खूप चांगले राजे आहेत. त्यांना पाहिल्यावर मला आपली आठवण येते.

पत्र वाचून झाल्यावर राजेसाहेबांनी विचारले, "तुला आईची खूप आठवण येते का?"

"होय," सौमित्र म्हणाला, "मला तिची आठवण येते." सौमित्र त्यांच्यापुढे उभा राहिला आणि त्यांच्या गुडघ्यावर हात ठेवत त्यांच्याकडे बघून म्हणाला, "तुम्हाला तिची आठवण येत नाही ना?"

"मी तिला ओळखत नाही, "राजेसाहेब तुटकपणे म्हणाले. "मला ते माहित आहे," सौमित्र म्हणाला, "मला याच गोष्टीचे आश्चर्य वाटते. आईने मला सांगितले की तुम्हाला कोणतेही प्रश्न विचारू नकोस, आणि मी प्रश्न विचारणार देखील नाही, पण काही वेळा माझ्या मनात याविषयी विचार येतात आणि मी अधिकच गोंधळून जातो पण मी तुम्हाला किंवा आईला याविषयी प्रश्न विचारणार नाही. जेव्हा मला तिची खूप आठवण येते तेव्हा मी माझ्या खोलीतल्या खिडकीतून बाहेर पाहतो, रोज दिवेलागणीच्या वेळी माझ्यासाठी तिच्या खिडकीत ठेवलेल्या दिव्याचा उजेड मला दिसतो. त्याचा काय अर्थ आहे हे मला माहीत आहे."

"काय अर्थ आहे?" राजेसाहेबांनी विचारले.

" 'माझ्या लाडक्या तुला रात्री शांत झोप लागू दे. तुला वाईट साईट स्वप्ने पडू नयेत. देव तुझे कल्याण करो!' रोज रात्री झोपण्यापूर्वी मला थोपटत ती हेच म्हणत असे.

सकाळी उठल्यावर सर्वात प्रथम आपल्या तळहाताचे दर्शन घेऊन,

‘कराग्रे वसते लक्ष्मी: करमध्ये सरस्वती।

a

कर मूले स्थितो ब्रह्मा प्रभाते कर दर्शनम्’

हा श्र्लोक म्हणायला सांगत असे.

आणि जमिनीवर पाय ठेवण्यापूर्वी

'समुद्र वसने देवी पर्वत स्तन मंडिते। विष्णु पत्नी नमस्तुभ्यं पाद स्पर्श क्षमश्वमेव'

हा श्र्लोक आठवणीने म्हणायला लावत असे.

हा माझा परिपाठ मी इथे सुरू ठेवला आहे, म्हणून मला रात्री शांत झोप लागते आणि दिवसभर उत्साही रहायला होते,’’ सौमित्र मनापासून बोलत होता. "अगदी, बरोबर आहे," सौमित्रकडे एकटक पाहात राजेसाहेब कोरड्या स्वरात म्हणाले.

ते नेमका काय विचार करत असावेत याचे सौमित्रला कोडे पडले होते.

# प्रकरण 9

खरे सांगायचे झाले तर कुंतलपूरचे राजेसाहेब अनेक नवनवीन गोष्टींचा विचार करायला लागले होते, जो आजवर त्यांच्या मनाला शिवला देखील नव्हता आणि या मागची गंमत अशी होती की ते विचार, कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यांच्या नातवाशी जोडले गेलेले होते. राजेसाहेबांना त्यांच्या नातवाचा अत्यंत अभिमान वाटत होता आणि त्यांच्या अभिमानाला पूरक असेच सौमित्रचे वागणे होते. त्यांच्या या अभिमानातून त्यांना जीवनाची नव्याने आवड निर्माण होऊ लागली आणि त्यांना आपला वारसदार जगाला दाखवताना धन्य वाटू लागले. स्वतःच्या मुलांच्या बाबतीत झालेली त्यांची निराशा जगजाहीर होती; त्यामुळे छोट्या युवराजांच्या लाघवी स्वभावामुळे नव्याने पल्लवित झालेली आशा त्यांना आपली विजय पताका म्हणून मिरवायची होती. त्यांचा नातू युवराजपदाच्या सामर्थ्य आणि वैभव याविषयी अनभिज्ञ होता, त्याची त्याला जाणीव व्हावी आणि इतरांनाही कळावी ही राजेसाहेबांची इच्छा होती. सौमित्रचे वय लहान असल्यामुळे राजेसाहेबांना पुढे जाऊन तो राज्यकारभाराची जबाबदारी कशी काय निभावून नेईल याची त्यांना काळजी वाटत होती, त्यासाठी त्याला योग्य मार्गदर्शनाची गरज होती. खुद्द राजेसाहेबांना स्वतःच्या भूतकाळाची खंत वाटत होती, त्यांच्या भूतकाळातील कटू सत्य जर सौमित्रला समजले असते तर त्याच्या निष्पाप मनाला धक्का बसला असता. गेली अनेक वर्षे त्याच्या आजोबांची 'कुंतलपूरचे दुष्ट राजेसाहेब' अशी असलेली ओळख जर त्याच्या कानावर पडली असती तर त्याचा सुंदर, निरागस

a

चेहरा कसा काळवंडून गेला असता याची त्यांना कल्पना पण करवत नव्हती. सौमित्रला त्यांचा भूतकाळ समजावा असे त्यांना वाटत नव्हते. त्यांचे चित्त या सर्व गोष्टींमध्ये गुंतून गेले तसा त्यांना त्यांच्या संधिवाताचा काहीसा विसर पडला आणि थोड्या दिवसांनी त्यांच्या डॉक्टरांना आश्चर्य वाटले की राजेसाहेबांची तब्येत त्यांच्या अपेक्षेपेक्षा लौकर बरी होत आहे. आता राजेसाहेबांचा वेळ नेहमीप्रमाणे संथ आणि कंटाळवाणा न जाता, इतका आनंदात आणि उत्साहात जात होता की त्यांना त्यांच्या संधिवाताच्या जूनाट वेदनेकडे आणि लहान सहान शारीरिक तक्रारींकडे लक्ष द्यायला वेळच शिल्लक नसे.

एके दिवशी सकाळी सौमित्र, करीम चाचा ऐवजी दुसऱ्या एका साथीदारासोबत घोड्यावरून रपेट मारताना पाहून कुंतलपूरचे लोक आश्र्चर्यचकीत झाले. राखाडी रंगाच्या घोड्यावर बसलेला उंच, धिप्पाड, वयोवृद्ध साथीदार म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून खुद्द कुंतलपूरचे राजेसाहेब होते. खरे तर ही कल्पना सौमित्रने सुचवली होती. स्वतः लहान घोड्यावर चढताना तो खंतावलेल्या स्वरात आपल्या आजोबांना म्हणाला, "तुम्ही सुध्दा माझ्या बरोबर रपेट मारायला यावे, असे मला वाटते. मी घोडेस्वारी करायला गेल्यावर आपण एव्हढ्या मोठ्या वाड्यात एकटेच असता. तुम्हाला घोडेस्वारी करायला नक्कीच जमेल."

काही वेळात तबेल्यात एकच खळबळ उडाली, राजेसाहेबांचा खास घोडा 'पवन', खोगीर वगैरे घालून घोडेस्वारी साठी सज्ज केला गेला. त्यानंतर जवळपास रोजच राजेसाहेबांचा 'पवन' आणि सौमित्रचा 'धीरज' सकाळी रपेटीसाठी तयार केले जाऊ लागले. छोट्या युवराजांच्या तपकिरी लहान तट्टू सोबत उंच तगड्या राखाडी रंगाच्या घोड्यावर, उग्र चेहऱ्याचे, उंच धिप्पाड, वयोवृद्ध राजेसाहेब घोडदौडीला निघालेले पाहण्याची लोकांना सवय झाली. लहान मोठ्या रस्त्यांवरून, मैदानावर, गावाबाहेरच्या माळरानावर दोन्ही घोडेस्वार आनंदाने रपेट मारत असत. त्या दोघांची

a

मैत्री अजून घनिष्ठ झाली. हळूहळू राजेसाहेबांनी अपर्णाताई बद्दल, मुंबईच्या त्यांच्या आयुष्याबद्दल बऱ्याच गोष्टी सौमित्रच्या तोंडून ऐकल्या. सौमित्र त्यांच्या बरोबरीने आपला घोडा दौडत आनंदाने गप्पा मारत असे आणि राजेसाहेब शांतपणे सौमित्रचा आनंदाने चमकणारा चेहरा पाहात शांतपणे ऐकत असत. काहीवेळा राजेसाहेब सौमित्रला त्याचा घोडा खूप जोराने पळवायला सांगत आणि सौमित्र जराही न घाबरता ताठ मानेने घोडा पळवत पुढे जात असे. त्याला पाहतांना राजेसाहेबांच्या डोळयात अभिमान आणि आनंद तरळत असे. परत येताना सौमित्र आनंदाने खिदळत ओरडून आपली टोपी हातात घेऊन आजोबांच्या दिशेने हालवत असे. तेव्हा त्याला वाटायचे की तो आणि त्याचे आजोबा खरोखरच खूप चांगले मित्र आहेत.

आपल्या मुलाच्या पत्नीला कुंतलपूरच्या गरीब वस्तीतील लोक खूप चांगले ओळखतात हे राजेसाहेबांना समजून आले. ती नुसते निष्क्रिय जीवन जगत नाही या गोष्टीचे त्यांना समाधान वाटले. कोणत्याही घरात आजारपण किंवा दु:ख किंवा गरिबी आली की, छोटी बग्गी अनेकदा दारात उभी असायची.

सौमित्र आपल्या आजोबांना सांगत होता की लोक त्याच्या आईला पाहिल्यावर 'देव तुमचे कल्याण करो' अशी प्रार्थना करतात. लहान मुले तिला बघून आनंदीत होता. अनेक स्त्रिया जून्या वाड्यावर दुपारी दोन ते चार या वेळात शिवणकाम शिकायला जातात. राधाक्कांना मदतीला घेऊन आई सकाळी दोन तास बालवाडी चालवते. मुंबई प्रमाणे फुलांचे गजरे आणि हार करायला तिने वस्ती वरच्या मुलींना शिकवायला सुरुवात केली आहे.

सौमित्रच्या आईचे खानदानी सौंदर्य पाहून त्या सामान्य कुटुंबातून आल्या आहेत यावर कुणाचा विश्वास बसला नसता. त्यांची लोकप्रियता आणि त्यांचे राज घराण्यात शोभण्यासारखे व्यक्तीमत्व या दोन्ही गोष्टींमुळे राजेसाहेब फारसे नाखुश

नव्हते. पण आपला मुलगा तिच्यामुळे आपल्या कुटुंबाला दुरावला ही गोष्ट ते विसरू शकत नव्हते. परंतु त्यांचे सर्वात मोठे शल्य म्हणजे खुद्द सौमित्रचे आपल्या आईवर जीवापाड प्रेम होते म्हणूनच तिला पाहिल्यावर त्यांच्या कठोर हृदयात ईर्षा जागृत होत असे. त्यांना आपल्या आणि आपल्या नातवाच्या प्रेमामध्ये कोणी प्रतिस्पर्धी असायला नको होता पण प्रत्यक्षात त्याची आई पहिल्या स्थानावर होती आणि दुय्यम स्थान राजेसाहेबांना कधीही मान्य होणे शक्य नव्हते.

एके दिवशी सकाळी सौमित्र आणि राजेसाहेब घोड्यावरून एका उंच टेकाडावर गेले. राजेसाहेब, हातातील चाबकाने समोरचा विस्तीर्ण भूप्रदेश सौमित्रला दाखवत म्हणाले, "तुला माहित आहे काय ही सगळी जमीन माझ्या मालकीची आहे?"

"काय? एव्हढी सगळी जमीन, एका माणसाच्या मालकीची, किती छान!"

"एखाद्या दिवशी ही सर्व जमिन शिवाय आणखी बरेच काही तुझ्याच मालकीचे असेल, हे तुला माहित आहे काय?"

"माझ्या?" सौमित्र आश्चर्यचकित आवाजात उद्गारला. "पण कधी?"

"माझ्या मृत्यूनंतर," त्याच्या आजोबांनी उत्तर दिले.

"तर मग मला काही नको आहे," सौमित्र म्हणाला; "तुम्ही नेहमी जगावे अशी माझी इच्छा आहे."

"तुझी इच्छा चांगली आहे," राजेसाहेब कोरडेपणाने म्हणाले; "तथापि, एखाद्या दिवशी हे सर्व तुझे असेल - तू कुंतलपूरचा राजा होशील." छोटे युवराज काही क्षण त्यांच्या घोड्यावर अगदी शांत बसले. समोर पसरलेले विस्तीर्ण खोरे, हिरवीगार शेते, वेळूची बने, लहान लहान झोपड्या, सुंदर गाव आणि राजवाड्याचे राखाडी बुरुज आणि मोठे मोठे उंच वाढलेले वृक्ष- या समृद्ध वारश्याकडे सौमित्रने स्थितप्रज्ञ नजरेने पाहिले आणि मग एक विचित्र उसासा टाकला. "तू काय विचार

a

करत आहेस?" राजेसाहेबांनी सौमित्रला विचारले. "या साऱ्या राजवैभवाचा भावी अधिपती म्हणून मी खूप लहान आहे. यासंदर्भात आईचे शब्द आठवत आहेत."

"तुझ्या आईने नेमके काय सांगितले?"

"आई म्हणते, 'श्रीमंत बनणे ही कोणालाही सहजसाध्य गोष्ट नाही आणि जर कोणी व्यक्ती अशी ऐश्वर्यसंपन्न असेल तर तिने ही गोष्ट विसरून चालणार नाही की प्रत्येकजण इतका भाग्यवान असू शकत नाही त्यामुळे अशा व्यक्तींने इतरांच्या भल्यासाठी निश्चितच प्रयत्न केले पाहिजेत,' मी तिला आपण किती इतरांना मदत करता याविषयी सांगितले तेव्हा ती म्हणाली, 'राजेसाहेबांकडे सामर्थ्य आहे, अधिकार आहे, संसाधने आहेत आणि त्यासोबत प्रजेच्या हिताच्या गोष्टी करण्याची इच्छा असेल तर ती एक खूप चांगली गोष्ट आहे. राजाने फक्त स्वतःच्या सुखसोयी आणि आनंदाचा विचार करून चालणार नाही, त्याच्यासाठी राबणाऱ्या लोकांच्या सुखदुःखाची काळजी घेणे ही त्याची जबाबदारी आहे. कारण असे अनेक लोक आहेत आणि ते जर दु:खी असतील तर त्यांचा अधिपती सुखात राहू शकत नाही.' समोरच्या झोपड्या पाहिल्यावर मी विचार करत आहे की मी राजा झाल्यावर अशा रंजल्या गांजल्या लोकांचा शोध कसा घेऊ? त्यांच्या पर्यंत कसा पोहचू? तुम्ही कशी त्यांची माहिती मिळवता?"

राजेसाहेबांना त्यांच्या शेत जमिनींवर राबणाऱ्या शेतकऱ्यांनी कुणी खंडाची रक्कम वेळेवर भरली आणि कुणी नाही या गोष्टीची माहिती असायची आणि वेळेवर भरणा न केलेल्या कुळाची राहत्या जागेतून आणि शेतातून हकालपट्टी केली जायची. प्रजेला शेतसारा, विविध कर वेळेवर भरावा लागत असे मात्र प्रजेच्या साठी कल्याणकारी योजना राबविण्यात कुंतलपूर संस्थान कधीच विशेष प्रयत्नशील नव्हते. सर्व काही रामभरोसे अशी अवस्था होती. त्यामुळे सौमित्रच्या प्रश्नाचे उत्तर देणे राजेसाहेबांच्यासाठी अवघड होते.

a

"मला खाजगीचे कारभारी नरसिंह कुलकर्णी आणि इतर तलाठी, मामलेदार अशा सरकारी नोकरांकडून माहिती मिळते" राजेसाहेबांनी मिशीला पीळ देत सौमित्रला उत्तर दिले. पुढे ते अस्वस्थपणे सौमित्रला म्हणाले, "खूप वेळ झाला आपण परत निघूया. तू जेव्हा कुंतलपूरचा राजा होशील तेव्हा माझ्यापेक्षा चांगला राजा बनण्याचा प्रयत्न कर.”

परतीच्या वाटेवर राजसाहेब खूप शांत होते. त्यांनी आयुष्यभर स्वतः व्यतिरिक्त इतर कुणावरही प्रेम केले नव्हते पण त्यांना आता जाणवले की त्यांचा जीव आपल्या छोट्या नातवावर जडला आहे, यात काही शंकाच नव्हती आणि याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. सुरवातीला सौमित्रचे देखणेपणा आणि शूरपणा त्याचा त्यांना अभिमान वाटला होता पण आताच्या त्यांना जाणवणाऱ्या भावनेत अभिमाना व्यतिरिक्त काही तरी आगळीवेगळी भावना होती. राजेसाहेब स्वतःवर कोरडेपणाने हसले, सौमित्रचा सहवास त्यांना हवाहवासा वाटे, त्याचे निरागस आणि उत्साहाने भरलेले बोलणे ऐकत रहावेसे वाटे, आपल्या तो जसा प्रिय आहे तसे आपण त्याला प्रिय व्हावे, त्याच्या मनात कायम आपल्याबद्दल चांगल्या भावना असाव्यात अशी त्यांची इच्छा होती.

"आता म्हातारपणी एकुलत्या एका नातवाचा विचार करण्याखेरीज मला दुसरे काही काम नाही," असे ते स्वतःशी जरी म्हणत असले तरी ती गोष्ट पूर्णपणे खरी नाही हे तेही ओळखून होते. खरी गोष्ट अशी होती: सौमित्रच्या अंत:करणात दया बुध्दी वसत होती, त्याच्या वागण्याबोलण्यात प्रामाणिकपणा होता, आडल्यानडल्याना मदत करायची इच्छा होती, त्याच्या मनात सर्वांबद्दल प्रेम, सद्भावना आणि विश्र्वास होता. नेमक्या ह्याच गुणांचा राजेसाहेबांकडे अभाव होता आणि सौमित्रच्या नेमक्या याच गुणांचे राजेसाहेबांना आकर्षण वाटत होते.

a

यानंतर जेमतेम एक आठवडा गेला, सौमित्र जून्या वाड्यातून आपल्या आईला भेटून परत आला होता. सर्वात प्रथम तो जेव्हा राजेसाहेबांना भेटला होता त्यावेळी बसलेल्या उंच खुर्चीत काही न बोलता शांत बसून राहिला. त्याच्या मनातील खळबळ त्याच्या चेहऱ्यावर दिसत होती. राजेसाहेब त्याच्याकडे शांतपणे पहात होते. शेवटी सौमित्रने मान वर केली आणि राजेसाहेबांना विचारले, "खाजगीचे कारभारी नरसिंह कुलकर्णी यांना आपल्या सर्व कुळांविषयी संपूर्ण माहिती आहे काय?"

"होय, त्यांच्याबद्दल जाणून घेणे हेच तर त्यांचे काम आहे," राजेसाहेब म्हणाले. "का बरे ? त्यांनी त्याकडे काही दुर्लक्ष केले आहे काय?" राजेसाहेबांनी आपल्या कुळांच्या संदर्भात कधीच लक्ष घातले नव्हते, असे असले तरी सौमित्रचे त्यात विशेष लक्ष असलेले पाहून त्यांना कौतुक वाटे. पण सध्या सौमित्रच्या डोक्यात काहीतरी गंभीर विषय चालला आहे हे उघडपणे जाणवत होते. त्यांनी सौमित्रकडे निरखून पाहिले त्याच्या मोठ्या डोळयात भीती दिसत होती. सौमित्र म्हणाला, "आई म्हणत होती, 'गावाच्या बाहेर आपली एक वसाहत आहे. तेथील दाटीवाटीने घरे उभी आहेत पण आता बहुसंख्य मोडकळीस आली आहेत. अरुंद गल्ली बोळात सर्वत्र अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. तिथल्या खोल्या इतक्या कोंदट आहेत की श्वास घ्यायला शुध्द मोकळी हवा मिळणे अशक्य आहे, त्यामुळे रोगराईला जणू आमंत्रणच मिळाल्यासारखे झाले आहे. तिथे राहणाऱ्या लोकांच्या नशिबी गरीबी तर पाचवीला पुजलेली आहे. अन्न अपूरे, आणि दूषित पाण्यामुळे साथीचे आजार नेहमीच येतात आणि अशा आजारात औषधपाण्यावाचून लहान मुले हमखास दगावतात. तिथल्या घरांवरचे छप्पर पार वाकलेले असून पावसाचे पाणी घरात येते त्यामुळे भिंतींमध्ये सतत ओल राहते, यापेक्षा जनावरांचे गोठे परवडले.' आई तिथे एका गरीब स्त्रिच्या समाचाराला गेली होती. मी गेलो तेव्हा नुकतीच ती तेथून परत

आली होती. तिने अंघोळ केल्याशिवाय मला जवळ यायला दिले नाही. जेव्हा तिने मला याबद्दल सांगितले तेव्हा तिच्या गालावरून अश्रू वाहत होते!"

सौमित्रच्या डोळ्यात पण अश्रू आले होते पण त्यांना थोपवून कसनुसे हसण्याचा प्रयत्न करत तो राजेसाहेबांना म्हणाला, "मी आईला सांगितले की या गोष्टींची तुम्हाला काहीच माहिती नाही. मी तुमच्या कानावर सर्व हकीकत घालतो. आजोबा नक्की यातून चांगला मार्ग काढतील." असे म्हणून सौमित्र उडी मारुन खुर्चीतून खाली उतरला आणि राजेसाहेबांच्या जवळ गेला. "जसे तुम्ही हरबा पवारांना मदत करून त्यांची विस्कटलेली घडी बसवायला मदत केलीत तसे तुम्ही वस्तीतील प्रत्येकासाठी जे काही आवश्यक आहे ते नक्की कराल. मी तिला असेही सांगितले की कदाचित खाजगीचे कारभारी नरसिंह कुलकर्णी तुम्हाला सांगायला विसरले असतील." सौमित्रने त्यांच्या गुडघ्यावर आपले हात ठेवले. त्याचा आपल्यावरचा विश्र्वास पाहून राजेसाहेबांच्या अंतःकरणात कुठेतरी कालवाकालव झाली. कारण खाजगीचे कारभारी नरसिंह कुलकर्णींनी, सौमित्रच्या आईने पाहिलेली गावाबाहेरच्या हरिजन वस्तीची अवस्था त्यांच्या कानावर घातली होती. मोडकळीस आलेली घरे, तुंबलेल्या गटारी, पाण्याचे दुर्भिक्ष, रोगराईचे माहेरघर असलेल्या हरिजन वस्तीबद्दल, गुरव मास्तरांनी सुध्दा अनेकदा त्यांच्यापुढे कैफियत मांडली होती पण राजेसाहेबांनी त्याकडे दुर्लक्ष करत, उलट गुरव मास्तरांना भलेबुरे ऐकवले होते. राजेसाहेबांना स्पष्टपणे आठवले, ज्यावेळी ते स्वतः संधिवाताने जागेवर खिळून राहिले होते आणि तेव्हाच नेमके गुरव मास्तर हरिजन वस्तीत पसरलेल्या साथीच्या आजाराविषयी सांगायला आले होते. तेव्हा राजेसाहेब मास्तरांना म्हणाले होते की वस्तीतील सर्व माणसे जरी मसणात गेली तरी मला सांगायला येऊ नका. मला काही फरक पडत नाही. त्यानंतर मात्र गुरव मास्तर कधी या विषयावर सांगायला आले नाहीत. पण आज त्यांच्या गुडघ्यावर हात ठेऊन, त्या वस्तीची प्रत्येक गरज पूर्ण

a

होईल असे आपल्या आईला खात्रीपूर्वक सांगणाऱ्या त्यांच्या नातवाच्या डोळयात, त्यांच्या बद्दलचा गाढ विश्र्वास आणि सच्चेपणा दिसत होता; तो पाहिल्यावर राजेसाहेबांना स्वतःचीच आणि त्यांच्या मालकीच्या वस्तीची लाज वाटली. "म्हणजे तुझ्या मते आपल्या वस्तीची आदर्श वसाहत बनवायची आहे, असेच ना?" असे म्हणत त्याच्या मताला दुजोरा देत राजेसाहेबांनी त्याच्या चिमुकल्या हातावर थोपटले. "होय पण त्या झोपड्यांची अवस्था दुरुस्त होण्याच्या पलीकडे आहे, त्या पाडवून सर्व नव्याने बनवायला लागतील. आपण उद्याच कामाला सुरुवात करु. तुम्ही पण तिकडे चला, तुम्हाला पाहून लोकांना फार आनंद वाटेल. त्यांना कळेल की तुम्ही त्यांना मदत करायला आला आहात!" त्याचे डोळे तेजस्वी ताऱ्यासारखे चमकत होते.

राजेसाहेब त्यांच्या खुर्चीवरून उठले आणि त्यांनी सौमित्रच्या खांद्यावर हात ठेवत थोडे हसून म्हणाले, "चल आपण बाहेर जाऊ, गच्चीवर फेऱ्या मारता मारता कामाविषयी चर्चा पण करता येईल." नेहमीप्रमाणे सौमित्रच्या खांद्यावर हात ठेवून फेऱ्या मारताना राजेसाहेब कोणत्यातरी विचारात गुंतलेले होते तरी चेहऱ्यावर प्रसन्नता होती.

a

# प्रकरण 10

खरी गोष्ट अशी होती की अपर्णाताईंनी कुंतलपूरच्या गरीब वस्तीत समाज सेवेचे कार्य सुरू गेल्यावर तिथल्या परिस्थितीची कल्पना आली. दूरवरून सुंदर दिसणाऱ्या झोपड्या, जवळ जाऊन पाहिल्यावर घाणीचे साम्राज्य, रोगराईचे माहेरघर, गरीबी, अज्ञान आणि त्याच्या जोडीला आळस असे चित्र दृष्टीस पडले.

गुरव मास्तरांनी अपर्णाताईंना अनेक अडचणींचा पाढा वाचून दाखवला आणि वेळोवेळी याबाबत राजेसाहेबांना लक्ष घालण्याची मागणी करूनही पदरी पडलेली निराशा पण विशद केली. तेथील व्यवस्था पाहण्यासाठी नेमलेले लोक राजेसाहेबांना खुश करण्यासाठी तिथे राहणाऱ्या लोकांच्या मूलभूत गरजांकडे पण दुर्लक्ष करत. त्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस अधिकाधिक वाईट होत गेली.

अपर्णाताईंना यापेक्षा मुंबईतील झोपडपट्टी चांगली असे वाटले. विशेषतः त्यांना तेथील लहान मुलांची अवस्था जास्त दयनीय वाटत होती. गरीबी, कुपोषण, आजारपण या चक्रात त्यांचे बालपण अडकले होते. त्यामधून तग धरून कोणी थोडे

मोठे झाले तर शिक्षणाची काही सोय नव्हती मग लहानसहान चोऱ्या-माऱ्या केल्या जायच्च्या आणि गुन्हेगारीचा शिक्का आयुष्यभर पुसला जात नसे. त्या मुलांकडे पाहिल्यावर अपर्णाताईंना सौमित्रची आठवण येत असे. आपला मुलगा राजवाड्यात ऐश्वर्य उपभोगत आहे आणि त्याच्याच वयाची ही मुले अन्नाला मोताद झाल्याचे पाहिल्यावर त्यांचे मातृ हृदय कळवळून गेले. त्यांच्या मनात एक धाडसी विचार आला, इतरांप्रमाणेच त्यांनाही कळायला लागलं होतं की राजेसाहेब त्यांच्या मुलावर-सौमित्रवर खूप खुश आहेत, त्याने नुसती इच्छा जरी केली तरी ती पूर्ण करण्यासाठी ते मागे पुढे पाहत नसत आणि नेमक्या याच गोष्टीचा फायदा करून घेऊन या वस्तीची परिस्थिती काही प्रमाणात का होईना पण सुधारणे शक्य होईल अशी त्यांना आशा वाटली. तसे त्यांनी गुरव मास्तरांकडे बोलून दाखवले,

"राजेसाहेब, युवराजांचा शब्द खाली पडून देणार नाहीत. निव्वळ सुखोपभोगासाठी खर्च होणारा पैसा अशा चांगल्या कामासाठी खर्च झाल्यास त्याचा संपूर्ण समाजाला उपयोग होईल म्हणून मला या कामात युवराजांची मदत घेऊन पाहायचे आहे." आणि तसे झाले देखील, प्रत्येकाला या गोष्टीचे आश्चर्य वाटले. वस्तूस्थिती अशी होती की राजेसाहेबांवर प्रभाव टाकू शकणारी शक्ती म्हणजे त्याच्या नातवाचा त्यांच्यावर असलेला दृढ विश्वास. सौमित्रचा असा विश्वास होता की त्याचे आजोबा, योग्य असेल ती गोष्ट करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत मग त्यासाठी कितीही पैसे खर्च करतील. प्रत्यक्षात राजेसाहेबांना उदार वगैरे बनण्यात काही रस नाही, फक्त स्वतःचा स्वार्थ साधणे हाच त्यांचा हेतू असे पण हे सत्य त्यांच्या नातवाने जाणावे असे मात्र त्यांना वाटत नव्हते. निरागस सौमित्रला राजेसाहेब म्हणजे 'दानशूर कर्णाचे अवतार अथवा जणू सत्यवचनी हरिश्चंद्र' असे वाटत होते मात्र या नव्या ओळखीचे त्यांना अप्रुप वाटायला लागले होते. "मी एक स्वार्थी माणूस आहे, मी माझ्या आयुष्यात कधीही उदार गोष्ट केली नाही, आणि

a

मला हरिजन वस्तीच्या दुरावस्थेविषयी किंवा तिथल्या गरीब लोकांची पर्वा नाही" असे सौमित्रच्या प्रेमळ तपकिरी डोळयांमध्ये पाहात सांगण्याची कल्पना मात्र राजेसाहेबांच्या मनाला भावली नाही. त्या कुरळया केसांच्या लहान मुलावर ते खरोखरच प्रेम करायला लागले होते आणि असे प्रेम करणे जर चूकीचे असेल तर ती चूक परत परत करण्याची त्यांची तयारी होती. हा विचार मनात आल्यावर ते स्वतःशी हसले आणि थोडावेळ विचार करून त्यांनी खाजगीचे कारभारी नरसिंह कुलकर्णींना तातडीचे बोलावणे धाडले. कारभारी आल्यावर राजेसाहेबांनी त्यांच्या बरोबर बराच वेळ चर्चा केली आणि शेवटी खराब झालेल्या जून्या झोपड्या त्याजागी नवीन आदर्श वसाहत बनवायची योजना पक्की झाली.

"यासाठी छोट्या युवराजांनी आग्रह धरला आहे. जूनी पुराणी वसाहत आता अगदीच मोडकळीस आली आहे, त्याचा भाडेकरूंना त्रास होतो त्याचा दोष आपल्याकडे येतो असे त्यांचे म्हणणे आहे. तुम्ही भाडेकरूंना सांगू शकता की ही छोट्या युवराजांची कल्पना आहे," असे म्हणत त्यांनी सौमित्रकडे पाहिले, तो शेरू बरोबर खेळत होता. अलीकडे शेरू सतत त्याच्या मागे मागे असत असे. अगदी घोडेस्वारी सुरू असताना शेरू बरोबर दौडत असे. घोडागाडीतून सौमित्र जून्या वाड्याकडे निघाला तरी शेरू मागे मागे जात असे.

हरिजन वस्तीच्या सुधारणेची सगळीकडे पसरली, सुरवातीला या गोष्टीवर कुणाचा विश्वास बसला नाही पण जेव्हा कामगारांची तुकडी वस्तीवर हजर झाली आणि जुन्या खोल्या पाडण्यास सुरुवात झाली तेव्हा लोकांची खात्री झाली की ही सारी छोट्या युवराजांची करामत आहे. त्यांच्यामुळे राजेसाहेबांना नवीन वसाहत उभी करावी लागत होती. सगळीकडे सौमित्रची वाहवा सुरू होती. एव्हढ्या लहान वयात त्यांची कामगिरी पाहून लोक भविष्यात त्यांच्याकडून अजून मोठ्या अपेक्षा करत होते. लोक त्याची स्तुती करताना हे सौमित्रच्या ध्यानी मनी सुद्धा नव्हते. त्याचा

a

दिनक्रम नेहमी सारखा सुरू होता: उद्यानात शेरू बरोबर फिरणे, सशांचा पाठलाग करत त्यांच्या बिळांचा शोध घेणे, हिरवळीवर पडून अद्भुतरम्य गोष्टींची पुस्तके वाचून त्याविषयी राजेसाहेबांशी चर्चा करणे, परत एकदा आईबरोबर त्या गोष्टींची उजळणी करणे, बबन आणि बापू शेठ यांना लांबलचक पत्रे लिहणे, त्यांची उत्तरादाखल आलेली पत्रे आईला आणि राजेसाहेबांना दाखवणे, सौमित्रची करीम चाचा किंवा राजेसाहेबांबरोबर घोड्याची रपेट कधी चुकत नसे. जेव्हा ते गावातील रस्त्यांवरून जात तेव्हा लोक मुद्दाम थांबून अभिवादन करत. सौमित्र पण हसून मान लववून प्रतिसाद देत असे. मात्र त्याचा असा समज होता की लोकांच्या या उत्स्फूर्त अभिवादनाचे कारण त्याच्यासोबत असणारे त्याचे आजोबा आहेत. एकदा सौमित्र आपल्या आजोबांना म्हणाला देखील, "आजोबा तुम्ही कुंतलपूरच्या लोकांना खूप आवडता, तुम्हाला पाहण्यासाठी ते मुद्दाम बाहेर उभे राहतात. मला पण तुमच्या सारखे व्हायला नक्कीच आवडेल. तुमच्या सारख्या लोकप्रिय व्यक्तीचा नातू असल्याचा मला अभिमान वाटतो." आजोबा नुसतेच हसले.

जेव्हा नवीन वसाहतीचे बांधकाम सुरू झाले तेव्हा सौमित्र आणि राजेसाहेब अनेकदा बांधकामाच्या पाहणीसाठी तिथे जात असत. सौमित्र तर आपल्या घोड्यावरून उतरून कामगारांशी गप्पा मारत असे. दगड, वीटा, वाळू, चुना याविषयी माहिती विचारत असे, मुंबईच्या उंच इमारती, मोठ्या चाळी यांची कामगारांना माहिती देत असे आणि ते पण त्याचे बोलणे कौतुकाने ऐकत किंबहुना तो त्यांचा विरंगुळा असे. थोड्याच दिवसात सौमित्रने बांधकामाच्या संदर्भात इतकी माहिती गोळा केली की परत जाताना आजोबांना या विषयावर अगदी सविस्तर माहिती देऊ शकला. "मला नेहमी अशा गोष्टींबद्दल जाणून घ्यायला आवडते त्याशिवाय आपल्याला जे काही चालले आहे त्याची नेमकी कल्पना येत नाही," सौमित्र आजोबांना सांगत होता.

a

सौमित्रचे खिशात हात घालून उभे राहून कुतुहलाने कामाची पाहणी करणे, शंका विचारणे कामगारांना पण सवयीचे झाले. त्यांना त्यांचे मोठे कौतुक वाटे. तो निघून गेला की त्यांची आपापसात चर्चा चाले. त्याच्या सारख्या राजघराण्यातील मुलाने त्यांच्या बरोबर मित्रत्वाच्या नात्याने गप्पा माराव्यात याचे त्यांना कोण अप्रुप वाटे. अगदी ते घरी गेल्यावर आपल्या बायका मुलांकडे याची चर्चा करत. अशा रीतीने जवळजवळ प्रत्येकाच्या तोंडांत छोटे युवराज आणि राजेसाहेब यांच्यातील नातेसंबंधांचा विषय असे. सौमित्रमुळे राजेसाहेब पूर्णपणे बदलल्याचे जाणवत होते.

राजेसाहेब सौमित्रची जास्तीत जास्त काळजी घेत, संपूर्ण जगात फक्त एकट्या सौमित्रचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे असे त्यांना वाटे आणि ते खरेही होते. तो मोठा झाल्यावर आपल्या दयाळू स्वभावाने आणि प्रेमाने सर्वांची मने जिंकून घेईल यात त्यांना तीळमात्र शंका वाटत नव्हती. त्याला अशक्य असे काहीच नाही याची त्यांना खात्री होती. परंतु सौमित्र विषयीच्या त्यांच्या भावना त्यांनी कुणापुढेही उघड केल्या नाहीत. सौमित्र बद्दल इतरांशी बोलताना त्यांच्या चेहरा नेहमीसारखा कठोर असे पण सौमित्रला समजले होते की त्यांचे आजोबा त्याच्यावर खूप प्रेम करतात. त्यांच्या दालनात त्याला अगदी जवळ बसायला देत, जेवणाच्या टेबलावर त्यांच्या समोरची खुर्ची त्याची असे, घोड्यावरून दोघे बरोबरीने रपेट मारत. संध्याकाळी गच्चीवर त्यांचा एकत्र फेरफटका ठरलेला असे.

एक दिवस सौमित्र पुस्तक वाचता वाचता आजोबांच्या जवळ गेला आणि म्हणाला, "आजोबा, मी आलो होतो त्या रात्री काय म्हणालो होतो की दोन माणसांचे एकमेकांशी फारसे सख्य नसेल तर एकत्र राहून देखील कधी कधी एकटे वाटू शकते, हे तुम्हाला आठवत आहे काय? पण आता माझी खात्री झाली आहे की आपण एकमेकांचे चांगले सोबती बनलो आहोत. तुम्हाला काय वाटते?"

a

"होय आपण खूप चांगले सोबती आहोत," राजेसाहेबांनी उत्तर दिले. "इकडे ये." सौमित्र लगबगीने त्यांच्या जवळ गेला. "तुझ्याकडे एखादी नसलेली गोष्ट तुला हवी आहे काय?" राजेसाहेबांनी विचारले. सौमित्र उत्सुकतेने राजेसाहेबांकडे पहात म्हणाला, " फक्त एक गोष्ट."

"ती कोणती?" राजेसाहेबांनी चौकशी केली. सौमित्र एक क्षणभर शांत झाला, त्याने इतके दिवस स्वत:साठी महत्त्वाचा विचार केला नव्हता. "माझी आई, माझ्या आईची मला उणीव भासते." राजेसाहेब एकदम चमकून म्हणाले, "पण तू तिला रोजच तर पाहतोस, तेव्हढे पुरेसे नाही का?"

"पुर्वी आम्ही एकत्र असायचो," सौमित्र म्हणाला. "रोज रात्री आई मला गोष्टी सांगत थोपटून झोपवायची. मला तिला भेटायला वाट पाहात बसायला लागत नसे."

राजेसाहेब आणि सौमित्र शांतपणे एकमेकांना पाहत राहिले. राजेसाहेबांच्या भुवया आक्रसल्या होत्या.

"तू तुझ्या आईला विसरू शकत नाहीस काय?" राजेसाहेबांनी विचारले. "नाही," सौमित्रने उत्तर दिले, "कधीच नाही; आणि आईसुद्धा मला कधी विसरणार नाही. तुम्हाला माहिती आहे काय, जर मी तुमच्या पासून दूर गेलो, तरी मी तुम्हाला विसरणे शक्य नाही उलट मी तुमचा जास्त विचार करेन."

"नक्कीच तू तसे करशील याची मला खात्री आहे," राजेसाहेब त्याच्याकडे पाहत म्हणाले. सौमित्र जेव्हा आपल्या आईबद्दल बोलत होता तेव्हा राजेसाहेबांच्या मस्तकात संतापाची तिडीक उठली आणि अपर्णाताईंचा पुर्वी पेक्षा जास्त मत्सर वाटला, राजेसाहेबांना आता सौमित्र पुर्वी पेक्षा जास्त आपला वाटायला लागला होता. आपल्या मुलाच्या विधवा पत्नीचा ते फक्त रागराग करत.

a

पण लौकर त्यांना या पेक्षा वेगळ्या मानसिक त्रासांना सामोरे जावे लागले, त्यामुळे आपल्या सूनबाईंचा रागराग करण्याचे जणू काय ते विसरूनच गेले. या साऱ्या त्रासाची सुरवात विचित्र आणि धक्कादायक पद्धतीने झाली. नवीन वसाहतीचे बांधकाम सुरू असताना राजेसाहेबांनी राजवाड्यात एका मोठ्या मेजवानीचे आयोजन केले. बऱ्याच काळापासून असा काही समारंभ राजवाड्यात झाला नव्हता. त्यापूर्वी काही दिवस अगोदर लोहितपूरचे राजे हेमचंद्र आणि त्यांच्या पत्नी रुक्मिणी देवी, ज्या कुंतलपूरच्या राजेसाहेबांच्या एकुलत्या एक भगिनी होत्या, त्यांचे आगमन कुंतलपूरच्या राजवाड्यात झाले. या बातमीमुळे कुंतलपूरच्या प्रजाजनांमध्ये खळबळ उडाली कारण कित्येक वर्षांत रुक्मिणी देवी कुंतलपूरला आल्या नव्हत्या. एकेकाळी रुक्मिणी देवी एक अप्रतिम लावण्यवती म्हणून ओळखल्या जात. आता वृध्दत्वाकडे झुकलेले त्यांचे खानदानी सौंदर्य, स्वभावातील ऋजुता, उदार अंतःकरण आणि शालीनता यामुळे त्या लोहितपूरच्या प्रजेमध्ये प्रिय होत्या. 'कुंतलपूरची माहेरवाशीण' म्हणून कुंतलपूरच्या प्रजेला त्यांच्याबद्दल कमालीचा आदर वाटत असे.

राजेसाहेबांचा स्वकेंद्रित स्वभाव आणि स्वार्थ परायण भावनाशून्य मनोवृत्ती, रुक्मिणी देवींना अजिबात पसंत नव्हती. त्यांचे हे मत त्या राजेसाहेबांना तोंडावर सांगण्यात मागे पुढे पहात नसत. लहानपणापासून बहिणभावाची भांडणे नेहमीची होती.

रुक्मिणी देवींच्या लग्नानंतर त्यांनी यांच्या भावाच्या बाबतीत फारसे चांगले असे काही ऐकले नव्हते. आपल्या 'शांतला' नावाप्रमाणेच शांत स्वभावाच्या पत्नीकडे त्यांचे झालेले दुर्लक्ष तिच्या मृत्यूस कारणीभूत झाले होते, असे इतरांप्रमाणे त्यांचेही मत होते. स्वतःच्या मुलांकडे देखील राजेसाहेबांनी दुर्लक्ष केले होते त्यामुळे त्यांची मोठी दोन्ही मुले अगदीच वाया गेलेली होती. दोघेही शरीराने दुर्बल, मनाने

a

दुष्ट आणि बुध्दीने जेमतेम होते. त्यातच हलक्या लोकांच्या संगतीने दोघे व्यसनी, लबाड आणि उधळे बनले होते. सर्वात मोठा रुद्रसेन, मधला विरेंद्र आणि लहान आशुतोष, यापैकी मोठ्या दोघांना आत्याबाईंनी- रुक्मिणी देवींनी अगदी त्यांच्या बाळपणी पाहिले होते. मात्र एकदा लोहितपूरच्या राजवाड्यात, दिसायला देखणा, शरीरयष्टी काटक, बांधा उंच सडसडीत बोलण्यात मार्दव, वागण्यात मर्यादाशील असा अठरा वर्षांचा, त्यांचा सर्वात लहान भाचा, आशुतोष सहज त्या भागात काही कामानिमित्त येणे झाले म्हणून भेटायला आला. शांतलादेवींनी म्हणजे त्याच्या मॉसाहेबांनी मुद्दाम त्याला आत्याबाईसाहेबांना भेटायला सांगितले होते. रुक्मिणी देवीनी इतक्या वर्षांनी माहेरचा पाहुणा आला म्हणून त्यांचे खूप आदरातिथ्य तर केलेच पण उभ्या उभ्या म्हणून भेटायला आलेल्या लाडक्या भाच्याला आठ दिवस आग्रहाने राहायला भाग पाडले. आशुतोष त्याच्या मॉसाहेबांच्या वळणावर गेला होता. स्वभावाने त्यांच्यासारखा गोड आणि लाघवी होता. परत जाताना लौकरच परत येण्याचा कबूल करून गेला होता पण ही गोष्ट राजेसाहेबांना पसंत पडली नाही. मागच्या काही गोष्टी त्यांनी मनात धरून ठेवल्या होत्या, त्यांनी आशुतोषला परत एकदा लोहितपूरला जाण्यास सक्त मनाई केली. रूक्मिणी देवीला मात्र त्याची फार आठवण येत होती. पुढे आशुतोषने शिक्षण पूर्ण झाल्यावर मुंबईत नोकरीच्या निर्णयावर राजेसाहेब असंतुष्ट झाले आणि त्याच्या लग्नाच्या निर्णयावर तर प्रचंड संतापले. राजेसाहेबांनी त्याच्या बरोबर तोडलेले संबंध वगैरे सर्व गोष्टी रुक्मिणी देवींच्या कानावर आल्या. राजेसाहेबांचा टोकाचा निर्णय रुक्मिणी देवींना अजिबात पसंत पडला नाही. पण त्या काही करू शकत नव्हत्या. आणि शेवटची बातमी कानावर आली ती आशुतोषच्या अकाली मृत्यूची होती. रुक्मिणी देवींना खूप दु:ख झाले. त्यानंतर पाठोपाठ त्यांच्या माहेरघरा संबंधी फक्त दु:खाच्याच बातम्या ऐकायला आल्या. थोरले युवराज रुद्रसेन घोड्यावरून पडून मरण पावले तर दुसरे

विरेंद्र मुदतीच्या तापाने दगावले. पण रूक्मिणी देवींना कुंतलपूरला येऊन आपल्या भावाची भेट घेऊन सांत्वन करण्याची गरज वाटली नाही. कारण राजेसाहेबांना अशा दु:खाच्या प्रसंगी अगदी सख्खी बहिण का असेना पण समाचाराला आलेले आवडले नसते हे त्या जाणून होत्या.

गेल्या एक दोन महिन्यांपूर्वी मुंबईत शोध घेऊन छोट्या युवराजांना देशपांडे वकिल कुंतलपूरच्या राजवाड्यात घेऊन आल्याची बातमी लोहितपूरच्या राजवाड्यापर्यंत पोहोचली. तेव्हा मात्र रुक्मिणी देवींना राहवले नाही त्या हेमचंद्र राजेसाहेबांना म्हणाल्या, "जर आशुतोषची पत्नी आपल्या मुलाची काळजी स्वतः घेण्यास समर्थ असेल तर वेगळी गोष्ट आहे, नाहीतर या लहानग्या मुलाचे भवितव्य, दादासाहेबांच्या अहंकारी स्वभावामुळे इतरांप्रमाणेच उद्ध्वस्त होण्यास वेळ लागणार नाही." त्या लहानग्या मुलाला त्याच्या आईपासून वेगळे करण्यात आल्याचे समजल्यावर तर रुक्मिणी देवींच्या रागाचा स्फोट झाला. हेमचंद्र राजेसाहेबांना त्या म्हणाल्या, "ही तर दुष्टपणाची कमाल झाली. एव्हढ्या लहान मुलाला त्याच्या आईपासून तोडून दादासाहेबांसारख्या माणसाच्या सानिध्यात राहायला लावल्यास, त्या मुलाच्या भवितव्याची पुरती वाट लागेल. एक तर त्याचे आजोबा त्याच्याशी क्रूरपणे वागतील किंवा त्याचे अति लाडाने त्याला पार बिघडवून टाकतील. मला वाटते याबद्दल कुंतलपूरला निदान पत्र लिहून असे करू नये म्हणून सांगावे."

"त्याचा काही उपयोग होईल असे मला वाटत नाही," राजे हेमचंद्र म्हणाले. "होय, मला पण त्याची कल्पना आहे. उलट दादासाहेबांना अपमान वाटून नक्कीच राग येईल," रुक्मिणी देवी हताशपणे म्हणाल्या.

छोट्या युवराजांचे वागणे, बोलणे, खेळणे, बागडणे, दिसणे, हसणे या सर्व गोष्टींची कुंतलपूरच्या घराघरात चालणारी चर्चा, हळूहळू आजुबाजुच्या गावागावातून

शहरापर्यंत पोहोचली. इतर संस्थानाच्या उमराव वर्गापासून सामान्य लोकांना पण परिकथेतील हा छोटा राजकुमार पाहण्याची, जाणण्याची उत्सुकता वाटू लागली. घराघरात जेवताना खाताना, पाणवठ्यावर पाणी भरताना, सगळीकडे सौमित्र विषयी चर्चा सुरू असे. विशेषतः स्त्रियांना लहानग्या सौमित्रची आणि त्याच्या आईची अशाप्रकारे ताटातूट केल्याबद्दल राजेसाहेबांचा राग येत असे आणि अपर्णाताईं विषयी अपार सहानुभूती वाट असे.

एकदा राजेसाहेबांची आणि धरणगावच्या जहागिरदारांची नवीन वसाहतीच्या बांधकामाच्या ठिकाणी भेट झाली. कुंतलपूरच्या राजेसाहेबांना पाहिल्यावर ते एकदमच आश्चर्यचकीत झाले. राजेसाहेबांचे जूने संधिवाताचे दुखणे पार नाहीसे झाले होते आणि ते बरेच तंदुरुस्त दिसत होते. त्यांच्या वागण्या बोलण्यातून नातवाबद्दलचा अभिमान प्रकर्षाने जाणवत होता. जहागिरदार आपल्या परिचितांना सांगत होते, "लहान घोड्यावर युवराज अगदी पट्टीच्या घोडेस्वाराप्रमाणे ऐटीत बसले होते आणि त्याचे आजोबा त्यांच्या वयापेक्षा दहा पंधरा वर्षांनी तरुण वाटत होते."

लोहितपूरच्या राजवाड्यात रुक्मिणी देवीं पर्यंत या सगळया बातम्या पोहोचण्यास फारसा वेळ लागला नाही. हरबा पवारांना मिळालेली मुदतवाढ, अपंग मुलाला केलेली मदत आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जून्या पुराण्या हरिजन वस्तीच्या जागी नवीन वसाहतीची उभारणी या साऱ्या गोष्टी कुणालाही आश्चर्यचकीत करणाऱ्या होत्या, सहाजिकच रुक्मिणी देवींच्या मनात छोट्या युवराजांना भेटण्याची इच्छा झाली. ही गोष्ट कशी काय शक्य होईल असा त्यांचा विचार सुरू झाला आणि अचानक त्यांना राजेसाहेबांकडून त्यांच्या पतीसह कुंतलपूरला येण्याचे निमंत्रण मिळाले. रुक्मिणी देवींना या गोष्टीचे खूपच नवल वाटले. त्या हेमचंद्र राजेसाहेबांना म्हणाल्या, "त्या छोट्या मुलाने चमत्कार केल्याचे

a

माझ्या कानावर आले आहे आणि माझा आता त्यावर विश्वास बसत चालला आहे. दादासाहेबांचा तो खूप आवडता आहे, क्षणभर देखील ते त्याला आपल्या नजरेआड होऊ देत नाहीत असे लोक म्हणतात ते खरेच असावे. त्यांना त्याचा फार अभिमान वाटत आहे आणि खरे सांगायचे झाले तर म्हणूनच त्याला आम्हाला दाखवायचे आहे," रुक्मिणी देवींनी निमंत्रण लगेच स्विकारले.

रुक्मिणी देवी कुंतलपूरला आपल्या पतीसह पोहोचल्या. नंतर राजेसाहेबांना भेटायला त्यांच्या दालनात गेल्या. राजेसाहेब खिडकीजवळ पाठमोरे उभे होते, त्यांच्या शेजारी काळया रंगाचा मखमली सूट घातलेला एक लहान मुलगा उभा होता. त्याने मान वळवून मागे पाहिले, त्याला पाहिल्यावर रुक्मिणी देवींना बालपणीच्या आशुतोषची आठवण आली, तसाच तेजस्वी चेहरा, कुरळे पिंगट केस पण डोळे मात्र वेगळे तपकिरी रंगाचे होते. त्याच्याकडे बोट दाखवत रूक्मिणी देवींनी राजेसाहेबांना विचारले, "मार्तंड दादासाहेब हाच तो मुलगा आहे काय?" राजेसाहेबांना त्यांच्या नावाने मारलेली हाक ऐकून कित्येक वर्षे लोटली होती. "होय, रुक्मिणी हाच माझा नातू सौमित्र आहे," राजेसाहेब म्हणाले. "सौमित्र, या तुझ्या आजी साहेब रुक्मिणी देवी, तुझ्या वडिलांच्या लाडक्या आत्याबाई साहेब."

"आजी साहेब आपण कशा आहात?" असे म्हणत सौमित्र नमस्कार करण्यासाठी खाली वाकला. रुक्मिणी देवींनी त्याच्या डोक्यावर आशीर्वाद देण्यासाठी हात ठेवला आणि पटकन त्याला उचलून कवटाळून धरले आणि म्हणाल्या, "बाळ, तू तुझ्या वडिलांसारखा- आशुतोष सारखा दिसतोस."

"हे ऐकून मला आनंद झाला, माझे बाबा सर्वांना प्रिय होते, माझी आई सुद्धा असेच म्हणते की मी ही त्यांच्यासारखा 'जगन्मित्र' आहे." रुक्मिणी देवी आनंदित झाल्या आणि त्यांनी वाकून सौमित्रचा पापा घेतला. त्या क्षणापासून ते एकमेकांचे मित्र बनले. नंतर सौमित्र बाहेर गेल्यावर रुक्मिणी देवी राजेसाहेबांना म्हणाल्या,

a

"मार्तंड दादासाहेब, एव्हढ्या मोठ्या राजवाड्यात हे लहान मूल एकाकी पडत आहे, असे तुम्हाला वाटत नाही काय?"

"अजिबात नाही, तो खूप चांगला मुलगा आहे. वयाच्या मानाने त्याला चांगली समज आहे. आमच्या दोघांची चांगलीच मैत्री जमली आहे. तो मला एक सुस्वभावी, परोपकारी व्यक्ती समजतो. रुक्मिणी मी तुझ्याकडे कबूल करतो- नाहीतरी तुझ्या ते लक्षात सुध्दा येईल की मी नकळतपणे इतका बदलतो चाललो आहे की खरोखरच लोक मला म्हातारचळ लागला की काय, अशी शंका घेत असावेत."

"त्याच्या आईला तुमच्याबद्दल काय वाटतं?" रुक्मिणी देवींनी सरळपणे विचारले. "मी तिला विचारले नाही," राजेसाहेब किंचित चिडून म्हणाले. "ठीक आहे," रुक्मिणी देवी म्हणाल्या, "मी सुरुवातीलाच तुम्हाला स्पष्टपणे सांगते की मार्तंड दादासाहेब मला तुमचे हे वर्तन आवडलेले नाही. मी शक्य तितक्या लवकर सौमित्रच्या आईला भेटायला जाणार आहे. तुम्हाला ते कदापिही आवडणार नाही याची मला कल्पना आहे, तरी मी मागे हटणार नाही. आमच्या लोहितपूर पर्यंत ही बातमी पसरली आहे की तिला आपल्या जमिनी कसणारी कुळे मानतात. आपल्या रयतेमध्ये ती अत्यंत लोकप्रिय झाली आहे."

"होय, त्यांनी फक्त तिची पूजा करण्याचे बाकी ठेवले आहे. तशी चणीने आणि वयाने लहान आहे, दिसायला चांगली आहे. मुलगा मातृमुखी असल्याने सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू झाला आहे त्याबद्दल मी तिचा आभारी आहे, त्या पलीकडे तिचा माझा काही संबंध नाही. तुला तिला भेटायला जायचेच असेल तर तू जून्या वाड्यात जाऊ शकतेस. पण तिला इथे येता येणार नाही, शिवाय तू मला तिची भेट घेण्यासाठी गळ घालता कामा नये, त्याचा काहीही उपयोग होणार नाही," राजेसाहेब रागाने म्हणाले.

a

रुक्मिणी देवी, हेमचंद्र राजेंना म्हणाल्या, "आता मला लक्षात आले आहे की दादासाहेब तिचा निदान द्वेष तरी करत नाहीत. ते खूपच बदलले आहेत, त्यांचे सौमित्रवर खूप प्रेम आहे. त्या निष्पाप , प्रेमळ मुलावरच्या त्यांच्या प्रेमाने, त्यांना बदलायला भाग पाडले आहे. दादासाहेबांची स्वतःची मुले त्यांच्या दालनातील खुर्चीजवळ जायला, वाघाच्या गुहेत जाण्यासारखी घाबरत असत, पण हा खुशाल त्यांच्या गुडघ्यावर हात ठेवून उभा रहातो."

दुसऱ्या दिवशी रूक्मिणी देवी अपर्णाताईंना भेटायला गेल्या. परत आल्यावर त्या राजेसाहेबांना म्हणाल्या, "मार्तंड दादासाहेब, खरोखरच नक्षत्रासारखी देखणी पोर आहे, बिचारी वर एव्हढ्या लहान वयात असा प्रसंग यायला नको होता. तरी पण खंबीरपणे सगळ्याचा सामना करत आहे. तिचा आवाज ऐकून देवघरातील चांदीच्या घंटाची किणकिण ऐकल्यासारखे वाटले. तिने आपल्या मुलाला नुसते सौंदर्य दिलेले नाही तर त्यापेक्षा महत्त्वाची अशी उच्च मुल्यें त्याच्यामध्ये रुजवली आहेत. तुम्ही तिला राजवाड्यात न बोलावण्यात चूक करत आहात. आपल्यासकट इथली सर्व जबाबदारी ती अतिशय उत्तमरीत्या पार पाडू शकेल. मी तिला लोहितपूर येण्याचे निमंत्रण देणार आहे."

"ती मुलाला सोडून लोहितपूरला येणार नाही," राजेसाहेबांनी उत्तर दिले.

" मग मी तिला मुलासह येण्याचे निमंत्रण देईन," रुक्मिणी देवी हासत म्हणाल्या. पण त्यांना याची कल्पना होती की राजेसाहेब सौमित्रला त्यांच्याकडे पाठवणार नाहीत. आजोबा आणि नातवाची गट्टी चांगलीच जमली होती. त्या निष्पाप, प्रेमळ बालकाचा राजेसाहेबांना खरोखरच लळा लागला होता. राजेसाहेबांच्या साऱ्या आशा आकांक्षा त्यांच्या नातवावर एकवटल्या होत्या. सौमित्रने आपल्या आजोबांवर संपूर्ण विश्र्वास टाकून प्रेमाने त्यांना आपलेसे केले होते. रुक्मिणी देवींना यांची कल्पना होती की या भव्य मेजवानीचे आयोजन

a

राजेसाहेबांनी सगळीकडे ज्याची सध्या चर्चा सुरू होती त्या सौमित्रला सर्वात समोर आणण्यासाठी केले होते.

"रुद्रसेन आणि विरेंद्र यांचे वर्तन दादासाहेबांकरिता खूप लाजिरवाणी गोष्ट होती. प्रत्येकाला या गोष्टीची कल्पना होती. राजेसाहेब त्या दोघांचा तिरस्कार करत असत. आणि म्हणूनच सौमित्रला त्यांना जगापुढे वारस म्हणून अभिमानाने मिरवायचे आहे," रुक्मिणी देवी त्यांच्या पतीला म्हणाल्या. प्रत्येकजण सौमित्रला पाहण्यासाठी उत्सुक होता त्यामुळे कुंतलपूर दरबाराचे मेजवानीचे आमंत्रण सर्वांनी आनंदाने स्विकारले.

राजेसाहेब उपस्थित लोकांशी बोलताना म्हणाले, "हे आमचे छोटे युवराज, सौमित्र, वयाने लहान असले तरी त्याला वागण्याबोलण्याचे चांगलेच तारतम्य आहे. तो फारसा कुणाच्या अध्यात मध्यात पडत नाही. बहुतेक लहान मुले नको तेव्हढी बडबड करणारी किंवा दंगामस्ती करणारी असतात, तसा मी फारसा मुलांमध्ये रमणारा गृहस्थ नाही. पण सौमित्र तसा नाही, जर त्याला विचारण्यात आले तरच तो उत्तर देतो, एरव्ही तो शांतपणे ऐकण्याचे काम करतो. तो कधीही उध्दटपणे वागत नाही." पण उपस्थित पाहुणे मंडळींनी सौमित्रला फार वेळ गप्प बसू दिले नाही.

प्रत्येकजण त्याच्याबरोबर बोलण्यास उत्सुक होता. कुंतलपूर आणि इतर संस्थानांतील बहुतेक सर्व लब्धप्रतिष्ठीत स्त्री पुरुष या मेजवानीसाठी आले होते. विशेष पाहुणे म्हणून कुंतलपूरचे ब्रिटिश रेसिडेंट मि. था◌ॅमस आणि पत्नी मिसेस मेरी हेही उपस्थित होते. त्यांच्या सोबत त्यांची लहान मुलगी मार्गारिट आली होती. तिला खरोखरचा प्रिन्स पाहायचा होता. सहा महिन्यांपूर्वी था◌ॅमस कुटुंब मुंबईहून कुंतलपूरला आले होते. राजेसाहेबांनी सौमित्रची मि. था◌ॅमस आणि त्यांच्या कुटुंबीयांची ओळख करून दिली. मार्गारिट आणि सौमित्र एकमेकांशी मोडक्या तोडक्या हिंदी मध्ये गप्पा मारत होते.

रुक्मिणी देवींनी सौमित्रची ओळख राजपरिवारातील इतर मंडळी बरोबर करून दिली. सौमित्रने प्रत्येकाला नमस्कार करून आपल्या गोड आवाजात त्यांची खुशाली विचारली. त्या मंडळींना त्याच्या मुंबईतील जीवनाबद्दल जाणून घेण्यात औत्सुक्य होते, सौमित्रने प्रांजळपणे आपल्या मुंबईतील मित्रपरिवाराची माहिती सांगितली. बबनने दिलेला रुमाल दाखवला, सर्वजण त्याचा मुंबईतील सर्वसाधारण जीवनक्रम ऐकून आश्चर्यचकीत झाले होते. सुरवातीला राजेसाहेबांनी ओळख करून दिल्याप्रमाणे सौमित्र खरोखरच कुणाच्या अध्यात मध्यात नव्हता. त्याला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अचूक देत होता, इतरवेळी दुसऱ्यांचे बोलणे शांतपणे ऐकत उभा असे त्यामुळे त्याचा कुणाला कंटाळा वाटला नाही. वेळोवेळी मात्र सौमित्र, राजेसाहेबांच्या खुर्चीजवळ जात होता, नेहमीप्रमाणे त्याचे हात त्यांच्या गुडघ्यावर विसावलेले असत. आजोबा आणि नातवाची अशी जवळीक पाहून आमंत्रितांना नवल वाटणार हे जाणवून राजेसाहेबांना गंमत वाटली आणि हासू आले त्यामध्ये त्यांना वाटणारा नातवाचा अभिमान स्पष्टपणे दिसून येत होता.

संध्याकाळच्या मेजवानी साठी देशपांडे वकील, दुपारी येणे राजेसाहेबांना अपेक्षित होते पण त्यादिवशी त्यांना राजवाड्यात पोहोचायला खूपच उशीर झाला. या अगोदर असे कधी घडले नव्हते. आमंत्रित मंडळींची भोजनाला बसण्याची तयारी झाली आणि त्यावेळी देशपांडे वकील राजवाड्यात पोहोचले. जेव्हा ते राजेसाहेबांना भेटायला गेले तेव्हा राजेसाहेबांना आश्चर्य वाटले, देशपांडे वकीलांचा चेहरा वैतागलेला दिसत होता, कसल्यातरी घाईत ते असल्याचे वाटत होते. त्यांचा चेहरा पडला होता. ते हळू आवाजात राजेसाहेबांना म्हणाले, "मी एका वेगळयाच कामात गुंतलो होतो, एक चमत्कारिक गोष्ट घडली आहे."

देशपांडे वकील जूने जाणते वकील होते, उशीर झाल्याने वैतागून जाणे ठिक होते पण ते काळजीत पडल्यासारखे दिसत होते. त्यांचे धड जेवणात लक्ष नव्हते

a

किंवा कोणी त्याच्यांशी बोलायला आले तरी ते आपल्याच विचारात गढून गेल्यासारखे वाटत होते. एक दोन वेळा सौमित्र त्यांच्या जवळ आला तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरची काळजी आणि अस्वस्थता सौमित्रच्या पण लक्षात आली. एरव्ही ते सौमित्र बरोबर खेळीमेळीने वागत असत आज त्यांचे सौमित्र कडे लक्ष पण नव्हते. त्याच्याकडे बघून ते साधे हसले सुध्दा नाहीत.

खरी गोष्ट अशी होती की देशपांडे वकीलांना एक विचित्र आणि दु:खदायक गोष्ट राजेसाहेबांच्या कानावर तातडीने घालणे जरूरीचे होते - एक अशी धक्कादायक गोष्ट की जिचे पर्यवसान सर्वकाही उद्ध्वस्त होण्यात होणार होते. देशपांडे वकीलांनी उत्तरोत्तर रंगत चाललेल्या मेजवानीवर एक उदास नजर टाकली. हास्यविनोदाचे फवारे उडत होते. अभिमानाने भारावून गेलेले राजेसाहेब आणि आनंदाने सर्वांशी हसणारा सौमित्र यांच्या जोडीकडे त्या कठोर वृद्ध वकीलांची नजर गेली आणि ते मनोमनी हादरून गेले, एक मोठा आघात त्यांच्यावर झाला होता.

मेजवानी संपण्यास बरीच रात्र होत आली. देशपांडे वकील एखादा चित्रपट पाहात असल्यासारखे निरिक्षण करत होते. राजेसाहेब अनेकदा त्यांच्याकडे बघत होते पण त्यांचे त्याकडे लक्ष नव्हते. शेवटी मेजवानी आटोपली. सौमित्र मार्गारिट सोबत सोफ्यावर बसला होता. त्याने राजेसाहेबांसोबत उपस्थितांचे आभार मानले. शेवटचा पाहुणा बाहेर पडला तेव्हा सौमित्र बसल्याजागी झोपी गेला होता. राजेसाहेब झोपलेल्या सौमित्रला प्रेमाने पाहत उभे होते. तेव्हढ्यात तिथे आपली हनुवटी चोळत देशपांडे वकील तिथे उपस्थित झाले. राजेसाहेबांनी थोड्या मोठ्या आवाजात देशपांडे वकीलांना प्रश्न केला,

"देशपांडे काय भानगड आहे? काहीतरी घडले आहे हे उघड आहे. अशी कोणती चमत्कारिक गोष्ट घडली?"

अजून देशपांडे वकिलांना बोलायचे धाडस होत नव्हते. शेवटी मनाचा हिय्या करून म्हणाले, "राजेसाहेब, एक वाईट बातमी आहे, अत्यंत दु:खदायक गोष्ट आहे आणि दुर्दैवाने ती मला सांगावी लागते आहे.”

राजेसाहेब संध्याकाळपासून अस्वस्थ होते, देशपांडे वकीलांच्या अस्वस्थ चेहऱ्याकडे त्यांची वारंवार नजर जात होती त्यामुळे ते अजून अस्वस्थ होत होते.

देशपांडे वकील, सौमित्र कडेच बघत असल्याचे पाहून राजेसाहेब एकदम चिरडीला आले आणि रागाने म्हणाले, "संध्याकाळपासून मी पाहत आहे, तुम्ही सारखे सारखे त्याच्याकडे बघत आहात! तुमची कावळ्यासारखी नजर सतत मला त्याच्यावर रोखलेली दिसली, त्याचा काही संबंध तुमच्या या गोष्टीशी आहे काय?"

"सरकार! मी जास्त बोलणार नाही पण खरोखरच त्या गोष्टीचा संबंध छोट्या युवराजांशी पोहोचत आहे आणि जर त्या गोष्टीवर आपल्याला विश्र्वास ठेवायचा झाला तर - तर हे कुंतलपूरचे युवराज नसून, आशुतोष आणि अपर्णा यांचे चिरंजीव आहेत: खरे युवराज तर युवराज रूद्रसेन यांचा मुलगा असून तो पुण्यामध्ये राहात आहे," शेवटी एकदाचे वकीलसाहेब बोलले.

राजेसाहेबांनी खुर्ची, घट्ट पकडली, त्यांच्या कपाळावरची उठलेली शीर स्पष्टपणे दिसत होती, चेहरा संतापाने फुलला होता, ते जोराने ओरडले, "तुम्ही शुध्दीवर आहात काय? ही अशी तद्दन खोटी गोष्ट कोण सांगत आहे?"

"ही जर ती गोष्ट खोटी असती तर चांगले झाले असते, पण दुर्दैवाने ती सत्य असावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आज सकाळी एक स्त्री मला भेटायला माझ्या ऑफिसमध्ये आली. ती म्हणाली सहा वर्षांपुर्वी तिचे आणि रुद्रसेन यांचे पुण्यामध्ये लग्न झाले आहे. तिने मला लग्नाचे प्रमाणपत्र दाखवले. लग्नानंतर एका वर्षात त्या दोघांचे एकमेकाशी पटेना, आपल्यापासून दूर होण्यासाठी रुद्रसेन यांनी तिला मोठी रक्कम दिली. त्या दोघांचा मुलगा पाच वर्षांचा आहे. ती एक

a

अर्धशिक्षित, असंस्कृत स्त्री आहे असे दिसते. रुद्रसेन यांच्या अपघाती निधनानंतर तिने आपल्या मुलाचे पुढे काय होणार यासाठी एका वकीलांशी सल्लामसलत केली आणि वकीलांनी शोध घेऊन तो मुलगा म्हणजे कुंतलपूरचा युवराज असून आपला खरा वारस असल्याचे सांगितले. सहाजिकच ही गोष्ट मान्य व्हावी असे तिचे म्हणणे आहे.”

"पिवळया रंगाच्या सॅटीनचा अभ्रा घातलेल्या उशीवर डोके ठेवून सौमित्र गाढ झोपला होता, झोपेत त्याची चाळवाचाळव झाली. थोड्याच वेळात या राजवाड्यातील त्याचे छोट्या युवराजाचे स्थान अबाधित राहणार नव्हते, तो कुंतलपूरचा भावी राजा बनणार नव्हता, हे त्याची झोप चाळवण्यामागचे कारण तर नक्कीच नव्हते. त्याने झोपेत कुस बदलली आणि त्याच्या चेहरा राजेसाहेब उभे असलेल्या बाजूला वळला गेला. राजेसाहेबांच्या गंभीर चेहऱ्यावर आता क्रुद्ध भाव आणि कडवटपणा दिसत होता.

"मी या गोष्टीवर विश्वास ठेवायला सपशेल नकार दिला असता, पण रुद्रसेनाकडून असे नीच काम घडणे अशक्य नाही. माझ्यासाठी, माझा मुलगा रुद्रसेन, कुंतलपूरचा युवराज- नेहमीच एक कमकुवत मनाचा, खोटारडा, लबाड, क्रूर आणि आंबटशौकीन माणूस होता. ती स्त्री सुध्दा असंस्कृत आणि असभ्य आहे असे आपण म्हणालात ना?"

"मला हे कबूल करायला भाग पडत आहे की ती एक अडाणी स्त्री आहे. अशिक्षित आणि पैशासाठी काम करणारी आहे असे वाटते. तिला पैशाशिवाय इतर काही देणेघेणे नाही. पण ती खूप देखणी स्त्री असून गावंढळ आहे." शामराव देशपांडे, हे जूने जाणते कर्तव्यदक्ष वकील होते, त्यांचे बोलून झाले आणि पुढे काय घडणार या भीतीने त्यांचा थरकाप उडाला.

a

राजेसाहेबांच्या कपाळावरच्या शिरा टरारून फुगल्या होत्या. चेहरा घामाघूम झाला होता. त्यांनी रुमालाने घाम टिपला, चेहऱ्यावर कडवट हास्य रेंगाळत होते. "नियती माझ्यावर सूड उगवत आहे," सौमित्र कडे बोट दाखवत ते म्हणाले, "याच्या आईला मी सूनबाई म्हणून स्विकारण्यास नकार दिला, ती गरीबाघरची असली तरी शिक्षित आणि सुसंस्कृत होती. मला माझ्या करणीचे फळ मिळाले."

राजेसाहेब खुर्चीवरून ताडकन उठले आणि दालनात फेऱ्या मारायला लागले. राजेसाहेब तोंडाने अखंड शिव्यांची लाखोली वाहत होते. त्यांच्या अंत:करणातील क्षोभ, द्वेष, त्यांची झालेली क्रूर निराशा यामुळे राजेसाहेब वादळात सापडलेल्या झाडासारखे हेलकावे खात होते. त्यांचा आवेश भितीदायक होता. तरीसुद्धा देशपांडे वकिलांना या गोष्टीचे समाधान वाटले की राजेसाहेबांचा क्रोधाग्नी भडकलेला असताना, पलीकडे पिवळ्या रंगाच्या सॅटीनच्या उशीवर झोपलेल्या सौमित्रचा त्यांना विसर बिलकुल पडला नव्हता. त्याची झोपमोड होऊ नये म्हणून त्यांनी आवाज अजिबात चढवला नव्हता.

"मला असे काही होईल अशी शंका वाटत होती," राजेसाहेब म्हणाले. "रुद्रसेन आणि विरेंद्र, जन्मापासून माझ्यासाठी कधीही कौतुकास्पद नव्हते! मी त्या दोघांचा कायम तिरस्कार केला; आणि त्यांनी पण माझा तिरस्कार केला! त्या दोघांपैकी रुद्रसेन सर्वात वाईट होता. तरीसुद्धा मी अजून या स्त्रीच्या बोलण्यावर विश्वास ठेवणार नाही. मी शेवटपर्यंत याच्या विरोधात लढेन. पण हे वागणे रुद्रसेन सारखे आहे - अगदी त्याच्यासारखे आहे!"

राजेसाहेबांच्या रागाचा पारा परत एकदा चढला. त्यांनी देशपांडे वकीलांकडे त्या स्त्रीची चौकशी केली, सादर केलेल्या पुराव्यांची माहिती विचारली आणि परत त्यांनी फेऱ्या मारायला सुरुवात केली. त्यांचा चेहरा रागाने लालेलाल झाला होता. राजेसाहेबांची चौकशी पूर्ण झाली. त्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची

a

देशपांडे वकीलांनी उत्तरे दिली, जेव्हढ्या म्हणून वाईट गोष्टी होत्या त्या राजेसाहेबांना समजून चुकल्या. देशपांडे वकीलांना आता राजेसाहेबांच्या मन:स्थितीची काळजी वाटू लागली. राजेसाहेब पूर्णपणे आतून तुटल्यासारखे दिसत होते, थकले होते आणि पुर्णतः बदलल्यासारखे दिसत होते. त्यांच्या रागाचा पारा नेहमीच चढा असत असे पण यावेळच्या रागाचा महाभयंकर उद्रेक काही वेगळाच होता: त्यात रागापेक्षा वेगळे असे काहीतरी जास्त होते.

शेवटी राजेसाहेब सोफ्यावर झोपलेल्या सौमित्र जवळ आले आणि थरथरत्या हळू आवाजात कठोरपणे म्हणाले, "मी कधी मुलांवर प्रेम करेन असे कोणी मला सांगितले असते तर मी त्यावर विश्वास ठेवला नसता. मी माझ्या स्वतःच्या मुलांचा मी इतर मुलांपेक्षा जास्त रागराग करत असे. पण मला हा मुलगा आवडला, त्याच्यावर माझे प्रेम जडले," कडवटपणे हसून ते म्हणाले, "मी लोकप्रिय नाही आणि कधीच नव्हतो, पण मी याला आवडायला लागलो, हा मला कधीच घाबरला नाही - त्याने माझ्यावर कायम विश्‍वास ठेवला. मला या गोष्टीची कल्पना आहे की या मुलाने माझ्या जीवनातील पोकळी भरून काढली आणि इतक्या सुंदर रितीने काढली की मला तसे करणे कधीच शक्य झाले नसते. याच्यामुळे सरदेशमुखांच्या राजघराण्याचे नाव नक्कीच सगळीकडे दुमदुमले असते."

राजेसाहेब, खाली वाकून सौमित्रच्या झोपलेल्या आनंदी चेहऱ्याकडे बघत एक मिनिट उभे राहिले. त्याच्या जाड भुवया आक्रसल्या होत्या, आणि तरीही ते अजिबात उग्र दिसत नव्हते. त्यांनी सौमित्रच्या कपाळावर आलेले केस हलकेच मागे फिरवले आणि मग मागे वळून बेल वाजवली. त्यांचा खास सेवक आत आला तेव्हा त्यांनी सोफ्याकडे इशारा केला आणि म्हणाले, "उचलून घे" - आणि मग त्यांचा आवाज थोडा बदलला - "युवराज सौमित्रना त्यांच्या खोलीत घेऊन जा."

# प्रकरण 11

बापू शेठ यांचा छोटा मित्र सौमित्र, कुंतलपूरचा युवराज बनवण्यासाठी मुंबई सोडून कुंतलपूरला गेला आणि बापू शेठ अगदीच एकटे पडले. तसे बापू शेठ कधी फारसे लोकांत मिसळत नसत. त्यांना नेहमीची गिऱ्हाईक सोडल्यास इतर कुणाशी बोलण्याची वेळ येत नसे. आताशा वर्तमानपत्रे वाचायला पण त्यांना कंटाळा येऊ लागला होता. त्यातील बातम्यांवर चर्चा करण्यासाठी आता कोणी हक्काचा श्रोता नव्हता. परत परत त्यांना जुन्या गोष्टी आठवत. दुपारच्या रिकाम्या वेळात सौमित्रच्या मुळाक्षरांचा श्रीगणेशा बापू शेठ यांनीच केला होता. सौमित्र कुंतलपूरला गेल्यावर सुरवातीला बापू शेठना सौमित्र फार दूर गेला आहे असे काही वाटले नव्हते. तो कधीही परत येईल आणि आपण वाचत असलेल्या वर्तमानपत्रात डोकावून हसऱ्या चेहऱ्याने विचारेल, "नमस्कार, बापू शेठ कसे आहात? आज खूपच उकाडा वाढला आहे नाही का?" पण दिवसामागून दिवस सरले, सौमित्र काही परत आला नाही.

तसतसे बापू शेठ खूप कंटाळले, त्यांना खूप अस्वस्थ वाटू लागले, अगदी वृर्तमानपत्र वाचण्याचा पण कंटाळा येऊ लागला. ते बऱ्याच वेळा पेपर गुडघ्यावर ठेवून समोरच्या उंच स्टूलाकडे टक लावून बघत बसत. सौमित्र त्यांच्याबरोबर गप्पा मारता मारता स्टुलाच्या पायावर टाचा इतक्या जोरात आपटत असे की त्या जून्या पुराण्या स्टुलाच्या पायावर त्याच्या लाथांच्या खुणा उठल्या होत्या. बापू शेठ थोडा

a

वेळ तिकडे पहात, मग उसासा टाकत आणि दुकानाच्या दारात कुणाची तरी वाट बघत उभे रहात. कधी कधी सौमित्रने दिलेले सोन्याचे घड्याळ बघत बसत, तर कधी घड्याळाच्या पेटीच्या आतल्या बाजूला लिहिलेला मजकूर वाचत, "आपणाला रोज घड्याळ पाहिल्यावर माझी आठवण येईल. तुम्ही मला कधीही विसरु नये असे मला वाटते." खरंच त्याला विसरणे त्यांना अशक्य झाले होते. बटाट्याची पोती किंवा सफरचंदाची बुट्टी सरकवून ठेवताना सौमित्र मदत करायला पुढे येई, मध्यंतरी त्यांचा पाय दुखावला होता तेव्हा आपल्या चिमुकल्या खांद्याचा काठी सारखा उपयोग करायला त्याने मोठ्या काळजीने सुचवले होते आणि आनंदाने आधार देत असे, अशा या आठवणी आल्यावर बापू शेठ संध्याकाळी दुकान बंद झाल्यावर पाय मोकळे करायला समोरच्या गल्लीत जात आणि सौमित्रच्या घरापर्यंत फेरफटका मारत, घराच्या दर्शनी भागावर 'भाड्याने देणे आहे' ही पाटी पाहून हताशपणे माघारी वळत.

या अशा मनःस्थितीत दोन तीन आठवडे गेले, बापू शेठ यांच्या मनात एक नवीन कल्पना आली पण त्यांचा स्वभाव थंड असल्याने ही कल्पना सत्यात उतरण्यास अजून थोडा वेळ लागला. त्यांनी बबनला भेटण्याचे ठरवले होते. बबन सौमित्रचा जूना मित्र होता, सौमित्रने बापू शेठना बबनची सगळी माहिती सांगितली होती त्यामुळे त्याच्या बरोबर सौमित्र बद्दल बोलून थोडे बरे वाटेल असे बापू शेठना वाटले. ते बबनच्या बूटपॉलिश करण्याच्या नेहमीच्या जागी गेले. बबन एका गिऱ्हाईकाच्या बूटाना पॉलिश करत होता. बापू शेठ जवळ उभे राहून त्याला निरखून पाहू लागले. त्याने स्वच्छ गणवेश घातला होता. त्याच्या खिशावर नावाचा बिल्ला होता, बबन कदम, बिल्ला नंबर 51 . मागे त्यांच्या नावाची पाटी लावलेली होती.

बबन कदम : बिल्ला नंबर 51

योग्य दाम, चोख काम

धंदा सचोटीचा, पैसा कष्टाचा

हातातील काम संपवून बबनने बापू शेठ यांच्याकडे पाहिले आणि बूट पॉलिश करायचे आहे काय असे विचारले. बापू शेठनी मान डोलावली आणि आपले पाय त्याच्या पॉलीश करायच्या फळीवर ठेवले. बापू शेठ त्याच्या शर्टच्या बिल्ल्यावर आणि नावाच्या पाटीवर बघत होते. त्यांनी बबनला विचारले हा गणवेश आणि बिल्ला कुठून मिळाला? "माझ्या एका छोट्या मित्राने मला दिला. सध्या तो कुंतलपूरला असतो."

"तू सौमित्र बद्दल बोलत आहेस काय?" बापू शेठनी विचारले. बबन आश्र्चर्यचकीत झाला आणि बूट पॉलिश करायचे विसरून त्यांच्याकडे पाहात मोठ्याने म्हणाला "काय ? तुम्ही त्याला ओळखता का?"

"होय तर, त्याच्या जन्मापासून ओळखतो," बापू शेठ म्हणाले, त्यांना पुढे बोलणे अवघड झाले होते. त्यांनी खिशातून सोन्याचे घड्याळ काढून बबन पुढे धरले आणि घड्याळाच्या पेटीतील चिठ्ठी काढून त्याला वाचायला दिली. "ही किमती वस्तू त्याची आठवण म्हणून माझ्याकडे आहे, बाकी तो इथून गेल्यापासून मला त्याचा काही थांगपत्ता लागलेला नाही," बापू शेठ म्हणाले. "खरोखरच तो माझा सच्चा मित्र होता. अगदी लहान होता तेव्हा त्याचा बॉल त्याच्या हातातून सुटून माझ्यासमोर एका घोडागाडीच्या खाली गेला. मी चपळाईने तो त्याला परत आणून दिला. तेव्हापासून त्याने माझी ओळख ठेवली आहे. इकडे तो कधी कधी त्याच्या आईबरोबर किंवा राधाक्कांबरोबर आला की न चुकता मला भेटायला येत असे. खूपच आनंदी आणि दयाळू मनाचा होता. त्याच्याशी बोलल्यावर खूप चांगले वाटत असे, आपले दुःख विसरले जाई, तो दुःखाचे कारण लक्षात ठेवून मदतीला पुढे येत असे," बबन गहिवरून म्हणाला. "खरे बघायला गेले तर त्याला कुंतलपूरला युवराज

a

बनवण्यासाठी न्यायला नको होते. तो इथेच एक चांगला व्यापारी बनला असता," बापू शेठ नाराजपणे म्हणाले.

एकंदरीत बापू शेठ आणि बबनचे एका गोष्टीवर एकमत झाले की त्यांच्यामध्ये अजून अनेक गोष्टी बोलायच्या राहिल्या आहेत, म्हणून मग दुसऱ्या दिवशी बबनने त्याचे काम संपवून बापू शेठ यांच्या दुकानात यावे असे ठरले. या गोष्टीचा बबनला खूप आनंद वाटला. लहानपणापासून जरी तो रस्त्यावर वाढला असला तरी त्याला चांगल्याप्रकारे आयुष्य घालवावे अशी इच्छा होती. सध्या स्वत:चा धंदा सुरू केल्यानंतर अगदीच रस्त्यावर राहण्याऐवजी डोक्यावर छप्परच काय पण अजून चांगली प्रगती शक्य आहे, असे त्याला आतून वाटत होते. बापू शेठ यांच्यासारख्या घोडा गाडी बाळगणाऱ्या प्रतिष्ठीत दुकानदाराने भेटीचे आमंत्रण देणे, त्याला आपला बहुमानच वाटला.

ही त्यांच्या मैत्रीची सुरुवात होती. दुसरे दिवशी संध्याकाळी बबन दुकानात आला. तेव्हा बापू शेठनी त्याचे आपलेपणाने स्वागत केले. बसायला दाराजवळची थोडी डुगडुगणारी खुर्ची दिली. सौमित्रच्या लाथांच्या खुणा पायावर मिरवणारे उंच स्टुल बापू शेठनी बबनला दाखवले. बापू शेठ तसे 'एकटा जीव सदाशिव' असे गृहस्थ होते. दुकानाच्या मागच्या खोलीत त्यांचे स्वयंपाकघर होते. शेजारची एक स्त्री दोन्ही वेळेस स्वयंपाक रांधून जात असे. आज बबन पाहुणा म्हणून येणार होता, त्यांच्यासाठी बापू शेठनी दोन पदार्थ जास्त करून घेतले होते. गरमागरम भजी तयार होती. कित्येक दिवसांनी त्या दोघांना जेवताना सोबत मिळाली होती. आरामात जेवण झाले आणि मग लौकरच परत भेटण्याचे ठरवून बबनने बापू शेठ यांचा निरोप घेतला. पोरक्या बबनच्या आयुष्यातील तो खास प्रसंग होता, एकाकी बापू शेठना पण तो प्रसंग विसरणे शक्य नव्हते. या नंतर बबन आणि बापू शेठ यांच्या भेटीगाठी वाढल्या. बापू शेठना आता वर्तमानपत्र वाचनाच्या जोडीला इतिहासाच्या पुस्तक

a

वाचनाची गोडी लागली होती. एके दिवशी बापू शेठ जवळच्या वाचनालयात नाव घालून आले आणि हिंदुस्थानचा इतिहास, इंग्लंडचा इतिहास गोष्टी रुपाने वाचण्याचा सपाटा त्या दोघांनी लावला. एकंदरीत कुठलाही देश अथवा प्रदेश असो कट कारस्थाने हा राजकारणाचा अविभाज्य भाग असल्याचे त्यांना जाणवले आणि त्यांना सौमित्रच्या सुरक्षिततेची काळजी वाटू लागली.

सौमित्रचे कुंतलपूरहून पत्र येईपर्यंत बापू शेठ आणि बबन दोघेही काळजीमध्ये होते. सौमित्रचे पत्र मिळाल्यावर बापू शेठनी त्याचे अनेकदा पारायण केले आणि बबनला आलेले पत्र पण त्यांनी वाचून काढले. तेव्हा जरा कुठे त्यांचा जीव भांड्यात पडला. त्यानंतर त्यांची सौमित्र बरोबर पत्रापत्री सुरू झाली. पत्र पाठवण्यात आणि आलेले उत्तर वाचण्याचा जणू छंदच त्यांना जडला. सुरवातीला बबनला लिहताना थोडी अडचण येत होती कारण सराव नव्हता. जेव्हा तो त्याच्या भावाबरोबर रहात होता तेव्हा तो रात्र शाळेत जात होता. तसा तो तल्लख बुद्धीचा होता. पण शाळा लौकर सुटली मग जुनी वर्तमानपत्रे वाचून, खडूने भिंतीवर लिहून गरजेपुरते लिहायला आणि वाचायला शिकला होता.

बबनने बापू शेठना आपली सर्व हकीकत सांगितली. त्याच्या लहानपणीच त्याची आई देवाघरी गेली होती. तिच्या माघारी वडीलांनी मोठा मुलगा शंकर आणि धाकटा बबन यांचा सांभाळ केला. पण बबन पाच वर्षांचा झाला तेव्हा त्याचे वडील निवर्तले. बबन स्वतंत्रपणे घरोघरी पेपर टाकण्याएव्हढा मोठा होईपर्यंत त्याच्या भावानेच त्याची काळजी घेतली. शंकरला पण एका दुकानात चांगली नोकरी मिळाली. त्याच्या सचोटीवर आणि कामावर त्याचे मालक समाधानी होते. बबन पण रात्र शाळेत जायला लागला होता. घरची थोडी घडी बसत चालली होती. " आणि शंकर दादांचे लग्न ठरले," बबन सांगत होता, "शंकरदादाचे लग्न एका अतिशय सुंदर मुलीशी झाले. तिचे नाव सौदामिनी होते. सौदामिनी अनाथ होती,

नाटक मंडळीत लहान सहान काम करत असे. त्या नाटक मंडळीचा मुंबईतील मुक्काम संपत आला तेव्हा मुंबई सोडून जायचे तिच्या जीवावर आले होते. दिसायला सुंदर असल्याने तिच्या डोक्यात सिनेमात काम करण्याचे वेड शिरले होते. नाटक मंडळीना चुकवून ती मुंबईत राहिली पण तिला अजून बाहेरच्या जगाची ओळख झाली नव्हती. सिनेमात नुसते रुप असून चालत नाही, थोडे फार शिक्षण, अक्कल हुषारी आवश्यक असते हे तिला समजून चुकले. तिला जेमतेम नाव लिहता येत होते आणि रटफ करत वाचत असे, अगदी रिम्याडोक्याची होती. जेव्हा रस्त्यावर येण्याची वेळ आली तेव्हा शंकर भेटला आणि लग्न ठरले. तिच्याबरोबर लग्न करणे ही शंकरदादाची घोडचूक ठरली. पहिल्या दिवसापासून ज्या कुरबुरी सुरू झाल्या त्या शेवटपर्यंत सुरूच राहिल्या. तिला घरकाम अजिबात आवडत नसे. पहिल्याप्रमाणे दोन्ही भाऊ घरकाम करत. छानछोकीने रहायचे, नट्टापट्टा करून नाटक सिनेमा पाहायला तिला आवडत असे. गरीबीच्या संसारात ही आवड पूर्ण होणे अशक्य आहे तिच्या लौकरच लक्षात आले. मग भांडणे, आदळाआपट सुरू झाली. तशात बाळाचा जन्म झाला. बाळ अगदी किरकिर करत असे. दिवस रात्र किंचाळून रडत असे. घरात कुणालाच सुख नव्हते. वहिनीची मजल आता कजाग स्त्री सारखी हातातील वस्तू फेकून मला मारण्यापर्यंत गेली होती. एकदा तिने मला फेकून मारलेली ताटली बाळाच्या हनुवटीला लागली आणि बाळाच्या हनुवटीला खोच पडली, दवाखान्यात नेऊन चार टाके घालावे लागले. यानंतर दररोज पैशासाठी शंकरबरोबर भांडणे होत राहिली. तो कुठून जादूने पैसे आणू शकणार नव्हता. मुंबईत निभाव लागणे कठीण म्हणून तो मुंबई सोडून दूरच्या गावी काम शोधायला निघून गेला. त्यानंतर एक आठवडा पण गेला नाही, मी पेपर टाकून घरी आलो तर घराला कुलूप होते. मालकीण बाईंनी सांगितले की घर रिकामे करून वहिनी बाळाला घेऊन निघून गेली. मी अक्षरशः रस्त्यावर आलो. नंतर मला शेजारच्या एक काकू सांगत

होत्या की वहिनी पुण्याला एका मोठ्या सरदाराच्या लहान बाळाची देखभाल करण्याची नोकरी करण्यासाठी गेली होती. जर ती चांगलेपणाने नांदली असती तर सोन्याचा संसार झाला असता पण डामडौल, मोठेपणाची आवड, नट्टापट्टा, श्रीमंतीची हाव बहुदा तिच्या रक्तातच असावी त्यामुळे सगळे वाटोळे झाले असे त्या म्हणत होत्या.''

कामाच्या शोधात शंकर परगावी गेल्यावर एक दोनदा त्याचे बबनला पत्र आले. बरेच दिवस शंकरला चांगले काम मिळाले नाही. शेवटी नागपूर येथे संत्र्याच्या बागेत मुकादम म्हणून नोकरी मिळाली. बबनची आणि बापू शेठ यांची ओळख झाली त्या दरम्यान ही बातमी शंकरने पत्राने बबनला कळवली.  बबन, बापू शेठना सांगत होता, "खरंच त्यांने त्या मुलीबरोबर लग्न करायला नको होते. त्याचे आयुष्यभराचे नुकसान झाले. आता परत एकदा लग्नाला तो मुळीच तयार होणार नाही. त्याचा एकुलता एक मुलगा पण त्याच्यापासून दुरावला गेला. मला त्याच्याबद्दल खूपच वाईट वाटते."

बापू शेठ पाईपमध्ये तंबाखू भरत होते, ते काड्या पेटी आणायला दुकानाच्या गल्ल्याकडे गेले तेव्हा त्यांना वर्तमानपत्र पत्राच्या खाली एक पोस्टाचे पाकीट दिसले. बहुदा पोस्टमन तिथे ठेवून गेला असावा. त्यांनी ते निरखून पाहिले आणि म्हणाले की सौमित्रचे पत्र आले आहे. आता काय बातमी आहे पाहू, असे म्हणत त्यांनी काळजीपूर्वक पाकीट उघडले आणि तिथेच उभ्याने वाचू लागले,

" प्रिय बापू शेठ यांना,

सौमित्रचा साष्टांग नमस्कार,

मला तुम्हाला एक महत्त्वाची बातमी सांगायची आहे. माझी खात्री आहे की तुम्हाला ती बातमी वाचून आश्र्चर्याचा धक्का बसेल. मला कुंतलपूरचा युवराज समजण्यात चूक झाली आहे. त्यामुळे मी आता कुंतलपूरचा राजा बनणार नाही.

माझ्या मोठ्या काकांचे लग्न झाले होते, त्यांच्या मागे त्यांची पत्नी आणि एक लहान मुलगा आहे, जो कुंतलपूरचा युवराज बनेल. माझे वडील सर्वात लहान होते, कायद्याप्रमाणे मोठा मुलगा किंवा त्यांच्या माघारी त्याचा मुलगा युवराजपदाचा हक्कदार आहे. आता मी मुंबईत होतो तसा फक्त 'सौमित्र सरदेशमुख' आहे. आता माझ्या सर्व गोष्टी माझ्या चुलत भावाच्या मालकीच्या असतील. माझा घोडा आणि घोडागाडी पण मला त्याला द्यावी लागेल काय म्हणून मी आजोबांना विचारले पण आजोबांनी त्याची गरज नाही असे सांगितले आहे. आजोबांना खूप वाईट वाटले आहे. त्यांना त्या मुलाची आई आवडत नाही. त्या बाईने तिच्या लहान मुलाला राजवाड्यात आणले तेव्हा आणि माझे आजोबा आणि श्री देशपांडे वकील तिच्याशी बोलत होते. मला वाटते की ती रागावली होती आणि मोठमोठ्याने बोलत होती आणि माझे आजोबा सुद्धा रागावले होते. मी त्यांना या अगोदर कधीही रागावलेले पाहिले नव्हते. आजोबांना वाटते की मला आणि माझ्या आईला मी राजा बनणार नाही या गोष्टीचे दु:ख होत असेल. मला सुरुवातीला राजा बनणे आवडले नव्हते, पण आता मला समजले आहे की तुम्ही राजा असाल तर तुम्ही खूप चांगल्या गोष्टी करू शकता. मी आता श्रीमंत नाही पण मला माझ्या आईसाठी पैसे मिळवायचे आहेत. सध्या मी करीम चाचा कडून घोड्यांना शिकवून तयार करायचे काम शिकून घ्यावे असा विचार करत आहे.

मला तुम्हाला आणि बबनला मुद्दाम ही गोष्ट सांगायची होती. तुर्तास एवढेच.

तुमचा मित्र
सौमित्र सरदेशमुख
(कुंतलपूरचा युवराज नसलेला)"

a

बापू शेठ हताशपणे त्यांच्या खुर्चीत जाऊन बसले. "सत्यानाश झाला," असे म्हणून एकदम गप्प झाले. "खरे आहे, बराच मोठा गोंधळ उडाला आहे," बबन म्हणाला. "मला तर वाटते हा नक्कीच काहीतरी कट असावा. अपर्णाताई आणि सौमित्र साधी सरळमार्गी माणसे आहेत. कुणीतरी त्याचा गैरफायदा घेऊन हा बनाव रचला असेल अशी माझी खात्री झाली आहे. त्यांची फसवणूक केली जात आहे," बापू शेठ भयंकर चिडले होते. आताशी कुठे त्यांची संस्थानिकांच्या विरोधातली जहाल मते निवळायला लागली होती. आपला छोटा मित्र, सौमित्र युवराज बनला असून पुढे एका मोठ्या संस्थानाचा राजा बनणार आहे, याचा त्यांना अभिमान वाटू लागला होता आणि ही बातमी म्हणजे खरोखरच त्यांच्या आशेला सुरुंग लागल्यासारखे झाले होते. बराच वेळ त्यांनी बबनला सोबतीला ठेवून घेतले. रात्री खूप उशिरा बबन निघून गेल्यावर एकटेच समोरच्या गल्लीत पाय मोकळे करायला बाहेर पडले. परत येताना ते सौमित्रच्या रिकाम्या घरासमोर काही वेळ थांबले, "भाड्याने देणे आहे" या पाटीकडे एकटक पाहत अस्वस्थ मनाने धुम्रपान करत उभे राहिले.

# प्रकरण 12

राजवाड्यातील मेजवानी नंतर बरेच दिवस त्या मेजवानी संबंधी चर्चा केवळ कुंतलपूरच नव्हे तर आजुबाजुच्या प्रदेशात गाजत राहिली. अगदी पुण्या मुंबईच्या वर्तमानपत्रात पण या बाबत सविस्तर माहिती प्रसिद्ध झाली होती. त्या अनुषंगाने सौमित्रचे नांव सर्वत्र गाजू लागले. त्याचा गोड स्वभाव, त्याने त्याच्या कठोर स्वभावाच्या आजोबांवर केलेली जादू, कुंतलपूरच्या गोर गरीब जनतेमधील त्याची लोकप्रियता या साऱ्या गोष्टी सर्वांचे मनोरंजन करत होत्या. त्यानिमित्ताने आशुतोष आणि अपर्णाताईंची प्रेम कहाणी, राजघराण्याने अपर्णाताईंचा केलेला अव्हेर यांची पण चर्चा सगळयांच्या तोंडून ऐकायला येत होती. नेमके या सोबतच एका नवीन गरमागरम विषयाची पण भर पडली, ती म्हणजे युवराज रुद्रसेन यांचे सहा वर्षांपूर्वी झालेले गुप्त लग्न आणि त्यांच्या अकाली मृत्यूनंतर, अचानकपणे प्रगट झालेल्या त्यांच्या विधवा पत्नीने आपल्या मुलाचा युवराज म्हणून मान्यता मिळवण्यासाठी सुरू केलेली खटपट, या साऱ्या गोष्टींची जोरात चर्चा सुरू होती. सर्व गोष्टींबद्दल बरेच बोलले गेले आणि वर्तमानपत्रांत रकानेच्या रकाने भरून लिहिले सुध्दा गेले. मग अशी बातमी पसरली की कुंतलपूरचे राजेसाहेब नव्याने युवराज पदाचा दावा केलेल्या प्रकरणावर समाधानी नव्हते आणि कदाचित या प्रकरणाची कायदेशीर शहानिशा करूनच या खटल्याचा निकाल लावला जाईल आणि प्रचंड खळबळ उडाली.

a

खुद्द कुंतलपूरमध्ये तर या चर्चेला उत आला होता. राजवाड्यातील महत्वाच्या बातम्या श्रीपती कडून जनाबाईकडे आणि जनाबाईकडून तिच्या बहिणीला द्रौपदीबाईना समजत. दौपदीबाईंच्या दुकानात रोजच्या विक्रीबरोबर या बातम्यांचे प्रसारण होई. गावातील स्त्रिया पाणवठ्यावर बोलून झाले तरी मुद्दाम संध्याकाळी एकमेकींना चहाच्या वेळी भेटायला जात आणि मग खमंग चर्चा सुरू होत असे. नवीन मुलाला युवराज म्हणून मान्यता न देण्याचा राजेसाहेबांचा निर्धार आणि त्यांच्या आईबद्दल तीव्र संताप याबद्दल द्रौपदी बाईंना सर्वात जास्त माहिती होती त्यामुळे त्यांच्या दुकानात गिऱ्हाईकांची रिघ लागली होती. द्रौपदी बाई इतर बायकांना सांगत होत्या, "राजेसाहेबांनी ज्याप्रकारे सौमित्रला त्याच्या आईपासून वेगळे केले, त्याचेच हे फळ त्यांना मिळाले आहे. आता ते स्वतः त्याच्या इतक्या प्रेमात पडले आहेत की त्याच्यापासून वेगळे होण्याच्या कल्पनेनेच त्यांना वेड लागायची पाळी आली आहे. त्यात भर म्हणजे ती नवीन आलेली स्त्री दिसायला चांगली आहे, ठसठशीत चेहरा, काळे डोळे, लांब सडक काळे केस, इतकी सुंदर असूनही छोट्या युवराजांच्या आईसारखी घरंदाज स्त्री असल्याचे अजिबात दिसत नाही. ती एक मोठमोठ्याने बोलणारी, भांडखोर आणि कजाग स्त्री आहे. थोरामोठ्यांच्या घरी कसे वागावे बोलावे, याची तिला अजिबात समज नाही. अगदी श्रीपती, राजेसाहेबांचा खास सेवक सुध्दा म्हणत होता की राजवाड्यातील सेवकांना तिच्या आज्ञा पाळायला कमीपणा वाटेल. जर खरच ती राजवाड्यात राहायला आली तर श्रीपतीने राजवाडा सोडून जाण्याची तयारी केली आहे. त्या नवीन मुलाची तुलना तर छोट्या युवराजांशी होऊच शकत नाही. या सगळ्याचा शेवट काय होणार देव जाणे."

राजवाड्यातील सेवक मंडळी आपापसात चर्चा करत. देशपांडे वकील आणि राजेसाहेबांची सल्लामसलत राजेसाहेबांच्या दालनात बऱ्याचवेळा सुरू असे.

दासींच्या घोळक्यात पण याच विषयावर बोलणे चालत असे. शाही घोड्यांच्या तबेल्यात करीम चाचा सौमित्रचे गुणगान करतांना हळहळत असत. असा लहान मुलगा इतक्या वर्षात त्यांनी प्रथमच पाहिला असल्याचे त्यांचे म्हणणे होते, त्याच्याकडे उपजतच मुक्या प्राण्यांना वश करून घेण्याची क्षमता होती. त्याची घोडेस्वारी नैसर्गिक होती. त्याच्या सानिध्यात त्यांना खूप आनंद वाटत असे. आता पुढे काय? हाच प्रश्न करीम चाचांना पडला होता.

पण या सर्व गडबड गोंधळात फक्त एक व्यक्ती शांत होती ती म्हणजे खुद्द छोटे युवराज- ज्यांची युवराजपदाची मान्यता काढून घेतली जाण्याची दाट शक्यता होती. जेव्हा सर्वात प्रथम त्याला उद्भवलेल्या सर्व घडामोडींची माहिती दिली गेली तेव्हा सुरुवातीला तो थोडा गोंधळून गेला. थोडा काळजीत पडला पण त्याची मनोधारणा बिल्कुल बदलली नाही.

राजेसाहेबांनी जेव्हा त्याला या संबंधीची माहिती दिली तेव्हा तो नेहमीप्रमाणे जवळच्या स्टूलावर बसून एखादी मनोरंजक गोष्ट ऐकत असल्यासारखा शांत बसला होता. राजेसाहेबांचे बोलून झाल्यावर सौमित्र त्यांना म्हणाला, "हे मला विचित्र वाटते, खूप विचित्र!" राजेसाहेबांनी शांतपणे त्याच्याकडे पाहिले. त्यांच्या संपूर्ण आयुष्यात अशी विचित्र अनुभूती त्यांनी कधीही अनुभवली नव्हती. त्यांना सौमित्रच्या नेहमीच्या आनंदी हसऱ्या चेहऱ्यावर त्यांना आनंदी चिंता दिसत होती ही गोष्ट पण त्यांना नेहमीपेक्षा वेगळी वाटत होती.

"माझ्या आईकडून तिचे घर आणि बग्गी काढून घेतली जाणार काय?" सौमित्रने चिंतेच्या स्वरात विचारले, त्याचा आवाज थरथरत होता. "नाही!" राजेसाहेब ठामपणे मोठ्याने म्हणाले, "ते तिच्याकडून काहीही काढून घेऊ शकत नाहीत." "ठिक आहे!" सौमित्रने सुटकेचा निःश्वास टाकला "ते तसे करू शकत नाहीत काय?" मग त्याने आजोबांकडे पाहिले, आणि त्याच्या डोळ्यात एक विचित्र

सावली होती, डोळ्यातील चमक लोपली होती आणि ते मलूल दिसत होते. "तो दुसरा मुलगा," सौमित्रचा अगदी थरथरत होता, "त्याला--आता तुमचा नातू होईल-- जसा मी होतो--तसाच तो होईल ना?"

"नाही!" राजेसाहेबांनी ताडकन उत्तर दिले -त्यांचा आवाज एवढा चढला होता की सौमित्र दचकला आणि म्हणाला, "नाही? तो का नाही? मला वाटले----" असे म्हणत सौमित्र उठून स्टुलाच्या जवळ उभा राहिला. "जरी मी जरी राजा होणार नसेन तरी मी तुमचा नातू म्हणून राहू शकतो काय?" सौमित्र आनंदाने म्हणाला. "मी पूर्वी जसा होतो तसाच तुमचा नातू होऊ का?" त्याचा लालबुंद चेहरा आतुरतेने उजळून निघाला होता.

म्हातारे राजेसाहेब त्याच्याकडे डोक्यापासून पायापर्यंत पाहत राहिले, त्याच्या भल्यामोठ्या जाड भुवया आक्रसल्या होत्या, आणि त्याचे खोल गेलेले तीक्ष्ण डोळे एकदम चमकून उठले--सगळेच किती विलक्षण होते. "माझा नातू!" राजेसाहेब म्हणाले--कुणाचा विश्र्वास बसला नसता पण त्यांचा कंठ भरून आला होता, भावनाविवश झाल्याने आवाज थोडा थरथरत होता, तोंडातून शब्द फुटत नव्हते, शेवटी त्यांनी स्वतःवर ताबा मिळवला आणि निर्धाराने स्पष्ट शब्दात म्हणाले,--"होय, मी जिवंत असेपर्यंत फक्त तूच माझा नातू असशील; ईश्र्वराला स्मरून सांगतो कधी कधी मला असे वाटते की तू एकटाच माझा नातू आहेस."

सौमित्रचा चेहरा आनंदाने फुलून गेला होता; त्याचे गोरे गोबरे गाल लालबुंद झाले होते. त्याने आपले दोन्ही हात आपल्या पॅटच्या खिशात घातले आणि आपल्या प्रिय आजोबांच्या डोळ्यात निरखून पाहात म्हणाला, "तर मग मी युवराज असण्याने अगर नसण्याने काही फरक पडणार नाही असेच आहे ना? तुम्हाला सांगतो मला वाटले की तो युवराज होणारा मुलगाच फक्त तुमचा नातू असेल आणि तोच राजा बनेल- आणि त्यामुळेच माझा गोंधळ उडाला होता." राजेसाहेबांनी त्याच्या

a

खांद्यावर हात ठेवला आणि त्याला जवळ घेतले. "जे मी तुझ्यासाठी राखून ठेवले आहे ते तुझ्याकडून ते काढून घेऊ शकत नाहीत. ते तुझ्याकडून काहीही काढून घेऊ शकणार नाहीत हा माझा विश्वास आहे. तुझ्या हक्काची जागा अजूनही तुलाच मिळेल. पण काही झाले तरी मला तुला जे काही द्यायचे आहे ते मी तुला दिल्याशिवाय राहणार नाही," राजेसाहेब जरी सौमित्रशी बोलत होते पण प्रत्यक्षात ते स्वतःच स्वतःला वचनबद्ध करत होते असे वाटत होते. त्यांना सौमित्र किती प्रिय आहे आणि त्याचा त्यांना किती अभिमान वाटतो हे त्यांना आजवर उमगले नव्हते. सौमित्रची आंतरिक शक्ती, उत्तम गुण आणि त्याचे सौंदर्य त्यांना आज जसे जाणवले तसे यापूर्वी जाणवले नव्हते. त्यांनी एकदी गोष्ट मनावर घेतली तर त्यांचा जिद्दी स्वभाव कोणत्याही परिस्थितीत माघार घेणारा नव्हता. आणि म्हणूनच त्यांनी, कितीही संघर्ष करायचा लागला तरी हार मानायची नाही असा निर्धार केला होता.

देशपांडे वकिलांना भेटल्यानंतर थोड्याच दिवसांत युवराज पदासाठी आपल्या मुलाचा हक्क सांगणारी स्त्री, आपल्या मुलाला घेऊन राजवाड्यात हजर झाली. पण तिला दारातूनच परत पाठवण्यात आले. राजेसाहेब तिची भेट घेणार नाहीत, जे काही बोलणे होईल ते तिच्या वकीलांशी होईल असा राजेसाहेबांचा निरोप श्रीपतीने दारातच तिला दिला. नंतर श्रीपती इतर सेवक मंडळींना सांगत होता, “इतकी वर्षे मी राजघराण्याची चाकरी करण्यात घालवली आहेत त्यावरून त्या स्त्रीला पाहिल्यावर ती काही खानदानी घराण्यातील असेल असे काही वाटले नाही. या उलट जून्या राजवाड्यातील बाईसाहेब, भले त्या मुंबईतील सामान्य घरातून आलेल्या असोत, पण पाहताक्षणीच मी त्या भल्या घरच्या आहेत हे तेव्हाच हरीला सांगितले होते. जेव्हा त्या स्त्रीला राजवाड्याच्या दारातून निघून जाण्यास सांगितले तेव्हा तिचा सुंदर चेहरा घाबरलेला आणि संतापलेला होता.”

सुरवातीलाच देशपांडे वकीलांच्या लक्षात आले होते की तिचा स्वभाव तापट आणि उध्दट असून जरी ती मोठेपणाचा आव आणत असली तरी तिला रीतभात माहिती नसून एक गावंढळ स्त्री आहे. तशी बावळट म्हणायला हरकत नव्हती. ती हुशार किंवा धाडसी अजिबात नव्हती. तिच्यावर सध्या ओढवलेल्या परिस्थितीमुळे ती अडचणीत सापडली होती. तिला असे काही होईल याची कल्पना नव्हती असे वाटत होते.

देशपांडे वकील, अपर्णाताईंना भेटायला गेले तेव्हा म्हणत होते, "ती स्त्री अतिशय निम्न वर्गातून आलेली आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. ती एक अर्धशिक्षित आणि असंस्कृत असून, थोरामोठ्यांच्या बरोबर वागण्याबोलण्याची तिला सवय नाही. राजवाड्यातून भेट न घेता राजेसाहेबांनी तिला माघारी पाठवले तेव्हा घाबरली होती आणि रागाने चरफडत होती. मी राजसाहेबांना ती ज्या ठिकाणी उतरली होती त्या अतिथीगृहात जाऊन तिची भेट घेण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे मी आणि राजेसाहेब तिकडे गेलो. राजेसाहेबांनी दालनात प्रवेश करताना पाहून ती भीतीने पांढरीफटक पडली होती पण लगेच तिच्या रागाचा पारा चढला आणि तिने धमकीच्या स्वरूपात आपल्या मागण्या राजेसाहेबांकडे एका दमात मांडल्या."

राजेसाहेब त्या दालनात एखाद्या दैत्यासारखे उभे होते, त्यांची धिप्पाड शरीरयष्टी संपूर्ण दालन व्यापून राहिल्यासारखी वाटत होती. राजेसाहेब तोंडातून एक शब्दही न काढता त्या स्त्रीकडे स्थिर नजरेने पाहात होते. त्यांनी डोक्यापासून पायापर्यंत तीक्ष्ण दृष्टीने तिचे निरीक्षण केले. राजेसाहेब शांतपणे तिचे बोलणे ऐकत उभे होते, त्यांच्या नजरेत फक्त तिरस्कार दिसत होता. ती बोलून बोलून थकून जाईपर्यंत राजेसाहेबांनी एक शब्दही उच्चारला नाही. शेवटी ती बोलायची थांबल्यावर राजेसाहेब म्हणाले: "माझ्या मोठ्या मुलाची आपण पत्नी आहात असे आपले म्हणणे आहे आणि त्यासाठी आपण पुरावे सादर केले आहेत, जर ही गोष्ट

a

जर खरी असेल तर कायदा आपल्या बाजूने आहे आणि त्यानुसार आपला मुलगा कुंतलपूरचा युवराज बनेल. परंतु या प्रकरणाची खात्रीने सखोल चौकशी केली जाईल. जर आपण केलेला दावा कायद्याच्या दृष्टीने खरा ठरला तर त्याची योग्य अंमलबजावणी होईल. पण जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत आपले अथवा आपल्या मुलाचे तोंड देखील पाहण्याची माझी इच्छा नाही. आपल्या दुर्दैवाने माझ्या मृत्यूशिवाय आपल्याला इथे जागा मिळणार नाही. माझा मुलगा रुद्रसेन ज्या प्रकारची व्यक्ती निवडेल असे मला वाटत होते बरोबर त्याच प्रकारची व्यक्ती आपण आहात." असे म्हणून राजेसाहेबांनी तिच्याकडे पाठ फिरवली आणि रागारागाने तिथून बाहेर पडले.

हा प्रसंग घडून थोडेच दिवस झाले, सकाळी अपर्णाताई आपल्या खोलीत काही लिहीत होत्या, तेव्हढ्यात वाड्यावरची मोलकरीण घाईघाईने आत आली, ती खूप भांबावलेली दिसत होती. घाबरलेल्या स्वरात ती अपर्णाताईंना म्हणाली, "बाईसाहेब, स्वतः राजेसाहेब आले आहेत." अपर्णाताई दिवाणखान्यात गेल्यावर वाघाची कातडी कमावलेल्या बैठकी जवळ एक अतिशय उंच, धिप्पाड असे वृध्द गृहस्थ उभे होते. देखणा गंभीर चेहरा, जाड भुवयांखाली वेध घेणारे तीक्ष्ण डोळे, गरुडाच्या चोची सारखे नाक, पिकलेल्या मोठ्या मिशा त्यांच्या चेहऱ्यावर ताठरपणा स्पष्ट दिसत होता. "मी मार्तंडदेव, कुंतलपूर संस्थानाचा अधिपती, " राजेसाहेबांनी आपली ओळख करून दिली.

अपर्णाताईंनी डोळे वर करून त्यांच्याकडे पाहिले. क्षणभर राजेसाहेबांची नजर त्यांच्या नजरेला मिळाली आणि राजेसाहेबांना ते डोळे पाहून, प्रेमळ, निष्पाप, तपकिरी रंगाचे सौमित्रचे मोठे डोळे आठवले आणि एक वेगळीच उत्सुकता वाटली. "सौमित्र अगदी तुमच्यासारखाच दिसतो," ते पटकन म्हणाले. "अनेक लोक असे

मला सांगतात, पण मला त्याच्यात त्याच्या वडिलांचा थोडाफार भास होतो या गोष्टीचे समाधान वाटते," अपर्णाताई नम्रपणे म्हणाल्या.

रुक्मिणी देवींनी त्यांना सांगितल्याप्रमाणे, अपर्णाताईंचा आवाज खूप गोड होता आणि वागणे खूप साधे आणि खानदानी स्त्रीला साजेसे होते. त्यांच्या अचानक येण्याने त्या जराही बावरून अथवा घाबरून गेल्या नव्हत्या. "होय, तो माझ्या मुलासारखा पण दिसतो," राजेसाहेब मिशीला पीळ म्हणाले, "मी इथे का आलो ते तुम्हाला माहिती आहे काय?"

"होय, देशपांडे वकिलांनी केलेल्या दाव्यांच्या बाबतीत मला सांगितले आहे." राजेसाहेब म्हणाले, "मी तुम्हाला सांगायला आलो आहे की, या दाव्यांच्या बाबतीत सखोलपणे चौकशी केली जाईल आणि कायदेशीररीत्या लढून पूर्ण ताकदीने आपल्या मुलाचा बचाव केला जाईल. हक्क---" त्यांचे बोलणे अपर्णाताईंनी मध्येच थांबवले आणि शांतपणे हळुवार स्वरात त्या म्हणाल्या, "जर कायद्याने देऊ केलेल्या गोष्टींवर त्याचा अधिकार नसेल तर तो त्याला मिळावा अशी माझी इच्छा नाही."

"दुर्दैवाने कायदा असा भेदभाव करु शकत नाही. तरीसुद्धा जे काही करणे आवश्यक आहे ते केलेच पाहिजे. त्या आक्रस्ताळी स्त्रीला आणि तिच्या मुलाला चांगला धडा शिकवायला हवा," राजेसाहेब चिडून म्हणाले.

"सरकार, कदाचित ती तिच्या मुलाची तितकीच काळजी घेत असेल जितकी मी सौमित्रची काळजी घेते," लहानखुऱ्या चणीच्या अपर्णाताई सहजपणे म्हणाल्या "आणि जर ती स्त्री आपल्या मोठ्या मुलाची पत्नी असेल, तर तिचा मुलगा कुंतलपूरचा युवराज बनेल, माझा नाही."

सौमित्र प्रमाणे अपर्णाताई राजेसाहेबांना अजिबात घाबरल्या नव्हत्या. सौमित्रसारखे थेट त्याच्या नजरेला नजर भिडवून त्या बोलत होत्या. आजवर सर्वत्र

राजेसाहेबांची ख्याती एक निरंकुशपणे सत्ता गाजवणारा संस्थानिक अशीच होती. लोक त्यांना घाबरत असत. त्यांना न घाबरता सहजपणे त्यांच्याशी थेट संवाद साधणाऱ्या व्यक्ती अगदी हाताच्या बोटावर मोजता येण्या इतक्या पण नव्हत्या, त्यामूळे ही गोष्ट त्यांच्या मनाला सुखावून गेली.

"मला वाटते," कपाळाला आठ्या घालत राजेसाहेब म्हणाले, "सौमित्र कुंतलपूरचा युवराज नसणे हे तुम्ही जास्त आवडेल असे वाटते." अपर्णाताईंचा चेहरा लाल झाला होता. "सरकार, कुंतलपूरचा अधिपती बनणे ही खूप मोठी गोष्ट आहे, मला हे माहित आहे, परंतु मला वाटते की त्याने त्याच्या वडीलांसारखे व्हावे- शूर, उदार न्यायप्रिय आणि सत्यवादी."

"म्हणजे त्याच्या आजोबांच्या अगदी उलट, असेच ना?" राजेसाहेब उपहासाने म्हणाले.

"मला त्याच्या आजोबांना जाणून घेण्याची संधी मिळाली नाही," अपर्णाताई म्हणाल्या, "पण माझ्या मुलाचा असा विश्वास आहे," क्षणभर त्या थांबल्या आणि शांतपणे त्यांच्या चेहऱ्याकडे पाहत त्या पुढे म्हणाल्या, "की त्याचे आजोबा शूर, उदार, न्यायप्रिय आणि सत्यवादी आहेत, त्याचे तुमच्यावर प्रेम आहे."

"मी तुम्हाला राजवाड्यात प्रवेश का दिला नाही, हे समजल्यावर त्याने माझ्यावर प्रेम केले असते?" राजेसाहेब कोरड्या स्वरात म्हणालेले  "नाही, असे मला वाटत नाही," अपर्णाताईंनी उत्तर दिले, "आणि म्हणूनच त्याला ते कळावे अशी माझी इच्छा नव्हती."

"ठीक आहे," राजेसाहेब तुटकपणे म्हणाले, "काही मोजक्याच स्त्रिया असा विचार करणाऱ्या असतील." राजेसाहेब अचानकपणे मिशावर हात फिरवत खोलीमध्ये ताड ताड फेऱ्या मारत बोलायला सुरुवात केली, "होय, तो माझ्यावर प्रेम करतो," राजेसाहेब म्हणाले, "आणि मला तो आवडतो. या अगोदर मी कुणावरही

a

प्रेम केले नव्हते पण मला तो फार आवडतो, अगदी पहिल्यापासून त्याने मला आनंद दिला. माझे आता वय झाले आहे, मी आयुष्याला कंटाळलो होते, त्यांने, त्यांने मला जगण्यासाठी काहीतरी कारण दिले. मला त्याचा अभिमान आहे. एक दिवस तो संस्थानाचा प्रमुख होणार या विचाराने मला आंतरिक समाधान मिळत होते."

फेऱ्या मारताना ते थांबले आणि अपर्णाताईंच्या समोर येऊन उभे राहिले आणि म्हणाले, "माझी अवस्था दयनीय झाली आहे, मी खूप दुःखी आहे." आणि ते खरोखरच तसे दिसत होते, त्यांचा अभिमान, अहंकार गळून गेला होता. त्यांचा आवाज कापत होता, हात थरथरत होते. क्षणभर असे वाटले की त्यांच्या खोल गेलेल्या, उग्र डोळयांत अश्रू तरळत असावेत.

"कदाचित मी दुःखी आहे म्हणून मी तुमच्याकडे आलो आहे," ते अपर्णाताईंकडे बघत म्हणाले. "मी तुमचा तिरस्कार करत होतो; मला तुमचा हेवा वाटत होता. पण या भिकारड्या लाजिरवाण्या प्रकाराने सर्व काही बदलून गेले. मी स्वतः माझा मुलगा रुद्रसेन याची पत्नी म्हणवून घेणारी ती तिरस्करणीय स्त्री पाहिल्यानंतर, मला खरोखरच तुमच्याकडे पाहून दिलासा वाटला. मी एक जिद्दी म्हातारा मूर्ख माणूस आहे, मी तुमच्या बरोबर चुकीच्या पद्धतीने वागलो. सौमित्र माझ्या आयुष्यातील पहिली अनमोल ठेव आहे. मी खूप दुःखी माणूस आहे, तुम्ही तुमच्या मुलासारख्या प्रेमळ आहात म्हणून मी तुमच्याकडे आलो आहे. तो तुमची काळजी करतो आणि मला त्याची काळजी लागून राहिली आहे. तुमच्या मुलाच्या चांगल्यासाठी तुम्ही शक्य तेव्हढे मला समजून घ्यावे, हे सांगण्यासाठी मी इथे आलो आहे." वरवर पाहता राजेसाहेब अतीशय परखडपणे आणि निष्ठूरपणे बोलत होते पण ते आतून तुटून गेले होते. त्यांच्या त्या शब्दानी अपर्णाताईंच्या हृदयाचा ठाव घेतला आणि त्यांनी उठून हाताची खुर्ची थोडी पुढे सरकवली आणि आपल्या गोड

a

आवाजात सहानुभूतीच्या स्वरात त्या राजेसाहेब म्हणाल्या, "आपण बसावे, आपण खूप थकला आहात, आपण थोडा आराम करावा."

राजेसाहेबांशी इतक्या सौम्य आणि साध्या पद्धतीने काळजी वाटून कोणी कधी बोलले नव्हते. त्यांना परत सौमित्रची आठवण आली. खरोखरच ते थकले होते. अपर्णाताईंनी सांगितल्याप्रमाणे ते खुर्चीत विराजमान झाले. दु:ख आणि निराशेने ते हतबल झाले होते तसे नसते तर त्यांनी अजूनही अपर्णाताईंचा तिरस्कारच केला असता. पण त्यांना खरोखरच थोडा आराम वाटू लागला होता. अपर्णाताईंचा प्रसन्न चेहरा, शांत स्वभाव, गोड आवाज आणि आदरपूर्वक बोलणे या साऱ्यांचा परिणाम एखाद्या जादूसारखा झाला आणि ते थोडे शांत झाले. "काही झाले तरी, सौमित्रला सर्व सोईसुविधा मिळतील. आता आणि भविष्यात त्याची घेतली जाईल," राजेसाहेबांनी शब्द दिला.

निघण्यापूर्वी त्यांनी एकदा दिवाणखान्यावर नजर टाकली आणि विचारले, "आपल्याला घर आवडले काय?"

"होय, खूप आवडले," अपर्णाताई म्हणाल्या. "ही एक आनंदी वास्तू आहे, मी पुन्हा इथे येऊन या विषयावर बोलू शकतो काय?" राजेसाहेबांनी विचारले. "आपण आपल्या इच्छेनुसार कितीही वेळा इथे येऊ शकता," अपर्णाताईंनी उत्तर दिले.

राजेसाहेब शांतपणे घोडागाडीकडे निघाले, गाडीवान आणि राजेसाहेबांचा खास सेवक अवाक होऊन त्यांना बघतच राहिले.

# प्रकरण 13

कुंतलपूरच्या युवराजांची सौमित्रची हृदयस्पर्शी कहाणी आणि नव्याने युवराज पदासाठी केलेल्या दाव्यामुळे राजेसाहेबांपुढे उद्भवलेल्या अडचणी याची चर्चा कुंतलपूर संस्थानातील वर्तमानपत्रां बरोबरीने पुण्या मुंबईतील वर्तमानपत्रांमध्ये सुध्दा गाजू लागली. परस्पर विरोधी माहिती वाचून बापू शेठ आणि बबन अचंबित झाले. सौमित्रच्या बाबत बऱ्याच काल्पनिक गोष्टी लिहिल्या गेल्याने बापू शेठ चक्रावून गेले. कुंतलपूरच्या राजेसाहेबांनी युवराज पदासाठी नव्याने सांगितलेल्या हक्का संबंधी आणि त्याला कायदेशीररीत्या शहानिशा करण्याचे ठरवल्याची बातमी पण प्रामुख्याने छापून येत होती. त्यानिमित्ताने कुंतलपूर संस्थानाचा वैभवशाली इतिहास, ऐश्वर्यसंपन्न वारसा, मालकीचे गड किल्ले आणि जून्या नव्या राजवाड्यांचे वर्णन पण वर्तमानपत्रात छापून येत राहिले. बापू शेठ आणि बबनला सौमित्रची काळजी वाटून राहिली होती. त्यांनी सौमित्रला पत्र लिहून त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. बापू शेठनी वेळ पडल्यास देशपांडे वकीलांशी सल्लामसलत करण्याची तयारी दाखवली. आणि अगदीच वेळ आली तर आपल्या दुकानात भागिदारी देण्याचा शब्द दिला. मुंबईत त्यांच्यासाठी हक्काचे घर आणि मित्र सदैव असल्याची ग्वाही दिली. बापू शेठ आणि बबनने, सौमित्रचे युवराजपद गेले तरी सदैव त्याच्या पाठीशी राहण्याचे ठरवले होते.

a

बबन फुटपाथवर जिथे बुटपॉलीश करत असे तिथून जवळच एका नवोदित तरूण वकीलाचे लहानसे साधेसुधे ऑफिस होते. त्यांचा अजून व्यवसायात चांगला जम बसला नसल्याने फारसे काम नव्हते पैशाची आवक बेतास बेत होती. पण तो एक हुषार आणि उत्साही तरुण होता. रोज बबन त्याच्या बुटाना पॉलीश करत असे त्यावेळी थोड्याफार गप्पागोष्टी होत असत. त्यादिवशी बबन बूट पॉलिश करत असताना ते तरूण वकील पेपर पाहण्यात दंग होते. बबनने बूट चकचकीत केले आणि त्या तरूण वकीलांनी पेपर बबनला दिला आणि सांगितले, "डबा खाताना पेपर बघ. राजवाड्याचा फोटो आहे आणि राजेसाहेबांच्या सुंदर सूनबाईंचा पण फोटो छापून आला आहे. कुंतलपूरचे राजेसाहेब आणि त्यांच्या सूनबाई यांच्या मध्ये बेबनाव निर्माण झाल्याची बातमी आहे."

बबनचे लक्ष पहिल्या पानावरच्या फोटो कडे गेले आणि त्याला धक्काच बसला. एका देखण्या स्त्रीचे चित्र होते, तिचे डोळे मोठे होते, तिने काळ्याभोर केसांच्या जाड वेण्या घातल्या होत्या. खाली लिहिले होते: "युवराज पदावर हक्क सांगणाऱ्या मुलाची आई." बबन डोळे विस्फारून, आ वासून फोटोकडे पाहत होता. वकीलांनी बबनला विचारले, "बबन काय झाले? असा एकदम गप्प का झालास?"

"मी, मी तिला ओळखतो, खूप चांगला ओळखतो," बबन म्हणाला. वकील हसायला लागले, "कसे काय? त्यांना तू कुठे भेटलास? मुंबईत की पुण्यात?" बबन हसायचे विसरून गेला आणि भराभर आपले सामान गोळा करून काम बंद करायच्या तयारीला लागला. "कसे आणि कुठे का असेना, मी तिला ओळखतो, आता मी काम बंद करत आहे." पुढच्या पाच मिनिटात बबन काम बंद करून बापू शेठ यांच्या दुकानाकडे सुसाट पळत सुटला.

बापू शेठ दुकानात गल्ल्यावर बसलेले होते. धापा टाकत आलेल्या बबनला पाहून ते गोंधळून गेले. बबनच्या हातात वर्तमानपत्राची घडी होती, त्याने ती बापू

शेठ यांच्या पुढ्यात टाकली, जोरात पळत आल्याने त्याच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. बबनने समोर टाकलेल्या वर्तमानपत्राकडे पाहात बापू शेठनी बबनला विचारले, "यामध्ये काय आहे?" बबन अजूनही धापा टाकत होता, "हा फोटो पहा, ती खानदानी घराण्यातील स्त्री नाही, तो मुलगा युवराज नाही ती स्त्री, आमच्या घरातून पळून गेलेली शंकरदादाची बायको सौदामिनी उर्फ मिनी आहे, हे मी शपथेवर सांगू शकतो."

बापू शेठ म्हणाले, "मला वाटत होते तसेच घडले आहे, हे मुद्दाम कोणीतरी सौमित्रच्या विरोधात कटकारस्थान रचले आहे."

"हे नक्कीच तिचे नाटक आहे. असली नाटके करण्यात ती पटाईत आहे. तिचा फोटो पाहिल्यानंतर पुढच्या क्षणाला मी तुम्हाला हे सांगण्यासाठी पळत पळत आलो. फोटो बरोबर तिच्या मुलाच्या संदर्भात लिहिले आहे, त्याच्या हनुवटीला टाके पडल्याची खूण आहे. तिनेच मला फेकून मारलेली ताटली बाळाच्या हनुवटीला लागली आणि दवाखान्यात नेऊन चार टाके घालावे लागले. तो कुंतलपूरच्या राजेसाहेबांच्या मोठ्या मुलाचा मुलगा नसून माझ्या शंकरदादाचा मुलगा आहे," बबन म्हणाला.

बबन कदम हा जात्याच एक हुशार मुलगा होता आणि मुंबई सारख्या शहरात रस्त्यावर राहून काम करून पोट भरण्यासाठी धडपड करतांना त्याने खूप व्यवहारज्ञान मिळवले होते. त्या क्षणी त्याच्या मनात खूप खळबळ उडाली होती, सौमित्रचे युवराज पद पणाला लागले होते तसेच त्याचा शंकरदादाला आपल्या मुलगा कायमचा गमावण्याची वेळ आली होती. या सगळ्या पार्श्वभूमीवर बापू शेठना आपल्यावरच्या जबाबदारीची जाणीव झाली. बबनला ही बातमी आपल्या शंकरदादाला कधी एकदा कळवतो असे झाले होते. त्याने गडबडीने शंकरदादाला पत्र लिहायला घेतले, पत्रासोबत वर्तमानपत्रातील बातमीचे कात्रण आणि फोटो

कापून जोडला. बापू शेठनी पण एक सौमित्रसाठी आणि दुसरे कुंतलपूरच्या राजेसाहेबांसाठी अशी दोन पत्रे लिहिली. पत्र लिहितांना बबनला एक वेगळीच कल्पना सुचली. तो बापू शेठना म्हणाला, "मला ज्यांनी हा पेपर दिला ते एक वकील आहेत. आपण त्यांचा सल्ला घेऊ. अशा प्रसंगी नेमके काय करावे लागते या गोष्टींची वकिलांना चांगली माहिती असते." बबनच्या या सूचनेचे बापू शेठना मोठे कौतुक वाटले आणि त्याच्या व्यवहारी बुद्धीने बापू शेठ प्रभावित झाले. "खरोखरच वकीलांशी बोलणे गरजेचे आहे," असे म्हणत बापू शेठनी जून्या नोकराला दुकानाकडे लक्ष देण्याची सूचना केली आणि आपण तयार होऊन बबन सह घोडागाडीतून वकीलांच्या ऑफिस कडे निघाले. सत्येंद्र हेगडे वकीलांना, भेटायला आलेल्या पक्षकारांना पाहून आश्चर्य वाटले. बापू शेठनी आपला परिचय करून दिला. बबनची आणि त्यांची तर ओळख होतीच. नवोदित वकील असल्याने, त्यांच्या हाताशी फारसे काम नव्हते त्यामुळे वेळ मात्र भरपूर होता. सगळी गोष्ट ऐकल्यावर त्यावर त्यांचा विश्वास बसला. तसे ते उत्साही गृहस्थ होते. त्यांना काहीतरी वेगळे करण्याची इच्छा होती. एका राजघराण्याच्या संदर्भातील इतकी विलक्षण गोष्ट ऐकून ते प्रभावित झाले.

सुरवातीलाच बापू शेठनी वकीलांना त्यांचा योग्य मोबदला दिला जाईल असा शब्द दिला होता. मात्र एकंदरीत प्रकरण खूपच गुंतागुंतीचे आणि राजघराण्याशी संबंधित असल्याने प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने लक्ष देण्यास बापू शेठनी मुद्दाम सांगितले होते. "ठीक आहे," सत्येंद्र हेगडे वकील म्हणाले, "आपण मांडत असलेली बाजू जर का सिद्ध झाली तर ती गोष्ट, कुंतलपूरच्या युवराजांप्रमाणेच माझ्या स्वतःच्या कारकिर्दीसाठी खूप महत्वाची असेल. काही झाले तरी याची शहानिशा करण्यात काही गैर नाही. युवराज म्हणून सादर केलेल्या मुलाच्या बाबतीत काही संशयास्पद गोष्टी आहेत हे उघड आहे शिवाय त्या स्त्रीच्या निवेदनात आणि

a

प्रत्यक्ष बोलण्यात, त्या मुलाच्या वयाच्या बाबतीत काही विसंगती आढळल्याने संशय बळावला आहे. तेव्हा आपल्याला बबनचा भाऊ शंकर आणि कुंतलपूरच्या राजेसाहेबांचे देशपांडे वकील या दोघांना तातडीने पत्र पाठवावे लागेल."

संध्याकाळपर्यंत दोन्ही पत्रे लिहून पूर्ण झाली आणि जलद टपालाने नागपूर आणि कुंतलपूर कडे रवाना केली गेली. त्या दिवशी बापू शेठ यांचे दुकान बंद झाल्यावर, बापू शेठ आणि बबन दुकानाच्या मागच्या खोलीत जेवण झाल्यानंतर मध्यरात्रीपर्यंत एकत्र बोलत बसले होते.

a

# प्रकरण 14

नशीबाचे फासे उलटे अथवा सुलटे पडायला क्षणाचा पण वेळ लागत नाही असे म्हणतात, हे खरे आहे. चार सहा महिन्यांपूर्वी बापू शेठ यांच्या दुकानातील उंच स्टुलावर बसून गप्पा मारणारा सौमित्र, एका क्षणात कुंतलपूर सारख्या ऐश्वर्यसंपन्न संस्थानाच्या युवराज पदाचा मानकरी झाला आणि अशाच एका क्षणात कुणी तरी आक्षेप घेतल्याने त्याला युवराज पद आणि सर्व ऐश्वर्य गमावण्याची वेळ आली. आश्चर्याची गोष्ट अशी घडली की सौमित्रची बदललेली परिस्थिती, गमावलेले ऐश्र्वर्य आणि युवराजपद, परत एकदा त्याच्याकडे सन्मानपूर्वक परत मिळण्याची संधी, अपेक्षेपेक्षाही लौकर चालून आली.

ही गोष्ट लौकर घडून येण्यासाठी, युवराजपदावर आपल्या मुलाचा हक्क सांगणारी खुद्द त्या मुलाची आईच कारणीभूत ठरली असे म्हटले तर वावगे ठरले नसते. आपल्या मुलाचा युवराज पदावर हक्क सांगणारी स्त्री, दुष्ट नक्कीच होती पण तितकीशी ती बुद्धिमान आणि चाणाक्ष नव्हती. देशपांडे वकिलांनी तिच्याकडे, तिच्या आणि युवराज रुद्रसेन यांच्या लग्नाविषयी आणि मुलाच्या जन्मासंबधी कसून चौकशी केली. नेमक्या त्यावेळी तिच्याकडून दोन तीन गंभीर चूका झाल्या, त्यामुळे देशपांडे वकीलांच्या संशय बळावला. या गोष्टींची तिला जाणीव झाल्यावर, तिच्या मनाचा तोल अजून ढळला आणि तिचे उसने अवसान गळाले त्यामुळे रागाच्या भरात तिच्या कडून अधिकाधिक चूका होत राहिल्या. या सर्व चुका तिच्या मुलाच्या जन्मासंबधी होत्या.

a

एक गोष्ट स्पष्ट होती की तिचे आणि रुद्रसेन यांचे लग्न झाले होते आणि सततच्या भांडणामुळे ते वर्षभरात वेगळे झाले होते, या गोष्टीची कुठून वाच्यता न करण्यासाठी आणि तिच्या खर्चासाठी तिला मोठी रक्कम दिली गेली होती याविषयी काही शंकाच नव्हती. पण वर्षभरात, पुण्यामध्ये मुलगा जन्मल्याच्या तारखेचा योग्य मेळ बसत नव्हता. काहीतरी गडबड आहे हे देशपांडे वकीलांच्या लक्षात आले. त्याच वेळी मुंबई मधील तरुण वकिलांचे त्यांना पत्र आले आणि बापू शेठ यांचे त्याच संदर्भात राजेसाहेबांना देखील पत्र आले. दोन्ही पत्रे मिळाल्यावर राजेसाहेब आणि देशपांडे वकिलांनी सल्लामसलत केली.

देशपांडे वकील म्हणाले, "पहिल्या दोन तीन भेटीनंतर मला तिचा संशय येऊ लागला होता. मला असे वाटले की त्या मुलाचे वय ती सांगत आहे त्यापेक्षा निश्चितच जास्त असावे. मुलाची जन्मतारीख सांगताना तिने चूक केली पण नंतर सारवासारव करून निराळी तारीख सांगितली. या पत्रांवरून माझा संशय खरा असल्याचा निष्कर्ष काढायला हरकत नाही. आता या पुढची योजना म्हणजे या दोन्ही भावांना, बबन आणि शंकर यांना तार करून ताबडतोब कुंतलपूरला बोलावून घेऊ, या बाबत तिला पूर्णपणे अंधारात ठेवायला हवे. तिला काही संशय न येऊ देता अचानक त्या दोघांना तिच्या समोर उभे करून एकदाच काय खरे खोटे करावे असे मला वाटते. ती स्वतःला जेव्हढी हुषार समजते तेव्हढी हुषार नाही शिवाय तिची बाजू लंगडी आहे. माझे असे मत आहे की तिचे खोटे बाहेर पडल्यावर ती घाबरून जाईल आणि स्वत: विणलेल्या जाळयात अलगद अडकेल.”

प्रत्यक्षात त्यांना वाटले तसेच घडले. देशपांडे वकिलांनी तिला भेटून चौकशी सुरू आहे अशी मोघम माहिती दिली. तिला आपली योजना सफल होत आहे असा समज झाला आणि तिचा आत्मविश्वास वाढू लागला. देशपांडे वकीलांच्या अपेक्षेप्रमाणे ती जास्त उद्धट होऊ लागली. एका सुंदर सकाळी ती

अतिथीगृहात आपल्या सोनेरी भविष्याची स्वप्ने पाहत बसली होती, अचानकपणे देशपांडे वकील आल्याची वर्दी आली. जेव्हा ते आत आले तेव्हा त्यांच्या सोबत तीन व्यक्ती होत्या. त्यापैकी एक पंधरा सोळा वर्षांचा तरतरीत मुलगा आणि दुसरा सत्तावीस अठ्ठावीस वर्षांचा तरूण आणि तिसरे खुद्द राजेसाहेब होते.

त्यांना पाहाताच भीतीने तिने किंकाळी फोडली. खऱ्या खोट्याची शहानिशा करण्याअगोदरच तिचा धीर सुटला. इतक्या दूरवरून इतक्या वर्षांनी ते दोघे अचानक समोर उभे राहतील याची तिने कधी कल्पना सुद्धा केली नव्हती. बबन तिच्याकडे बघून उपहासाने हसला आणि कोरडेपणाने कसे काय विचारले. शंकरने तिच्याकडे एक जळजळीत नजर टाकली. देशपांडे वकीलांनी त्या दोघांना विचारले, "तुम्ही यांना ओळखता काय?"

"हो," शंकर म्हणाला. "मी तिला चांगलाच ओळखतो आणि ती मला ओळखते." असे म्हणून त्याने तो तिच्याकडे पाठ फिरवली आणि खिडकीतून बाहेर बघत उभा राहिला, त्याला तिचे तोंडही पाहण्याची इच्छा नव्हती. ती आपले खोटे बाहेर पडल्याने ती गडबडली आणि तिचा स्वतःवरचा ताबा सुटला. ती बेभान होऊन तोंडाला येईल ते बडबडायला लागली. बबन आणि शंकर तिच्या अशा वागण्याला चांगले परिचित होते. सर्वांचा उद्धार करून नेहमीप्रमाणे तिने धमक्या द्यायला सुरुवात केली. पण शंकरने तिच्या धमक्यांना भीक घातली नाही किंवा मागे वळून तिच्याकडे पाहिले देखील नाही. बबनने तिच्या त्राग्याला हसण्यावारी नेले.

"मी कोणत्याही कोर्टात शपथेवर साक्ष देऊ शकतो," शंकर देशपांडे वकिलांना म्हणाला, "मुंबईतील आमच्या चाळीतील मंडळी देखील या गोष्टीची पुष्टी करतील." अचानकपणे शंकर तिच्या जवळ गेला आणि तिचा हात घट्ट पिरंगळत तिला जोरात विचारले, "माझा मुलगा गणेश कुठे आहे, मला माहित आहे तो तुझ्याकडेच आहे. यापुढे तो माझ्याकडे असेल कायमचा. तू एक चांगली बायको तर

होवू शकली नाहीस, पण एक चांगली आई पण झाली नाहीस. पैश्याच्या हव्यासापोटी पहिला नवरा जिवंत असताना दुसरे लग्न केलेस आणि आता माझ्या मुलाला तोतया युवराज बनवून हे सगळे वैभव हडप करायला निघालीस, तू आई नाही तर त्याची वैरीण झाली आहेस. तुझा हा हेतू मी सफल होऊ देणार नाही. माझ्या मुलाला मी माझ्या बरोबर घेऊन जात आहे." हा आवाज ऐकून एका लहान मुलाने शेजारच्या खोलीचा दरवाजा उघडला आणि तो बाहेर आला. दिसायला तो त्याच्या आईसारखा देखणा नव्हता, बहुतेक बापाच्या- शंकरच्या वळणावर गेला होता. नाकी डोळी बेतास बेत, तब्बेतीने धट्टाकट्टा आणि त्याच्या सारखा मितभाषी होता. हनुवटीला टाके पडल्याची खूण स्पष्टपणे दिसत होती.

शंकर त्याच्याजवळ गेला, त्याचे डोळे अश्रूंनी डबडबले होते, खाली वाकून त्याने मुलाला मिठीत घेतले आणि छातीशी घट्ट कवटाळून त्याचा पापा घेतला. "बाळ गणेश, तुझी टोपी कुठे आहे?" शंकरने विचारले.

गणेशने खुर्चीवर पडलेली टोपी दाखवली. त्याला टोपी घालून बाहेर नेले जात असल्याचा आनंद झाला होता. गणेश अगदी वर्षांचा झाला नव्हता तेव्हा त्याची आई त्याला घेऊन तिच्या एका नाटक कंपनीतील ओळखीच्या बाईकडे- कमलाबाई कडे घेऊन आली होती. कमलाबाईंचे वय झाल्यामुळे तिला कुठे काम मिळत नव्हते. तिच्या नाटक कंपनीत ओळखीची मंडळी आता सिनेमामध्ये शिरली होती. पुण्यात एका चाळीत एका खोलीत ती रहात होती. सौदामिनीला परत एकदा सिनेमात नशीब आजमावून पाहायचे होते. एका नवीन सिनेमा कंपनीला नायिकेच्या भूमिकेसाठी एक सुंदर स्त्री कलाकार हवी होती हे कमलाबाईला तिच्या ओळखीच्या मेकअप करणाऱ्या माणसाकडून समजले म्हणून तिने सौदामिनीला ताबडतोब मुंबईहून पुण्याला बोलावून घेतले. रूद्रसेन यांचा मित्र सिनेमा बनवणार होता आणि रूद्रसेन निर्माता बनले होते. नायिका म्हणून तिची लगेच निवड झाली मात्र ती

विवाहित असून एका मुलाची आई असल्याचे फक्त कमलाबाईंना माहित होते. त्यांनी ही गोष्ट गुप्त ठेवून मुलांचा सांभाळ करण्याचे कबूल केले. त्यासाठी दरमहा पैसे पाठवून देण्याचे सौदामिनीने मान्य केले. काही अडचणींमुळे सिनेमाचे काम सुरूच झाले नाही दरम्यान निर्माते रूद्रसेन आणि सौदामिनीचे सूत जमले. आशुतोषच्या लग्नाच्या अनुभवाने राजेसाहेब या विवाहाला कदापिही मान्यता देणार नाहीत म्हणून रुद्रसेन यांनी सौदामिनीशी गुप्तपणे विवाह केला. सुरवातीचे काही महिने बरे गेले पण लौकरच त्यांच्यामधील वाद विकोपाला गेले आणि मोठी रक्कम शिवाय दरमहा खर्चासाठी पैसे घ्यायचे मान्य करून सौदामिनीने त्यांच्यापासून दूर होण्यास मान्यता दिली. ही व्यवस्था रूद्रसेन जिवंत असेपर्यंत बिनबोभाट सुरू राहिली. मात्र त्यांच्या मृत्यूनंतर दरमहा येणारे पैसे थांबले. तो पर्यंत सुरवातीला मिळालेल्या पैशाला बरेच पाय फुटले होते. आणि अचानक कुंतलपूर संस्थानाच्या नव्या युवराजांच्या संदर्भात जिकडे तिकडे चर्चा सुरू झाली. लग्नाच्या संदर्भात तडजोड करणारे गोडबोले वकील सौदामिनीच्या चांगलेच परिचयाचे होते. त्यांना तिचा पूर्व इतिहास पण माहित होता. पहिल्या पतीपासून झालेला मुलगा गणेश, कमलाबाईंकडे असतो हे सर्व त्यांना माहित होते. कमलाबाई, सौदामिनी आणि गोडबोले वकील या तिघांनी मिळून गणेश हा रुद्रसेन यांचा मुलगा आहे असा बनाव रचला. याकामी रुद्रसेन आणि सौदामिनी यांच्या लग्नाचे आणि त्यानंतरच्या समझोत्याचे पुरावे गोडबोले वकीलांकडे होते. पण गणेशच्या खोट्या जन्म दाखल्यासाठी थोडी खटपट करावी लागली. सौदामिनीने कमलाबाईकडून मुलाला आणले. तो बिचारा आईला पण ओळखत नव्हता. कमलाबाईंना फक्त आत्याबाई असे समजत असे. त्याच्या सारख्या साध्या भोळया जीवाला या बदलांना सामोरे जाणे अवघड होते. म्हणून त्यांने खाणे आणि खेळण्यांची खेळणे या दोनच गोष्टीत मन रमवले होते.

आज शंकरने तू माझा मुलगा आहेस म्हणून जवळ घेतल्यावर तो त्याला प्रेमाने बिलगला आणि त्याच्या बरोबर जाण्यासाठी तयार झाला. बबनने गणेशची टोपी उचलून त्याच्या डोक्यावर ठेवली आणि मी तुझा काका बबन अशी ओळख करून दिली.  तिथून ते तिघे बाहर पडताना शंकरने देशपांडे वकिलांना सांगितले, "मी माझ्या मुलाला घेऊन जात आहे. तुम्हाला माझी गरज पडल्यास मी कधीही येईन. माझा पत्ता तुम्हाला माहिती आहे."

सौदामिनी त्या जाणाऱ्या तिघांना पाहातच राहिली. आता सर्व खेळ खलास झाला होता. तसा तिच्या रागाचा पारा चढला आणि ती अद्वातद्वा बडबडत राहिली. राजेसाहेब शांतपणे तिच्याकडे पाहत होते. ते म्हणाले, "असे वागणे इथे चालणार नाही. कुंतलपूर संस्थानाची फसवणूक केल्याच्या प्रयत्नांसाठी तुरुंगात आपली रवानगी व्हायला नको असेल तर ताबडतोब हा तमाशा बंद झाला पाहिजे."

त्यांच्या बोलण्यातून तिला पुढचा मार्ग सुचवला गेला होता आणि तो एकच तिथून सुटका होण्याचा सुरक्षित मार्ग होता. तिने त्यांच्याकडे एक तीव्र कटाक्ष टाकला. रागारागाने ती शेजारच्या खोलीत गेली आणि धाडकन दरवाजा ओढून घेतला. "आपल्याला तिच्यापासून आणखी त्रास होणार नाही," देशपांडे वकील म्हणाले. आणि ते बरोबर होते; त्याच रात्री तिने अतिथीगृह सोडले आणि पुण्याला जाणारी ट्रेन पकडली, त्यानंतर ती कुणाला दिसली नाही.

राजेसाहेब अतिथीगृहातून बाहेर पडले ते दारात उभ्या असलेल्या घोडागाडीत घाईघाईने चढले. बसल्या बसल्या घोडागाडी जून्या वाड्याकडे घेण्यास श्रीपतीला सांगितले. श्रीपतीने गाडीवानास गाडी जुन्या राजवाड्याच्या दिशेने वळवायला सांगितली आणि हळू आवाजात म्हणाला, "मी खात्रीने सांगतो की एक नवीन आणि चांगली घटना घडण्याची ही नांदी आहे." वाड्यातील दिवाणखान्यात सौमित्र आईबरोबर बसला होता. राजेसाहेबांनी आल्याची वर्दी देण्यासाठी मनाई

a

केली आणि अचानकपणे दिवाणखान्यात प्रवेश करते झाले. पटकन अपर्णाताई सामोऱ्या आल्या. आज राजेसाहेबांचा चेहरा प्रसन्न होता, त्यांचे डोळे कुणाला तरी शोधत होते, "आमचे छोटे युवराज कुठे आहेत?"

"म्हणजे तो युवराज आहे? हे खरे आहे?" अपर्णाताईंनी विचारले, त्यांचा चेहरा आनंदाने फुलून गेला होता. "होय, तोच कुंतलपूरचा छोटा युवराज आहे," राजेसाहेब म्हणाले.

अचानक त्यांना काहीतरी सुचल्या सारखे झाले आणि थोड्या अधिकारवाणीने ते सौमित्रला म्हणाले, "तुमच्या आईसाहेबांना विचारा की त्या आपल्या राजवाड्यात कधी राहायला येणार आहेत?" युवराज आईच्या कमरेला बिलगले आणि मोठ्याने ओरडून म्हणाले, "आमच्या बरोबर राहण्यासाठी! आमच्या बरोबर कायमचे राहण्यासाठी!"

अपर्णाताईंनी राजेसाहेबांकडे पाहिले, ते पण त्यांच्याकडेच पाहात होते. राजेसाहेबांचे डोळे तेच सांगत होते जे सौमित्र म्हणत होता. त्यांचा चेहरा गंभीर होता. त्यांनी आता सर्व गोष्टींवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचा निश्चय केला होता. युवराजांच्या आई, राजघराण्याचा प्रतिष्ठेला शोभणाऱ्या आहेत याची त्यांना मनोमन खात्री पटली होती. तरी सुध्दा अपर्णाताईंनी त्यांना स्पष्टपणे विचारले, "आपणास मी खरोखरच राजवाड्यात राहायला आलेले चालणार आहे काय?"

"नक्कीच! राजेसाहेब स्पष्टपणे म्हणाले, "आम्हाला आपले वास्तव्य राजवाड्यात नेहमी करता हवे आहे, याची नेमकी जाणीव आम्हाला आता झाली आहे. आपण याल अशी आशा आहे."

# प्रकरण 15

शंकर आपल्या मुलाला, गणेशला घेऊन परत नागपूरला दोन दिवसांनी ट्रेनने परत जाणार होता. तो पर्यंत ते राजेसाहेबांचे पाहुणे होते. देशपांडे वकील त्यांना भेटायला आले होते. त्यांनी राजेसाहेबांच्या सूचनेवरून एक योजना शंकर आणि गणेशच्या भवितव्यासाठी बनविली होती. राजेसाहेब पत्नी, शांतलादेवी या नागपूरच्या राजघराण्यातील होत्या. त्यांना स्त्रीधनामध्ये नागपूरच्या जवळची एक मोठी संत्र्याची बाग मिळाली होती. त्या होत्या तोवर त्यांनी त्याकडे लक्ष घातले होते. तिकडचा कारभारी दरवर्षी हिशोब आणि बागेतील निवडक माल कुंतलपूरला पोहोचत होता. त्या गेल्यावर तिकडे दुर्लक्ष झाले. देशपांडे वकिलांनी शंकरला त्या बागेचा संपूर्ण कारभार सोपवण्याचा राजेसाहेबांचा निर्णय कळवला. त्या मुलाच्या खोटारड्या आईची शिक्षा तिच्या मुलाच्या मिळू नये अशी त्यांची इच्छा होती. शंकर जेव्हा गणेशला सोबत घेऊन नागपुराला परत गेला, तेव्हा तो एका मोठ्या बागेचा कारभारी म्हणून गेला, आता त्याला स्वतःच्या आणि गणेशच्या भविष्याची काळजी उरली नव्हती.  पुढील आयुष्यात ते दोघे बापलेक यशस्वी आणि आनंदी झाले. शंकर नेहमी म्हणत असे की गणेशच्या पायगुणाने आयुष्य सुखाचे झाले.

वास्तविक पाहता बापू शेठ आणि बबन, सौमित्रला मदत करण्याच्या हेतूने कुंतलपूरला आले होते पण सर्व गोष्टी योग्य पध्दतीने मार्गी लागल्यावर ते लगेच मुंबईला परतले नाहीत.

कुंतलपूरच्या राजेसाहेबांनी बबनच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था कुंतलपूर मध्ये करण्याचे योजिले होते. त्या प्रमाणे त्याला स्वतंत्र शिकवणी लावून मॅट्रिकच्या

a

परिक्षेची तयारी करून घेण्याचे काम परत एकदा देशपांडे वकिलांकडे लागले आणि ते त्यांनी नेहमीप्रमाणे यशस्वी करून दाखविले.

बापू शेठनी दुकानाची सर्व जबाबदारी त्यांच्या सर्वात जून्या आणि विश्र्वासू नोकरावर सोपवली होती. त्यांचा जूना नोकर सुदामा आणि त्याचा तरूण मुलगा रामचंद्र दुकान चांगले सांभाळतील यांची बापू शेठना खात्री होती. त्यामुळे दोन महिन्यांनी येणारा सौमित्रचा आठवा वाढदिवस साजरा होईपर्यंत त्यांचा मुक्काम कुंतलपूर मधील अतिथीगृहात असणार होता.

कुंतलपूरचे राजेसाहेब आणि बापू शेठ यांच्या मध्ये फक्त एक दुवा होता तो म्हणजे सौमित्र हा होय. तसेही बापू शेठ यांची संस्थानिकांच्या संबंधी मते आता कुठे सौमित्र मुळे थोडे फार निवळायला लागली होती आणि राजेसाहेबांचा उभ्या जन्मात कधी किराणा दुकानदाराशी कधी संबंध आला नव्हता. मग अशा वेळी मुंबईतून मदतीला आलेल्या पाहुण्यांची म्हणजे बापू शेठ आणि बबनची सरबराई करण्याची जबाबदारी सौमित्रवर आली.

उद्यानाच्या प्रवेशद्वारावरच्या रुबाबदार दगडी सिंहांच्या शिल्पापासून सौमित्रने त्यांचा राजवाडा दाखवायला सुरवात केली. प्रथमदर्शनीच बापू शेठ विस्मयचकित झाले. राजेसाहेबांची खास घोडागाडी पाहुण्यांच्या सेवेत रुजू होती. ते भव्य उद्यान, तिथली वनराजी, तिथे बागडणारी हरणे, नाचणारे मोर, तुरुतुरु पळणाऱ्या खारूताई आणि आवाजाला घाबरून धूम ठोकणारे ससे, उद्यानातील मोठे तळे बबन आणि बापू शेठ दोघेही पाहण्यात दंग झाले होते. त्यांना माहिती करून द्यायला सौमित्रला पण आनंद वाटत होता. राजवाड्याच्या प्रांगणातील फुलबागा, बागेतील लता मंडप, तलाव, तलावातील कारंजे, तरंगणारी बदके, पोहणारे मासे, फुललेली कमळे सगळे कसे मनमोहक दृश्य होते. राजवाड्याच्या समोरच्या प्रांगणातील भल्या मोठ्या तोफा, सैनिकांचा जागता पहारा, समोरचे घड्याळ,

a

राजवाड्याची भव्यदिव्य अष्टकोनी इमारत, सर्वात वर फडकणारा जरीपटका पाहिल्यावर बापू शेठ यांचा उर अभिमानाने भरून आला. त्यांनी राजवाड्याच्या तळघरातील अंधार कोठडी जरा लांबूनच पाहिली. जून्या नव्या शस्त्रांचे भांडार असलेले शस्त्रागार, घोड्यांच्या पागा, शाही घोड्यांसाठीचा वेगळा तबेला, मोठमोठी दालने, भले मोठे जिने, चकचकीत पॉलिश केलेले उंची फर्निचर, राजवाड्याच्या वरच्या दगडी गच्चीवरून आजूबाजूचा सर्व टापूचे निरिक्षण करता येत होते. तिथून नदीचे नागमोडी पात्र मोठे सुंदर दिसत होते. राजेसाहेबांची लायब्ररी पाहिल्यावर बापू शेठ आणि बबनला आश्र्चर्याचा धक्काच बसली. एव्हढी मोठी ग्रंथसंपदा पाहून त्यांचे डोळे दिपून गेले.

राजवाड्यात वावरणारे लाल गणवेशधारी नोकर पाहून बापू शेठ आणि बबन गोंधळून गेले. बापू शेठना सर्वात आवडलेले दालन म्हणजे चित्रांची गॅलरी होती. तेथे देश विदेशातील महान चित्रकारांच्या चित्रांनी भिंती सजवलेल्या होती. त्यांना किती आणि काय काय पाहू? असे झाले होते. दालनातील एक बाजू कुंतलपूरच्या राजघराण्यातील व्यक्तींच्या तसबिरींनी सजली होती. कित्येक तसबीरी तर दिड दोनशे वर्षांपूर्वीच्या असाव्यात. कुंतलपूर घराण्याचा संपूर्ण इतिहास चित्र रूपाने तिथे मांडला गेला होता असे म्हटले तर वावगे ठरले नसते. त्यात एक फोटो खास होता. राजेसाहेब, राणी सरकार आणि त्यांची तिन्ही मुले लहान असतानाचा फोटो होता. तसाच आशुतोष इंजिनिअर झाल्यावर पदवीदान समारंभाचा फोटो पाहिल्यानंतर बापू शेठ यांचे डोळे ओले झाले. एव्हढा समृद्ध वारसा असलेल्या घराण्यातील एक असलेला त्यांचा लाडका सौमित्र पुढे जाऊन राजा बनणार, तो वारसा पुढे चालवणार या विचाराने बापू शेठ भारावून गेले.

युवराज सौमित्रच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एक मोठा समारंभ आयोजित केला होता. फक्त जवळचे कुटुंबिय आणि मिस्टर थाॅमस ब्रिटिश रेसिडेंट यांचे

a

सारखे सन्माननीय खास पाहुणे वगळल्यास बाकी आम लोकांना आमंत्रण दिले होते. अगदी द्रौपदीबाई पासून श्रीपतीच्या घरच्या मुलाबाळांना आमंत्रण होते. गुरव मास्तरांना सहकुटुंब आमंत्रण होते ते काही वेगळे सांगायला नको. नवीन वसाहती बनवणारे कामगार तसेच तिथे नव्याने राहायला जूने भाडेकरू, सर्वच जण येणार होते. गाव जेवणासाठी त्या दिवशी चूल बंद म्हणून अगोदरच दवंडी पिटली होती. संध्याकाळी आतषबाजी होणार होती.

सौमित्रच्या आठव्या वाढदिवसाचा दिवस उजाडला. सकाळी त्याच्या आईने आणि राधाक्कानी सुवासिक उटणे त्याला लावून स्नान घातले. पाच सुवासिनींनी औक्षण केले. राजवाड्यातील मंडळींसाठी पंचपक्वानांचे जेवण होते. रुक्मिणी देवी आणि त्याचे पती हेमचंद्र दोघे समारंभासाठी खास आले होते. अपर्णाताईंना राजवाड्यात पाहून रुक्मिणी देवी आनंदित झाल्या.

तीन चार वाजल्यापासून उद्यानात गावकरी जमायला लागले होते. मोठा शामियाना उभारला होता. खास पाहुण्यांची बसण्याची सोय केली होती. व्यासपीठावर राजेसाहेब, सौमित्र, रूक्मिणी देवी, राजे हेमचंद्र आणि अपर्णाताई बसल्या होते. लोक रांगेने येऊन सौमित्रचे अभिष्टचिंतन करत होते.

गुरव मास्तर आणि काही मुलांनी सौमित्रच्या संबंधी भाषण करून यांच्या चांगल्या स्वभावाचा आणि उत्तम गुणांचा सर्वांना परिचय करून दिला. नरसिंह कुलकर्णी पण सौमित्रचे कौतुकाचे चार शब्द बोलले. सर थॉमस यांची कन्या मार्गारेट बर्थडे विश करून गेली. सौमित्रने तिची बबनशी ओळख करून दिली. अपर्णाताईंना व्यासपीठावर मिळालेले स्थान पाहून स्त्रीवर्ग आनंदीत झाला होता. राजेसाहेबांच्या बदललेल्या रूपाला सौमित्र कारणीभूत ठरला आहे अशी सर्वांची धारणा होती ती अधिक पक्की झाली. यानंतर मेजवानीचा कार्यक्रम झाला. कित्येक वर्षांनंतर आज आम आणि खास लोक एका मांडवात जेवले.

a

आतषबाजी साठी खास कवठे एकंद या गावातून तज्ञ मंडळी बोलावली होती. खरोखरच लोकांच्या डोळयांचे पारणे फिटले. एव्हढ्या उतारवयात राजेसाहेबांच्या स्वभावातील सकारात्मक बदल पाहून लोकांच्या मनातील त्यांच्या बद्दलची कटूता कमी झाली होती. आता नव्या आशेने लोक त्यांच्याकडे पाहात होते.

कुंतलपूरचे राजेसाहेबांचे संपूर्ण लक्ष सौमित्रवर खिळलेले होते. तो उद्यानात सगळीकडे फिरत होता. त्याच्या ओळखीच्या लोकांशी बोलत होता. कोणी अभिनंदन केले तर हसून स्वीकार करत होते. बबन आणि बापू शेठ मजेत गप्पा मारत होते त्यांच्या बरोबर थोडा बोलत थांबला. त्याची आई गावातील स्त्रीयांशी बोलत उभी होती तिथे जाऊन सौमित्र चार शब्द बोलून आला. हे सर्व पाहिल्यावर राजेसाहेब त्याच्याबद्दल पूर्ण समाधानी झाले. आणि जेव्हा ते सर्वात मोठ्या शामियान्यात गेले तेव्हा तर त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. सगळेजण त्याचे अभिष्टचिंतन करत होते. त्याच्या एका बाजूला त्याची आई आणि दुसऱ्या बाजूला आजोबा होते.

दोन स्त्रिया सौमित्रला पाहत उभ्या होत्या. त्यांच्या डोळयात पाणी दाटले होते. त्यांनी मोठ्याने त्याला आशीर्वाद दिले: "देव आपले रक्षण करो! आपल्याला उदंड आयुष्य लाभो! आपण असेच सर्वांना प्रिय व्हाल!"

सौमित्रला आनंद झाला. तो उभा राहिला आणि हसला, आणि वाकून त्याने त्यांना नमस्कार केला. आणि आपल्या आईला म्हणाला, "माझ्यावर सर्वजण प्रेम करतात. मला खूप भारी वाटत आहे." राजेसाहेब त्याच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाले, "तर मग तू सर्वांना तसे सांगितले पाहिजेस."

सौमित्रने आईकडे पाहिले तिने मानेने होकार दिला. सौमित्र उठला थोडा पुढे झाला, त्याने सर्वांवर एक नजर टाकली. त्याच्या सुंदर निष्पाप प्रसन्न चेहऱ्यावर निश्र्चय दिसत होता. त्याने धाडसाने बोलायला सुरुवात

a

केली, "मी आपल्या सगळ्यांचा खूप खूप आभारी आहे. आपल्या सर्वांसोबत मला वाढदिवस साजरा करताना खूपच आनंद होत आहे, मला आशा आहे की आपणही माझ्या वाढदिवसाचा आनंद लुटावा. मी मोठा झाल्यावर कुंतलपूरचा राजा होणार ही गोष्ट प्रथम मला फारशी आवडली नव्हती. पण आता मला या गोष्टीचा आनंद वाटत आहे. मला हा राजवाडा, हा परिसर, इथली माणसे सर्व काही आवडत आहे. मी मोठा झाल्यावर माझ्या आजोबांसारखा चांगला राजा बनण्याचा प्रयत्न करणार आहे." टाळ्यांच्या कडकडाटात तो थोडा मागे झाला आणि खाली वाकून आपल्या आजोबांच्या पायावर डोके ठेवले. राजेसाहेबांनी त्याला वर उठवून आपल्या छातीशी घट्ट कवटाळून धरले आणि मग मस्तकाचे अवघ्राण केले.

बापू शेठ यांचे वैयक्तिक मत राजेशाही आणि ब्रिटिश सरकारच्या विरोधात होते हे गोष्ट मुंबईतच अगदी स्पष्ट झाली होती. पण आता प्रत्यक्ष राजघराण्याचा पाहुणचार स्विकारल्यानंतर त्या भूमिकेत थोडा का होईना फरक पडल्याचे दिसून येऊ लागले. ते स्वतःशी विचार करत होते, "मुळात या राजघराण्यांनी आपापल्या काळात महत्वाची कामगिरी बजावली होती ही गोष्ट विसरून चालणार नव्हती. बाजी प्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे किंवा 1857 चे स्वातंत्र्य युध्दातील नानासाहेब पेशवे, झाशीची राणी या साऱ्यांनी परकियांच्या विरोधात जीवाची बाजी लावली होती ही गोष्ट विसरून चालणार नाही. आता त्यांचे वंशज ब्रिटिश सत्तेशी हातमिळवणी करून प्रजेवर दडपशाही करत असतील ते ते निषेधार्ह आहे. पण म्हणून सर्वच संस्थानिक सारखे आहेत असे समजून चालणार नाही. जर एखादा संस्थानिक आपल्या सौमित्र सारखा साधा आणि प्रेमळ असेल तर 'रयतेचा राजा' बनून नक्कीच चांगले काम करू शकेल यात शंकाच नाही." आपल्या बदलेल्या भूमिके मागील पूर्वपीठिका त्यांना स्वतःला मान्य झाल्यावर त्यांनी असा निष्कर्ष काढला, "मी काही स्वतः त्यांच्यापैकी एक संस्थानिक बनणार नाही ही एक खूप

चांगली गोष्ट आहे, पण एक चांगला संस्थानिक बनण्यास लायक असलेल्या या छोट्या युवराजांच्या पाठीशी रहाणे आवश्यक आहे आणि मी ते काम जीवात जीव असेपर्यंत करणार हे नक्की." एव्हढा सगळा विचार पक्का झाल्यावर त्यांनी मुंबईचा बाडबिस्तरा गुंडाळून ठेवण्याचे ठरवले. त्यांनी हा विचार देशपांडे वकीलांना सांगितला. नंतर मग देशपांडे वकीलांच्या शिफारशीमुळे नवीन वसाहतीमध्ये एक सरकार मान्य स्वस्त दुकान उघडण्याचे ठरले. बापू शेठ ना फक्त देखरेख करायची होती. आता त्यांच्या वाढत्या वयामुळे त्यांना जास्त दगदग झाली नसती हे ओळखून काही होतकरू तरुणांना त्यांच्या मदतीला देण्याचा निर्णय झाला. मुंबईतील दुकान जूना नोकर सुदामा आणि त्याचा मुलगा रामचंद्र यांना विकून बापू शेठनी मुंबईला रामराम केला.

दुसरी एक आनंदी व्यक्ती होती ती म्हणजे खुद्द राजेसाहेब. आयुष्यभर श्रीमंत आणि उच्च कुळातील असले तरी ते खऱ्या अर्थाने आनंदी नव्हते. अचानक सौमित्रच्या येण्याने जादूची कांडी फिरवावी असा त्यांच्यात बदल झाला नाही हे खरे होते. पण त्या निष्पाप लहान मुलाने दयाळूपणे अडल्या नडल्यांसाठी मदतीचा प्रस्ताव ठेवला असता सुरवातीला त्यांना, त्या मुलाचा त्यांच्या चांगुलपणावरचा विश्र्वास भंग करण्याचे त्यांना धाडस झाले नाही. म्हणून मग हळूहळू हळूहळू लोकांच्या कडून ओरबाडून घेण्याऐवजी दात्याची भूमिका जास्त आनंददायी वाटू लागली. स्वतःच्या पलिकडे विचार करायला त्यांना त्यांच्या नातवाने शिकवले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सहवासाने आपल्या धाकट्या सूनबाईंचा पण त्यांना अभिमान वाटू लागला. चांगली व्यक्तिमत्त्व घडायला उच्च कुलीन असावे लागते हा त्यांचा भ्रम पूर्णपणे नष्ट झाला. हो, नाहीतर त्यांचे दोन मोठे मुलगे असे छानछोकीचे आणि बेबंद आयुष्य जगले नसते. अपर्णाताई जेव्हा सौमित्रला जवळ घेऊन प्रेमाने थोपटत बोलताना, राजेसाहेब निरखून पहात असत. असे प्रेमळ, सौम्य

a

शब्द त्यांच्यासाठी नवीन होते. त्यांचा त्यांच्या मुलांशी हडेलहप्पीचा व्यवहार होता याची त्यांना आठवण येई. सौमित्रच्या प्रेमाखातर त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व बदलले गेले आहे ही गोष्ट रयतेच्या लक्षात आली. आणि मग 'रयतेचा राजा' अशी ओळख मिळायला फार वेळ लागला नाही. मुंबईत अगदी सर्वसामान्य बूट पॉलिश करणाऱ्या मुलापासून, रस्त्यावर केळी विकणाऱ्या स्त्रीला मदत करणाऱ्या, त्यांच्या नातवाला उच्च कुलीन घराण्यातील रितीरिवाज शिकवण्यासाठी गरज पडली नाही. उलट त्याच्याकडून इतरांना फक्त शिकण्यासारखे अनेक गुण होते.

सौमित्रने पुढील शिक्षण खास युवराजांच्यासाठी असलेल्या शिक्षणसंस्थेमध्ये जाण्यास आपल्या वडिलांच्या प्रमाणे नकार दिला आणि संस्थानाच्या शाळेत शिकायला सुरुवात केली. यथावकाश बबनचे शिक्षण पूर्ण झाले, तो शंकरला भेटायला निघाला तेव्हा त्यांने बापू शेठना कुंतलपूर सोडून नागपूरला येण्याविषयी विचारले असता, त्यांनी सपशेल नकार देत हा विषय कायमचा संपला असे जाहीर केले. "मला सौमित्र जवळ कायमचे रहायचे आहे," हे त्यांचे म्हणणे होते.

अशा रितीने साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण झाली..

# समाप्त

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सतरावे वर्ष.

## सौ गायत्री साळवणकर यांचे ईसाहित्यवर हे तिसरे पुस्तक.

सौ गायत्री साळवणकर या पाश्चात्य दर्जेदार साहित्याच्या अभ्यासक आहेत. आपली मराठी ही दोन हजाराहून अधिक वर्षे साहित्यव्यवहार असलेली भाषा आहे. अमृतातें पैजा जिंकणारी. मुक्ताई, महदंबेची, बहिणाबाईची ही भाषा. जगातील कोणत्याही भाषेइतकीच समृद्ध. पण आज सोळा कोटींची ही भाषा जगातील लहान सहान भाषांतील साहित्यव्यवहाराशी तुलना करता मागे पडत आहे याची जाणीवही कोणाला फ़ारशी नाही. अशा वेळी जागतिक साहित्यातील हिंरे माणके आपल्या वाचकांच्या वाचनात यावी अशी तळमळ असणारे जे काही लेखक लेखिका आहेत त्यापैकी गायत्रीजी एक आहेत. आजच्या वाचकांतूनच उद्याचे नवलेखक जन्माला येणार आहेत. त्यांना जागतिक साहित्यातल्या प्रवाहांची ओळख असणे आवश्यक आहे. ते कार्य गायत्रीजी करत आहेत.

सौ गायत्री साळवणकर यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले

a

(१०), डॉ. नितीन मोरे (५२ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१२), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (८), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४२), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (५), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (५), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, उत्कृष्ट लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली उत्तमोत्तम पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

a

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें

